नूतन मराठी विद्यालय

स्मारकग्रंथ

अथवा

गेल्या पन्नास वर्षांची कामगिरी

सुवर्णमहोत्सव-दिन

१-१-१९३३

कै. विष्णुशास्त्री चिपळूणकर.



यांच्या स्मरणार्थ
नूतन मराठी विद्यालय १-१-१८८३ रोजीं स्थापन झालें.

नूतन मराठी विद्यालय

(स्थापना १-१-१८८३)

स्मारकग्रंथ

अथवा

गेल्या पन्नास वर्षांची कामगिरी




सुवर्णमहोत्सव-दिन

१-१-१९३३

प्रकाशकः—प्रो. त्र्यं. भि. हर्डीकर चिटणीस, नू. म. वि. सुवर्ण महोत्सव-मंडळ,
नूतन मराठी विद्यालय हायस्कूल, पुणें २.

मुद्रकः—स. रा. सरदेसाई, बी. ए., एल्एल्. बी., नवीन समर्थ विद्यालयाचा
'समर्थ भारत' छापखाना, ९४७ सदाशिव पेठ, पुणें २.


ज्यांच्या
अविश्रांत परिश्रमानें,
स्वार्थत्यागानें
व
एकनिष्ठ भक्तीनें
नूतन मराठी
विद्यालयाचा
उत्तरोत्तर उत्कर्ष
होत गेला
त्या
सर्व दिवंगत व विद्यमान
व्यक्तींच्या पुण्यस्मरणार्थ

विद्यालयाभिनन्दनम्

कविः—मुकुन्दरायः

याते श्रीमति विष्णुशास्त्रिणि दिवं दिव्यप्रभाभासुरे
तस्यात्र स्मृतिचिह्नमेष सुजनैर्विद्यालयो निर्मितः।
विस्तारस्त्वधुनातनोऽस्य वदति स्वार्थानपेक्षा इह
सामान्या अपि निश्चयेन महता किं किं न कुर्युर्नराः॥ १॥

शिष्या नैकविधोद्यमेषु निरताः शालीनताद्यैर्गुणैः
कीर्तिं दिक्षु वितन्वते शुचितरां विद्यालस्यानिशम्।
नूनं शास्त्रिवरो महोत्सवमिमं गोपालबालादिभि-[1]
र्निःस्वार्थैः सहकारिभिः सकुतुकं स्वर्गस्थितः पश्यति॥ २॥

श्रीकारात्प्रभृति प्रकाममिह च ज्ञानं महोपाधिमत्
लब्ध्वा स्वल्पधनेन मातरमिव प्रस्तौति शालां जनः।
केषांचित्समभूदसौ कुलगुरुः शाला महादेवता
यस्याः शिष्यवरो विराजति पिता सार्धं सुतैर्नप्तृभिः॥ ३॥

प्रोत्तुंगानि गृहाणि राजभवनैस्तुल्यानि यस्या बहू-
न्युत्साहैकपरैः सदैव बटुभिः क्रीडांगणं संकुलम्।
निष्णाता गुरवः स्वकीयविषये नीतिप्रिया वत्सलाः
कोऽसौ नाम गुणो न येन जनताचित्तानि संस्था हरेत्॥ ४॥

---

१ आगरकरटिळकादिभिः।

प्रस्तावना

स्मारकग्रंथाची कल्पना निघून आज सहा महिन्यांच्या खटपटीनंतर तो प्रसिद्ध होत आहे. पैकीं नू. म. विद्यालयाचें इतिवृत्त मुख्य संपादकांनीं तयार केलें असून रा. शं. द. गोखले व. द. प. जोशी यांनीं अनुक्रमें खेळांसंबंधींचें व बालवीर चळवळीसंबंधींचें शाळेंतील वृत्त लिहिलें आहे.

अनेकांकडून आठवणी मागविल्या, जाहीर विनंतीहि सर्व पत्रांतून केली, तथापि फारच थोड्या प्रसिद्ध करण्यासारख्या आठवणी हातीं आल्या. डॉ. घाटे यांनीं कॉलेज निघालें तेव्हां आठवणीचा सुंदर लेख लिहिला होता, तो येथें मुद्दाम दिला आहे. आज डॉ. घाटे असते तर खरोखरच हें वृत्तकथन आपल्या व इतरांच्या आठवणींनीं मनाप्रमाणें सजवून त्यांनींच प्रसिद्ध करण्याचें श्रेय साधलें असतें, याची मला शंका नाहीं. परवां परवां विद्यालयाचे अभिमानी माजी विद्यार्थी प्रो. रा. वि. ओतूरकर यांना स्मरण देतांच वेळांत वेळ काढून त्यांनीं आठवणी लिहून पाठविल्या, याबद्दल वाचकहि संपादकांइतकेच स्वतःस त्यांचे ऋणी समजतील.

वृत्तकथन व आठवणी हे दोन भाग झाल्यावर तिसरा महत्त्वाचा भाग आंकडेवार जीं अनेक परिशिष्टें व आलेख हीं जोडलीं आहेत त्यांचा आहे. खरी माहिती हीं परिशिष्टें जितकी बोलतात तितकी दुसऱ्या कोठूनहि मिळावयाची नाहीं.

शेवटचा चवथा भाग यादीचा. यासाठीं परिश्रम रा. गोविंदराव भावे व रा. शंकरराव गोखले यांचे झालेले आहेत. हें काम फार किचकट होतें आणि लोकांकडून वेळेवर व निश्चित माहिती येण्यावरच हें काम चोख होणें सर्वस्वीं अवलंबन होते. तथापि, आज झाली तेवढी मेहनत रा. भावे यांनीं केली आहे. यादी, वर्गीकरण व यांतली ठळक ठशांची योजना वगैरे सर्व भाग रा. भावे यांच्या श्रमाचा आहे. सूचींतील नांवांपुढील आंकडे व्यवसाय दाखविण्यासाठीं घातले आहेत. उदाहरणार्थ, १ सरकारी नोकर, ५ डॉक्टर, ११ खासगी व्यवसाय. खरोखर हें काम फार उपयुक्त झालें, असेंच सर्वांना वाटेल.

दुर्दैवानें शाळेचें दप्तर भटवाडा जळाला त्या वेळीं अग्नियेस्वाहा झालें; त्यामुळें जुनीं रजिष्टरें, पत्रकें, अहवाल, हजिऱ्या सर्व नाहींशा झाल्या. मग माहिती तयार करावी कोठून? अशी अपरिहार्य अडचण असतांहि जमवितां आली तेवढी माहिती एकत्र केली आहे. विद्यार्थ्यांच्या अखेरच्या यादींत पुष्कळ उणीवा अजूनहि सांपडतील, असें रा. भावे याचें म्हणणें आहे व तें यथार्थ आहे. सर्वांनीं जर मनावर घेऊन ती यादी परिपूर्ण व निर्दोष व्हावी यासाठीं चुका इकडे कळविल्या, नवीन माहितीची भर घातली तर विद्यालयाचा हीरक महोत्सव आणखी दहा वर्षांनीं साजरा करण्याचा सुप्रसंग जेव्हां येईल, त्या वेळीं पक्की यादी तयार करून प्रसिद्ध करण्यास ज्यास्त उत्साह वाटेल. आहे या स्थितींतहि तिचा सर्व नूतन

मराठी मंडळीस फार उपयोग होईल. अद्यापिहि शाळेंत जेवढीं नांवें रजिस्टरला लागलीं तेवढीं घेतलीं व **मराठी** शाळेंतील नांवांची त्यांत भर घातली तर ही यादी भयंकर फुगेल. हें काम अफाटच आहे. पण प्रसिद्ध न केली तर अशी **अकारविल्हेची एक विद्यार्थि-सूचि** अखिल नू. म. वि.ची करून ठेवण्याची योजना या पन्नाशीच्या सुप्रसंगी ठरेल तर मोठेंच कार्य होईल,

वास्तविक हा पन्नाशीचा उत्सव नू. म. वि.च्या मराठी शाळेचा अधिक यथार्थानें आहे. कारण १ जानेवारी १८८३ला केवळ मराठी शाळा (सहा इयत्ता) स्थापन झाली. तथापि, लागलीच त्याच सालीं इंग्रजीचें काम सुरू झालें व तेंहि नूतन मराठी विद्यालय याच नांवानें चाललें व आजहि चालत आहे. म्हणून अभेदभावानेंहि पन्नाशी साजरी करण्यास प्रत्यवाय नाहीं.

संपादकमंडळाला अनेकांचें बिनमोल साहाय्य झालेलें आहे. तथापि, या ग्रंथांत अनेक उणीवा आम्हांस दिसत आहेत. तसा योग आला तर त्यांची सुधारणा होऊन सर्वांग-सुंदर असें **विद्यालयवृत्त** आपणांस सादर करण्यास आम्हांस संतोष वाटेल. तोंवर आम्हीहि आणखी जुळवाजुळव करूं.

विद्यालयवृत्ताप्रमाणेंच इतर गांवोगांवींच्या अनेक संस्थांची सविस्तर वृत्तें प्रसिद्ध होतील तर त्यांचा उपयोग करून कोणीतरी महाराष्ट्रांतील शिक्षणाचा एक विस्तृत व वाचनीय इतिहास रचील आणि तो ग्रंथ अत्यंत उद्बोधक व मार्गदर्शक असा होईल.

हें विद्यालयवृत्त रचतांना ज्यांनीं साह्य केलें त्या सर्वांचें संपादकमंडळ फार फार ऋणी आहे.

ग्रंथांत घालण्यासाठीं आणखी बरेच फोटो मागविले होते. परंतु ते वेळेवर हातीं आले नाहींत, त्यामुळें नाइलाज झाला. इतरहि ज्ञाताज्ञात दोषांबद्दल सर्वांनीं क्षमा करावी व केलें आहे तेवढें काम गोड करून घ्यावें एवढीच विनंति.

मार्गशीर्ष वद्य १३, शके १८५४. **दत्तो वामन पोतदार**

अनुक्रमणिका

भाग पहिला (इतिहास)

खंड

१ ला स्थापना व घटनाबंधन, १८८३–८८ ... १

२ रा मॅट्रिकची मजल, १८८८–९६ ... ... २१

३ रा वनवासांतून विद्यामंदिरांत, १८९६–१६ ... २६

४ था कार्याचा विस्तार आणि भावंडांची जोड, १९१६–३२ ६३

५ वा परिशिष्टें—

१ नू. म. वि. पन्नास वर्षांतील ठळक गोष्टींची तारीखवार जंत्री ८१

२ लेखक व संपादक, माजी विद्यार्थी ८७

३ नू. म. विद्यालयाचे व्यवस्थापक ८८

४ हायस्कूलचे विद्यार्थि-श्रेष्ठ ८९

५ वेळोवेळीं शिष्यवृत्ति मिळविणारे विद्यार्थी ... ९०

६ आलेख–१ नू. म. वि. इंग्रजी शाळेंतील विद्यार्थ्यांच्या संख्येची वाढ दाखविणारा ९२

२ मॅट्रिक पास झालेल्यांची शेंकडेवारी दाखविणारा ९३

७ वार्षिक वासंतिक उपदेशांची यादी ९४

भाग दुसरा (क्रीडाविषयक)

क्रीडाविषयक अहवाल १

मिळालेलीं बक्षिसें १६

विद्यालयांतील बालवीर १८

भाग तिसरा (आठवणी)

डॉ. वि. स. घाटे १

पं. द. के. जोशी ४

प्रो. रा. वि. ओतूरकर ६

रा. शि. ल. करंदीकर २०

रा. भा. धुं. ओंकार २२

रा. ना. शं. ब्रह्मे	...	...	...	२३
रा. ह. शि. सहस्रबुद्धे	...	...	...	२४
रा. र. वि. करंदीकर	...	...	...	२४
रा. अ. ब. आगाशे	...	...	...	२६
रा. वि. कृ. जोशी	...	...	...	२६
रा. वि. रा. देशपांडे	...	...	...	२७
साठेबंधु	...	...	...	२८
रा. शां. ना. नगरकर	...	...	...	२८
रा. ग. गो. देव	...	...	...	३०
प्रि. वि. ग. आपटे यांस दिलेलें मानपत्र		...	...	३१

भाग चवथा (संकीर्ण माहिती)

शिक्षकांची यादी	...	...	...	१
सालवार आंकडे	...	...	...	१४
बक्षिसें व शिष्यवृत्त्या	...	...	...	२०
शिक्षणप्रसारक मंडळीचें कौन्सिल		...	...	२१

भाग पांचवा (सहोदर संस्था)

सर परशुरामभाऊ कॉलेज	...	...	...	१
हरिभाई देवकरण हायस्कूल	...	...	...	३
मीमांसा विद्यालय	...	...	...	४
शिक्षणप्रसारक ग्रंथशाळा	...	...	...	५
विद्यार्थिभांडार	...	...	...	६

भाग सहावा (माजी विद्यार्थ्यांची जंत्री)

प्रास्ताविक	...	...	...	१
व्यवसायवार जंत्री...		...	...	३
पुढील अभ्यासक्रमांत असलेले	...	...	...	५८
सूचि	...	...	...	७४
पुरवणी जंत्री	...	...	...	११३

मेहेरवान श्रीमंत शंकरराव आप्पासाहेब पटवर्धन
अधिपति संस्थान जमखंडी.



अध्यक्ष, शिक्षण प्रसारक मंडळी.

भाग पहिला

इतिहास

॥ श्री ॥

नूतन मराठी विद्यालय

गेल्या पन्नास वर्षांची कामगिरी

इ. स. १८८३ ते १९३२ अखेर] [शके १८०४ ते १८५४

पहिला खंड

इ. स. १८८३ ते १८८८

स्थापना व घटनाबंधन

स्थापना : विष्णुशास्त्री यांचें स्मारक

विष्णु कृष्ण चिपळोणकर हे आधुनिक महाराष्ट्राचे एक थोर प्रवर्तक म्हणून गणले जातात. पतित वर्गात मोडणाऱ्या आपल्या भारत देशाला पुनः वैभवगिरिशिखरावर नेऊन बसविण्यासाठीं सर्वत्र शिक्षणप्रसार केला पाहिजे ही तळमळ त्यांचे मनांत वागत होती. निबंधमाला रचून त्यांनीं नवीन इंग्रजी विद्येनें दिपलेल्या लोकांना जागें केलें. इतकेंच नव्हे तर यच्चयावत् लिहिणारा व वाचणारा महाराष्ट्र त्यांनीं उठविला! आणि पुढें 'केसरी' काढून दर आठवड्याला जागृतीचा नौबदनगारा त्यांनीं जोरानें वाजाविण्याचा क्रम सुरू केला. जिकडेतिकडे त्यामुळें खळबळ उत्पन्न झाली. लोकांची कैक दिवसांची झापड उडाली आणि लोक कामाला लागण्याच्या विचारास लागले. न्यू इंग्लिश स्कूलची स्थापना त्यांनीं टिळक व नामजोशी यांचे साहाय्यानें केली आणि आगरकर व आपटेप्रभृति कर्त्या तरुणांची जोड मिळविली. पोट भरण्याचा एक उद्योग म्हणून कांहीं ही मंडळी या शाळेच्या वगैरे खटपटींत पडली असें नाहीं तर, सर्वत्र शिक्षणप्रसार करावा, नवचैतन्य खेळवावें, आत्मप्रत्यय उत्पन्न करावा, सारा महाराष्ट्र अशा शिक्षणसंस्थांनीं बांधून काढावा आणि स्वतःच्या देशाच्या शिक्षणाचा उद्योग स्वतः लोकांनींच चालविणें योग्य व शक्य आहे असें प्रस्थापित करावें असा उदात्त हेतु या मंडळींचा होता. हा हेतु नुसता मनांत किंवा दप्तरांत न ठेवतां वरील मंडळींनीं महदुद्योग आरंभून प्रत्यक्ष सिद्ध करून सर्वांची खात्री करून दिली आणि महाराष्ट्रांत त्या योगें

मोठेंच क्रांतीचें बीज पेरलें. शके १८०४ (१८८२ इ. स.) मध्यें जें विद्यासमीक्षणमंडळ (हंटर कमिशन) नेमलें होतें त्याचे अध्यक्ष डॉक्टर हंटर यांनीं देखील 'अशी संस्था उभ्या हिंदुस्थानांत आपण पाहिली नाहीं असें स्पष्ट प्रतिज्ञेवर सांगतों,' असे आश्चर्योद्गार काढले. एवढा परिणाम या नूतनोपक्रमाचा झाला. याच सालीं डॉ. मॅकिकन यांनींहि पुणें येथील सरकारी हायस्कूल बंद करावें किंवा कसें याची चौकशी करण्याची वेळ आली आहे असें म्हटलें; आणि त्या वेळच्या टाइम्स ऑफ इंडियाच्या संपादकानें तर असें दूरदर्शी भविष्य वर्तविलें कीं, एकंदर हिंदुस्थानाच्या भावी परिस्थितीवर या नवीन घटनेचे विलक्षण परिणाम घडतील. यावरून यांतील मर्म त्यांनीं बरोबर ताडलें होतें व तें असें कीं परकीय सरकारावर आपल्या जीवनासाठीं किंवा महत्त्वासाठीं अवलंबून न राहतां शिक्षण, वाङ्मय, व्यापार वगैरे सर्व शाखांत आपण स्वतःच स्वाभिमानपूर्वक प्रयत्न करून नांव आणि कीर्ति मिळविली पाहिजे असा वास्तविक या सर्व खटाटोपाचा अर्थ आहे. तात्पर्य, विष्णुशास्त्री यांनीं नवीन इंग्रजी शाळा काढून ज्या उद्योगाचें बीजारोपण केलें त्याचें अपरंपार महत्त्व यावरून सर्वांचे ध्यानांत येईल.

शास्त्रीबुवांच्या उद्योगाच्या प्रभावानें जशी इंग्रजी शिकलेल्या तरुण पिढीवर छाप पाडली तशीच त्या वेळेच्या मराठी शिकणाऱ्या तरुणांवरहि पाडली. इंग्रजी शिकणारे तरुण मुख्यतः डेक्कन कॉलेजांत होते आणि मराठी शिकणारे तरुण पुण्यास ट्रेनिंग कॉलेजांत होते. वास्तविक ट्रेनिंग कॉलेज आणि डेक्कन कॉलेज या दोन्ही संस्थांचा उगम एकाच ठिकाणाहून झालेला होता. इंग्रजी अंमलाच्या प्रारंभीं अल्फिन्स्टन साहेबांनीं प्रयत्न करून पुणें संस्कृत कॉलेज १८२१ त स्थापन केलें; त्याचींच अनेक स्थित्यंतरें होतां होतां इ. स. १८६३ त इंग्रजींतून शिक्षण देणारें पूना कॉलेज आणि मराठींतून उच्च शिक्षण देणारें व्हर्नाक्युलर कॉलेज अशा मूळच्या संस्थेच्या दोन शाखा झाल्या. दुर्दैवानें व्हर्नाक्युलर कॉलेजचा उपक्रम १८६५ सालीं बंद झाला. पुढें पूना कॉलेजचें इ. १८६८ त डेक्कन कॉलेज झालें आणि व्हर्नाक्युलर कॉलेजच्या जागीं ट्रेनिंग कॉलेज आलें आणि त्याचे पहिले प्रिन्सिपाल कृष्णशास्त्री चिपळूणकर हे झाले.

याच कृष्णशास्त्र्यांचे चिरंजीव विष्णुशास्त्री आणि याच ट्रेनिंग-कॉलेजांतून बाहेर पडलेले कित्येक तरुण त्यांच्या शिकवणीच्या मोहिनीनें भारून जाऊन नूतन मराठी विद्यालयाचे स्थापनकर्ते झाले. ट्रेनिंग कॉलेजांतून एक प्रकारें नूतन मराठीचा उदय झाला; आणि पुढें नूतन मराठींतून न्यू पूना कॉलेज निघालें आणि त्यानें ट्रेनिंग कॉलेजाचें वडील भावंड जें पूना कॉलेज त्याचीच परंपरा पुढें चालविली. हा योगायोग मोठा विलक्षण म्हटला पाहिजे. असो.

ज्या वेळीं विष्णुशास्त्री निबंधमाला लिहीत होते व ट्रेनिंग कॉलेजांतील तरुण मंडळी तिचीं पारायणें करीत होती त्या वेळीं रा. कृष्णाजी बळवंत डोंगरे, रामचंद्र गोपाळ देव, कृष्णाजीपंत उकिडवे व दामोदर सदाशिव करंबेळकर वगैरे मंडळी ट्रेनिंग कॉलेजांत शिकत होती. या वेळीं कै. रा. ब. सिताराम विश्वनाथ पटवर्धन यांची प्रिन्सिपाल म्हणून कडक कारकीर्द या कॉलेजांत चालू होती. तथापि निबंधमालेनें ट्रेनिंग कॉलेजचे विद्यार्थी झपाटल्याशिवाय राहिले नाहींत. केवळ सरकारी नोकरींत गुरफटून न राहातां कांहींतरी **स्वतंत्र असा देशसेवेचा मार्ग** आपण अवलंबावा अशी स्फूर्ति पुष्कळांस साहजिकच होत होती व वर वर्णन केलेलीं टिळकआगरकरांचीं यशस्वी उदाहरणें त्यांच्या डोळ्यांसमोर होतीं.

केवळ ट्रेनिंग कॉलेजांतील मंडळी असा काय स्वतंत्र उपक्रम करूं शकतील हें सांगणें कठिण होतें. १०—२० रुपयांच्या सनदी नोकरीचें अभिवचनपत्रक फार तर त्यांच्या हातांत होतें; परंतु त्यालाच मोहानें कवटाळून बसणारे आणि त्याजवर जीव ठेवून राहणारे असे शेंकडो लोक होते. तसें म्हटलें तर दहावीस रुपड्यांची कथा काय! याहूनहि दसपटीनें सुखाची असलेली सरकारी नोकरी तिला रुपेरी बेडी समजून विष्णुशास्त्री यांनीं ताडकन् तोडून टाकिली आणि **बागेदारपणाचें नवीन युग** सुरू केलें होतें. अर्थात्, आपणहि सर्टिफिकेट आणि सरकारी नोकरी यांचा **मोह तोडून टाकावा** अशी प्रबल इच्छा डोंगरे प्रभृति तरुणांस झाली यांत नवल नाहीं. त्यांनीं असा विचार केला कीं, एकंदर शिक्षण समाजाच्या अगदीं खालच्या थरांपर्यंत लोकांत पसरावयाचें असेल तर तें **इंग्रजींतून देऊन चालणार नाहीं**, तर तें जन्मभाषेंतूनच दिलें पाहिजे. अर्थात् **पायाशुद्ध शिक्षणाची सुरुवात करावयाची असेल तर ती आरंभापासूनच केली पाहिजे.**

आतां निवळ मराठी शाळा चालवावयाची म्हटलें तर त्याला पुष्कळच अडचणी होत्या. एकतर सरकारी शाळा गांवांत बऱ्याच होत्या; आणि त्यांतील शिक्षणहि अति स्वस्त असे. अशा स्थितींत नवीन मराठी शाळा काढली तर ती चालावी कशी! परंतु न काढली तर पायाशुद्ध शिक्षण व्हावें तरी कसें! असा दुहेरी पेंच नवीन तरुणांपुढें पडला होता. त्यांतून अखेर दृढ निश्चयानें बाटेल त्या अडचणी सोसून उपक्रम केलाच पाहिजे, हीच तीव्र इच्छा यशस्वी झाली; आणि ता. १ जानेवारी* १८८३ सालीं ज्या वाड्यांत न्यू इंग्लिश स्कूल स्थापन झालें होतें त्याच इतिहासप्रसिद्ध अशा **मोरोबादादा फडणीसांच्या** जाळीदार वाड्यांत नूतन मराठी विद्यालय स्थापन केल्याचें जाहीर करण्यांत आलें.

---

*सोमवार मि. मार्गशीर्ष व. ८ शके १८०४.

कै. रा. उकिडवे यांचा कारभार

या स्थापनेचे कामीं खटपट करणाऱ्या मंडळींत रा. कृष्णाजी गोविंद उकिडवे या नांवाचे गृहस्थ प्रमुख होते. रा. उकिडवे हे प्रथमदर्शनीं लोकांवर छाप टाकणारे, हुशार, परंतु जरा उलाढालीच म्हटलें तरी चालेल असे, गृहस्थ होते.

या गृहस्थांना मुख्य व्यवस्थापक नेमून नूतन मराठी विद्यालयाचा कारभार सुरू झाला, त्यासंबंधानें ता. २ जानेवारी १८८३ च्या केसरींतील इहवृत्तांत पुढीलप्रमाणें मजकूर आला आहे.

"काल रोजीं आमच्या या पुण्यांत एक नूतन मराठी विद्यालय स्थापन झालें. हें विद्यालय रा. कृष्णाजी गोविंद उकिडवे व त्यांचे ट्रेनिंग कॉलेजमधील मित्र यांनीं कै. वे. शा. सं. रा. रा. *विष्णुशास्त्री चिपळूणकर यांच्या स्मरणार्थ सुरू केलें आहे. शास्त्रीबोवांचे महाराष्ट्र भाषेवर अनंत उपकार झाले आहेत त्यांचें हें 'मराठी' विद्यालय योग्य स्मारक होईल. आरंभालाच सुमारें ८० विद्यार्थी आले असें कळतें; यावरून रा. उकिडवे यांचे श्रमाला बरेंच यश येईल असें दिसतें. फीचे दर ६ आणे व ८ आणे आहेत. शाळेच्या उद्देशाप्रमाणें थोडक्याच दिवसांत ही शाळा 'न्यू इंग्लिश स्कूल' ची सहकारी होवो, असें आम्ही इच्छितों."

यानंतर लागलीच ता. २३ जानेवारी १८८३ च्या केसरीवरून कळतें कीं, फेब्रुवारी महिन्याच्या पहिल्या तारखेपासून लहान मुलांना लवकर लिहितांवाचतां

[रा. उकिडवे यांचा जन्म सांवतवाडीस झाला आणि प्राथमिक शिक्षण तेथेंच झालें. (मराठी ६ वी इयत्ता=वर्ग ग्रंथाध्ययन) पुढें 'स्वकष्टार्जित द्रव्योपार्जनानें कांहींतरी शिक्षणाचा मार्ग चोखाळावा' म्हणून ते शिक्षणाकरतां पुण्यास ट्रे. कॉलेजमध्यें आले आणि तेथील सनदहि त्यांनीं मिळविली. पण नोकरी न करतां त्या वेळेस 'निबंधमाला केसरी मराठा यांच्या प्रखर तेजानें जो चोहींकडे भडका उडून राहिला होता, त्यांतील कोल्हापूर प्रकरणांत केसरीमराठ्यांच्या बाजूनें सर्व कोंकणपट्टी फिरून यांनीं प्रेसफंड मिळविण्याची खटपट केली. 'सत्संगाद्भवति हि साधुता खलानाम्' या न्यायाला अनुसरून शास्त्रीबुवांच्या पश्चात् त्यांच्या हेतूप्रमाणें आपणहि थोडेंफार वागून दाखविण्याची इच्छा' झाल्यामुळें रा. उकिडवे यांनीं स्वतंत्र धंदा करण्याचा निश्चय केला. त्यांना 'शिरजोर भागिदार' मिळाले आणि नूतन मराठी विद्यालयाची स्थापना झाली. पुढें लवकरच म्हणजे १८८४ सालच्या आरंभीं रा. उकिडवे यांना खाजगी कारणांमुळें शाळेचा संबंध सोडून जाणें भाग पडलें.' (शाळेचें पत्रक) पुढें त्यांनीं बडोद्यास शाळा काढली त्यांतहि त्यांस अपयश आलें, इत्यादि हकिकत रा. उकिडवे यांनीं इ. स. १८९१ त प्रसिद्ध केलेल्या 'समाजविवेक' नामक निबंधांत आढळते. ती बहुतेक त्यांच्याच शब्दांत येथें दिली आहे.]

* * * *

* या प्रकरणांत उताऱ्यांतील मजकुरांत टळक टसे आढळतील ते आमचे समजावे.

येईल अशा रीतीनें शिक्षण देऊन दरमहा १ रु. फी ठेवून इन्फंट क्लास सुरू करण्याचा योजना चालकांनीं सुरू केली.

कांहीं सुधारणा

पुढच्याच महिन्यांत ता. ६ फेब्रुवारी १८८३ रोजीं केसरींत एक सविस्तर खुलासा प्रसिद्ध झाला आहे तो खालीं दिला आहे, त्यावरून दिसतें कीं, एक महिन्याच्या आंतच नूतन मराठी विद्यालयांत ३५० विद्यार्थी झाले. व्यवस्थापकांनीं प्रथमपासूनच नूतन मराठींत द्यावयाच्या शिक्षणाबाबत त्या वेळीं इतरत्र चालू असलेल्या शिक्षणपद्धतीपेक्षां कांहीं सुधारणा अंमलांत आणल्या. मराठींतून विषय शिकविले असतां मुलांना लवकर व पक्कें ज्ञान होतें या सिद्धान्तावर चालकांची दृढ श्रद्धा असल्यामुळेंच त्यांनीं नूतन मराठी विद्यालय स्थापन करण्याचा उपक्रम केला हें उघड आहे. आधीं मराठीचा पाया भक्कम करून मग मुलांस इंग्रजी शिकविलें असतां तें त्यांना सुलभ पडेल असा अनुभव रा. वामनरावजी आपटे यांच्या शाळेंत रा. देवस्थळी यांनीं चालवलेल्या वर्गांच्या अनुभवावरून आला होता. आपला उपक्रम यशस्वी झाल्यास आपलें नूतन मराठी विद्यालय हें न्यू इंग्लिश स्कूलची ब्रँच अथवा शाखा करावी असा चालकांचा हेतु होता. आपली मराठी शाळा स्थापन करण्यापूर्वी चालकांनीं कै. विष्णुशास्त्री यांजवळहि बाटाघाट केल्याचें आम्हांस माहीत आहे. परंतु निव्वळ मराठी शाळा चालणें अशक्य आहे, असा आपला अभिप्राय शास्त्रीबोवांनीं चालकांजवळ व्यक्त केला होता. शास्त्रीबोवा वारल्यावर शास्त्रीबुवांच्या स्मरणार्थ म्हणून चालकांनीं नूतन मराठी विद्यालय स्थापून आपला हेतु तडीस नेला. शास्त्रीबोवांचे प्रमुख सहकारी टिळक, आगरकर, नामजोशी व आपटे, विशेषतः टिळक व आगरकर यांचा सल्ला चालक मंडळी हमेश घेत असे; आणि तेहि अत्यंत मनापासून आणि कळकळीनें सल्ला देत असत. शाळेचे चालक हे रा. आगरकरांचे घरीं जाऊन अपरात्र झाली तरीसुद्धां त्यांचा सल्ला विचारीत आणि तेही पण तशा वेळीं तो देत. नूतन मराठी विद्यालय व न्यू इंग्लिश स्कूल यांचा असा जिव्हाळ्याचा संबंध होता आणि त्याचा स्पष्ट उल्लेख जसा रा. उकिडवे यांच्या केसरींतील लेखांत आहे, तसाच तो रा. वामनरावजी आपटे यांच्या न्यू इं. स्कू. च्या रिपोर्टांतहि आहे. सदरहू दोन्ही लेख आम्ही एकामागून एक असे देत आहोंत.

(केसरी, मंगळवार ता. ६ फेब्रुवारी १८८३)

" आम्ही हस्तपत्रीं प्रसिद्ध केल्याप्रमाणें जानेवारी महिन्याचे पहिले तारखेस कै. वे. शा. सं. रा. रा. विष्णुशास्त्री चिपळूणकर यांचे स्मरणार्थ म्हणून ' नूतन मराठी विद्यालय ' स्थापन केलें आहे; यांत सरकारी शाळांत चालूं असलेल्या शिक्षणपद्धतींत बदल करून शिकविण्याचा आमचा विचार आहे. भूगोल, इति-

हास इत्यादि विषय शिक्षकांनीं गोष्टींसारखे शिकविले असतां सनतारखांची घोकंपट्टी करण्यापेक्षां इतिहासादि विषय शिकविण्याचा उद्देश भिन्न है विद्यार्थ्यांच्या लक्षांत आल्यावांचून राहणार नाहीं. आजच जरी नाहीं तरी थोड्या दिवसांत (मराठींत शिकविले जात नाहींत असे) बीजगणित, चार पुस्तकें, भूमिति, अंकगणिताची उपपत्ति, संस्कृत इत्यादि विषय शिकविण्याचा आमचा विचार आहे. व्यवहाराशीं ज्याचा निकट संबंध व पदोपदीं ज्याची आवश्यकता असा जो पदार्थविज्ञानविषय व रूपावली हे तूर्तच शिकविण्याला प्रारंभ केला आहे. विद्यार्थ्यांनीं धर्माप्रमाणें वागून नास्तिक न व्हावें म्हणून नमस्कार घालणें, संध्या करणें, आईबापांची मर्यादा राखणें इत्यादि गोष्टींकडे पूर्ण लक्ष पोहोंचविणार आहोंत. इतकेंच नव्हे तर हा प्रश्न महत्त्वाचा आहे असें आमचें मत आहे. मराठी विषय उत्तम शिकविले असतां पुढें इंग्लिश शिकण्याला किती सोपें जातें याबद्दल परवा बक्षिससमारंभाचे वेळीं रा. रा. वामनराव आपटे, न्यू इंग्लिश स्कूलचे सुपरिंटेंडेंट, यांनीं वाचलेल्या रिपोर्टावरून कळून येईलच. ईश्वरकृपेनें व लोकाश्रयानें आम्हीं हातीं घेतलेलें कृत्य उत्तम रीतीनें तडीस गेलें तर थोड्या मुदतींत ही शाळा न्यू इंग्लिश स्कूलची ब्रँच करून यांत इंग्रजी तीन ईयत्तांपर्यंत शिक्षणहि देऊं. प्रत्येक मनुष्याचा विषय त्याला चांगला अवगत होऊन तो दुसऱ्यालाहि चांगल्या रीतीनें शिकवितां येतो म्हणून चार, पांच, सहा या ईयत्तांत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना शिकविण्यासाठीं एकच शिक्षक न नेमतां निरनिराळे विषय शिकविण्यासाठीं शिक्षक नेमिले आहेत. प्रस्तुत ही पद्धति लोकमान्य आहे. खालील ईयत्तांसाठीं एकेक शिक्षक कायम केला केला आहे. वरील तीन ईयत्तांना शिकविण्यासाठीं ट्रेनिंग कॉलेजच्या पहिल्या क्लासचे शिक्षक असून खालील तीन ईयत्तांवर दुसऱ्या क्लासचे आहेत. शिवाय अक्षर उत्तम होण्याकरितां एक स्वतंत्र मनुष्य ठेविला आहे. बहुतेक सरकारी शाळांमध्यें ट्रेनिंग कॉलेजचा एकच शिक्षक असतो. त्यामुळें त्यांच्यापेक्षां आमचे शिक्षकांच्या हातून विशेष शिक्षण मिळेल अशी आशा आहे.

पुष्कळ आईबापांचा व विद्यार्थ्यांचा दुपारीं अकरा वाजल्यापासून शाळा सुरू करण्याविषयींचा आग्रह दिसल्यावरून त्याप्रमाणें शाळेची वेळ ठेविली आहे. लहान मुलांचे संबंधानें पाहातां असें करणें विशेष सोईचें आहे. शिवाय लहान मुलांकरतां दोनपासून तीनपर्यंत एक तास सुट्टी ठेविली आहे.

ट्रेनिंग कॉलेजच्या पहिल्या क्लासांत पास झालेले जे या शाळेवर आहेत ते व शाळेचे व्यवस्थापक हे सर्व शाळेच्या संबंधानें सारखेच जबाबदार आहेत.

ही शाळा सुरू होऊन एक महिना नाहीं झाला तोंच या शाळेंत सुमारें ३५० विद्यार्थी झाले, यावरून पुष्कळ लोकांनीं आम्हांस उदार आश्रय दिला हें उघड आहे. मराठी शाळा चालणें म्हणजे स्वतःचे जोरानें कितपत चालेल हें

आम्हीं सांगितलें पाहिजे असें नाहीं. हा आमचा प्रयत्न 'दसकी लकडी एकका बोजा' या न्यायानें चालला पाहिजे.

कृष्णाजी गोविंद दांडेकर
व्यवस्थापक
नूतन मराठी विद्यालय.',

Report of the New English School for 1882-83

(Page No. 22)

"(7) While on this subject, I may notice one thing. "A New Marathi School" has been opened in this city, in memory, as the promoters of the school have notified, of the late Vishnu Shastri Chiplunkar, from the 1st of January 1883. The promoters, before issuing the prospectus, consulted us, and we freely gave them hints and directions for their guidance. From what we understand to be their objects, they propose to give to a student in their school the knowledge of all those subjects that are required for the Matriculation in Marathi, before he begins his English course. If we find that the method proposed by them comes up to our mark of expectation, and also find that they are men of sufficient pluck, intelligence, and above all sufficient persevering spirit, we may think of making that school our feeder. We shall, therefore, watch its progress and career with care; and though it is financially independent of our school, we may now and then, as our other duties permit us, personally direct its course with hints and suggestions if necessary. We by no means desire to monopolize all "New" things in our own body. If the school started by these gentlemen be a success—and we earnestly hope it will be—and satisfies our requirements in all respects, we may avail ourselves of the opportunity presented by it and turn it into our feeder. We shall be but too glad to find that some of our requirements are satisfactorily fulfilled by other bodies; and if the school becomes what we wish it should be, we need hardly mention that the present period of a student's instruction will be considerably reduced, and it will save, not only years, but a large waste and misdirection of youthful energies, and thus on the whole effect a considerable saving of money."

इंग्रजीची जोड

नू. म. विद्यालय ही शाळा सुरू होऊन दोन महिने झाले नाहीं तोंच शाळेची लोकप्रियता झराट्यानें वाढत आहे असें अनुभवास आलें. मुलांची संख्या भराभर वाढूं लागली आणि इंग्रजी शिकविण्याची कल्पनाहि पुढें आली. ता. ६ मार्च १८८३च्या केसरींतील जाहिरातीवरून हा हेतु स्पष्ट होतो. सदरहु जाहिरात येणेंप्रमाणें:—

'आम्ही मार्च महिन्याचे पहिले तारखेपासून आमचे शाळेंत इंग्रजी शिकविण्यास प्रारंभ केला आहे. शाळेंतील मुलें चवथी, पांचवी व सहावी या इयत्तांतील असल्यामुळें तें शिक्षण शाळेच्या वेळांव्यतिरिक्त वेळांत ठेविलें आहे. प्रस्तुत इंग्रजी शिकणारे विद्यार्थी ६० असून त्यांचे दोन वर्ग केले आहेत. आमच्या हेतूप्रमाणें मराठी शिक्षण उत्तम प्रकारें चालून इंग्रजी जास्त शिकण्याची सोय जमल्यास तीनहि इयत्ता शिकविण्याचा आमचा विचार आहे.

ट्रेनिंग कॉलेजच्या पहिल्या क्लासचे } कृष्णाजी बल्लाळ डोंगरे, दामोदर सदाशिव करंबेळकर, कृष्णाजी गोविंद उकिडवे'

यापुढील वृत्त लगेच १० जुलै १८८३च्या केसरींत आलें आहे. रा. उकिडवे, व्य. नू. म. विद्यालय, यांच्या सदरहु पत्रावरून असें दिसतें कीं, दक्षिणभागचे रेव्हिन्यु कमिशनर यांचे माजी प्रसिद्ध दफ्तरदार श्रीनिवास शेषो यांचे घाकटे चि. श्री. बाळासाहेब कृष्णराव यांनीं शाळेस कांहीं लांकडी सामानाबाबत मदत केली. एवढ्या अवधींत शाळेंत ४५० विद्यार्थी झाले आणि लोकांनीं उत्तेजनहि बरेंच दिलें.

गव्हर्नरांची भेट व पहिला बक्षिससमारंभ

अशा उत्साहानें शाळेचें काम चालू असतां ता. २४ ऑगस्ट १८८३ रोजीं नामदार गव्हर्नरसाहेब यांनीं शाळेस भेट दिली (केसरी २८ ऑगस्ट). या वेळीं मुलांची संख्या ४८० झाली होती. 'सरकारी मदत शाळेस मिळेल' असें नामदारसाहेब म्हणाले; परंतु अर्थातच या गोष्टीस बराच काळ लागला व बऱ्याच अडचणीहि आल्या!

वर्षाअखेरीस शाळेचा जम बराच दिसून आल्याचें दिसलें. सहावी इयत्तेस ६ विद्यार्थी पाठविले व ४ विद्यार्थी पास झाले. या वेळेपासून ६ वी इयत्तेचे सकाळीं व दुपारीं वर्ग चालू करण्याचें ठरलें. (केसरी, २।१२।८३)

१८८३ च्या ऑगस्ट महिन्यांत शाळेचा पहिला बक्षिससमारंभ झाला. या बक्षिससमारंभाचे वेळीं अध्यक्ष रा. गोपाळराव हरि देशमुख ऊर्फ लोकहितवादी यांनीं वरच्या इयत्तांत मराठीबरोबरच इंग्रजी शिकविलें असतां मुलांच्या शिक्षणास लागणाऱ्या वेळेचा व पैशाचा फायदा होईल अशी या

विद्यालयाच्या व्यवस्थापकांस सूचना केली होती. वास्तविक यापूर्वी मार्च महिन्यापासूनच चालकांनीं इंग्रजीचा उपक्रम केला होता. त्यानंतर सुमारें पांच सहा महिन्यांनीं रा. दामुअण्णा कुळकर्णी हे व्यवस्थापक मंडळीस येऊन मिळाले.

येणेंप्रमाणें शाळेचें पहिलें वर्ष पुरें झालें.

एक सदिच्छा

गळालेलीं मुलें वगैरे काढून पक्के आंकडे पाहतां शाळेच्या १८८५-८६ च्या अहवालावरून असें दिसतें कीं, जानेवारी ८३ त मुलांची संख्या ७१ होती, ती जानेवारी ८४ त ४२५ झाली. शाळेच्या उपक्रमाविषयीं तरुण मंडळींना वाटणारी सहानुभूति कशी वाढत होती याचें लक्षांत ठेवण्यासारखें एक प्रत्यंतर लवकरच आलें. डेक्कन कॉलेजमधील विद्यार्थ्यांनीं शाळेस प्रतिवर्षी शेंदोनशें रुपये पोहोंचविण्याचें योजिलें होतें. हा उपक्रम खरोखरीच अत्यंत अभिनव, अनुकरणीय व उत्साहदायक होता. यासंबंधानें केसरींतील लेख मोठा वाचनीय आहे. सबब तोच येथें उतरून घेतों. (ही लेखणी आगरकरांची दिसते.)

(स्फुट सूचना, केसरी १८८४, २९ जानेवारी)

"येथील 'नूतन मराठी विद्यालय' द्रव्याचे स्वल्पतेनें जेरीस आलें आहे असें पाहून 'डेक्कन कॉलेजां'तील विद्यार्थ्यांनीं त्यास प्रतिवर्षी शेंदोनशें रुपये पोहोंचविण्याचें योजिलें आहे असें समजतें. वरिष्ठ विद्यालयानें कनिष्ठ विद्यालयास हात देण्याचा हा जो स्तुत्य हेतु धरिला आहे, तो अभिनंदनीय व अनुकरणीय होय यांत कांहीं संशय नाहीं. तथापि डेक्कन कॉलेजांतील विद्यार्थ्यांची सर्वसाधारण गरिबी, शुल्क कारणावरून तरुण जनांच्या समाजांत होणारा मतभेद, सतत द्याव्या लागणाऱ्या वर्गणीच्या संबंधानें उत्पन्न होणारी संकोचबुद्धि, घरून येणाऱ्या नेमणुकीचा अत्यंत क्षुल्लक हिस्सा देखील नेहमीं एका बाजूस काढून ठेवतांना मनास अवघड वाटणें, कालांतरानें परोपकारबुद्धीस येणारी क्षीणता व या वर्षांत अशीं कामें हातीं घेण्यास आम्ही बांधलों गेलों नाहीं अशी वृत्ति एकादे वेळेस उत्पन्न होण्याचा सहजसंभव वगैरे उपरोधक गोष्टींचें कांहीं एक चालूं न देतां विद्यार्थी मजकुरांनीं हा उपक्रम कांहीं वर्षें चालविला तर तो त्यांस भूषणावह होणार आहे हें कोण कबूल करणार नाहीं ! वास्तविक पाहिलें तर एवढ्या विद्यार्थिसमूहास ही दर महिना हजामत दोन हजामतींची बाब आहे व सारखा दिल लागल्यास ती सहज तडीस नेतां येण्याजोगी आहे.* "

---

* याप्रमाणें रकम कांहीं वसूल झाल्याचें दिसत नाहीं. हिशेब पाहतां अशी रकम आलीच नसली पाहिजे. असें कळतें कीं रा. मामा करंबेळकर यांजकडे कॉलेजमधील विद्यार्थी हि गणित शिकण्यास येत आणि त्यायोगें हा बूट निघून केसरीप्रवेतों मजल गेली असावी. परंतु तेथेंच सारें खुंटलें असें दिसतें !

मुलांची वाढ व सुधारणा

१८८४ सालच्या ऑगष्ट महिन्यांत मुलांची संख्या ५९२ झाली आणि ८५ च्या ऑगष्ट महिन्यांत ती ६१७ झाली, ८६ सालीं ऑगष्टमध्यें मुलांची संख्या ६१६ झाली. ८३ सालापासून ८६ पर्यंत ३ वर्षांत मुलाची संख्या सारखी वाढत होती; परंतु ६ शेंवर आंकडा जेव्हां गेला तेव्हां ती संख्या स्थिर झाल्यासारखी झाली.

मुलांच्या अभ्यासाकडे व सर्वांगीण सुधारणेकडे शाळेच्या चालकांचें प्रथमपासून लक्ष होतें. सन १८८६ सालीं सरकारी क्रमिक पुस्तक चवथें, पांचवें व सहावें यांच्या जागीं अनुक्रमें हरि आणि त्रिंबक, गद्यरत्नमाला आणि सद्वर्तन हीं पुस्तकें शाळेंत लाविलीं आणि त्यांचें कारण तीं पुस्तकें " चांगलीं बोधपर व व्यावहारिक शिक्षणपर " असून सरकारी पुस्तकांच्या बरोबरीचीं होतीं. परंतु हीं पुस्तकें केवळ गद्यरूप असल्यामुळें निवडक लहानें व सुरस अशीं जुन्या कवींचीं आख्यानें काढून चालकांनीं कवितांच्या वेचांचें एक पुस्तक काढून तें पद्याकरतां चालू केलें. सरकारी मदत या शाळेला १८८५ सालींच मिळावयाची होती; परंतु 'ज्या कारणाबद्दल शाळेच्या व्यवस्थापकांना व त्यांच्या मंडळींना कोणत्याहि तऱ्हेनें दोष देतां येणार नाहीं अशा कांहीं कारणामुळें सरकारी मदत देण्याचें डायरेक्टरसाहेबानें नाकारलें, व १८८६त सुद्धां सरकारची मदत मिळाली नाहीं.' तथापि चालकांनीं आपलें पवित्र कार्य दृढ निश्चयानें तसेंच पुढें चालू ठेविलें.

म्युनिसिपालिटीची मदत

याचा सुपरिणाम असा झाला कीं, 'पुणें शहर म्यु. नें १८८६ च्या एप्रिल महिन्यापासून' या शाळेला दरमहा २० रु. मदत देण्याचें ठरविलें. या मदतीतून शाळेच्या इमारतीचें भाडें (२७ रु. ८ आ. दरमहा) देखील पुरें भागत नसे. शाळेला फीचें उत्पन्नहि बेताचेंच असे. सन १८८४-८५ सालीं फीचें उत्पन्न दरमहा १७७ रु. ५ आ. ८ पै होतें; हें १८८५-८६ सालीं १९५ रु. ११ आ. ८ पै झालें; आणि खर्च अनुक्रमें दरमहा रु. १३७-८ आ. व दरमहा रु. १५० असा होता. अर्थातच सर्व शिक्षक लोकांनीं 'फार थोडया वेतनांत संतुष्ट राहून' आपापलीं कामें केलीं म्हणूनच निभावलें.

सर्व जातींचीं मुलें

आरंभापासूनच नू. म. वि.ची शाळा ही आगासलेल्यामागासलेल्या, सर्व वर्गांच्या व सर्व जातींच्या लोकांकरतां चालत होती. १८८५ सालीं व १८८६ सालीं शाळेंतील एकंदर सुमारें ६०० मुलांपैकीं ब्राह्मण, प्रभु वगैरे विद्यार्थी सुमारें

४५० व मराठे कुणबी सुमारें १००, सुतार, सोनार वगैरे ५०, दोन तीन मुसलमान व ५-६ इतर प्रकारचे, अशा प्रकारचे जातवारीचे आंकडे सांपडतात.

कायद्याची मागणी

शाळेंत येणाऱ्या मुलांचीं वयें पाहतां या वेळच्या रिपोर्टांत '६ किंवहुना ५ वर्षांचीं मुद्धा मुलें शाळेंत दृष्टीस पडतात,' असें सांगून रा. दामूअण्णा यांनी 'एवढ्या वयापासून एक प्रकारची काळजी त्यांच्या मागें लागते व तिचा त्यांच्या बाळयक्तीवर व बाढीवर परिणाम होऊन तीं अशक्त व खुजीं होत चाललीं आहेत,' अशी तक्रार केली आहे, इतकेंच नव्हे तर पुढें जाऊन 'सरकारनें किंवा म्युनिसिपॅलिटीनें ८ किंवा फार तर ७ वर्षांपेक्षां कमी वयाचा मुलगा आईबापांनीं शाळेंत पाठवूं नये, असा कायदा करावा, यावांचून लोक आपण होऊन या गोष्टीचा विचार करतील असें वाटत नाहीं,' असा कडक इषाराहि दिला आहे.

शाळेची परीक्षा

१८८५ व ८६ सालीं चालकांनीं शाळेंतील मुलांच्या शिक्षणाची परीक्षा विद्याखात्यांतील कित्येक अनुभवशीर अशा सरकारी व खाजगी गृहस्थांकडून घेवविली. न्यू इंग्लिश स्कूलच्या संस्थापकांनीं प्रथमारंभीं असेंच केलें होतें. वरील परीक्षकांत रा. रा. बाळ गंगाधर टिळक, रा. धारप, रा. वासुदेवराव केळकर वगैरे न्यू स्कूलमधील, तसेंच प्रख्यात भावे स्कूलचे संस्थापक रा. वामनराव भावे आणि अनुभविक सरकारी अधिकारी रा. नीलकंठशास्त्री साठे, रा. नारोपंत देवघर वगैरे मंडळी होती. टिळकांनीं इंग्रजी ३ री ईयत्तेचें गणित पाहून 'शिक्षण चांगलें आहे' असा शेरा दिला आणि उपपत्ति शिकवावी अशी सूचना दिली. धारप यांनीं त्या वर्गाचा मराठी विषय पाहिला आणि 'पोट विषयांतसुद्धां मुलें चांगलीं तयार केलीं होतीं' असा अभिप्राय दिला. केळकर यांनीं इंग्रजी पाहिलें आणि २४ मुलांतील १९ मुलें पास झालीं तेव्हां हा 'निकाल फारच भूषणदायक आहे' म्हणून संतोष व्यक्त करून तिसऱ्या ईयत्तेंत कांहीं इंग्रजी पद्यें शिकवितात, ही पद्धति चांगली आहे, अशी शिफारस केली. रा. वामनराव भावे यांनीं इंग्रजी पहिलीच्या तीन वर्गांचा इतिहासभूगोल पाहिला आणि 'मुलांची परीक्षा चांगली उतरली' असें म्हणून चालकांची व्यवस्था व टापटीप यांविषयीं वाखाणणी केली. मराठी शाळेकडे रा. देवधर यांनीं चवथीच्या तीन्ही वर्गांचें गणित व लेखन पाहून गणितांत सर्व आणि लेखनांत एका खेरीज बाकीचे वर्ग फार सुरेख असें म्हटलें आहे. रा. नीळकंठशास्त्री साठे यांनींहि मुलांनीं फार चांगलीं उत्तरें दिलीं असें म्हणून 'शाळेची स्थिति पाहून मी सुख झालों' असा आपला स्पष्ट अभिप्राय दिला आहे. अक्षराविषयीं तर शाळेची प्रथमपासूनच प्रसिद्धि होती आणि ती यथार्थ होती. सुप्रसिद्ध अक्षराचार्य बण्डुनाना

रानडे यांनीं या शाळेंतील मुलांचीं अक्षरें पाहून तीं फार चांगलीं झालीं आहेत, मास्तर लोकांनीं फार मेहनत घेतली आहे, आम्हांस 'फार संतोष झाला.' अशा आशयाचा जो मोकळया मनाचा अभिप्राय लिहिला आहे त्यावरून तसें खात्रीपूर्वक म्हणतां येतें. रावसाहेब नेने यांचा अभिप्राय वरील्लानांप्रमाणेंच आहे.

आगखी एक बक्षिससमारंभ

१८८५ सालच्या मे महिन्यांत शाळेचा जो बक्षिससमारंभ* झाला, त्या वेळीं प्रो. जिन्सीवाले (१५ रु.), रावबहादुर रानडे (१० रु०), काशिनाथपंत गाडगीळ (१० रु.), माधवराव नामजोशी (६ रु.), रामभाऊ गुप्ते, कुशाबा नाना लिमये, वासुदेवराव केळकर, श्री. चिंतामणराव मेहेंदळे, दामोदरपंत गोखले (प्रत्येकीं ५रु.) व इतर कित्येक गृहस्थ (३६ रु.) मिळून १०२ रुपयांची मदत शाळेस मिळाली. त्यांतून ५० रु. डेडस्टॉक सामानाकडे व्यय केला व बाकी अर्धी रक्कम मुलांना बक्षिसें वाटण्यांत खर्च केली. हा वृत्तांत सांगून दामुअण्णा विचारतातः—'श्रीमान् सरकार आपल्या सरकारी शाळांच्या गरजा पुरविण्यास समर्थ आहे. परंतु आमच्या या खासगी शाळांच्या गरजा पुरविण्याला आमच्या परोपकारी लोकांवांचून कोण समर्थ आहे !'—आणि खरोखर, कोण समर्थ आहे ?

शाळेच्या गरजा

शाळेच्या बालराज्याच्या गरजा अनेक असतात. योग्य प्रकारचें सामान-सुमान ही पहिली गरज व दुसरी मोठी गरज पुस्तकसंग्रहाची; आणि तिसरी गरज

---

* ता. २० मे १८८५ रोजीं महादेव मोरेश्वर कुंटे यांचे अध्यक्षतेखालीं नू. म. विद्यालयाचा बक्षिससमारंभ झाला, त्या वेळीं माधवरावजी रानडे यांनीं भाषण केलें त्याचा उताराः—

"हल्लींच्या आमच्या शाळा म्हणजे खरोखर शाळा नव्हेत तर निरनिराळे कांहीं विषय शिकविण्याचे वर्ग आहेत. घरच्या माणसांना मुलांच्या शिक्षणाकडे पाहण्याला वेळ नाहीं, म्हणून तीं त्यांना शाळेंत पाठवितात. तर त्यांची सर्व प्रकारें सुधारणा झाली पाहिजे, शरीरें सुधारलीं पाहिजेत.

"अशा सर्व गोष्टी झाल्या पाहिजेत. शहरांतलें व खेड्यांतलें शिक्षण सारखें नसावें. धर्मशिक्षण पाहिजे. पूर्वीच्या परंपरा बदलून नव्या सांच्यांतून ओतून काढण्याची पद्धति अनिष्ट आहे. पंजाबबंगालमध्यें धर्मशिक्षण देणारे महात्मे आहेत, इतर प्रांतांत नाहींत. याकरितां महाराष्ट्रांतल्या जोश्यांना धर्मशिक्षणाकडे लावून त्यांचा उपयोग करून घेतला पाहिजे. नगरच्या शाळांतून अशी व्यवस्था पाहिजे. पोहणें, घोड्यावर बसणें या कला त्यांना शिकविल्या पाहिजेत."

(ग. ना. र. फाटककृत रानडे चरित्र, पृ. ३७५)

तालिमखान्याची. पैकी सामानाचो गरज चालकांनीं थोडीफार भरून काढिली होती; आणि पुस्तकसंग्रहाची गरज भरून काढण्यासाठीं सर्व ग्रंथकारांकडे आपापल्या ग्रंथाची एकएक प्रत शाळेस भेट पाठविण्यासाठीं विनंति करण्याचें योजिलें होतें. कांहींना विनंति केली आणि तिचा उपयोग होऊन निर्णयसागरचे उदार मालक जावजी दादाजी यांनीं ४० पुस्तकें पाठविलीं. तालिमखान्याची स्थापना करण्यास त्या वेळेस सोईची जागाच मिळाली नाहीं त्यामुळें चालकांचे त्या वेळचे मनोरथ मनांतच राहिले.

कै. दामुअण्णाचे उद्गार

१८८६ च्या आरंभापासून शाळेचे व्यवस्थापक रा. रामकृष्ण भिकाजी ऊर्फ दामुअण्णा कुळकर्णी हे होते. ते आपल्या अहवालांत असें विचारतात कीं, " लोक म्हणतात त्याप्रमाणें शाळा काढणें हा एक उदरपूर्तीचाच मार्ग आहे असें धरून चाललें तरी आमचें उत्पन्न व खर्च यांचे आंकडे मनांत आणतां त्या मार्गांत तरी आम्हांस कितपत यश आलें आहे! ... त्याऐवजीं 'हा धंदा सोडून देऊन सरकारी नोकरी पत्करून आम्हीं राहिलों असतों तर आमची द्रव्यसंबंधीची स्थिती आजला चांगली असती. ..... परंतु स्वावलंबन करून लोकांना आवडेल असें फायद्याचें शिक्षण मुलांना देऊन देशसेवेचा एक अल्पसा भार यथाशक्ति व फार हाव न धरतां मस्तकीं वाहण्याचा जो आमच्या मंडळीचा हेतू तो सरकारी नोकरी धरून गांवांत पडून राहिल्यानें खचित तडीस गेला नसता.....प्राथमिक शिक्षण सर्व शिक्षणाचा पाया आहे व असा पाया ज्या शाळांत भरला जातो त्या शाळांच्या हिताकडे लक्ष देणें व त्यांच्या अभ्युदयाविषयीं झटणें हें प्रत्येक देशहितेच्छु व उदार मनुष्याच्या अनेक कर्तव्यकर्मांपैकीं एक महत्त्वाचें कर्तव्यकर्म आहे हें सांगणें नलगे.... द्रव्याचांचून कोणतीहि गोष्ट नडते... सरकारी मदतीशिवाय इंग्रजी शाळा फीच्या उत्पन्नावर चालविता येईल, कारण फीचे दर बरेच जास्त असतात. परंतु मराठी शाळेची तशी गोष्ट नाहीं. मराठी शाळेचें फीचें उत्पन्न फारच थोडें असतें. तेव्हां तेवढ्यावरच शिक्षकांचा पगार, सादिलवार, शाळेचें भाडें, डेड-स्टॉक, सामान, पुस्तकें वगैरेचा खर्च भागून शाळा चालविणें किती दुस्साध्य आहे! तशांत अशा खाजगी मराठी शाळा म्हणजे कांहीं विशेष प्रकृतीच्या लोकांना कापदार्थ वाटत असल्यामुळें त्यांचा रोषही कधीं कधीं त्यांना भोवतो. एखाद्या गोष्टीची सदैव सारखी स्थिती राहते असें नाही. तिच्यांत कालांतरानें चलबिचल होत असते. पुढील काळावर नजर देऊन शाहाणा मनुष्य नेहमीं संग्रह करीत असतो.... त्याचप्रमाणेंच शाळेला अलग ठेवलेला फंड असला पाहिजे...आम्हीं हातीं घरलेलें काम जबाबदारीचें आहे व आम्हांस योग्य प्रोत्साहन मिळालें असतां आम्हीं

आपल्या कामांत किती सुधारणा करूं हे पुढें अनुभवांतीं समजेल. संस्थानिक, जहागिरदार व थोर गृहस्थ यांनीं आमची खरी स्थिति मनांत आणून द्रव्यबलानें या *शाळावृक्षाची जोगवग करावी अशी आमची त्यांस सविनय प्रार्थना आहे." अशा प्रकारें कळकळीचे उद्गार नूतन मराठीचे त्या वेळचे व्यवस्थापक दामुअण्णा यांनीं काढले आहेत व ते सर्वस्वीं यथार्थ आहेत.

शाळेंतील शिक्षकवर्ग

१८८६ सालच्या ऑगष्टपर्यंत जे शिक्षक शाळेंत काम करीत होते, त्यांचीं नांवें येथें देतों:—१ रामकृष्ण भिकाजी कुळकर्णी, व्यवस्थापक, २ दामोदर सदाशिव (मामा) करंबेळकर, ३ कृष्णाजी बल्लाळ डोंगरे, ४ बाळकृष्ण अप्पाजी सिनकर, ५ केशव बळवंत परांजपे, ६ नारायण गंगाधर लागू, ७ भास्कर गोविंद करंदीकर, ८ *रामचंद्र गोपाळ देव, ९ *शिवराम भिकाजी पाटणकर, १० गोपाळ दाजी फडके, ११ *विष्णु महादेव तैलंग, १२ गणेश हरि चाफेकर, १३ दत्तो रामचंद्र बोधी, इंग्रजी शिक्षक, १४ भिकाजी श्रीधर निमकर, १५ विनायक बळवंत शेंडये, १६ नरहर वामन नेवासकर, १७ रामचंद्र बापूजी दाणी. यांतील क्रमांक २ पासून क्रमांक १२ सुद्धा सर्व मंडळी ट्रेनिंग कॉलेजांत शिकून तयार झाली होती. रा. दाणी व रा. लागू हे अक्षरशिक्षक होते.

नवे भागीदार


येणेंप्रमाणें इ. स. १८८३ पासून १८८७ अखेर पांच वर्षें शाळेचा कारभार चालकांनीं मोठ्या उत्साहानें केला; आणि आपली कळकळ लोकांच्या प्रत्ययास

---

* १८८५ च्या समारंभाचे वेळीं एक पद्य करून म्हटले व वाटलें होतें. त्याचे कांहीं चरण रा. रामभाऊ देव यांनीं आठवले तसे म्हणून दाखविले. त्यांत ही शाळा-वृक्षाचीच कल्पना होती. दामुअण्णा व हरिभाऊ आपटे यांच्या संगनमतानें हें पद्य रचलें गेलें असावें. ते त्रुटिचरण येथें देण्यासारखे आहेत.

नूतन तरु अम्हि लाविय्ला ।
दैवें थोर असे झाला ॥ १ ॥
यावें फुलफळ हें त्याला ।
अजुनी नच ये नजरेला ॥ २ ॥
[द्यावया] पाणी स्वत त्याला ।
न मिळे म्हणुनी कृश झाला ॥ ३ ॥
परि या तरुला ।
भीती म्हणुनी । करितों विनतीला ।
पुढती पोसावें याला ॥ ४ ॥

* हे गृहस्थ विद्यमान आहेत.




कै. गु. डॉ. सर रामकृष्ण गोपाळ भांडारकर

शिक्षण प्रसारक मंडळीच्या कौन्सिलचे अध्यक्ष

(१८८८–१९२५)

बालोद्यान प्रेस, पुणे.



दि. ब. काशिनाथ रामचंद्र गोडबोले.
शिक्षण प्रसारक मंडळीच्या कौन्सिलचें अध्यक्ष.
(१९२५)

बालोद्यान प्रेस, पुणें.

आणून दिली. लोकांनींहि मुलें पाठवून व अन्य तऱ्हेनें मदत करून त्यांचा उत्साह वाढविला. पहिले चालक आपणांस भागीदार असें म्हणवीत. आरंभीं रा. उकिडवे, करंबेळकर व डोंगरे हे तीन भागीदार होते. लवकरच रा. सिनकर हे चवथे भागीदार झाले. रा. दामुअण्णा कुलकर्णी यांचीहि त्यांत भर पडली. उकिडवे गेल्यावर चवघे भागीदार शिल्लक राहिले. १८८७ अखेर आणखी पांच असामी या मंडळीस येऊन मिळाली. त्यांचीं नांवें:—

१ रा. भिकाजी श्रीधर निमकर,
२ रा. रामचंद्र गोपाळ देव, (सांप्रत विद्यमान)
३ रा. नारायण गंगाधर लागू,
४ रा. भास्कर गोविंद करंदीकर,
५ रा. हणमंत रघुनाथ सहस्रबुद्धे.

पैकीं रा. सहस्रबुद्धे हे नवीन होते व बाकीची मंडळी जुनीच होती. रा. सहस्रबुद्धे यांचा स्वभाव तापट असल्यामुळें बरीच खटखट होऊन रा. सहस्रबुद्धे यांस पुढें कांहीं वर्षांनीं जावें लागलें. रा. देव हे अद्याप निवृत्तवेतन भोगीत आहेत आणि त्या काळची प्रत्यक्ष साक्ष देत आहेत ही मोठ्या सुदैवाची गोष्ट आहे. या नऊ मंडळींनीं आपल्यापुढें ठेवलेले हेतु पुढें लिहिल्याप्रमाणें शाळेच्या एका पत्रकांत नमूद आहेत.

मराठी शिक्षण-प्रसारक-मंडळीची स्थापना

" इंग्रजी भाषा शिकण्याला बरेच श्रम करावे लागतात. यामुळें मुलांच्या प्रकृति क्षीण होऊन बुद्धि विकास पावत नाहीं. शिवाय शास्त्रीय व दुसरे गहन विषय परकीय भाषेच्या द्वारें शिकणें व शिकविणें फारच श्रमाचें व त्रासदायक होतें; कारण कोणताहि गहन विषय समजण्यास फार श्रम पडतात व तो परकीय भाषेच्या द्वारें शिकणें भाग पडल्यामुळें विशेष श्रम करावे लागतात. तो स्वभाषेच्या द्वारें शिकविला असतां शिकण्यास व शिकविण्यास फार सोपें पडून पुष्कळ श्रम व काळ वाचून त्या विषयांचें मुलास यथार्थ ज्ञान होऊन इष्ट हेतु सिद्धीस जाईल. यामुळें, वरिष्ठ प्रतीचें शिक्षण केवळ मराठी जाणणाऱ्या लोकांना कधींच मिळत नाहीं, तें मिळावें व शास्त्रीय विषय जे मराठी जाणणाऱ्यांना नाममात्रहि माहीत नसतात त्यांची त्यांना माहिती व्हावी; तसेंच साधुसंतांच्या वाक्यांवरून मुलांना थोडेसें धर्मविषयक व नीतिविषयक शिक्षण मिळण्याचीहि तजवीज व्हावी असा सर्व लोकांचा हेतु आहे. "

" सदरहु हेतु तडीस नेणें फार महत्त्वाचें व जबाबदारीचें काम आहे आणि म्हणून या कामीं अनुभविक, धोर, विद्वान् व विद्येच्या कामीं झटणारे अशा लोकांचें

साह्य असल्यावांचून हें काम तडीस नेणें बरेंच अवघड आहे असें जाणून सदरील नऊ व्यवस्थापक मंडळींनीं व त्यांच्या हितचिंतकांनीं रविवार ता. ५ फेब्रुवारी सन १८८८ रोजीं नूतन मराठी विद्यालयाच्या दिवाणखान्यांत शहरांतील थोर, विद्वान्, संभावित गृहस्थांची सभा भरविली. या वेळीं त्या ठिकाणीं बरींच भाषणें झालीं आणि मराठी शिक्षणाचा प्रसार करण्याकरितां एक मंडळी स्थापन करावी असा ठराव होऊन 'मराठी शिक्षण-प्रसारक-मंडळी' या नांवाची एक मंडळी स्थापन झाली व ती इ. स. १८६०च्या २१व्या कायद्याप्रमाणें नोंदण्यांत आली. या मंडळीचे पहिले अध्यक्ष डॉ. रामकृष्ण गोपाळ भांडारकर यांस निवडण्यांत आलें आणि तेव्हांपासून तों सतत ३७ वर्षें, डॉक्टरसाहेबांच्या आयुष्याच्या शेवटच्या घटकेपर्यंत तेच मंडळीचे अध्यक्ष होते. या मंडळीचे हेतु पुढें दिल्याप्रमाणें आहेत:-

" १ शिक्षण लोकप्रिय व सुलभ होईल अशी तजवीज करावी, खाजगी शाळा स्थापन कराव्या, असतील त्या देखरेखीखालीं घ्याव्या, मराठी भाषेला उत्तेजन द्यावें, मराठी शिक्षणाचा पाया दृढ करावा व सदरहु हेतु सिद्धीस जाण्याकरितां अशाच प्रकारच्या दुसऱ्या इष्ट वाटतील त्या तजविजी कराव्या. "

म. शि. प्रसारक-मंडळीच्या घटनेचें पहिलें स्वरूप

येणेंप्रमाणें मराठी शिक्षण-प्रसारक मंडळी स्थापन झाली, त्या वेळीं जी घटना करण्यांत आली तिची संक्षिप्त माहिती वरील पत्रावरून कळते. या घटनेत अनुसरून 'स्थायिक' सभासद म्हणजे लाइफमेंबर्स यांची व्यवस्थापक मंडळी बनवण्यांत आली आणि या स्थायिक सभासदांच्या संख्येइतकेच साह्यदाते व आश्रयदाते यांतून लोक निवडून घेऊन त्यांचें व व्यवस्थापक मंडळींचें मिळून एक 'अधिष्ठायक' मंडळ म्हणजे कौन्सिल नेमण्यांत आलें. याशिवाय ट्रस्टी नेमावे असें ठरलें. स्थायिक सभासदाला निदान पंधरा वर्षेपर्यंत काम करण्याचें बंधन असे. निदान २० रु. देणारा 'साह्यदाता' समजला जाई. निदान १०० रु. देणारा 'आश्रयदाता' समजला जाई. स्थायिक व चालू असे फंडाचे दोन प्रकार केले होते. स्थायिक फंडाची व्यवस्था अधिष्ठायक मंडळाकडे व चालू फंडाची व्यवस्था व्यवस्थापक मंडळाकडे होती. शाळेच्या आंतील सर्व प्रकारची व्यवस्था व्यवस्थापक मंडळाकडे होती. याप्रमाणें मराठी शिक्षण-प्रसारक-मंडळीच्या घटनेचें पहिलें ठोकळ स्वरूप होतें. मराठी शिक्षण-प्रसारक-मंडळीची स्थापना करून आपण आजवर मोठ्या कष्टानें व मेहनतीनें चालविलेलें नूतन मराठी विद्यालय चालकांनीं आपली भागीदारी सोडून नवीन मंडळीच्या हवालीं केलें आणि येथपासून विद्यालयाच्या आयुष्याच्या एका नव्या युगाला प्रारंभ झाला असें म्हणण्यास हरकत नाहीं.

जमाखर्चाची दुर्मिळ वही

पुरवणी

सन १८८३ ते १८८८ या काळांतील शाळेच्या जमाखर्चाची एक दुर्मिळ वही कै. कृष्णाजीपंत डोंगरे यांच्या संग्रहांत होती. तीवरून कांहीं उपयुक्त माहिती पुढें देत आहों—

असें दिसतें कीं, शाळेच्या कामासाठीं म्हणजे बाकें वगैरे आणण्यासाठीं कै. भिकाजी श्रीधर निमकर (शाळेचे पुढें झालेले भागीदार) यांचेकडून कांहीं रक्कम उसनवार घेतली असावी; कारण पुढें (मे १८८५ त) ती रक्कम परत केल्याचा दाखला आहे. माहे ऑगस्ट १८८५ मध्यें भिकाजीपंत यांचेकडून शाळेच्या स्थापनेच्या वेळीं घेतलेले रुपये ४ परत दिले आहेत.

* * * *

असें दिसतें कीं पहिल्या वर्षांत शाळेमध्यें दरमहा मुलांस बक्षिसें वाटीत होते.

* * * *

जानेवारी १८८३ मध्यें पगारखातीं २४ रुपये, १५ रु. शाळेचें घरभाडें व ४ रु. डेड स्टॉक म्हणजे २ खुर्च्या व टेबल १ असा खर्च पडला आहे व न्यू स्कूलमधून बाकें आणण्याबद्दल मजुरी खर्च ०१२ पडला आहे. अशींच बाकें वारंवार भाड्यानें आणलीं आहेत. फेब्रुवारीचा पगार रुपये ३२ पुढील तपशिला-प्रमाणें खर्ची पडला आहे—

अक्षरमास्तर (दाणी) ८, महाजन २ रु. (सीतारामपंत महाजन हे गृहस्थ डाव्या पायानें मोडी अक्षर लिहीत. पंढरपूरच्या बाजूकडील मोडलिंबचे राहणारे होते. गाण्यावजावण्याचा यांस शोक असे. सुमारें १९०५ ते १९१० पावेतों हे पुनः शाळेमध्यें अक्षरमास्तर म्हणून कित्येक वर्षें कामावर होते. त्या वेळीं मोरोबा-दादांचे वाडयांत डोंगरे यांचे खोलींतच हे राहत असत. यांचें स्मरण पुष्कळांस असेल.), शिंदकर ५ रु., भिकाजीपंत ५ रु., शंकर त्र्यंबक भिडे ५ रु., शिपाई ६* रु.,

---

* दामू शिपाई-सडपातळ व हुशार व हबाबदार होता. याचेंच चित्र शाळेच्या एका पाटीवर काढलें होतें! यास पगार रु. ६ म्हणजे कित्येक शिक्षकांपेक्षांहि अधिकच होता हें लक्षांत ठेवण्यासारखें आहे!! दामूचा लायकी व शिक्षकांची हलाखी या दोहींची साक्ष यावरून मनास सहज पटते!

१ सारवण–अर्थात् या रकमेंत करंबेळकर, उकिडवे व डोंगरे या त्रिवर्ग भागीदारांचा पगार आला नाहीं हें उघड आहे. तो पगार प्रत्येकीं ८ प्रमाणें २४ रु. होत असावा असें दिसतें. नूतन मराठी विद्यालय हें काढतांना रा. रामचंद्र बापूजी दाणी याची एक खासगी शाळा होती, ती या नवीन मंडळींनीं आपले ताब्यांत घेतली आणि दाणी यांनाहि आपले प्रमाणेंच ८ रु. पगार दिला. मार्च महिन्यांत इंग्लिश शिकविण्याकरितां ७॥ रु. खर्च पडला आहे. मे महिन्यांत बाकणकर यांस इंग्रजीबद्दल ४ रु. पगार दिला आहे; आणि विंचुरकर (म्हणजे दाणी) रु. ८, शिनकर ६, निमकर ५, साठे ५, महाजन ३ व ६ रु. शिपाई मिळून ३३ रु. असा भागिदारांशिवाय इतरांचा खर्च पडला आहे.

* * * *

ही हिशेबाची वही बहुतेक रा. करंबेळकर यांचे हातची आहे व दोन ठिकाणीं त्यांनीं आपले नांवापुढें 'हेडमास्तर, नू. म. विद्यालय' असें लिहिलें आहे. तीं दोन ठिकाणें म्हणजे माहे जुलै १८८३ ची जमा व खर्च खात्यांची अखेर हीं होत. माहे जून १८८३ बद्दल करंबेळकर, डोंगरे व उकिडवे अशीं नांवें घालून पगार लिहिला आहे. त्यावरून प्रत्येकाचा पगार ८ रु. ठरला असावा असें दिसतें; व तसाच तपशील पुढेंहि आला आहे. सप्टेंबर ८३ मध्यें शाळेंत शिपायाला पट्टा घेतला. गोविंदराव लिमये यांस ३ रु. इंग्लिश क्लास शिकविण्याबद्दल दिले. मूरसाहेबांकडे जाण्याकरितां गाडीखर्च पडला आहे तो गव्हर्नरसाहेबांचे भेटी-बाबत असावा असें वाटतें. ऑक्टोबर ८३ मध्यें पगारखर्च (भागिदारांचा) ४२ रु. देऊन तपशील दाखविला आहे तो असा––

करंबेळकर, डोंगरे, उकिडवे, दामुअण्णा यांनीं आठ आठ रुपये व शिवाय दामूअण्णा यांनीं इं. ब. (इंग्लिशबद्दल) १० रु. घेतले. ते माहे सप्टेंबरबद्दल. याचप्रमाणें ४२ रु. पगारखर्च दाखविण्यांत आला आहे.

* * * *

जानेवारी १८८४ मध्यें शिनकरांचा पगार भागिदारांत दाखविला आहे. उकिडवे गेले व शिंदकर त्या जागीं भागीदार झाले. उकिडवे नोव्हेंबर ८३ मध्यें दोन महिने रजेचा आगाऊ पगार घेऊन घरीं गेले, ते फेब्रुवारींत पुन्हा आले व मग कायमचेच गेले. मार्च ८४ मध्यें स्कूलफंडखातीं प्रथमच ५ रु. जमा आहेत (जोशी बडोदें ४ व लष्करकर १).

भागीदार मंडळांपैकीं, हिशेबावरून असें दिसतें कीं, डोंगरे यांनीं बेळ पडला तर आपला पगार कित्येक महिने मागाहून घेतला आहे (उदाहरणार्थ मे १८८४). शास्त्रीबुवांच्या तसबिरीचा डेडस्टॉक खर्च जून ८४ मध्यें पडला आहे. नोव्हेंबर १८८४ मध्यें आनंदोद्भव थिएटरचें भाडें बाकांबद्दल ९ रु. खर्च पडलें असून शाळेंतून न्यू इंग्लिशमध्यें नादार मुलें पाठविलीं त्यांच्या १ महिन्याचा व एंट्रन्स-फीबद्दल ४॥ रु. खर्च पडला आहे.

* * * *

१८८५ मेमध्यें भिकाजीपंत निमकर यांचे ५० रुपये शाळा स्थापन झाल्या-वेळीं घेतलेले परत दिल्याचा उल्लेख आहे. ५ ऑगस्टमध्यें लॉटरीमध्यें म्हणून शाळेच्या नांवानें ८८ खर्च टाकला आहे. सप्टेंबर ८५ मध्यें व्हिजिटिंग कार्ड ८४ व मे १८८५ मध्यें रिपोर्ट छापण्याकरितां २० रु. व बक्षिससमारंभ २० रु. असा खर्च पडला आहे. (२०८१०८९ बक्षिससमारंभ) जानेवारी १८८६मध्यें शाळेंत बाकें घेतल्याबद्दल ४ रु. खर्च पडला आहे.

* * * *

१८८६ ऑक्टोबरमध्यें दसऱ्याचे दिवशीं शाळेच्या भागीदारांकडून प्रत्येकीं ५० रु. प्रमाणें ५ जणांनीं घातले ते, असे २५० रु. जमा आहेत. (भागीदार म्हणून पगारावरून पाहतां दामुआण्णा, डोंगरे, करमेळकर व शिनकर या चवघां-चींच नांवें येतात. पांचवे बहुधा निमकर असावेत.)

* * * *

जानेवारी १८८७ मध्यें मेहेरबान जज्जसाहेब शाळा पाहण्यास आले, त्यासाठीं ५८६८६ खर्च पडला. १८८७ फेब्रुवारीमध्यें दामुअण्णा, शिनकर, करंबेळकर व डोंगरे यांनीं जाने. पगार घेतला रु. ६२. यावरून प्रत्येकीं १३ व दामुआण्णा १० असा हिशेब बसतो. म्हणजे ८ रु. चे १३ रु. अशी भागी-दारीचे पगारांत वाढ १८८७ पासून केली. हाच ६२ आंकडा पुढें चालू आहे. एप्रिल १८८७ मध्यें विष्णु बाळकृष्ण गोखले, सर्वेअर गोवें, (पुढें ज्यांनीं पंथ-एका-वेदांतसर्वेश्वराची स्थापना पुण्यांत केली ते) यांचेकडून शाळेच्या बक्षिससमारंभाकरितां आलेले ४० रु. जमा आहेत; आणि पुणें शहर म्युनिसिपॉलिटीकडून १८८६ एप्रिलपासून १८८७ जानेवारीअखेरपर्यंत दरमहा

२०रु. प्रमाणें दहा महिन्यांच्या ग्रँटबद्दल आलेले २००रु. जमा आहेत. १८८७ मे महिन्यामध्यें ३० रु. रिपोर्ट छापणावळ व सुमारें ८०।९० रुपये बाक्षिससमारंभ असा बराच मोठा खर्च पडला आहे. १८८७च्या जुलैमध्यें दि. ब. लक्ष्मण जगन्नाथ वैद्य, दिवाण गायकवाड, यांचेकडून शाळेला २५ रु. मदत मिळाली. १८८७ च्या सप्टेंबरमध्यें आश्विन शु. १० रोजीं शाळेचे भागीदार यांनीं शाळेचा खर्च योग्य तऱ्हेनें चालविण्याकरितां घातलेले रु. १५० जमा आहेत. म्युनिसिपल मदत दरमहा२० रु. प्रमाणें जमा आहे. नोवेंबर ८७ मध्यें म्युनिसिपल मदतीपैकीं मास्तर-लोकांस वाटले ते रु. २२० खर्ची पडले आहेत. डिसेंबर ८७ मध्यें डेडस्टॉककरितां ८३ रु. खर्ची पडले आहेत.

* * * *

फेब्रुवारी १८८८ मध्यें रु. २०८१, म्हैसूर व त्रावणकोरचे महाराज शाळेंत आले त्या वेळचा खर्च म्हणून खर्ची पडले आहेत. १५ रु. म्हैसूरचे महाराजांना मानपत्रखर्च व सोन्याची खुर्ची आणली तिचें भाडें रु. ५. याशिवाय म्हैसूरचे महाराजांस आमंत्रण करण्याकरितां मुंबईस गेल्याबद्दल ७ रु. व त्या प्रकरणीं आणखी खर्च रु. २० झालेला नमूद आहे. म्हणजे हा समारंभ ६०।७० रु. खर्चून बराच मोठा केला होता असें दिसतें. याच महिन्यांत मराठी शि. प्र. मंडळी स्थापन झाली. त्यानिमित्त थोडा खर्च झाल्याचें नमूद आहे. मार्च १८८८ ला दोनशें साठ रुपये पावणे सोळा आणे दोन पै अशी शिल्लक पेस्तर महाकरितां काढून ही वही संपविली आहे.

* * * *

दुसरा खंड

इ. स. १८८८ ते १८९६

मॅट्रिकची मजल

डायरेक्टरांचा रोष

१८८७ च्या प्रारंभाला रा. शिंनकर यांचें नांव व्यवस्थापक म्हणून लागूं लागलें. तरी बरेंचसें काम रा. दामुअण्णा हेच पहात होते. कामाची ही अदलाबदल डायरेक्टरसाहेबांचा राग गेला तर पाहावा म्हणून केली होती. रा. दामुअण्णा हे चालकांस येऊन मिळण्यापूर्वी डायरेक्टरचे ऑफिसांत नोकरीस होते. डायरेक्टर मि. चाटफील्ड यांस दामुअण्णा सुखाची सरकारी नोकरी सोडून या नवीन शाळेच्या फंदांत पडले हें आवडलें नाहीं. मि. चाटफील्ड यांचा कांहींसा असाच राग रा. बामनराबजी आपटे यांचेवरहि झाला होता. (वि. कृ. चि. चरित्र) ही नवीन तरुण मंडळी निश्चित स्वरूपाच्या सरकारी नोकऱ्या सोडून अनिश्चित स्वरूपाचे नवीन उद्योग हातीं घेत होती, हें पाहून मि. चाटफील्ड यांची वृत्ति गोंधळून गेली असेल तर नवल नाहीं. रा. दामुअण्णा यांनीं रु. चाळीस दरमहाची सरकारी नोकरी सोडली ती निश्चित विचार करून सोडली होती व अठरा रुपयांवर नवीन संस्थेंत काम करण्याचें त्यांनीं ठरविलें. या नवीन संस्थेचे इतर संस्थापक हे देखील ट्रेनिंगचे सर्टिफिकेटप्रमाणें त्यांना मिळावयाच्या सरकारी नोकऱ्या सांगून आल्या असतांहि अत्यल्प वेतनावर (सरकारी पगाराच्या निदान $\frac{1}{3}$) नू. म. विद्यालयासच आपलें आयुष्य वाहण्याचा संकल्प करून—वेळ पडल्यास मधुकरीहि मागूं अशा कृतनिश्चयानें आले होते.

प्लेगच्या कठिण दिवसांत या शाळेंतील एका दोघा जुन्या शिक्षकांनीं थोडे दिवस प्रत्यक्ष मधुकरीहि मागितली होती. शाळेंतून कितीहि वेतन मिळो, शाळेचा उपक्रम सोडावयाचा नाहीं; आणि 'जर उपक्रम[1] केलातच तर यावज्जीव तो सोडूं नका.'

---

१. रा. रा. गो. देव सांगतात कीं आपण व रा. पुरुषोत्तम पांडुरंग ढमढेरे, आपले ट्रेनिंगांतील सहाध्यायी, व हल्लीं खानदेशांत किफायतशीर शेती करून राहिलेले आपले एक मित्र व इतर कांहीं मंडळी यांनीं मराठी शाळा स्थापण्याबाबत कै. विष्णुशास्त्री यांची गांठ घेतली होती तेव्हां वरीलप्रमाणें संवाद झाला. [रा. डोंगरे, करंबेळकर व ढमढेरे हे वरच्या वर्गात, रा. देव, लागू व उकिडवे हे एका खालच्या वर्गात आणि रा. शि. भि. पाटणकर,

असा जो विष्णुशास्त्र्यांनीं चालकांपैकीं कित्येकांस भेटीचे प्रसंगीं निक्षून उपदेश केला होता, तो लक्षांत बाळगून संस्था चालवण्याचा निर्धार चालकांनीं कधींहि सोडला नाहीं व प्रपंचखर्चास पुरवणीदाखल म्हणून चालकांपैकीं बहुतेकांस खासगी शिकवण्या कराव्या लागत; आणि एकास तर घरची भिक्षुकीहि चालवावी लागे. तात्पर्य, दामुअण्णा ज्या मंडळींत येऊन मिळाले त्या मंडळींचे ठिकाणीं स्वार्थ-त्यागाचें बीज याप्रमाणें दृढ रुजलेलें होतें व डायरेक्टरसाहेबांचा रोष झाला तेवढ्या-वरून आपल्या अंगीकृताच्या परिपालनापासून मंडळी मुळींच ढळण्याचा संभव नव्हता. तथापि, डायरेक्टरसाहेबांची व सरकारी अधिकाऱ्यांची कृपा, सहानुभूति व साह्य आपल्या गुणांवर मिळविण्याची उमेद चालकांनीं कधीं सोडली नाहीं. रा. दामुअण्णा व्यवस्थापक असतां एका मुलाच्या वयासंबंधानें कांहीं शंका निघून, दामुअण्णांनीं म्हटल्याप्रमाणें चालकांकडे कांहींहि दोष नसतां, डायरेक्टरसाहेबांचा कांहीं गैरसमज करून देण्यांत आल्यामुळें संस्थेवर रोष होऊन ज्या सरकारी मदतीला संस्था सर्वस्वीं लायक होती ती मदत तिला मिळाली नाहीं. व्यवस्थापकाचें नांव बदलूनहि विशेष उपयोग झाला नाहीं. चालकांनींहि धीर न सोडतां आपलें काम नेटानें पुढें चालू ठेवलें व आपल्या गुणांवर सरकारी मदत उशिरानें कां होईना पण मिळविलीच.

पानसे व मावळणकर यांचा कारभार

रा. शिंनकर व रा. दामुअण्णा यांजकडे व्यवस्थापकाचें काम असतांना शाळेंतील मुलांची संख्या व शाळेची लोकप्रियता क्रमाक्रमानें वाढतच होती. पुढें १८९१ चे सुमारास रा. नारायण सखाराम पानसे,[1] बी. ए.,—जे पुढें फर्ग्युसन कॉलेजमध्यें प्रोफेसर झाले ते—या शाळेंत कांहीं दिवस नोकरीस होते व चालकांनीं त्यांजकडे व्यवस्थापकाचें कामहि नेमून दिलें होतें. परंतु पुढें रा. पानसे यांची नेमणूक फर्ग्युसन कॉलेजांत झाल्यामुळें रा. पानसे यांचे नंतर व्यवस्थापकाचें काम रा. केशव

रा. के. ब. परांजपे व रा. प. सि. सबनीस (पुढें पेन्शनर झाल्यावर न्यू. म. विद्यालय मराठी शाळेंत कित्येक वर्षें व्यवस्थापकांचे मदतनीस असलेले) हे एका वर्गांत अशी मंडळी तेव्हां होती.]

१. ' इ. स. १८८८ सालीं इंग्रजी चवथीचा वर्ग उघडण्यांत आला. श्री. दामुअण्णा हे एकटेच इंग्रजी शिकवणारे होते. त्यांना एकट्यालाच सर्व वर्गांना इंग्रजी शिकवावयाचें काम होईना. तेव्हां हरिभाऊ आपटे व त्यांचे मित्र श्री. पानसे (पुढें प्रो. पानसे) यांनीं कांहींहि वेतन न घेतां शाळेंत शिक्षकाचें काम करण्याचें ठरविलें. हरिभाऊ इंग्रजी शिकवीत तर श्री. पानसे संस्कृत घेत. पुढें दोन वर्षांनीं पानसे पगार घेऊं लागले. '

(कु. वेणुताई पानसेकृत ' हरि नारायण आपटे, ' पृष्ठ २६१-६२)

बाळकृष्ण मावळणकर,* बी. ए., यांजकडे देण्यांत आलें. शाळेमध्यें १८८८ चे सुमारास इंग्रजी तीन ईयत्तांपर्यंतचें शिक्षण मराठी सहाव्या ईयत्तेचे जोडीनें चालूच होतें व त्यांतच क्रमाक्रमानें एकेका ईयत्तेची भर टाकून पांचव्या इयत्तेपर्यंतची मजल चालकांनीं मारली होती. परंतु ज्या मुलांवर येथें चालक एवढी मेहनत करीत आणि ज्या मुलांचा लळा व अभिमान चालकांना व चालकांचा ज्या विद्यार्थ्यांना उत्पन्न होई, असे या शाळेंतील पुष्कळ हुशार विद्यार्थी आपणांस येथूनच मॅट्रिक्युलेशन होतां येत नाहीं याबद्दल मनांत फार खट्टू होत. चालकांची आर्थिक स्थिति कशी होती हें आतां निराळें सांगावयास नकोच व त्यामुळेंच बाहेरील मंडळी कमी पगारावर मिळवून इंग्रजी शाळेच्या वरील ईयत्ता सुरू ठेवणें चालकांस फार कठीण जात होतें. ग्रॅज्युएट किंवा अंडर-ग्रॅज्युएट मंडळी त्या वेळेस आतांप्रमाणें हजारांनीं नव्हे तर शेंकडयांनींच मोजावी लागस होती व ती थोड्या पगारावर कायमची येण्यास क्वचितच तयार होत व आली तरी टिकून राहण्याचा संभव मुळींच नव्हता म्हटलें तरी चालेल. अशा वेळीं एक गरीब, दृढनिश्चयी, स्वावलंबी परंतु उच्च शीलसंपन्न असे तरुण गृहस्थ चालकांस येऊन मिळण्यास तयार झाले. हे गृहस्थ रा. विनायक गणेश आपटे हे होत. या वेळीं स्वत:चे हिंमतीवर ते आधीं फर्ग्युसन व पुढें डेक्कन कॉलेजांतला आपला विद्याभ्यास करीत होते. कांहीं शिकवण्या, प्रो. चांदोरकरांसारख्या विद्वानांचें काव्यप्रकाशसंबंधीं कांहीं लिहिणें असे उद्योग करून

---

* ता. ३० जून १८९५ रोजीं रा. मावळणकर यांनीं व्यवस्थापक या नात्यानें विद्यालयांतील विद्यार्थ्यांचे पालकांस एक छापील पत्रक पाठविलेलें आम्हांस मिळालें आहे. त्यांत लेखनासाठीं मुलांनीं घरून दौत व टाक आणण्याची जी पद्धति सर्वत्र रूढ होती तिचे दोष रसभरित पद्धतीनें वर्णन करून रा. मावळणकर लिहितात:—

" शाळा या एका विषयासंबंधानें द. म. ४० रु. खर्च करीत आहे. हा खर्च इतर शाळांमधून नाहीं. इतर शाळांत निराळे अक्षर शिकविणारे शिक्षक नसतात, तर जो वर्गावरचा शिक्षक असेल त्यालाच तें काम करावें लागतें. अलीकडील सर्व शिक्षकांचीं अक्षरें चांगलीं च असतात असा नियम नाहीं त्यामुळें आम्हीं ही निराळ्या शिक्षकाची तजवीज केली आहे व ज सें इंग्रजी अक्षर लिहावयाकरितां निराळी जागा असते त्याप्रमाणेंच मोडी अक्षर लिहावयाकरितां स्वतंत्र जागा घेतली आहे. त्या जागेच्या भाड्याचा व शिक्षकाचे पगाराचा खर्च शाळा करीतच आहे." या खर्चाचे ऐवजीं ' प्रत्येक विद्यार्थ्यांचे पालकानें एक आणा शाळेचे फी-बरोबर फीच आहे असें समजून ' पाठविल्यास सर्व अडचण दूर होईल व अक्षर शिक्षणाचें काम उत्कृष्टपणें चालेल, अशा आशयाचें हें रा. मावळणकर यांचें पत्रक पाहतां आमच्या नू. म. विद्यालयांतील चालक अक्षराकरितां किती कसोशीनें प्रयत्न करीत हें सर्वांचे ध्यानांत येईल व हा आमच्या संस्थेचा महत्त्वाचा विशेष कसा होता हेंहि ध्यानांत येईल.


त्या बळावर ते आपला गुजारा करीत. पुढें आपला अभ्यास तसाच अर्धवट टाकून रा. आपटे यांस कांहीं दिवस सोलापूर जिल्ह्यांत बांगी येथील शाळेवर काम पत्करावें लागलें. महाराष्ट्र व्हिलेज एज्युकेशन सोसायटी या नांवाची एक संस्था त्या वेळीं असे. ती कै. रामभाऊ कळसकर यांनीं स्थापन केली होती. बांगी व इंदापूर येथील शाळांवर कांहीं दिवस काम केल्यावर रा. आपटे नू. म. विद्यालयांत आले. कांहीं दिवस येथें काम करून त्यांनीं रजा घेऊन पुनः कॉलेजचा अभ्यास केला व बी. ए. ची परीक्षा ते दुसऱ्या वर्गात पास झाले. चालकांनीं आपल्यामध्यें येऊन मिळण्याबद्दल रा. आपटे यांशीं जें बोलणें केलें, तें रा. आपटे यांनीं मान्य करून रा. आपटे हे संस्थेचे पहिले ग्रॅज्युएट चालक म्हणजे आजन्मसेवक झाले (ता. ११ जुलै १८९५). रा. मावळणकर हे व्यवस्थापकाचें काम करीत होतेच. पुढें त्यांनीं तें काम लवकरच सोडून दिलें आणि व्यापारांत शिरून मोठ्या धाडसाचे उपक्रम करून विलायतेंत जाऊन सर्व हिंदी मंडळींत फार मोठें नांव कमावलें. आज मावळणकर यांचें घर त्यांच्या पश्चातहि विलायतेस जाणाऱ्या सर्व महाराष्ट्रीयांना आपलें घर असें वाटतें. इतकी योग्यता रा. मावळणकर यांनीं विलायतेंत कमावली. रा. आपटे यांनीं व्यवस्थापकाचें काम पत्करल्यावर पूर्वीप्रमाणेंच अतिशय कळकळीनें व अतिशय दक्षतेनें अध्यापकाचें व व्यवस्थेचें काम संस्थेंत केलें.

ईयत्तेमागून ईयत्ता

मागें सांगितल्याप्रमाणें इंग्रजी पांचव्या ईयत्तेपर्यंतचे वर्ग शाळेंत उघडलेच होते. सहावी* ईयत्ताहि आम्हांस येथेंच मिळाली पाहिजे, आम्ही दुसऱ्या शाळेंत जाणार नाहीं असा त्या वेळच्या प्रेमळ विद्यार्थ्यांचा अत्याग्रह पाहून ही कठिण जबाबदारी चालकांनीं विद्यार्थ्यांच्या प्रेमाच्या व उत्साहाच्या बळावर अंगीकारिली. रा. हरिभाऊ आपटे यांचा जिवाभावाचा पाठिंबा चालकांस पहिले दिवसापासून होताच. कसलीहि अपेक्षा न करितां बाटेल तेव्हां येऊन रा. हरिभाऊ शाळेंत वर्ग घेत. त्या वेळचें त्यांचें इंग्रजीचें शिक्षण उत्कृष्ट होत असे व त्याची आठवण प्रो. श्रीकृष्ण नीलकंठ चाफेकरप्रभृति त्यांचे विद्यार्थी आजहि वारंवार काढतात. रा. विनायकरावजीहि शिक्षक या नात्यानें आपलें काम फार चोख करीत असत. एका प्रसंगीं रा. ब. महाजनी, डॉ. भांडारकरप्रभृति मंडळींनीं जेव्हां शाळेची परीक्षा घेतली तेव्हां रा. विनायकराव आपटे यांचा इंग्रजी सहावीचा वर्ग पाहून डॉ. भांडारकर यांनीं I have never seen a class better taught असा अभिमान

---

* 'सन १८९० सालच्या शेवटीं मराठी ४ ईयत्ता व इंग्रजी ५ ईयत्ता तयार होण्यापर्यंत मजल आली. ५ वर्षेपर्यंत ही स्थिति कायम राहिली. पुढें इंग्रजी सहावी ईयत्ता निघाली.' (शाळेचें छापील पत्रक, पत्रक १८, जुलै १९१३)




कै. डॉ. वि. स. घाटे, नूतन म. वि. चे
माजी भूषणभूत व आदर्श विद्यार्थी.



कै. वासुदेव गोविंद आपटे
संपादक, आनंद
लाइफमेंबर, शिक्षक प्रसारक मंडळी.

बालोद्यान प्रेस, पुणें.



शिक्षण प्रसारक मंडळी, पुणें
तहाइयात सभासद

बालोद्यान प्रेस, पुणें.

वाटण्याजोगा शेरा रा. आपटे यांस दिला. अद्यापहि शाळेच्या वार्षिक परीक्षा चालकांस बाहेरील विद्वान् बोलावून त्यांच्याकडूनच घ्याव्या लागत आणि अशा परीक्षांत चालकांच्या कामाचें चीज होईल अशा प्रकारचे उत्कृष्ट शेरे त्यांना मिळत असत. विद्यार्थ्यांचे आग्रहास्तव सहावी इयत्ता काढल्यावर सातवी[1] इयत्ता आम्हांस येथेंच पाहिजे, असा हट्ट विद्यार्थ्यांनीं धरला आणि तो प्रेमाचा हट्ट बालहट्टाप्रमाणें चालकांस पुरवावाच लागला. त्या वर्गांसाठीं चालकांनीं आपल्या जिवाचें रान करून मुलांस उत्तम प्रकारें शिक्षण दिलें. दिवस पाहिला नाहीं, रात्र पाहिली नाहीं, श्रमाकडे पाहिलें नाहीं, पैशाकडे लक्ष दिलें नाहीं. त्यांच्यासमोर एकच गोष्ट होती, एकच ध्येय होतें, तें हें कीं, घेतलेली अवघड जबाबदारी पूर्णपणें यशस्वी करून दाखवावी. विद्यार्थी चालकांशीं अत्यंत मनोभावानें सहकार करीत होते. अध्यापकांच्या संक्रमणशक्तीचा व विद्यार्थ्यांच्या ग्रहणशक्तीचा अत्युत्कृष्ट संयोग या प्रसंगीं होऊन त्याचें अत्यंत अभिनंदनीय फल चालकांस १८९६च्या मॅट्रिक्युलेशन परीक्षेचे वेळीं मिळालें. या परीक्षेस नू. म. विद्यालयांतून प्रथमच एकंदर ११ विद्यार्थी पाठविण्यांत आले व अत्यंत अभिमानाची व संतोषाची गोष्ट ही कीं, हे सर्व अकराचे अकरा विद्यार्थी मॅट्रिक्युलेशन परीक्षेंत एकजात पास झाले व त्यांपैकीं रा. विनायक सखाराम घाटे हे विद्यार्थी सर्व इलाख्यांत पहिले येऊन त्यांनीं पहिली जगन्नाथ शंकरशेट स्कॉलरशिप पटकावली. या अपूर्व यशानें विद्यार्थ्यांची, त्यांच्या अध्यापकांची व नू. म. विद्यालयाची कीर्ति चोहोंकडे दुमदुमून गेली आणि शाळेचा लौकिक फारच वाढला. पूर्वी असलेला लोकांचा चालकांवरील विश्वास अधिकच दृढ झाला आणि संस्थेच्या इतिहासांतील पुढील यशस्वी युगाचा प्रारंभ झाला. १८८३ सालापासून जवळजवळ १२।१४ वर्षांत चालकांनीं एवढी मजल मारली ती केवळ स्वतःच्या गुणांवर व जनतेच्या गुणग्राहकतेवर मारली. हायस्कूलला सरकारी[2] ग्रँट अद्यापि मिळाली नव्हती. मराठी शाळेला सरकारी मदत (रु. ९४७) इ. स. १८९२-९३ पासून मिळूं लागल्याचें मे. डायरेक्टरांच्या रिपोर्टावरून कळून येतें.

---

१. अधिष्ठायक मंडळीच्या ठरावावरून दिसतें कीं सहावी इंग्रजी पावेतों वर्ग १८९५ त होतेच. पुढें ता. १ ऑक्टोबर १८९५ पासून (त्या वेळीं वर्ष बदलण्याचे दिवस हेच होते) सातवी ईयत्ता काढावी असें ठरलें.

२. अधिष्ठायक मंडळीचे ठराव (ता. २१ ऑगष्ट १८९५) पाहतां १८९६।९७ सालाकरितां मे. डायरेक्टरांकडे ग्रांटसाठीं अर्ज करण्याचें ठरलें असें समजतें. यापूर्वी शाळा इन्स्पेक्शनसाठीं नोंदण्यांत आली होती. मे. डायरेक्टरांकडे 'एक डेप्युटेशन जावें व त्यांत डॉ. भांडारकर, रा. ब. नारायणभाई दांडेकर, रा. ब. श्रीराम भिकाजी जठार व रा. विष्णु मोरेश्वर भिडे व दोन व्यवस्थापक यांनीं जावें' असा ठराव झाला.

तिसरा खंड

१८९६ ते १९१६

वनवासांतून विद्यामंदिरांत

प्लेगचा कहर

१८९६ सालापासून सुमारें २० वर्षेपर्यंत पुण्यांत प्लेगचा कहर बहुधा सालोसाल उडत असे आणि त्याची बाधा शिक्षणसंस्थांना अतोनात झाल्यावांचून राहिली नाहीं. सालोसाल ४।२ महिने संस्था कधीं कधीं तर बंदच करण्याचा प्रसंग यावा. विद्यार्थी नाहींत, अर्थात् उत्पन्न नाहीं; अर्थात् शिक्षकांना पगारहि नाहीं. अशा स्थितींत शिक्षक तरी टिकावे कोठून? आणि त्यांनीं न टिकावें तर जावें तरी कोठें? अशी विलक्षण संकटमय परिस्थिति प्राप्त झाली होती. प्लेगच्या पाहिल्या वर्षी तर पुण्यासारख्या लाख दीड लाख लोकसंख्येच्या शहरांत मृत्यूचें मान ३००।४०० पावेतोंहि जाई. शहराला भयाण प्रेतकळा चढत असे. भर दिवसा शहराच्या मध्यवस्तींतसुद्धां हिंडण्यास भय वाटे. अशा स्थितींत केवळ लोकाश्रयावर चाललेली आणि सरकारची मदत नसलेली इंग्रजी शाळा कशी तगते हा प्रश्नच होता. परंतु चालकांची दृढ निष्ठा व चिकाटी व परमेश्वरावरील श्रद्धा यांमुळेंच केवळ या महत्संकटांतून ही संस्था त्यांस पार पाडतां आली. मुलांच्या नियमित अभ्यासाचें या प्लेगामुळें किती नुकसान होत असे व त्यामध्यें कसा खंड पडे याचा ज्यांनीं अनुभव घेतला आहे, त्यांसच कल्पना येईल. आधींच आमची शाळा गरीब, त्यांतून हा असा खंड; तेव्हां या कालांत संस्था जगवण्यास संस्थेचा एकनिष्ठ शिक्षकवर्ग आणि दृढनिश्चयी चालकवर्ग यांचे श्रमच कारणीभूत झाले यांत संशयच नाहीं; आणि ही त्यांची कामगिरी संस्थेच्या इतिहासांत केवळ अपूर्व आहे! नू. म. विद्यालयावर त्या संस्थेतील शिक्षकांचें किती अनिवार प्रेम होतें याचें प्रत्यंतर या संकटकालांत फार उत्कृष्ट प्रकारें मिळालें. चारचार महिन्यांचा पगार मिळाला नाहीं तर नाहीं, परंतु प्लेगचे दिवस संपून गांव पुन्हा भरलें व शाळा पुनः सुरू झाल्या, म्हणजे हें शाळाभिमानी शिक्षकमंडळ पुन्हा बिनचूक कामावर हजर होई आणि पुढील सालच्या प्लेगच्या स्वारीची वाट पहात आपलें काम धैर्यानें व न डगमगतां करीत राही. पुढें जेव्हां सरकारी मदत शाळेस मिळूं लागली तेव्हां या प्लेगच्या दिवसांतील सक्तीच्या रजेवद्दल कांहीं थोडा मोबदला शिक्षक-

वर्गास देतां येऊं लागला. तसेंच प्लेग आंगवळणीं पडल्यावर शाळेचे कांहीं वर्ग बाहेर तंबू ठोकून किंवा झोंपड्या बांधून त्यांत भरविण्यांत येऊं लागले.

वाइटांतून चांगलें

प्लेगच्या दिवसांत मुलांचा शाळेचा अभ्यास बुडत असे हें खरें; तथापि वाइटांतहि चागलें कांहीं निघतें या न्यायास अनुसरून बऱ्याच मुलांस रानांत बाहेर उघड्या हवेवर किंवा खेडेगांवीं मोकळ्यावर राहण्यास मिळे आणि भरपूर व्यायाम करण्यास संधी सांपडून व सृष्टीचे देखावे पाहण्यास मिळून एक प्रकारें बराच फायदा शिक्षणदृष्ट्याहि मिळत असे, असें म्हटल्यास वावगें होणार नाहीं. बाहेर रानांतील वस्तींत बरेवाईट अनेक प्रसंग अनुभवावयास सांपडत, आसपास हिंडण्यास पोहण्यास सांपडे, प्रापंचिक घरगुती पुष्कळ कामें स्वतः हातांनीं करावीं लागत, आणि यांमुळें एक प्रकारचा धीटपणा अंगीं येऊन बरेंच व्यवहारज्ञान होई. पुण्याचे आसपास तर कित्येक लोकांनीं आपल्या कायमच्या छावण्या केल्या होत्या आणि त्यांत राहण्यास गेल्यावर रानझाडें व रानफुलें, नाना प्रकारांच्या औषधी, प्राणी, किडे, कीटक वगैरे दृष्टीस पडून त्यांची थोडीफार माहिती मुलांस सहज होत असे; थंडी, वारा, ऊन सोसण्याची शक्ति अंगांत येई आणि एकंदर प्रकृती सुधारे. किंबहुना आम्हांस असेंहि वाटतें कीं, सन १८९५ च्या सुमाराला व त्यापूर्वी एकंदर शिकलेले व शिकणारे लोक खुजे, अशक्त व दुर्बळ बनत चालले आहेत, यांचें आतां पुढें कसें होईल, असें जें भय विचारी लोकांस वाटत होतें त्याचा अंशतः निरास, प्लेगच्या दिवसांनीं अभ्यासांत खंड पडून मोकळ्या हवेंत राहावयास मिळाल्यामुळें होऊन, या काळांतील विद्यार्थी अधिक निरोगी व सशक्त असे झाले असें विचारांतीं म्हणण्यास चिंता नाहीं.

नू. म. विद्यालयाचें संपूर्ण हायस्कूल १८९६ त सुरू झालें व प्लेगचेंहि ग्रहण त्याच वेळेपासून जें लागलें तें न्यू पूना कॉलेज सुरू होईपर्यंत जवळजवळ २० वर्षें टिकलें. या प्लेगयुगांत संस्थेचीं सर्व सूत्रें श्री. विनायक गणेश आपटे यांच्याच हातीं होतीं. रा. विनायकरावजी आपटे हे बी. ए. होण्यापूर्वीच संस्थेस कसे येऊन मिळाले आणि पुढें बी. ए. होऊन नू. म. विद्यालयाच्या आजन्मसेवकां-पैकीं पहिले ग्रॅज्युएट आजन्मसेवक म्हणून संस्थेंत कसे दाखल झाले, हा वृत्तांत मागें सांगितलाच आहे. या संकटकालांत याच करारी, कष्टाळू व कडक गृहस्थांच्या हातांत नू. म. विद्यालयाच्या सुपरिंटेंडेंटीचे अधिकार होते आणि म. शि. प्र. मंडळीची चिटणीशीहि होती. अनेक संकटांशीं टक्कर देत, धिमेपणानें परंतु धीरानें विनायकरावजींनीं संस्थेची सेवा मोठ्या मनोभावें केली. शांतपणें, गाजावाजा न करितां, आपलें कार्य मोठें पवित्र आहे आणि परमेश्वर आपणांस यश दिल्याशिवाय राहणार नाहीं, अशी पक्की श्रद्धा ठेवून रा. विनायकराव व

त्यांचे सहकारी यांनीं हे दिवस काढले व म्हणूनच संस्थेला सोन्याचे दिवस आले. एकदा निश्चयपूर्वक जें व्रत घेतलें तें संस्थेच्या सेवेचें व्रत या मंडळींनीं अखंडपणें चालविलें, चिकाटी सोडिली नाहीं, आक्षेप जुमानले नाहींत आणि आपला पुण्य-मार्ग रेसभरहि सोडला नाहीं. हें कसकसें होत गेलें, संस्थेवर बरेवाईट प्रसंग कसे आले व त्यांतून संस्थेचें पाऊल कसें पुढें पडलें हें आतां जरा विस्तारानें पाहूं.

सालोसाल शाळेंत विद्यार्थ्यांची संख्या वाढत होती. १९०१-०२-०३ सालीं इंग्रजी व मराठी दोन्ही शाळांत प्रत्येकीं विद्यार्थ्यांची संख्या सुमारें ५०० ते ६०० अशी असे, असें म्हणावयास हरकत नाहीं.

दोन संस्मरणीय विशेष

ता. २० ऑगस्ट १९०१ रोजीं मध्यभागचे शाळातपासनीस मि. आर. डी. प्रायर यांनीं शाळेची तपासणी केली. नू. म. विद्यालयास भेट देण्याचा हा त्यांचा पहिलाच प्रसंग होता आणि त्या पहिल्याच प्रसंगाला पटावरील ५८४ पैकीं ५३४ मुलें हजर पाहून हजेरीचें हें प्रमाण 'पुण्यांतील दुसऱ्या कोणत्याहि संस्थेपेक्षां अधिक मोठें आहे व तें पाहून आपण थक्क झालों' असा शेरा मशारनिल्हे प्रायर यांनीं लिहून ठेवलेला आहे.

मि. प्रायर यांनीं त्याच भेटींत या आमच्या शाळेचा दुसरा एक अत्यंत संस्मरणीय विशेष संतोषपूर्वक नमूद केला आहे. नू. म. विद्यालय हें मागें सांगि-तल्याप्रमाणें केवळ ट्रेनिंग कॉलेजांतून बाहेर पडलेल्या व इंग्रजी न जाणणाऱ्या अशा मराठी शिक्षकांनीं स्थापिलें होतें. आणि स्थापनेपासून विनायकरावजी आपटे येऊन मिळेपर्यंत कायमचा असा एकहि ग्रॅज्युएट शिक्षक संस्थेंत नव्हता. आणि पुढेंहि ग्रॅज्युएट शिक्षकांची संख्या पुष्कळच कमी असे. ट्रेनिंग कॉलेजां-तील मंडळींच्या हातीं आणि अनुभवी अशा अंडरग्रॅज्युएट लोकांचे हातीं बरेच वर्ग या शाळेंत देण्यांत येत असत; आणि त्यांचीं कामें ते इतक्या कळकळीनें व दक्षतेनें करीत असत कीं, मोठ्या पदवीधर विद्वानांसहि त्यांचा हेवा वाटावा. त्यांना अर्थातच कमी पगार दिल्यानें भागत असे आणि यामुळेंच सरकारी मदत पुष्कळ वर्षें मिळाली नाहीं तरीहि चालकांनीं तग धरला. गणित, मराठी, वगैरे विषय ही ट्रेनिंगांतील मंडळी बरच्या वर्गांसहि शिकवीत. मामा करंबेळकर यांजकडे गणित शिकण्यास कॉलेजमधीलहि विद्यार्थी मोठ्या उत्सुकतेनें येत असत याची साक्ष पुष्कळजण देतील. १८९६ सालीं जेव्हां मॅट्रिकचा वर्ग निघाला किंवा विद्या-र्थ्यांचे आग्रहावरून काढण्यांत आला, त्या वेळीं विद्यार्थ्यांचा हुरूप पाहून हेच शिक्षक एकदम पुढें झाले व पूर्वी न शिकविलेले अवघड अवघड विषय त्यांनीं मोठ्या मेहनतीनें व कळकळीनें शिकवून मोठेंच यश कसें मिळविलें तो इतिहास मागें सांगितला आहेच. विनपदवीधर आणि वेताची विद्वान् असली तरी 'संक्रमण'

सामर्थ्यात मोठ्यामोठ्यांसहि मागें न हटणारी, खटपटी व कळकळीनें भरलेली अशी ही शिक्षकमंडळी होती. अर्थात् प्रायर यांनीं ही पद्धति पाहून ती आपणांस अत्यंत यशस्वी वाटल्याचें वरिष्ठांकडे लिहून कळविलें.

ना. गव्हर्नरसाहेबांची पहिलीच भेट

प्रायरसाहेबांची भेट झाल्यावर थोड्याच दिवसांनीं म्हणजे ता. ११ ऑक्टोबर १९०१ रोजीं ने. ना. गव्हर्नरसाहेब यांनीं शाळेस भेट दिली. १८८३ सालानंतर संस्थेस गव्हर्नरसाहेबांनीं दिलेली ही पहिलीच भेट होय. मुलांची कवाईत व शाळेंतील शिक्षण पाहून नामदारसाहेब संतुष्ट झाले; तथापि शाळेला सरकारी मदत देण्याबद्दल आपली कितीहि इच्छा असली व सहानुभूति असली, तरीहि आपण तसें करण्यास असमर्थ आहों असें गव्हर्नरसाहेब म्हणाले. तथापि, २३ सप्टेंबर १९०१ रोजीं संस्थेनें मदतीकरितां जो अर्ज सरकारांत केला होता, त्याबाबत मि. जाइल्स, डायरेक्टर, यांजकडून ता. १२ मे १९०२ रोजीं सहानुभूतीचें उत्तर येऊन शाळा मदतीकरितां नोंदण्यांत आली व अशा रीतीनें इंग्रजी शाळेचें पूर्ण हायस्कूल झाल्यावर सहा वर्षांनीं सरकारांतून मदत मिळूं लागली. या मदतीमुळें चालकांस शाळेच्या सुधारणेकडे अधिक लक्ष देण्यास सवड सांपडली, हें उघड आहे. या सरकारी मदतीकरितां मि. प्रायर यांनीं सप्टेंबर १९०२ मध्यें खालील इयत्तांची सरकारमार्फत परीक्षा घेतली. पटावरील ६७९ मुलांपैकीं ४०० मुलांची परीक्षा होऊन त्यांत २४० किंवा शें. ६० इतके विद्यार्थी सर्व विषयांत पास झाले, असा उत्तेजनकारक निकाल लागला. सन १९०१ सालीं मॅट्रिक्युलेशनला ३२ मुलें जाऊन २३ मुलें पास झालीं व विद्यार्थी जगन्नाथ गणेश गुणे (हल्लींच्या लोणावळें येथील कैवल्यधाम या अपूर्व संस्थेचे स्थापक श्री. कुवलयानंद) यांस दुसरी जगन्नाथ शंकरशेट स्कॉलरशिप मिळाली. १९०२ सालीं ३२ विद्यार्थी पाठविले, त्यांपैकीं २३ पास झाले.

हायस्कूल व मिडलस्कूल स्कॉलरशिप परीक्षांमधूनहि या शाळेंतील विद्यार्थी वरींच बक्षिसें मिळवीत असलेले दिसतात. असो. शिक्षकवर्गापैकीं एक अत्यंत सुने व अनुभविक शिक्षक रा. केशवराव परांजपे[1] हे सन १९०२ सालीं प्लेगला

---

१. रा. केशव बळवंत परांजपे—१८८६ ते १९०२ पावेतों शाळेंत शिक्षक होते. मराठी विषय इंग्रजी दुसऱ्या इयत्तेस शिकवीत त्याचा आम्हांस अनुभव आहे. हातांतील छडीचीं दोन टोकें दोन आंगठ्यांच्या चिमटींत धरून वर्गांत येरझारा करणारी यांची गौरवर्ण शुभ्रवेषी मूर्ति जेव्हां शाळा सुटल्यावर सर्व तुकड्या एकत्र बोलावून महाभारतांतील गोष्टी सांगे, तेव्हां आम्हां विद्यार्थ्यांस परमानंद वाटे! रा. दाणी, परांजपे, सखारामपंत पंडित, वैंगरे मंडळी दुसरी इयत्ता घेत तर रा. अध्ये, दत्तोपंत जोशी, हेर्लेकर हे तिसरी घेत. पहिलीचें काम रा. भिकाजीपंत निमकर, ढेकणे, ढापरे प्रभृतींकडे या वेळीं असे (इ. स. १९०० ते १९०३).

बळी पडले, ही दुर्दैवाची गोष्ट होय. एकंदर शिक्षकवर्गानें संस्थेबद्दल आस्थापूर्वक केलेल्या खटपटीबद्दल संस्थेच्या अहवालांत व्यवस्थापकांनीं प्रशंसोद्गार काढले आहेत हें येथें नमूद केलें पाहिजे.

तालीमखान्याची अडचण संस्थेस प्रथमपासूनच होती आणि कवायतीकडे विशेष लक्ष पुरविण्याबद्दल मि. प्रायर यांनींहि सूचना केली होती. ती उणीव भरून काढण्याकरितां श्री. बी. डी. पटवर्धन या पेटिट इन्स्टिटयूटचें सर्टिफिकेट असणाऱ्या गृहस्थास शिक्षक नेमून ही उणीव दूर करण्याचा प्रयत्न याच सुमारास करण्यांत आला.

प्लेगची स्थिति सुधारली नाहीं, उलट जास्तच बिघडली. तथापि शाळेंतील मुलांची संख्या टिकून राहिली. या सालीं नामदार गव्हर्नर लॉर्ड नॉर्थकोट यांनीं श्री गणेश चतुर्थीचे मंगल दिवशीं म्हणजे ता. २६ ऑगस्ट १९०३ रोजीं शाळेंतील बक्षिससमारंभाचें अध्यक्षपद स्वीकारिलें. 'आपण लवकरच विलायतेस परत जाणार, तथापि हिंदुस्थानांतील लोकांची शिक्षणाची आस्था पाहून आपणांस फार संतोष होतो,' असें सांगून 'हिंदुस्थान हा एक फार गरीब देश आहे, त्यामुळें येथील शिक्षणास इच्छा असूनहि फारशी मदत करतां येत नाहीं.' असें नामदारसाहेबांचें म्हणणें पडलें. 'आम्हां इंग्रज लोकांचे मनांत हिंदुस्थानांतील शिक्षणांत व्यर्थ ढवळाढवळ करावी अशी बिलकुल इच्छा नसून त्याची योग्य दिशेनें वाढ व्हावी, यासाठींच लोकहितार्थ व लोकांबरोबरच सरकारासहि या प्रकरणीं काम करण्याची इच्छा आहे आणि इतक्या उत्कृष्ट रीतीनें व इतक्या उत्साहानें चाललेलें हें तुमचें नू. म. विद्यालय पाहून ही आपली आशा निर्फळ होणार नाहीं,' असा भरंवसा नामदारसाहेबांनीं व्यक्त केला. या सालीं म्हणजे ता. १४ सप्टेंबर १९०३ रोजीं इं. शाळेची मि. प्रायर यांनीं व १२ सप्टेंबर रोजीं रा. मोरोपंत कीर्तने यांनीं मराठी शाळेची तपासणी केली व संतोष व्यक्त केला. मि. प्रायर यांनीं आपल्या रिपोर्टांत या शाळेंतील मुलांची उत्तम शिस्त व येथील नीतिशिक्षण देण्याचा विशेष प्रयत्न याची मोकळ्या मनानें तारीफ केलेली आहे.

पहिल्याच वर्षीं पहिलें बक्षिस

सरकारनें शाळांतील अभ्यासक्रमपत्रक नुकतेंच सुधारलें होतें. तदन्वयें समाविष्ट झालेल्या वैकल्पिक विषयांपैकीं सातवीशिवाय इतर वर्गांस कवाईत, चवथीपांचवीस रेखाकला ऊर्फ ड्रॉइंग आणि सहावीस वस्तुपाठ असे वैकल्पिक विषय सुरू करण्यांत आले होते. मराठी शाळेंत देखील वस्तुपाठांची योजना झाली होती व कवायतीकरितां पटवर्धन गेल्यावर रा. पाटणकर यांची नेमणूक करण्यांत आली होती. हेहि पटवर्धनांप्रमाणेंच पेटिट इन्स्टिटयूटचें प्रशंसापत्र धारण करणारे असून आपल्या कामांत, प्लेगांत वारलेल्या आपल्या बंधूंप्रमाणें (हे शाळेंत पुष्कळ दिवस

शिक्षक होते) बाकबगार होते. आट्यापाट्यांचे सामने शाळाशाळांतील विद्यार्थ्यांत नुकतेच होऊं लागले होते आणि त्यांतील पहिलें बक्षिस पहिल्याच वर्षी आपल्याच शाळेस मिळालें ही मोठी अभिमानाची गोष्ट आहे. क्रिकेटची शाळेंत सुरुवातहि नुकतीच झाली होती आणि १९०४ सालीं शाळेचा क्रिकेटसंघ शेवटच्या फेरीपर्यंत गेला होता. या शाळेचा क्रिकेटसंघ याच वेळीं प्रथम सामन्यांत शिरला होता व पहिल्याच वर्षी येथील बिशप हायस्कूलशीं कुरबूर होऊन प्रसंग मारामारीवर बेतला; तथापि आनंदाची गोष्ट ही कीं, सरकारी चौकशींत आमची शाळा सर्वथा निरपराधी ठरली.

या सालीं शाळेच्या स्थापनेपासून मोठ्या उत्साहानें व नियमितपणानें आणि भक्तीनें शाळेची सेवा करणारे आणि पुढें शाळेच्या आजन्मसेवकांत दाखल झालेले रा. भिकाजीपंत[1] निमकर हे कालवश झाले. पायांत आगरकरी जोडा, पांढरा शुभ्र आंगरखा, स्वच्छ रुमाल आणि पाणीदार डोळे असलेले भिकाजीपंत वर्गांतून इकडेतिकडे फिरत भिंवया वर चढवून मुलांस आपल्या खड्या आवाजानें उदाहरणांचा पाठ देत आहेत व त्यांच्या गंभीर मुद्रेला पाहून मुलें त्यांस मोठीं वचकून वागत आहेत असा देखावा अद्यापहि आमच्या स्मरणांत आहे. भिकाजीपंत गणित व ढेकणे इंग्रजी अशा फक्कड रीतीनें शिकवीत कीं त्यांच्या हाताखालून तयार झालेला वर्ग कधींच कच्चा लागत नसे. असा उत्तम शिक्षक गेल्यामुळें शाळेचें खरोखरीच फार नुकसान झालें. तथापि पुण्यांतील एक प्रसिद्ध नागरिक कै. कृष्णाजी रघुनाथ ऊर्फ तात्या केळकर यांचे चिरंजीव नरहरपंत ऊर्फ बाबा केळकर, बी. ए., जे गेल्या दोनतीन सालांपासून शाळेंत शिक्षकाचें काम करीत होते, त्यांची भर आजन्मसेवकांत पडून आजन्मसेवकांची संख्या ७ झाली.

या वेळीं मराठी शाळेंत १७ व इंग्रजी शाळेंत २८ शिक्षक कामावर होते. ३९ रुपयांची मदत म्यु.नें नादाऱ्यांकरितां इंग्रजी शाळेस दिली होती व स्कूल फायनलचा वर्ग उघडावा असा चालकांचा विचार सुरू होता. अशा किरकोळ गोष्टी सोडल्या तरी शाळेला स्वत:ची जागा व स्वत:ची इमारत असावी व विद्यार्थ्यांकरितां एक वसतिगृह असावें अशा प्रकारचा विचार चालकांचे मनांत फार जोरानें येऊं लागला.

ना. लॉर्ड लॅमिंग्टन यांची भेट

प्लेगची पीडा चालूच होती. तथापि भरतीच्या वेळीं शाळेंतील मुलांची संख्या १३५६ पर्यंत जाऊन पोहोंचली होती. या सालीं पुन्हा बक्षिससमारंभाकरितां

---


१. रा. भिकाजीपंत यांची ट्रेनिंग परीक्षा झाली नव्हती. प्रथमपासूनच चालक मंडळांत ते समाविष्ट न होण्याचें हेंच बहुधा कारण असावें.

म्हणून नामदार गव्हर्नरसाहेबांचा लाभ झाला. नॉर्थकोट यांचे मागून आलेले गव्हर्नर नामदार लॉर्ड लॅमिंग्टन यांनीं ता. २० सप्टेंबर १९०४ रोजीं मुलांना बक्षिसें वाटलीं. त्या वेळीं शाळेच्या मूळ संस्थापकांच्या स्वार्थत्यागाची ना. लॉर्ड लॅमिंग्टन यांनीं फार प्रशंसा केली व इंग्रजी शाळेस ग्रँट मिळाली आहे तेव्हां अधिक सुधारणा करून दाखविल्याबद्दल संतोष व्यक्त केला. तालमींतील मुलांची संख्या १०।१२ आहे ती वाढवून दाखवून आपली शाळा पुण्यांतील एक उत्कृष्ट शाळा होईल अशी आशा त्यांनीं व्यक्त केली. ता. १४ सप्टेंबर रोजीं श्री. कीर्तने व २९ सप्टेंबरला श्री. बळवंतराव सहस्रबुद्धे यांनीं सरकारतर्फे शाळेची तपासणी केली. ७५३ पैकीं ७१० मुलें हजर पाहून सहस्रबुद्धे यांस आनंद वाटला. संख्येच्या दृष्टीनें पाहिलें तर ती शाळा सर्व पुण्यांत मोठी आहे यावरून तिची लोकप्रियता सिद्ध होते, असा सहस्रबुद्धे यांनीं आपला अभिप्राय दिला. शाळेंतील शारीरिक शिक्षणाची तारीफ करून सहस्रबुद्धे यांनीं तालीममास्तर पाटणकर यांच्या चलाखीबद्दल अत्यंत अनुकूल मत दर्शवून ते सरकारी हायस्कुलांत घेण्यास लायख आहेत असें लिहून कळविलें. मराठी शाळेंत वस्तुपाठाचा नवा विषय दामुआण्णा कुलकर्णी हे मोठ्या यशस्वी रीतीनें घेत व शिक्षकांसहि त्यांनीं तयार केल्याबद्दल अधिकाऱ्यांनीं संतोष व्यक्त केला आहे.

पुणें येथें गायनसमाज नांवाच्या प्रसिद्ध व जुन्या संस्थेमार्फत मराठी पहिल्या इयत्तेस फेब्रुवारी १९०५ पासून गायन शिकविण्यास प्रारंभ केला. यापासून मुलांच्या वृत्ती उल्हसित होऊन सुपरिणाम घडून येईल अशी चालकांस आशा होती.


दामुआण्णा कुळकर्णी

हायस्कूल स्कॉलरशिपचे चढाओढींत सर्व तिन्ही स्कॉलरशिपा पटकावण्याचा अपूर्व मान या शाळेनें मिळविला. असा मान कोणत्याहि शाळेस बरींच वर्षें मिळाला नव्हता. मॅट्रिकला पाठविलेल्या ३९ मुलांपैकीं २६ मुलें १९०४ सालीं पास झालीं. क्रीडांगणाकरितां दरसाल १०० रुपयांचें जबर भाडें देऊन शाळेनें गुदस्तापासून एक बखळ जागा घेतली होती. अशा प्रकारें सर्व बाजूंनीं शाळेची समाधानकारक प्रगति होत असतां शाळेवर एकाएकीं मोठा घाला पडला. सप्टेंबर १८८३ मध्यें शाळेच्या चालकवर्गांत दाखल झालेले रामचंद्र भिकाजी कुलकर्णी ऊर्फ दामुआण्णा हे या सालीं प्लेगला बळीं पडले. आणि त्यामुळें शाळेचा एक आधारस्तंभच मोडून पडल्याप्रमाणें झालें. रुबाबदार चेहरा, टपोरे पाणीदार डोळे, हुकमी आवाज, तीव्र स्मरणशक्ति, माणसाची अचुक पारख, उत्कृष्ट व्यवहारज्ञान, प्रेमळपणा, विषय शिकविण्याची उत्कृष्ट हातोटी या आपल्या अंगच्या अनेक गुणांमुळें आपल्या विद्यार्थ्यांत व सहकाऱ्यांत दामूअण्णा हे अत्यंत लोकप्रिय झाले होते. मंडळीचे अध्यक्ष डॉ. भांडारकर यांची त्यांजवर अत्यंत मर्जी असे. डॉ. भांडारकर



कै. रामकृष्ण भिकाजी ऊर्फ दामुअण्णा कुलकर्णी
नू. म. वि. चे एक जुने व्यवस्थापक व आजन्मसेवक.

बालोद्यान प्रेस, पुणे.



कै. डॉ. कृष्णाजी गोविंद लोहोकरे बी. ए. (मेडॅलिस्ट)
नू. म. वि. चे माजी विद्यार्थी, आजन्मसेवक, नंतर कांहीं वर्षे
लेजिस्लेटिव्ह असेंब्लीचे सभासद.

बालोद्यान प्रेस, पुणें.

यांनीं दामुअण्णांचे अनेक गुण पाहून त्यांस आपल्या बरोबर वरिष्ठ कायदे कौन्सिलांत कर्झनसाहेबांचें युनिव्हर्सिटी बिल आलें असतां मदतीकरितां नेलें होतें ! दामुआण्णा यांनीं **निबंधमालेची आर्यभूषण आवृत्ति** आपल्या कुलकर्णी आणि मंडळीमार्फत प्रसिद्ध केली होती. निबंधमालेनंतर निबंधचंद्रिका निघाली त्या उपक्रमांतहि दामुआण्णांचें अंग होतें व हरिभाऊ आपटे यांच्या करमणूक पत्राशीं तर त्यांचा निकट संबंध होता. अशा प्रकारचा प्रेमळ, कष्टाळू व वजनदार चालक नाहींसा झाल्यामुळें संस्थेचें नुकसान तर झालेंच आणि ज्या सारस्वत समाजाला ते एक भूषण होते त्याचें व अखिल महाराष्ट्राचेंहि मोठें नुकसान झालें. तथापि चालकांनीं धीर न सोडतां आपल्या अंगावरील बाढत्या जबाबदाऱ्या पार पाडण्यास आपली कंबर कसून तयारी केली तो प्रसंग पुढें वर्णन करूं.

१९०५–६ साल किंचित् स्वस्थतेचें जातें न जातें तोंच १९०६–०७ सालांत प्लेगचा कहर उसळून शाळेस धक्का बसला. एप्रिल १९०६ त १५२३ व जुलै १९०६ त १६५६ अशी मुलांची संख्या शिगेला गेली ! परंतु ३१ मार्च १९०७ ला पटावर १५१८ संख्याच राहिली. असा चढउतार प्लेगमुळें अपरिहार्य होता. चालकांनीं न डगमगतां येईल त्या प्रसंगाला पाठ देऊन काम पुढें चालविण्याचा निश्चय बिलकुल सोडला नाहीं.

लॅमिंग्टनसाहेबांची पुनः भेट

पूर्वीच्या भेटीनंतर सुमारें एक वर्षानें म्हणजे सप्टेंबर ११, १९०५, रोजीं ने. ना. लॉर्ड लॅमिंग्टनसाहेब यांनीं शाळेस पुनः भेट देऊन मुलांस बक्षिसें वाटलीं. स्वतः लॉर्डसाहेबांनीं ठेवलेलें आपल्या नांवचें बक्षिस या शाळेंतून १९०५ सालीं मॅट्रिक पास झालेल्या विद्यार्थ्यांत सायन्स विषयांत पहिल्या आलेल्या सखाराम विनायक आपटे (आतां एम्. ए., बी. एससी., प्रोफेसर, कॉलेज ऑफ् इंजिनिअरिंग, पुणें) या विद्यार्थ्यास दिलें. लॉर्डसाहेबांनीं आपल्या भाषणांत आपण पूर्वी आलों असतांना मुलांनीं **व्यायाम व तालीम** यांकडे अधिक लक्ष द्यावें अशी जी सूचना केली होती ती अंमलांत आणली गेली याबद्दल संतोष व्यक्त केला, आणि एखाद्या कामावर सर्व लक्ष एकवटलें तर हटकून यश प्राप्त होतें असा आपल्या चिरंजीवास केलेला उपदेश या प्रसंगीं पुन्हा व्यक्त करून शाळेस अभीष्ट चिंतिलें.

४ सप्टेंबर, १९०५, रोजीं मे. प्रायरसाहेब यांनीं शाळेची कसून तपासणी केली; आणि त्यांच्या अहवालावरून **डायरेक्टरसाहेबांनीं** आपला संतोष आपल्या सरकारी अहवालांत प्रसिद्ध केला. विशेषतः स्कूल फायनलचे परीक्षक यांनीं मुलांचें अक्षर सुधारण्याबद्दल केलेल्या सूचनांवरून त्या बाबतींत अधिक लक्ष देण्यास

भ्र. प्रायर यांनीं सुचविलें. त्याचप्रमाणें भूगोलहि जुन्या पद्धतीनें न शिकवितां नव्या पद्धतीनें व अनेक ग्रंथांच्या साहाय्यानें शिकविण्याविषयीं सूचना केली. मराठी ट्रेनिंगचें महत्त्व जसें चालकांनीं ओळखलें आहे, तसेंच इंग्रजी शाळेचे शिक्षकांसहि अध्यापनशास्त्राचें आवश्यक तें ज्ञान दिलें पाहिजे व म्हणून एस्. टी. सी. चे परीक्षेस शाळेंतील शिक्षक पाठविण्यास आग्रहपूर्वक सूचना केली. सन्नागरिकत्वाचें योग्य शिक्षण देण्याविषयींचा शाळेचा कटाक्ष कायम असल्याचें पाहून आणि मोडी अक्षराविषयीं घेतली जाणारी दक्षता बाखाणून मे. प्रायर यांनीं आपला अभिप्राय समाप्त केला.

मराठी शाळेची तपासणी ३१ ऑगस्ट, व १ सप्टेंबर, १९०५, रोजीं मे. शेख रुस्तम व १९०६ सालीं रा. कीर्तने यांनीं करून समाधान व्यक्त केलें. मराठी शाळेंत गायन शिकविण्याचा केलेला उपक्रम पुणें गायनसमाजाचे बतीनें सर्व वर्गांस चालू केला व त्याचा फायदाहि चांगला दिसून आला. स्कॉलरशिप परीक्षांचा निकाल सालाबादप्रमाणें यशस्कर लागला. मॅट्रिक्युलेशन परीक्षेस ४६ विद्यार्थी पाठविले त्यांतील ३३ पास झाले आणि संख्येच्या दृष्टीनेंच नव्हे तर गुणांच्या दृष्टीनेंहि शाळेचा निकाल त्या सालीं फार सरस झाला. कृष्णाजी विष्णु जोशी (हल्लीं एम्. ए., एलएल्. बी., वकील, व प्रोफेसर, झेविअर कॉलेज, मुंबई) व यशवंत अनंत गोडबोले (हल्लीं आय्. सी. एस्., बिहार) हे दोन विद्यार्थी सबंध इलाख्यांत अनुक्रमें तिसरे व चवथे असे आले; आणि गोडबोले यांनीं दुसरी जगन्नाथ शंकरशेट स्कॉलरशिप मिळविली. १९०६ सालीं ७५ पैकीं ४५ विद्यार्थी मॅट्रिक्युलेशनला पास झाले आणि इलाख्यांत ७ वा व शहरांत पहिला असा शाळेचा क्रम लागला. ड्रॉइंगच्या परीक्षांत आर. बी. गवंडी व के. बी. कुलकर्णी यांनीं बक्षिसें मिळविलीं. स्कूलफायनलचा जम अजून बसावयाचाच होता व ती परीक्षाहि अमळ मोघम स्वरूपाची होती.

प्रख्यात मराठी लेखक आनंदकर्ते श्री. वा. गो. आपटे, बी. ए., हे नोव्हेंबर १९०५ मध्यें शाळेच्या चालकांस येऊन मिळाले. आजन्म सेवकमंडळांत प्रविष्ट होण्यापूर्वी सुमारें तीन वर्षे त्यांनीं शाळेंत उत्तम शिक्षक म्हणून नांवलौकिक मिळविला होता. मुलांच्या शिक्षणासाठीं ते हौसेनें झटत असत. नीतिशिक्षणाचा उपक्रम त्यांनीं हातीं घेतला होता. विशेषेंकरून जुने चालक एकामागून एक प्लेगला बळी पडत होते अशा वेळीं रा. आपटे यांची जोड विशेषच लक्षांत भरण्यासारखी होती.

लागू मास्तर

प्लेगचें सत्र चालू होतें आणि या वेळीं तर शाळेवर त्यानें कहर केला. १९०६ सालीं रा. सखारामपंत पंडित व व्ही. जी. गोडबोले प्रभृति पांच

शिक्षक प्लेगवश झाले. खुद्द चालक मंडळासहि प्लेगनें सोडलें नाहीं. आपल्या मोडी लेखनानें आणि मोडी अक्षराच्या शिकवणीनें अत्यंत विख्यातीस आलेले या शाळेचे एक अत्यंत जुने चालक रा. नारायण गंगाधर लागू हे ऑगष्ट १९०५ मध्यें मृत्यु पावले. डोंगरे[1] व लागू यांनीं नू. म. विद्यालयांत मुलांस इंग्रजी-मराठी अक्षरें शिकविण्याचा लौकिक मोठ्या परिश्रमानें कायम ठेवला होता. एका हातानें लांब पातीचा भला मोठा चाकू हातांत घेऊन, अंगांत सदरा, वर जाकीट, डोकें बहुधा मोकळेंच, शेंडी बहुधा मागें टाकलेली, तांबडें उभें गंध कपाळास असलेले असे लागू मास्तर समोरील बांकावर बसून मधून मधून लेखण्या करीत आहेत आणि मधून मधून एकीकडे मुलांस 'शांताकारं भुजगशयनं' चीं वळणें घालून देत आहेत आणि त्याच बेळीं बसल्या जाग्यावरूनच आपली तीक्ष्ण नजर समोरच्या शेंपन्नास मुलांवर चालवून त्या मुलांच्या समोर ठेवलेल्या दौतींच्या लांब लांकडी ठोकळ्यांवर कोरून काढलेले मुलांचे क्रमांक दुरून नेमके उच्चारून मुलांच्या चुका तेथूनच सांगत आहेत आणि त्यांना शब्दानें ताडण करीत आहेत

---

[1] कै० डोंगरे हे मूळचे रत्नागिरीजवळील केळ्यें येथें राहणारे. यांचे वडील बाळभट्ट यांच्या मुलांमुलींत डोंगरे सर्वांत लहान. यांचा जन्म भाद्रपद शु॥ ४ शके १७८३ ता. ७ सप्टेंबर १८६१ रोजीं झाला. लहानपणीं शिक्षण बेतावेंच झालें. बाळभटजींचे वडील चिरंजीव रा. गोविंदराव हे भोर संस्थानांत श्रीमंत नानासाहेबांचे पदरीं होते, तेथेंच कृष्णाजीपंतांचें शिक्षण झालें. पंधरावे वर्षीं रा. डोंगरे यांचें लग्न झालें. डोंगरे यांची सर्व मंडळी आतां भोरास राहावयास आली. कृष्णाचे ठिकाणीं हूडपणा बराच होता. पुढें शिकण्यासाठीं म्हणून पुण्यास ट्रेनिंगांत पाठवावें म्हणून कृष्णास त्याची बहीण पुण्यास होती तिचेजवळ शिक्षणासाठीं ठेविलें. द. म. ६ रु. शिष्यवृत्ती मिळवून त्यांचा ट्रेनिंगांत प्रवेश झाला. तेथें जोरजोडी, मलखांब करून त्यांनीं मेहनत केली व ऑक्टोबर १८८० त दुसऱ्या वर्षाचें सर्टिफिकेट घेऊन ते डहाणू मुक्कामीं नोकरीवर दाखल झाले. १८८२ ऑक्टोबरांत परवानगी मिळवून त्यांनीं तिसऱ्या वर्षाची परीक्षा दिली. पगार रु. २० झाला. नेमणूक उंबरगांवास झाली. सरकारी नोकरीचा कंटाळा येऊन स्वतंत्र उद्योग करण्याविषयीं वाटाघाटी रा. डोंगरे, शिंनकर, उकिडवे, चित्रशाळेचे रा. वासुदेवराव जोशी वगैरे मंडळींत सुरू झाल्या. मराठी शाळेची कल्पना रा. उकिडवे यांनीं पुढें मांडली. डोंगरे यांस ती पटली. मग रा. दाणी यांचा अक्षरशाळा ताब्यांत घेऊन पहिल्या खंडांत वर्णिल्याप्रमाणें त्यांनीं शाळेची सेवा फार मोठी अशी केली. रात्रंदिवस शाळेशिवाय त्यांचे डोक्यांत विषय नसे. अशा एकनिष्ठ रीतीनें शाळेची सेवा करून ते ता. १४।२।२२ रोजीं थोड्या आजारानें निमित्त होऊन वारले. डोंगरे यांचा वर्ण काळा सांवळाच होता, तथापि त्यांचे नजरेंत एक प्रकारची जादू होती यांत शंकाच नाहीं. आजची वृत्ति, समयसूचकता, एक प्रकारची असाधारण

असें लागूंचें चित्र आजहि आमच्या नजरेसमोर उभें असलेलें आम्हांस अजूनहि दिसत आहे. 'पुस्त्या हातांत धरून उभे रहा' असा आपल्या खणखणीत आवाजांत त्यांचा हुकूम होतांच पलटणींतील शिपायांप्रमाणें मुलें उभीं राहत व मग वर वर्णिलेली लागू मास्तरांची मूर्ति एका हातांत छडी घेऊन पेन्सिलीनें पुस्त्यांवर भराभर गुणांचे आंकडे टाकीत चाले. त्या वेळीं मध्येंच थबकून 'लेका, तुझ्या कपाळाला गंध कां नाहीं?' असें कोणास म्हणून कपाळावर छडी मारावी तर दुसऱ्याचा दंड धरून चाचपून 'थोडे नमस्कार घालीत जा,' अशी इशारत द्यावी व त्याच वेळीं तिसऱ्या कोणा गडबड करणाऱ्या विद्यार्थ्यास '×××××' असें खडसवावें असा त्यांचा नेहमींचाच क्रम असे. लागूंची जागा भरून काढणारा शिक्षक मिळणें फार दुरापास्त होतें. तथापि शाळेच्या अगदीं प्रारंभींच्या वर्षी शाळेंत असलेले रा. सीताराम नरहर महाजन यांनीं पुन्हा कामावर येऊन लागूंची उणीव बरीच भरून काढली व डोंगरे यांस मदत केली यांत शंका नाहीं.

बाबा प्लेगला बळी पडले

ऑक्टोबर १९०६ मध्यें नरहर कृष्ण ऊर्फ बाबा केळकर या आजन्म सेवकांचा प्लेगनें बळी घेतला. शुद्धाचरण, कडक स्वभाव, कळकळ आणि विद्वत्ता हे

कल्पकता, सावधपणा, एकनिष्ठा, साधेपणा, हिशेबीपणा वगैरे अनेक गुण त्यांचे ठिकाणीं दिसून आले. वर्गांत शिकवतांना डोंगरे, नेवासकर, शेंडे, आबा कुलकर्णी प्रभृति मंडळींच्या पोशाखाचा एक नमुना असे. आंत तांबड्या काड्याचा सद्रा, वर काळें जाकीट, त्यावर एक काळा किंवा भुरा शॉर्ट कोट, स्वच्छ पांढरें धोतर, लांब शेंडीची भली मोठी गाठ मानेच्या मध्यावर आलेली आणि डोक्यावर तपकिरी रंगाची हॅगेरियन टोपी, हातांत छडी आणि जरूर असेल त्या वेळेस नाकावर चष्मा, असा त्या चौघांचा एक छाप होता. बाहेर जातांना रा. डोंगरे यांचा पोषाख तांबडी सुती झिळमिळ्याची पगडी, काळा किंवा निळा कोट, पांढरें स्वच्छ उपरणें असा असे. पायांत मुद्दाम बांधवलेला असा काळा स्लिपर ते वापरीत. दुसऱ्याला खुलवून त्याचें अंतःकरण प्रसन्न करून त्याला अनुकूल प्रेरणा करण्याच्या कामांत डोंगरे प्रवीण होते. त्यांनीं एकदां आपली नजर तिरपी करून आपल्या विशिष्ट रीतीनें कोणाकडे पाहिलें म्हणजे राग, प्रेम वगैरे आपले मनोविकार ते मोठ्या परिणामकारक तऱ्हेनें प्रगट करीत. विष्णुबुवा जोगांच्या सहवासालाच ते होते, तथापि आपला देव शाळाच असें ते समजत. सदरा एकच असला तरी तो रात्रीं धुऊन सकाळला वाळवून अंगांत घालतांल पण कधींहि मलीन राहणार नाहींत. आपल्या डोळ्यांदेखत आपण लावलेल्या वृक्षाला मधुर फळें आलेलीं पाहण्याचें सद्भाग्य त्यांना लाधलें म्हणून जसें डोंगरे स्वतःला धन्य समजत तसे, ज्या एका मराठी ट्रेड मास्तरांनीं आपल्या कौशल्यानें व एकनिष्ठेनें हें अपूर्व साहस केलें त्याचें चरित्र आपणास पहावयास सापडलें व त्याचा सहवास आपणास झाला याबद्दल प्रस्तुत लेखक स्वतःस धन्य समजतो.

बाबांचे ठळक गुण होत. तास, घंटा वगैरेसारख्या निर्जीव किंवा पुढील तासाचे शिक्षक किंवा अधिकारी अशा सजीव सूचना यांतून कोणांकडेहि लक्ष न देतां बाबा आपलें शिकवणें चालू ठेवून सारा किल्लेवाडा दणाणून सोडीत. घेरी आली तरी शेवटपर्यंत तसाच नेट धरून बसत. कीस इतका काढीत कीं, तासांत धड ओळ दोन ओळी सुद्धा धडा आटपे न आटपे. मात्र जें होई तें पक्कें होई. बाबा यांनीं १८८६ त दुसरी जगन्नाथ शंकरशेट स्कॉलरशिप मिळविली होती; अर्थात् ते बहुधा संस्कृत शिकवीत. संस्थेविषयीं त्यांचे ठायीं विलक्षण कळकळ होती. त्यांच्या मृत्यूनें संस्थेचें मोठें नुकसान झालें हें सांगावयास नकोच.

तालीममास्तर रा. पाटणकर यांना अखेर सहस्रबुद्धे यांचे शिफारशीप्रमाणें सरकारनें आपलेकडे घेतलें. त्यांचे जागीं रा. जोगळेकर यांची नेमणूक करण्यांत आली. शाळेकरितां भाड्यानें घेतलेला क्रीडांगणाचा एक तुकडा अपुरा पडूं लागल्यामुळें तो बदलून एक एकर जागा अधिक घेतली आणि या कामीं सालीना २४० रु. भाडें कबूल केलें. हायस्कूलमधील प्रत्येक मुलामागें एक आणा व मिडल स्कुलांतील प्रत्येक मुलामागें अर्धा आणा याप्रमाणें प्रत्येकीं खेळफी घेण्याचा उपक्रम करण्यांत आला.

भटवाड्यास आग

माणसें गेलीं एवढी एकच हानि संस्थेची १९०६ मध्यें झाली असें नव्हे, तर मार्च २४, १९०६, रोजीं शाळेच्या ५० वर्षांचे इतिहासांत आला नाहीं असा मोठा अनर्थ कोसळला. या दिवशीं मध्यरात्रीं सर्वत्र सामसूम असतांना आप्पा बळवंत कोपऱ्याजवळ असलेल्या आवटी नांवाच्या एका लेखनसामान विकणाऱ्या दुकानदाराच्या दुकानास आंत चुकून राहिलेला दिवा भडकल्यामुळें आग लागली. थोड्याच वेळांत धुराचे प्रचंड लोट बाहेर येऊं लागले! आणि दिवाळीकरतां आणलेल्या दारूंतील शिलकी दारूनें पेट घेऊन फटाक्यांचे बार आकाशांत उंच उडूं लागले! इतक्यांत भटवाड्याचा वरचा मजलाही पेटून ज्वाळांची धग भर रस्त्यावर इतक्या जोरानें येऊं लागली कीं, रस्त्यापलीकडील मोरोबादादावाड्यांतील वाळत टाकलेल्या एका कांबळ्यालाहि आहाळ लागली! धुराच्या लोटांनीं सबंध रस्ता भरून गेला! लोक जमा होऊं लागले. आंत आग कोठवर पसरली याचा बाहेर कांहीं अंदाज येईना. किल्यांच्या वाड्याचें काम टोलेजंग तीन मजली चिरेबंदी होतें आणि क्षणभर आरसेमहालासकट हा सारा वाडा पेटला कीं काय असें वाटून मंडळी हताश झाली होती. हा पेटीबंद वाडा त्या वेळीं शाळेकडेच बहुतेक भाड्यानें असे. मोठ्या दरवाजाला बाहेर शाळेचें कुलूप लागलें होतें व आंत जाण्याला तेवढाच एक मार्ग होता. कुलपाच्या किल्ल्या आणण्यासाठीं गोविंदाला (हा शाळेचा मुख्य गडी) विनायकरावांचे घराकडे पिटाळण्यांत आलें. सदाशिव

पेठेंतून किल्ल्या येईपर्यंत आग आधिकच भडकली. पण दार उघडतांच वाड्याचा सर्व भाग शाबूत आहे आणि आग फक्त रस्त्याबरील भटांचे वाड्यापलीकडील चार खणांचे पलीकडे पसरली नाहीं असें दिसून आलें. पण भटांचे वाड्यांतच जेथें आग लागली त्याचे अगदीं नजीक, वरच शाळेची कचेरी, कागदपत्र व ग्रंथालयाचा कांहीं भाग होता. हा सारा भाग जळून खाक झाला आणि त्यांत शाळेचें बहुतेक जुनें दप्तर अग्नयेस्वाहा झालें! आग थांबविण्याकरतां पाण्याचे बंब जागेवर आले, परंतु पाण्याचाच पत्ता नव्हता. उन्हाळ्यामुळें रात्रीचें पाणी कांहीं तास बंद होतें. मोठ्या नळाची चावी फिरवून पाणी येऊन पोहोंचेपर्यंत आणखी अर्धा तास गेला व लोकांना आगीकडे टकमक पहात उभे राहावें लागलें! आगीवर मारा करण्याकरितां, पाण्याचे नळ हातीं धरण्यास माऱ्याचीं योग्य ठिकाणें लवकर सांपडेनात. अखेर पहांटे पांचचे सुमारास आग कह्यांत आली. परंतु इतक्या अवधींत शाळेची कचेरी व भटांचा दवाखाना बहुतेक जळून गेला. पाण्याचे बंब घुमसणाऱ्या आगीवर आपला वर्षाव पुढें एक दिवसभर अधूनमधून करीत होतेच. अशा या भयंकर आगींतून वांचलेला किबेवाडा कांहीं वर्षांपूर्वी अवघ्या दोन तासांत भरदिवसा अग्नीनें खाऊन टाकला; आणि किबेवाड्यांतील प्रेक्षणीय व नक्षीदार छताचे व सुरूच्या खांबाचे दिडके दिवाणखाने व आपलींच हजारों रूपें आपल्या भोंवतालीं उभीं करून मति गुंग करून टाकणारा या वाड्यांतील तो अजब ऐनेमहाल ऊर्फ आरसेमहाल याचाहि चक्काचूर होऊन गेला! असा हा फडकेवाड्याचा दुर्दैवी सोबती किबेवाडा आतां पुन्हा कोणाच्याहि दृष्टीस पडावयाचा नाहीं. तथापि ज्या नू. म. विद्यालयाचे विद्यार्थ्यांनीं यांत आपले लहानपणचे दिवस आनंदांत घालविले त्यांच्या स्मरणांत मात्र तो होता तसाच अखंड राहील. या अग्निप्रलयामुळें शाळेचें दप्तर जळालें ही गोष्ट शाळेला तर फारच त्रासदायक झाली; परंतु या शाळेचा पन्नास वर्षांचा इतिहास लिहिणाऱ्या या लेखकासारख्या लेखकांचीं किती तरी अमूल्य साधनें या प्रसंगीं नष्ट झालीं त्याची कल्पनाच करणें बरें. एवढें संकट आलें तरीसुद्धां चालकांनीं शाळेसाठीं स्वतंत्र नवी इमारत बांधण्याची कल्पना नेटानें यशस्वी करण्याचा चंग बांधला आणि कर्जरोख्याची नवी योजना काढून पैसा जमविण्याचा उद्योग केला. यावरून संस्थेची अंत:शक्ति किती प्रबळ होती याची कल्पना येईल. प्लेगचें लिगाड अद्यापहि सुटण्याचें चिन्ह दिसेना आणि प्रायरसाहेब तर १९०७ सालीं दोन वेळां अचानक व एक वेळ परीक्षेसाठीं असे शाळेंत आले (१६ ऑगस्ट व सप्टेंबर २९). तिन्ही वेळ शाळेंतील काम त्यांना समाधानकारक दिसून आलें व शाळेची इमारत केव्हां तयार होईल याची आपणांस व चालकांसहि उत्कंठा लागून राहिल्याचें त्यांनीं आपल्या अहवालांत लिहिलें आहे. रा. मोरोपंत कीर्तने यांनीं ७ सप्टेंबर १९०७ रोजीं मराठी शाळेची तपासणी करून संतोष वाटल्याचा

नूतन मराठी विद्यालय–इंग्रजी शाळा

पाहिले संमेलन १९०५



बालोद्यान प्रेस, पुणें.

१९२५ चा क्रिकेट-संघ.



गोविंदा भागवत, दिनकर त्रिं. गुप्ते, चंद्रशेखर त्रिं. गुप्ते, पुरुषोत्तम नगरकर, होळे.
रा. आर. आर. देशपांडे, खाडिलकर, यशवंत लिमये, सुळे, लक्ष्मण महादेव जोशी, पेंडसे, पाटणकर.
गोविंदा (गडी), भालू दामले, सखाराम रानडे, जोगळेकर, दातार, परांजपे, राजा दामले, रा. देवळ.

शेरा लिहिला. मॅट्रिकचा निकाल यंदा जरा बेताचा म्हणजे ६६ पैकी २८ झाला. तथापि स्कूलफायनलमध्ये १७ विद्यार्थी (शें. ४३) पास होऊन संख्येच्या दृष्टीनें मध्यभागांत शाळेचा पहिला नंबर आला.

मामा करंबेळकर स्वर्गवासी झाले

दरसाल एका चालकाचा बळी घ्यावयाच्या काळाच्या क्रमांत याहि वर्षी अंतर पडलें नाहीं. बाबांच्या मागून मामांची पाळी आली. आणि ता. २३ फेब्रुवारी १९०८ रोजीं शाळेचे एक प्रमुख संस्थापक, एकनिष्ठ व इमानी सेवक, राजशास्त्री देवकुळे यांचे एक पट्टशिष्य मामा करंबेळकर हे आपण स्थापलेल्या नू. म. विद्यालयाची २५ वर्षे सेवा केल्यावर आपलें नांव व कीर्ति मागें ठेवून आपल्या कालवश झालेल्या सहकार्यांचे समागमासाठीं स्वर्गवासी झाले! गोरा वर्ण, प्रशांत मुख, पोट सुटून पुढें आलेलें, मंद गति, थंड स्वभाव, लहान आवाज असे मामा वर्गांत येतांना आपलें मोठें, हिरव्या रंगाचें विष्णुशास्त्रीनमुन्याचें भव्य पागोटें आपल्या बसावयाच्या खोलींत ठेवून काळी टोपी घालून, हातांत पुस्तक व खडू घेऊन यावयाचे आणि खुर्चीवर एकदां आसन ठोकलें म्हणजे फळ्यापर्यंत तरी कोण जातो अशा भावनेनें बऱ्याच आकृति केवळ हवेंत बोटांनीं किंवा छडीनें काढून दाखवून विषयाची समजूत करून द्यावयाची अशी त्यांची रीत असे. अगदीं रागावले तर " बैलोबा " एवढें त्यांनीं म्हटलें कीं पुरें होई! चष्मा लावावयाचा नाहीं, मात्र एक मोठा कांचेचा गोळा घेऊन हळुहळू इंग्रजी उदाहरण वगैरे वाचावयाचें. गणितांत मामांचा हात धरणारा शिक्षक विरळा यांत शंका नाहीं. गणित शिकविण्याशिवाय, अगदीं शाळेचा पहिला नारळ फुटला त्या दिवसापासून शाळेच्या हिशेबाचें काम मामांच्याकडेच असे. त्यामुळें फीभरणा वगैरेसाठीं आम्हांस त्यांचेकडे रोज जावें लागे. अगदीं मितभाषी परंतु किंचित् विनोदी अशी त्यांची ही साधी परंतु भव्य मूर्ति कधींहि स्मरणांतून जाण्याजोगी नव्हती!

केसकर आले

अशा प्रकारें चालकमंडळांत पडणारा खड्डा भरून काढण्यासाठीं नवीन लोकांस संस्थेच्या आजन्म-सेवेची दीक्षा द्यावी लागे. अशा तऱ्हेची दीक्षा गेलीं २।३ वर्षे म्हणजे १९०५ सालापासून शाळेमध्ये शिक्षकाचें काम करीत असलेले रा. विश्वनाथ अनंत केसकर, बी. ए., यांस देण्यांत आली. (रा. केसकर हे सांप्रत विश्वनाथमहाराज योगी म्हणून प्रसिद्ध आहेत. अमेरिकेंतून परत येऊन यांनीं नुकतांच पुण्यांत कांहीं दिवस मुक्काम केला होता हें पुष्कळांच्या स्मरणांत असेलच.) रा. केसकर हे नव्या वळणाचे, तरतरीत व विद्यार्थ्यांशीं खेळीमेळीनें वागणारे असे प्रेमळ शिक्षक होते. विशेषेंकरून क्रिकेटप्रभृति खेळांकडे त्यांनीं विशेष लक्ष दिलें आणि मुलांत हुरूप आणला.

ग्रँट-इन्-एड कोडाच्या नियमांची दुरुस्ती या वेळीं होत होती. ग्रँट-इन्-एड नियमांत बराच फरक होऊन आपली ग्रँट शक्य तितकी वाढवून मिळावी म्हणून चालकांनीं प्रयत्न केला. भौतिक शास्त्रासाठीं कांहीं नवीन उपकरणें इंग्लंडहून मागविलीं. मुंबईच्या सेकंडरी कॉलेजचे पहिले प्रिन्सिपॉल मि. फ्रेझर यांनीं पसंत केलेल्या दुबैठकी बाकांसाठीं बाराशें रुपये खर्च केले. याप्रमाणें सुमारें तीन हजार रुपये शाळेच्या सुधारणेसाठीं चालकांनीं या वेळीं खर्च केले.

किबेवाडा यानंतर आर्यभूषण छापखान्याकडे आला आणि मोरोबादादांच्या वाड्यांत शाळेस पुनः जावें लागलें. कांहीं मोरोबादादावाडा, कांहीं भटवाडा आणि कांहीं राउंड अशी शाळेची त्रिस्थळी यात्रा झाली, त्यामुळें मुलांना पुष्कळच गैरसोयी सोसाव्या लागल्या. त्या त्यांनीं शाळेवरील प्रेमामुळें सोसल्या.

ग्रँट वाढली

सरकारी नियमान्वयें शाळेस मिळावयाची सरकारी मदत या शाळेच्या इंग्रजी शाखेस मिळूं लागल्याचा उल्लेख मागें गव्हर्नरसाहेबांचे भेटीचे वेळीं आलाच आहे. सन १९०८ पावेतों इंग्रजी शाळेस मदतरूपानें सरकारांतून ५७६२ रु. मिळत होते. मराठी शाळेस सरकारी मदत इंग्रजी शाळेच्या पुष्कळ पूर्वीपासून मिळत होती. या वेळीं या मदतीचा आंकडा रु. १४२७ होता. दोन्ही शाखांची फेरतपासणी होऊन त्यांची सरकारी मदत वाढवून मिळावी म्हणून अर्ज सरकारांत गुदरण्यांत आले. इंग्रजी शाळेचा अर्ज १५ एप्रिल व मराठी शाळेचा ४ मे रोजीं गुदरला. मग सरकारी नियमपत्रकास अनुसरून मेहेरबान प्रायरसाहेब यांनीं इंग्रजी शाळेची व रा. गणेश नारायण खरे यांनीं मराठी शाळेची अत्यंत कसून व खुलासेवार अशी तपासणी केली. उभय तपासनीसांचे अहवाल पाहतां त्यांचें शाळेच्या कारभाराविषयीं समाधान झालेलें दिसून येतें. मे. प्रायर यांस शाळेचा कारभार पुष्कळ दिवसांचे अनुभवानें चांगलाच माहीत झालेला होता; आणि शाळेचे व्यवस्थापक श्री. विनायकराव आपटे व त्यांची सहकारी मंडळी यांनीं शाळेंत ठेवलेली शिस्त आणि तेथील विद्यार्थ्यांचें सद्वर्तन यांवर ठेवलेला कटाक्ष यांविषयीं प्रायरसाहेबांचा अत्यंत अनुकूल ग्रह होता; इतकेंच नव्हे तर शाळेचा कारभार चालक अत्यंत दक्षतेनें आणि अत्यंत काटकसरीनें (most economically managed) चालवतात हेंहि मि. प्रायर यांनीं मुद्दाम नमूद केलें आहे. अर्थात् दोन्ही शाळांना मिळणारी मदत वाढवून एकूण खर्चाचा तिसरा हिस्सा या प्रमाणांत देण्यांत यावी, अशी वरील अधिकाऱ्यांनीं शिफारस केली व त्याप्रमाणें इंग्रजी शाळेस रु. ७१८५ व मराठी शाळेस रु. १८११ याप्रमाणें सालिना मदत मिळूं लागली.

प्लेगची अडचण चालूच होती आणि त्यांत जागेच्या अडचणीची भर. भटवाडा जळल्यापासून चालकांना फार त्रास झाला. मोरोबादादाचा वाडा मोठा असला तरी तितका सोईस्कर नव्हता व यामुळें स्वतंत्र इमारतीचा प्रश्न शक्य तों लवकर सोडविणें चालकांस भाग पडलें.

१९०८ चे निकाल

परीक्षांसंबंधीं पाहतांना आपटे, वर्तक, गोखले, दांडेकर (कासार) या विद्यार्थ्यांनीं स्कॉलरशिप परीक्षांत नांव मिळविलें. स्कूल फायनल परीक्षेंत १९०८ सालीं ३३ पैकीं १६ पास झाले. हा आंकडा मध्यभागांत मागील सालाप्रमाणें सर्वांत जास्त होता. १९०८ मध्यें मॅट्रिकमध्यें ७८ पैकीं ३२ विद्यार्थी पास झाले. ड्रॉइंग थर्ड ग्रेड परीक्षेचा वर्ग १ फेब्रुवारी १९०८ रोजीं शाळेंत सुरू करण्यांत आला होता व ऑगस्ट १९०८ मध्यें २४ विद्यार्थी परीक्षेला गेले, त्यांपैकीं ९ पास झाले. यांत लेले या विद्यार्थ्यानें चांगलें काम केलें. हा निकाल शाळेंतील शिक्षक रा. टिकेकर यांस भूषणावह झाला. खेळ व व्यायाम यांतहि शाळेचें पाऊल पुढेंच पडलें. चढाओढीच्या सामन्यांत शाळेंतील विद्यार्थ्यांनीं अधिक बक्षिसें मिळविलीं.

तेलंग आले

चालकमंडळींत जुलै १९०८ पासून श्री. रामेश्वर गंगाधर तेलंग, बी. ए., यांस घेण्यांत आलें. पीळदार शरीर, निकोप प्रकृति, तरुण वयांतला उत्साह, शांत व मनमिळाऊ स्वभाव आणि शिकवण्याची हातोटी यांमुळें रा. तेलंग यांनीं, ते शाळेंत डिसेंबर १९०५ रोजीं आल्या दिवसापासून, सर्वांचा अनुकूल ग्रह संपादन केला होता. एकंदरींत पदवीधर मंडळी शाळेच्या चालक वर्गांत येऊन शाळेचा वाढता भार सहन करण्यास पुढें सरसावूं लागली होती अशीं स्पष्ट चिन्हें दिसत होतीं. गेलीं ९।१० वर्षें शाळेंत आपल्या उत्कृष्ट शिक्षणपद्धतीनें प्रसिद्धीस आलेले शाळेंतील एक कायम शिक्षक रा. गोपाळ सदाशिव गोडबोले यांनीं उत्साहानें पुढें येऊन प्रायरसाहेब यांचे सूचनेप्रमाणें सेकंडरी टीचर्स सर्टिफिकेट परीक्षेचा अभ्यास करून त्यांत उत्कृष्ट यश मिळवून इतरांस अनुकरणीय उदाहरण घालून दिलें व शाळेंतील एक मोठी उणीव अंशतः दूर केली.

मृत्यूचा शेर या सालींहि मृत्यूस द्यावाच लागला. जवळजवळ शाळेच्या स्थापनेपासून शाळेची एकनिष्ठ सेवा करीत असलेले शाळेंतील एक उत्कृष्ट व अनुभविक शिक्षक रा. गणेश हरि चाफेकर हे वारल्यामुळें शाळेचें मोठें नुकसान झालें. मराठी व गणित हे विषय शिकवण्यांत यांचा हातखंडा असे. याप्रमाणें जुन्यांपैकीं एकेक शिक्षक हळुहळू मृत्युवश होत होते, तथापि त्यांची जागा नवीन

ग्रॅज्युएट शिक्षक पुढें येऊन भरून काढीत होते, अशी स्थिति आतां इतक्या वर्षांनीं आली होती.

सन १९०९–१० मध्यें प्लेगापासून थोडी उसंत मिळेल अशी आशा वाटूं लागली. ३१ मार्च १९१० रोजीं इंग्रजी शाखेकडे ११८५ व मराठी शाखेकडे ६११ एकूण संख्या १७९६ झाली. एवढी अबाधन्य संख्या यापूर्वी शाळेंत कधींच झाली नव्हती. ११ ऑक्टोबर, १९०९, रोजीं बदली एज्युकेशनल इन्स्पेक्टर रा. ब. केळकर यांनीं शाळेची तपासणी करून समाधान व्यक्त केलें.

खेळांत पहिला नंबर

परीक्षांमध्यें जोशी, ओतूरकर व गवंडी यांनीं, स्कॉलरशिप परीक्षा पास होऊन, शाळेचा लौकिक राखला. मॅट्रिक्युलेशनला १९०९ सालच्या परीक्षेंत ७८ पैकीं ५० मुलें पास झालीं आणि संख्येच्या दृष्टीनें इलाख्यांत शाळेचा नंबर ६ वा लागला; आणि गुणाच्या दृष्टीनें ३ रा लागला. गुण व संख्या उभय दृष्टीनें संस्था बरीच वर आली. ही तिच्या वाढत्या लोकप्रियतेची व उपयुक्ततेची उत्कृष्ट साक्ष होय. आणि हेंच तिच्या चालकांच्या एकनिष्ठेचें त्यांस मिळालेलें सुफल होय. स्कूल फायनल परीक्षेंत १६च मुलें पास झालीं. ड्रॉइंग परीक्षेचे निकाल चांगले लागून के. जी. भागवत यानें चांगला शेरा मिळविला. खेळांमध्येंहि १० बक्षिसें मिळवून सर्व शाळांत पुण्यांत पहिला नंबर मिळवून आव्हानाची ढाल शाळेस मिळाली. १९०१ सालीं स्थानिक शाळांची क्रीडासभा अस्तित्वांत आल्यापासून १९०९ सालीं शाळेस एवढें मोठें यश मिळालें. हें यश मिळवून देण्यामध्यें तिखे, भणगे, खानगांवकर, मळेकर, कांबळे, मोरगांवकर, आगाशे व शेट्ये या विद्यार्थ्यांचें कौशल्य कारण झालें.

रा. लोहोकरे आजन्म सेवक झाले

शाळेचा शिक्षकवर्गहि आतां वाढत चालला. इंग्रजी शाळेंत ८५ शिक्षक असून त्यांत १२ ग्रॅज्युएट व मराठी शाळेमध्यें २१ शिक्षक असून त्यांत ६ ट्रेंड होते. चालकमंडळांतहि एका तरुण, स्वावलंबी आणि महत्त्वाकांक्षी गृहस्थाची भर पडली. त्यांचें नांव कृष्णाजी गोविंद लोहोकरे असून त्यांचा प्रवेश चालक मंडळांत जून १९०९ मध्यें झाला. आजपर्यंत चालकमंडळामध्यें याच शाळेंत शिकून बाहेर पडलेला कोणीहि विद्यार्थी नव्हता, परंतु रा. लोहोकरे हे नू. म. विद्यालयांत शिकून तयार झालेले होते. शाळा सोडल्यावर त्यांनीं हॉस्पिटल असिस्टंटची परीक्षा दिली आणि त्या आधारावर आपलें कॉलेजशिक्षण पुरें करून अर्थशास्त्रांत एक पदक मिळवून ते पदवीधर झाले आणि संस्थेच्या चालक वर्गांत येऊन मिळाले. गणित हा त्यांचा अत्यंत आवडता विषय होता आणि तोच

विषय त्यांना आपले प्रिय गुरु कै. मामा करंबेळकर यांचे पश्चात् शाळेंत शिकवावा लागला.

स्वत:ची भरवस्तींत जागा

शाळेसाठीं स्वतंत्र इमारतीची खटपट चालक अलीकडे बरींच वर्षे करीत होते. प्लेगच्या भयंकर कहरांत संस्था टिकणेंच किती दुष्कर होतें, मग पैसा शिल्लक टाकणें किंवा नवीन मिळविणें हें त्याहूनहि किती दुष्कर असेल याची कल्पनाच करावी. अनेक वर्षेपर्यंत लायकी असूनहि सरकारी ग्रँट संस्थेस मिळाली नाहीं. चालक मंडळी 'आपण बरें, आपलें काम बरें,' अशा वृत्तीनें, एकनिष्ठेनें परंतु अत्यंत गरीबींत आपलें काम परमेश्वरावर भरंवसा ठेवून करीत राहणारी अशांपैकीं होती. अधिष्ठायकमंडळामध्यें डॉ. भांडारकरांसारख्या मंडळींचा समावेश असल्यानें त्यांची नैतिक सहानुभूति व पाठबळ चालकांस भरपूर होतें; तथापि आर्थिक प्रश्न तेवढ्यानें सुटण्यासारखा नव्हता. हरप्रयत्न करून, प्रसंगीं आपल्या व आपल्या शिक्षकांच्या पोटास चिमटा घेऊन, पडेल तो पैसा खर्च करून आपल्या संस्थेकरितां भर शहरांत मध्यवस्तींत एक विस्तीर्ण जागा संपादन, करावयाचीच असा त्यांनीं निश्चय केला. या निश्चयाला ईश्वरकृपेनें चांगलें फळ आलें. अनेक खटपटी करून चालकांनीं आनंदाश्रमापलीकडील खासगीवाल्यांचा विस्तीर्ण वाडा शाळेसाठीं मिळविला. याचा एक भाग त्यांनीं पूर्वीच खरेदी केला होता. तथापि तेवढ्यांत शाळेला पाहिजे तेवढी इमारत बसून शाळेची सोय पूर्ण होण्याजोगी नसल्यामुळें पलीकडील भागहि खरेदी करणें त्यांस भाग पडलें. शाळेचे धोरणी चालक कृष्णाजीपंत डोंगरे यांनीं फार मेहनतीनें आणि चतुराईनें सौदा पटविला; आणि नऊ हजार रुपयांस खासगीवाले वाड्याचा दुसरा भाग संस्थेकरितां विकत घेतला. या भागांत खासगीवाल्यांचा जुना दिवाणखाना व भोंवतालीं पडक्या-झडक्या इमारती असाच पसारा होता. तथापि, एवढी मोठी विस्तीर्ण जागा ऐन नाक्यावर व भर शहरांत मिळणें ही केवळ भाग्याची गोष्ट होय; आण तें भाग्य नू. म. विद्यालयाला लाभलें, हें चालकांच्या आजवरच्या पुण्याईला अत्यंत अनुरूप असेंच फळ आलें असेंच म्हटलें पाहिजे. मध्यवस्तींत सुमारें एक एकर क्षेत्रफळाची विस्तीर्ण भूमि शाळेचें विद्यामंदिर बांधण्याकरितां चालकांना मिळाल्यानें त्यांची एक मोठीच काळजी दूर झाली आणि आज पंचवीस वर्षे जिवापलीकडे बाढविलेली शाळा आतां आपण लवकरच स्वत:च्या घरांत नेऊन शिकवूं असा विश्वास चालकांत उत्पन्न झाला. आज जी आपण शाळेची भव्य इमारत पाहतों ती याच जागेवर आहे. या जागेची वास्तु ऐतिहासिक व पवित्र अशीच आहे; आणि ती संस्थेला एकंदरींत मोठी लाभदायक झाली असें पुढील इतिहासावरून म्हणण्यास हरकत नाहीं.

१९१०-११ चे निकाल

सन १९१०-११ सालींसुद्धां प्लेगचा उपद्रव जरा शमल्यासारखाच झाला. मुलांची संख्या वाढली व अभ्यास सुधारले आणि एकंदरींत स्थिरस्थावर होण्यास सुरुवात झाली. या वर्षी प्रायरसाहेबांनीं २४ ऑगष्ट १९१० रोजीं पहिली अचानक भेट दिली व ७ ऑक्टोबर रोजीं कामाची बारकाईनें तपासणी केली. शाळा तपासणीला चांगली लागली. आपटे, कस्तुरे, फडतरे व अब्दुल मुनशी यांनीं स्कॉलरशिपा मिळविल्या. मॅट्रिकमध्यें ८६ पैकीं ४८ मुलें पास झालीं. स्कू. फा.मध्यें ३४ पैकीं १८ पास झालीं. ड्रॉइंगचे निकालहि साधारणच झाले आणि खेळांचे बाबतींत शाळेनें गतवर्षी मिळविलेली आव्हानाची ढाल यंदाहि ९ बक्षिसें मिळवून कायम ठेवली. मेढेकर, परचुरे, आगाशे, कापडे, खानगांवकर, वाकनीस व तिखे या विद्यार्थ्यांनीं या कामीं चांगली शाबासकी मिळविली.

शिदोरे, गोखले, लेले, गोडबोले आजीव सेवक झाले

चालकमंडळामध्यें रा. गोविंद पंढरिनाथ शिदोरे, बी. ए., या ग्रॅज्युएट गृहस्थांची भर पडून शिवाय संस्थेंत कित्येक वर्षें उत्कृष्ट काम करून चांगला नांवलौकिक मिळविलेले परंतु ग्रॅज्युएट न झालेले असे पुढील तिघे गृहस्थ यांसहि चालकमंडळांत घेण्याचा योग जुळून आला. हे तीन गृहस्थ म्हटले म्हणजे शाळेंतील प्रख्यात संस्कृत शिक्षक रा. रामचंद्र जनार्दन गोखले, नांवाजलेले संस्कृत मराठी वक्ते, लेखक व शिक्षक रा. लक्ष्मण गणेशशास्त्री लेले आणि अनुभवी व यशस्वी शिक्षक रा. गोपाळ सदाशिव गोडबोले हे होत. रा. शिदोरे यांस मुलांच्या शरीरांकडे लक्ष देऊन त्यांचीं शरीरें निरोगी व बळकट करण्याचे कामीं विशेष कळकळ होती. त्यांच्या या गुणाला आणि त्यांच्या या उत्साहाला या शाळेंत चांगलाच वाव मिळण्यासारखा होता आणि तिकडे त्यांनीं लक्षहि पण चांगलें दिलें. अशा रीतीनें चालकमंडळांत चार नवीन सभासदांची भर पडली असतां जुन्यांतील एक अनुभवी व प्रसिद्ध शिक्षक रा. वासुदेवरावजी आपटे, बी. ए., यांची प्रकृति बिघडून अखेर त्यांनीं राजिनामा देऊन चालकमंडळांतून नांव काढलें. असेतोंवर रा. आपटे यांनीं संस्थेची सेवा मोठ्या उल्हासानें केली. परंतु प्रकृतीच्या दुर्बलतेमुळें त्यांस वर सांगितल्याप्रमाणें राजीनामा द्यावा लागला. मार्च १९१० मध्यें शाळेंतील एक अनुभवी शिक्षक रा. दादा गोडबोले हे कालवश झाले. ते मोठे करारी व नियमित असे होते.

या वर्षी मुद्दाम १०० रुपये खर्चून मुलांकरितां पुस्तकालय पुन्हा सुरू करण्यांत आलें. नीतिशिक्षणाविषयीं रा. वासुदेवरावजी आपटे यांचे देखरेखीखालीं योग्य प्रकारची योजना शाळेंत अमलांत होती. दरमहा ९ रुपयांची एक स्कॉलर-

शिप श्रीमंत बाबासाहेब इचलकरंजीकर यांनीं सहावी ईयत्तेंतील मुलांस ठेवली व ती पहिल्याच वर्षी गोखले या मुलास मिळाली.

शाळेचें संमेलन १९०५ मध्यें मोठ्या उत्साहानें रा. केसकर यांच्या प्रोत्साहनानें सुरू करण्यांत आलें होतें. त्याप्रमाणें १९१०–११मध्यें जें संमेलन झालें त्या वेळीं खानबहादूर खंडाळावाला यांनीं मुलांस उपदेश केला. दि. व. व्ही. एम्. समर्थ यांनीं शाळेंत दोन बक्षिसें ठेवलीं होतीं तीं या वेळीं दिलीं.

मराठी शाळेचा सवता सुभा

या म्हणजे इ. स. १९१०–११ सालापासून मंडळीच्या कौन्सिलानें मराठी शाखा व इंग्रजी शाखा यांचे अहवाल निरनिराळे प्रसिद्ध करावे आणि मराठी शाळेचा निराळा सुपरिंटेंडेंट नेमावा अशी योजना ठरविली. तीस अनुसरून रा. तेलंग यांस मराठी शाळेचे स्वतंत्र सुपरिंटेंडेंट नेमण्यांत आलें. ता. ७ व ८ जुलै रोजीं मराठी शाळेची सरकारी तपासणी झाली व शाळेस चांगला शेरा मिळाला. रा. देव हे मराठी शाळेचे हेडमास्तर या नात्यानें काम करीत होते. रा. जी. बी. मोकाशी यांची योजना किंडरगार्टनपद्धतीचें नवें शिक्षण देण्यासाठीं केली होती व त्यांनीं आपलें काम फार सुंदर तऱ्हेनें केलें. सर्व ईयत्तांना एक तास कवाइत शिकवण्यास सुरवात करण्यांत आली व हें काम इंग्रजी शाळेचे कवाइतमास्तर नायर यांस देण्यांत आलें. त्यांना दुसरीकडे अधिक पैशांची नोकरी आल्यामुळें त्यांनीं शाळेचें क्राम सोडून दिलें. सन १९०५ सालापासून गायनाचें शिक्षण मराठी शाळेंत देण्यास गायन समाजानें सुरवात केली. हळुहळू वाढत वाढत तें शिक्षण आतां मराठी शाळेंत सर्व ईयत्तांना देण्याचें काम चालू झालें व हें उपयुक्त कार्य पुणें गायनसमाज मोफत करीत होता. पुणें गायनसमाज ही एक पुण्यांतली अत्यंत जुनी संस्था आहे. तिच्या मार्फत पुण्यांतील विद्यार्थ्यांना गायन शिकविण्याचें काम नू. म. विद्यालयानें करावें, अशी एक योजना चालू होती; पण ती पुढें जुळून आली नाहीं. कै. लागू यांचे पश्चात् मराठी शाळेंत मोडी अक्षर शिकवण्याचें काम रा. महाजन हे करीत होते. सुमारें ५ वर्षें हें काम केल्यावर रा. महाजन यांस घरगुती कामासाठीं गांवीं जाणें भाग पडलें. रा. महाजन यांचे जागीं रा. रामचंद्र बापू वाडेकर यांची नेमणूक झाली. तेव्हांपासून आजतागायत रा. वाडेकर हे मोडी अक्षराचें काम शाळेमध्यें बिनबोभाट करीत आहेत. शाळेकरितां खासगीवाल्यांची जागा संस्थेनें खरेदी केली. तिजवर प्रथम जी इमारत बांधावयाची ती संस्थेची आद्य शाळा जी नू. म. विद्यालय ही शुद्ध मराठी शाळा असल्यामुळें त्या मराठी शाळेचीच सोय त्या इमारतींत आधीं करण्याचा विचार चालकांनीं ठरविला होता. असें असल्यामुळें त्या जागाखरेदीसाठीं सरकारनें खरेदीची निम्मी किंमत रु. ६२५० ही मदतरूपानें दिली.

सन १९११-१२ सालची सुरुवात जोमानें झाली; आणि आतां तिसरें वर्षहि प्लेगापासून सुटकेचें असें पदरांत पडणार अशी आशा वाटूं लागली; तोंच प्लेगनें आपलें भीषण स्वरूप प्रगट केलें आणि इंग्रजी शाळेंतील (१२५०) व मराठी शाळेंतील (६४९) मुलांची संख्या घटूं लागली; आणि दिवाळी तर भर प्लेगांतच गेली. परंतु तत्पूर्वी ऑगस्ट व सप्टेंबर महिन्यांत शाळेची वार्षिक तपासणी झाली आणि मे. प्रायर यांचा शेरा सालाबादप्रमाणें अनुकूलच पडला. विशेषेंकरून आंतरशालीय सामन्यांचे प्रसंगीं या शाळेच्या विद्यार्थ्यांनीं जी कौतुकावह शिस्त दाखविली तिचा अत्यंत अनुकूल परिणाम मि. प्रायर यांचे मनावर झाला. इंग्रजी शाळेंत ट्रेंड शिक्षकांची संख्या कमी असल्याबद्दल मे. प्रायर यांची तक्रार होती. तथापि गणित व मराठी अशासारखे जे विषय मराठींतून शिकविण्याची परवानगी होती ते शिकवण्यास मराठी ट्रेनिंग परीक्षा पास झालेले शिक्षक अधिक लायकीचे ठरतात, असा या शाळेचा अनुभव आहे आणि त्यावर चालकांनीं आपला भरंवसा असल्याचें नमूद केलें.

आबासाहेब नातू, नमुनेदार विद्यार्थी

स्कॉलरशिप परीक्षेंत विद्यार्थी दांडेकर, अब्दूल अजीज व नातू यांनीं (जानेवारी १९१२) उत्तम प्रकारचें यश मिळविलें. पैकीं विद्यार्थी मो. ना. नातू हा येथील सरदार श्री. दादासाहेब नातू यांचा मुलगा असून यानें आपल्या बडिलांचे इच्छेस मान देऊन आपली मिळालेली स्कॉलरशिप आपण केवळ सन्मान्य छात्र राहून आपल्या खालील सप्रे नांवाच्या विद्यार्थ्यास मोठ्या आनंदानें देऊं केली. नातू यानें घालून दिलेलें हें उदाहरण या शाळेंतीलच नव्हे तर इतर शाळांच्या इतिहासांतहि विरळाच सांपडेल. तेव्हांपासून ही जी वृत्ति नातू यानें दर्शविली तिचेंच पोषण त्यानें आजवर करून संस्थेची मोठी सेवा केली आहे आणि सर्वांचा—आपले गुरुजन, आपले सहाध्यायी व गांवांतील नागरिक या सर्वांचा—धन्यवाद संपादन केला आहे. डॉ. श्री. आबासाहेब नातू, बी. एस्सी., एम्. बी. बी. एस्., यांचें हें उदाहरण आमच्या संस्थेस निरंतर भूषणावह व इतरांस अनुकरणीय असें झालें आहे असें म्हणावयास कसलाहि प्रत्यवाय नाहीं. १९११ सालच्या मॅट्रिक्युलेशन परीक्षेंत या शाळेंतून ४५ विद्यार्थी पास झाले. पैकीं सखाराम काशिनाथ आगाशे, बी. ए. (हल्लीं शिक्षक, हायस्कूल, ठाणें) याचा नंबर सर्वांत इलाख्यांत दुसरा आला (गुण ५२७, शें. ७० टक्के). गणितामध्यें २०० पैकीं १८२ गुण मिळवून सदरहू आगाशे यांनीं अहमदाबादच्या गुजराथ एज्युकेशन सोसायटीचें बक्षिस मिळवून इलाख्यांत पहिला नंबर मिळविला. स्कू. फा. परीक्षेंत ४८ पैकीं २८ विद्यार्थी पास झाले. सरकारी शाळेंतील पास्चें प्रमाण शेंकडा ४० तर आमच्या शाळेचें पासाचें प्रमाण शेंकडा ६८

पडलें. ड्रॉइंग परीक्षेंत सेकंड ग्रेड परीक्षेशिवाय इतरांचा निकाल सालाबादप्रमाणें लागला. खेळांमध्यें आमच्या विद्यार्थ्यांनीं 'इजा बिजा तिजा' करून आव्हानाची ढाल तिसऱ्या खेपेस शिकस्तीचा प्रयत्न करून आपल्या ताब्यांत ठेविली. कापडे, खानगांवकर, सोनटक्के, परांजपे, शेटये वगैरे विद्यार्थ्यांस ऱ्याचें यश दिलें पाहिजे.

यंदा या शाळेंतील एक जुने शिक्षक रा. हरिभाऊ साठे हे अल्पवयींच वारले. आपल्या वर्गांतून चुणचुणीत मुलें निवडून त्यांना मराठींत व गणितांत स्कॉलरशिप परीक्षेस तयार करणें हा रा. हरिभाऊ यांच्या सेवेचा विशेष होय व तो इतर सर्व शिक्षकांना अनुकरणीय होता. १२ डिसेंबर १९११ रोजीं सुप्रसिद्ध राज्यारोहणाचा समारंभ शाळेंत मोठ्या थाटानें साजरा करण्यांत आला. इचलकरंजी बक्षिस मधुसूदन दामोदर भट (आय्. सी. एस्., हल्लीं कलेक्टर, ठाणें) यांस मिळालें. शाळेंतील शिक्षकांपैकीं रा. परचुरे यांनीं आपल्या वडिलांचे स्मरणार्थ गरीब मुलांस बक्षिसें दिलीं. पुण्यांतील सुप्रसिद्ध परोपकारी असे शिक्षक कै. गणेश बळवंत लिमये यांनीं दरमहा पांच रुपये प्रमाणें या शाळेंतील एका गरीब ब्राह्मण विद्यार्थ्यास सालोसाल मदत देण्याचें अभिवचन दिलें; तसेंच नागपूरच्या ज्या गोखले वकिलांच्या औदार्याचा संस्थेस पुढें ऐन वेळीं फायदा मिळाला त्यांनीं १०५ रुपयांचे कोट गरीब मुलांस वाटले.

झोंपड्यांत वर्ग

प्लेगच्या दिवसांत शाळा अजीबात बंद ठेवण्यापासून फारच नुकसान होतें, तेव्हां निदान गांवाबाहेर राहणाऱ्या विद्यार्थ्यांच्या तरी शिक्षणाची सोय गांवाबाहेरच तंबू, झोंपड्या वगैरे उभारून शक्य तोंवर करावी, असें चालकांच्या मनांत १९०५-६ सालापासूनच येत होतें. एका मॅट्रिक्युलेशनच्या वर्गाची सोय त्यांनीं याप्रमाणें प्रयोगादाखल करून पाहिलीहि होती. ती यशस्वी झाल्याचें दिसल्यावरून १९११ मध्यें शाळेचे कांहीं वर्ग डेक्कन जिमखान्याचे मैदानावर झोंपड्या बांधून भरविण्यांत आले. याचा परिणाम चांगला दिसून आला आणि ३९२ विद्यार्थी या वर्गांला आले. अशा तऱ्हेनें हा प्रयोग यशस्वी झाला. यांत विद्यार्थ्यांचें शिक्षण थोडेफार साधलें व सालोसालच्या हजारों रुपयांच्या आर्थिक नुकसानीस आळा बसला. या वेळीं मराठी शाळेच्या सुपरिंटेंडेंटचें काम श्री. लक्ष्मणशास्त्री लेले यांजकडे होतें.

प्लेग हटला तशी शाळांची स्थिति सहजच सुधारत चालली. सन १९१२-१३ सालीं संख्या, उत्पन्न वगैरे सर्व दृष्टींनीं शाळेची भरभराटच झालेली दिसून आली. वर्षअखेरीस इंग्रजी शाखेकडे १२७४ व मराठी शाखेकडे ५७९ अशी मुलांची संख्या भरली. फीचे दर वाढवावे लागल्यामुळें आणि प्लेगहि थांबल्यामुळें फीच्या उत्पन्नांत सुमारें साडेसात हजार रुपयांची वाढ झाल्याचें दिसून आलें. तथापि, मागील सालीं प्लेगामुळें उत्पन्नच कमी होत होतें तें लक्षांत घेतलें तर खरी वाढ त्याच्या निम्यानेंच धरली पाहिजे.


सरकारी शाळातपासनीस रा. ब. रामचंद्र परशुराम गोडबोले यांनीं ता. २८ व २९ सप्टेंबर रोजीं शाळा तपासली; आणि रा. खरे यांनीं ऑगष्टमध्यें ता. १२-१३ रोजीं मराठी शाळेचें काम तपासलें. उभयतां अधिकाऱ्यांनीं शिक्षण, निकाल वगैरे पाहून समाधान व्यक्त केलें. मोडी अक्षर शिकविणारे मराठी शाळेंतील मास्तर रा. डोंगरे हे घेत असलेले परिश्रम पाहून रा. खरे यांनीं त्याचा अहवालांत मुद्दाम उल्लेख केला आहे.

१९१२ चे निकाल

नातू व फडताळे या दोन मुलांनीं स्कॉलरशिप परीक्षेंत उत्तम यश मिळविलें. नातू याची प्रगति सर्वांसच पसंत पडली. मॅट्रिक्युलेशन परीक्षेंत ९४ पैकीं ४५ व स्कूल फायनलमध्यें ४८ पैकीं २८ असा निकाल लागून मधुसूदन दामोदर भट हा मॅट्रिकमध्यें इलाख्यांत ५ वा आला. मॅट्रिक्युलेशन व स्कू. फा. या दोन्ही परीक्षांचे अभ्यासक्रम नुकतेच बदलण्यांत आले होते. स्कूलफायनलला इतिहासभूगोलांचीं उत्तरें मराठींत द्यावयाची सवड मिळाली होती. खेळामध्यें जरी शाळेला आज तीन वर्षें आपल्याच हातांत ठेवलेली आव्हानाची ढाल विशप हायस्कूलचे हवालीं करावी लागली, तरी पूना नेटिव्ह इन्स्टिटयूशनशीं झालेल्या चुरशीच्या रस्सीखेचीचे सामन्यांत या शाळेंतील विद्यार्थ्यांनीं यश मिळविलें हें त्यांस भूषणावह आहे. त्याचप्रमाणें पंडित, रानडे, शेटये, खानगांवकर व तांबोळी या विद्यार्थ्यांनीं उत्तम क्रीडाप्राविण्य दाखविलें. शिमग्याच्या दिवसांत चालणाऱ्या अनेक अनिष्ट प्रकारांपासून शाळेंतील विद्यार्थ्यांना तरी निदान शक्यतोंवर अलिप्त ठेवावें, या सद्हेतूनें येथील डेक्कन जिमखान्यानें जे अभिनंदनीय प्रयत्न चालविले होते त्यांत मुलांचे खेळांचे सामने भरविणें व अशा रीतीनें त्यांस अनिष्ट प्रकारापासून सोडवून उपयुक्त गोष्टीकडे त्यांचें मन वेधणें हा मुख्य हेतु होता. या सामन्यांतहि शाळेंतील मुलांनीं कांहीं बक्षिसें मिळविलीं.


केसकर व लोहोकरे गेले

संस्थेच्या आजन्म सेवकांची संख्या अलीकडे कशी वाढत होती हें मागें सांगितलेंच आहे. परंतु त्यांत ज्या प्रकारानें आतां घट होण्याचा प्रसंग आला ती परिस्थिति मात्र संस्थेच्या प्रगतीच्या दृष्टीनें अत्यंत अनिष्ट होय, असें म्हटल्याशिवाय राहवत नाहीं. या सालांत संस्थेस अलीकडेच येऊन मिळालेले दोन तरुण व होतकरू चालक स्वीकृत बंधनांतून आपणांस मुक्त करून घेऊन चालकमंडळांतून बाहेर निघाले. हे दोघे म्हणजे रा. विश्वनाथ अनंत केसकर व रा. कृष्णाजी गोविंद लोहोकरे हे होत. रा. केसकर यांना प्रापंचिक घरगुती अडचणींमुळें आणि डॉ. लोहोकरे यांचा घसा टीचर्स थ्रोट म्हणून ज्या रोगाचें इंग्रजींत वर्णन करतात, त्या रोगाची बाधा झाल्यामुळें संस्थाच काय पण शिक्षकाचा व्यवसायहि डॉ. लोहोकरे



सर परशुरामभाऊ कॉलेज् क्रीडांगण

बालोद्यान प्रेस, पुणे.



"राऊंड" इमारत–पाडलेला भाग.

बालोद्यान प्रेस, पुणे.

यांस सोडावा लागला. पुढें प्रकृति अमळ बरी झाल्यावर त्यांनीं उत्साहानें जी जनसेवा केली ती सर्वविश्रुतच आहे. इतर शिक्षकांपैकीं रा. महादेव विष्णु हेरलेकर हे कालवश झाले. त्यांची अध्यापनपद्धति कुशलतेची व संस्थेची सेवा एकनिष्ठेची झाली होती.

सरकारी मदतीविषयीं राज्यारोहणाच्या दरबारानंतर सरकार खास शिक्षकांस देण्यासाठीं म्हणूनच पुरवणी मदत (Supplementary grant) म्हणून देऊं लागलें. ही मदत या शाळेला रु. १७९४ मिळूं लागली व या रकमेचा विनियोग सरकारच्या इच्छेप्रमाणें व नियमांप्रमाणें शिक्षकांच्या पगारांत वाढ करण्याप्रीत्यर्थच करावयाचा असल्यामुळें तसें करून ती रक्कम वांटून देण्यांत आली.

शाळेचें सामान जुन्या पद्धतीचें होतें त्याऐवजीं हळुहळू आरोग्यदृष्ट्या योग्य अशा प्रकारचें सामान—बाकें वगैरे घेण्यासाठीं संस्थेनें बराच खर्च (रु. १६०५) केला. अर्थातच अशा प्रकारचा खर्च करण्याची आवश्यकता मनांत आणूनच जादा फीची व्यवस्था मंजूर करण्यांत आली होती.

ऑक्टोबर १९१३ पासून, डॉ. हरि केशव रानडे यांनीं मंडळीस दिलेल्या ४०० रुपयांचे व्याजांतून दरसाल १२ रुपयांचें बक्षिस त्यांचे अटीप्रमाणें देण्याचें ठरलें. गोखले यांनीं पुन्हा याहि वर्षीं गेल्या सालप्रमाणें कपडे बाटले. कै. न्या. रानडे यांच्या धर्मादायनिधींतून २० रु. मदत सालाबादप्रमाणें मिळूं लागली. अद्याप इमारतीचा प्रश्न मात्र सुटला नव्हता.

या सालीं मराठी शाळेचे सुपरिंटेंडेंट रा. लेलेशास्त्री हेच होते व रा. देव हे हेडमास्तरचें काम करीत होते व शाळेंत २५ वर्षें काम करीत असलेले रा. बळवंतराव पुरंधरे पर्वतीकर हे जानेवारी १९१३ त सेवानिवृत्त झाले.

स्वतंत्र इमारतीस प्रारंभ

ता. २७ जून १९१३ हा दिवस संस्थेच्या इतिहासांत अत्यंत महत्त्वाचा असा आहे. आज कित्येक वर्षें चालकांनीं शाळेसाठीं स्वतंत्र इमारत उभी करण्याचा जो संकल्प मोठ्या चिकाटीनें जोपासला होता त्याला कृतीचें स्वरूप देण्याचा प्रारंभ सर्व लोकांसमक्ष त्यांनीं वरील दिवशीं केला. नामदार क्लॉड हिलसाहेब यांच्या हस्तें पूर्वीच खरेदी केलेल्या खासगीवाल्यांच्या बखळजागेंत आपल्या विद्यालयाच्या मराठी शाळेसाठीं इमारत बांधण्याचें टरून त्याच्या पायाचा दगड नामदारसाहेबांचे हस्तें वरील दिवशीं बसविण्यांत आला. समारंभाची तयारी चालकांनीं अत्यंत उत्साहानें केली होती. परंतु ऐन वेळीं जोराचा पाऊस येऊन मोटा गोंधळ उडाला. तथापि चालकांनीं व विद्यार्थ्यांनीं योग्य प्रसंगावधान दाखवून आपल्या अंगीं मुरलेली शिस्त या वेळीं सर्वांचे प्रत्ययास आणून दिली आणि समारंभ यशस्वी रीतीनें पार पाडला. नामदार हिलसाहेब यांनीं आपल्या भाषणांत या

संस्थेचे प्रथमपासूनचे पडद्यामागील मुख्य सूत्रधार कै. हरि नारायण आपटे यांच्या कामगिरीचें वर्णन करून संस्थेच्या कार्याची योग्य शब्दांनीं स्तुति केली. इतरांच्या अपेक्षेनें पाहतां या शाळेंतील शिस्तीची पद्धत व मुलांचें वर्तन यांसंबंधानें आपला झालेला विशेष अनुकूल ग्रह सुमारें ११ वर्षांपूर्वी लॉर्ड नॉर्थकोटसाहेबांचे भेटीचे वेळीं आलेल्या अनुभवावरून कसा काय झाला आहे तें मे. हिलसाहेब यांनीं स्पष्टपणें सांगितलें. अशा प्रकारें शिक्षणाची खटपट हेंच आपल्या मतें स्वराज्याचें सर्वोत्कृष्ट स्वरूप होय आणि अशा प्रयत्नांची सन्नागरिकत्वाच्या पोषणाला आणि लोकांच्या ठिकाणीं तत्संबंधानें जाणीव बिंबण्याला अत्यंत आवश्यकता आहे, अशा संस्थांना मदत करणारे हेच खरे स्वराज्याचे सेवक होत, असा आपला अभिप्राय सांगून संस्थेस सर्वांनीं मदत करावी अशी त्यांनीं कळकळीची विनंति केली व आपलें भाषण संपविलें. आपण काढलेल्या मराठी शाळेच्या अभिमानामुळें चालकांनीं मराठी शाळेसाठींच आधीं इमारत बांधण्याचें ठरविलें हें योग्य झालें. मराठी शाखेच्या इमारतीला सरकारी मदतीचें प्रमाण इंग्रजी शाळेच्या इमारतीला मिळणाऱ्या प्रमाणापेक्षां अधिक होतें, हीहि बाजू चालकांचे पुढें होतीच. तथापि असें वागण्यांत चालकांनीं मोठा हिय्या दर्शविला यांत शंका नाहीं. मार्च ३१, १९१४, या दिवशींचे आंकडे पाहतां इंग्रजी शाखा १३७२ व मराठी शाखा ५७१ मिळून १९४३ विद्यार्थी पटावर होते आणि जागा नाहीं म्हणून पुष्कळ विद्यार्थ्यांस नाकारावें लागलें. अशी मुलांची दाटी अव्याहतपणें शाळेचे दारांत वाढत होती. तेव्हां स्वतःची इमारत बांधून त्यांत इतक्या २००० विद्यार्थ्यांचा समावेश करून भाड्याच्या व गैरसोयीच्या जागेंतून आपली सुटका करून घेण्याकरतां चालक वाटेल ती मेहनत करण्यास तयार होते. आपल्या संस्थेवर चालकांचें लेंकरांसारखें प्रेम होतें आणि मायाळू बाप ज्याप्रमाणें प्रसंगीं पोटालाहि चिमटा घेतो, परंतु आपल्या लाडक्या लेकरांचें कांहीं उणें पडूं देत नाहीं तसेंच नू. म. विद्यालयासंबंधानें चालकांचें व जुन्या शिक्षकांचेंहि वर्तन झालें. स्वतः आपणांस काय करतां येईल तें अगोदर करून दाखवावयाचें व मग लोकांसमोर हक्कानें जावयाचें व मदत मागावयाची, अशी चालकांची रीत आहे. हिलसाहेबांकडून ज्या इमारतीचा चालकांनीं वरील तारखेस पाया भरविला ती इमारतहि शक्यतोवर आपली आपणच उभी करून दाखवावी आणि मगच लोकांस मदतीस हाक मारावी असा निश्चय चालकांनीं केला होता. हातीं घेतलेलें काम कांहीं लहान नव्हतें. सरकारची मदत इमारत झाल्यावर मिळावयाची होती. चालकांनीं तर कोण गरीबींतच दिवस काढले व शिक्षकवर्गानें किती अभिमानानें हाल सोसले याची थोडीबहुत कल्पना त्या वेळच्या पुष्कळ मंडळींच्या चांगलीच लक्षांत असेल. अशा अडचणींत आज कित्येक वर्षें चालकांना प्लेगसारख्या भयंकर संकटांशीं झगडावें लागलें होतें. कित्येक जुने चालक आपले. मनोरथ पूर्ण झाल्याचें

पाहण्यापूर्वीच हा लोक सोडून गेले होते. तथापि, राहिलेल्यांनीं धीर न सोडतां आपल्या साध्यावर दृष्टि ठेवून निश्चयानें आपली मार्गक्रमणा चालविली होती. त्यांची श्रद्धा प्रामाणिकपणें केलेल्या आपल्या कामावर व परमेश्वरावर होती. आज तीस वर्षे त्यांनीं पै पै करून जो पैसा गांठीं बांधला होता, तो आतां खर्चून वर सांगितलेली इमारत उभी करण्याचा त्यांनीं संकल्प केला. किंबहुना प्रत्यहीं वाढणाऱ्या मुलांच्या संख्येमुळें यापुढें वाट बघणें त्यांना अशक्य होतें.

तथापि, इ. स. १९०२ पासून मे १९१३ पर्यंत सुमारें १२ वर्षे ज्यांनीं सरकारच्या बाजूनें शाळेबद्दल अत्यंत सहानुभूति दर्शविली ते सरकारी शाळातपासनीस मि. प्रायरसाहेब हे समारंभाच्या पूर्वी थोडेच दिवस सेवानिवृत्त झाले होते आणि त्यांच्या जागीं मि. मार्श या नांवाचे एक तडफदार अंमलदार आले होते. मि. मार्स यांनीं १५ सप्टेंबर १९१३ रोजीं शाळेची तपासणी केली आणि प्रत्यक्ष पद्धतीनें इंग्रजी शिकविण्याचा एका वर्गांत केलेला उपक्रम पाहून शाळेविषयीं चांगला अभिप्राय प्रगट केला. मराठी शाळेची तपासणी ता. १२ व १३ जुलै रोजीं श्री. गोविंदराव ब्रह्मे यांनीं केली आणि आपणांस समाधान झाल्याचें लिहून कळविलें.

चॅटफील्ड स्कॉलरशिप मिळाली

सानें, गवंडी, खरे व गुलाब जेनुभाई यांनीं स्कॉलरशिप् परीक्षेंत यश मिळाविलें. ड्रॉइंग मास्तर टिकेकर यांचेकडील निकाल चांगले लागले व कामे नांवाच्या त्यांच्या विद्यार्थ्यांस शेरा चांगला मिळाला. मॅट्रिक्युलेशनसाठीं जो नवीन अभ्यासक्रम ठरला होता त्याअन्वयें ही पहिलीच परीक्षा होती आणि तींत या शाळेंतून पाठविलेल्या ९१ पैकीं ६५ विद्यार्थी पास झाले. खुपेरकर नांवाचा या शाळेचा विद्यार्थी पुणें केंद्रांत पहिला येऊन त्यानें चॅटफील्ड स्कॉलरशिप मिळविली. कर्डिले यासहि पहिल्या वर्गाचे गुण मिळाले. स्कूल फायनलमध्यें २८ विद्यार्थी पास झाले. यंदापासून मॅट्रिक्युलेशनच्या विषयांपैकीं सायन्स व भूगोल या विषयांची परीक्षा विद्यापीठानें शाळाचालकांवर सोंपविली होती. यंदापासून मॅट्रिक्युलेशनला प्रथमोपचार किंवा फर्स्ट एड हा विषय ठेवण्यांत आला होता. हा विषय शिकविणारा मनुष्य शक्य तोंवर पदवीधर वैद्य असावा अशी चालकांची इच्छा होती आणि या शाळेच्या पहिल्या मॅट्रिक पास झालेल्यांपैकीं शाळेचे माजी विद्यार्थी डॉ. विष्णु भालचंद्र बापट (बी. ए., एल्. एम्. एस्.) यांनीं हें काम संस्थेवरील प्रेमामुळें मोठ्या आनंदानें व निरपेक्षपणें केलें.

वार्षिक खेळांचे सामन्यांत शाळेच्या विजयांत यंदा उत्तम भर पडली. आटयापाट्या व रस्सीखेच या दोन्ही विजयढाली यंदा शाळेस मिळाल्या. मि. रेन यांनीं चालवलेल्या शारीरिक शिक्षणदानाच्या रीतीच्या वर्गास तेलंग यांनीं हजर राहून

या शिक्षणाचा फायदा शाळेंतील विद्यार्थ्यांना देण्याचें योजिलें होतें. परंतु त्यांच्या आजारीपणामुळें तें राहिलें. पण शाळेच्या एका तज्ज्ञ माजी विद्यार्थ्यानें स्वतःच एक खालच्या इयत्तेचा वर्ग आपण शिकवून तयार करण्यासाठीं घेतला आणि सदर वर्गाची तयारी अत्यंत समाधानकारक रीतीनें केली.

ओतूरकर यास इचलकरंजी बाक्षिस, पटवर्धन यास रानडे छात्रवृत्ति व गांगल यास लिमये मदत मिळाली. अशा प्रकारची मदत मिळत असूनहि गरीब विद्यार्थ्यांची नादारीची मागणी सारखी वाढतच होती. ब्राह्मण विद्यार्थि-सहाय्यक मंडळ यांनीं कित्येक ब्राह्मण विद्यार्थ्यांस जरी मदत केली तरीसुद्धां नादार मुलांचें सरकारी प्रमाण वाढविल्याखेरीज लायक अशा सर्व नादार मुलांना मदत देणें शक्य नव्हतें. विद्यार्थ्यांच्या ग्रंथालयाची व्यवस्था यंदा शाळेंत आलेल्या दोन नवीन उत्साही शिक्षकांनीं आपले हातीं घेतली होती; आणि ७ वी ईयत्ता, ६ वी ईयत्ता व ४ थी ईयत्ता अशा ईयत्तांत वर्गावर्गांचीं लहानशीं ग्रंथालयें काढून चांगलीं चांगलीं पुस्तकें वाचण्याची गोडी विद्यार्थ्यांत उत्पन्न करण्याचा त्यांनीं प्रयत्न केला. या जोडीपैकीं एका शिक्षकानें वादविवाद सभा मोठ्या जोमानें चालू केली आणि ती मोठ्या दक्षतेनें चालविली. या सभेविषयीं विद्यार्थ्यांत अतिशय उत्साह दिसून येऊं लागला होता. निवडक विषय नेमून देणें, त्यांची माहिती जमविण्यास प्रोत्साहन देणें, त्याबद्दलच्या निरनिराळ्या बाजू मांडण्यास विद्यार्थ्यांस प्रवृत्त करणें व सर्व कामांचा तपशीलवार अहवाल ठेवणें वगैरे व्यवस्था या कामीं करण्यांत आली होती ती अत्यंत अभिनंदनीय होय.

सभागृहाची जरूरी

शाळेचें वार्षिक संमेलन वास्तविक १९०५ सालीं रा. केसकर यांचे प्रोत्साहनानें प्रथम भरलें होतें व त्या वेळीं दि. ब. गोडबोले यांनीं मुलांस आपले जुने अनुभव सांगून उपदेश केला होता. संमेलनांत मुलांनीं कांहीं नाट्यप्रयोगहि शाळेच्या जागेंत करून दाखविले होते व जेवणाऐवजीं फराळाचा बेत करून शक्य ती काटकसर केली होती. तथापि, संमेलनाची प्रथा प्रतिवर्षी नियमानें चालली नाहीं. २९ मार्च सन १९१४ सालीं संमेलनाचे पाहुणे म्हणून नामदार शार्प यांना बोलाविण्यांत आलें होतें. ना. शार्प हे डायरेक्टर होते. त्यांनीं आपल्या जवळील चित्रदीपाचे साहाय्यानें मनोरंजक माहिती दिली. अशा प्रसंगास मोठ्या समाजाचा समावेश होईल, अशा प्रकारचा दिवाणखाना आपणांपाशीं नाहीं याची चालकांस फारच उणीव भासली.

नवीन तऱ्हेचीं सुधारलेलीं बाकें चालकांनीं बराच पैसा खर्च करून ३८ पैकीं १० वर्गांस पुरविलीं होतीं आणि सर्व वर्गांस पुरविण्यासाठीं त्यांची खटपट चालू होती.

झोळी फिरविण्यास सुरुवात

सरकारकडून मिळूं लागलेल्या पुरवणी मदतीपैकीं कांहीं रकमेचा विनियोग चालकांनीं शिक्षणोपयोगी सामान खरेदी करण्यांत केला. अशा प्रकारें चालकांनीं संस्थेची सुधारणा सर्व बाजूंनीं चालविली होती. परंतु, संस्थेस आधुनिक साधनांनीं संपन्न, हवाशीर आणि शिक्षण व आरोग्यशास्त्र यांना पसंत पडण्याजोगी अशी प्रशस्त इमारत चालकांना पाहिजे होती. मराठी शाळेची इमारत बांधण्याला आजवरचा संचित पैसा खर्चून चालकांनीं प्रारंभ केला होता. पुढें त्याच पायावर व त्याच इमारतीवर तिसरा मजला चढवून तो इंग्रजी सातवीस दिल्यास सुमारें पंधरा वर्गांची सोय कमी खर्चांत होण्याची शक्यता होती. सरकारी व बिनसरकारी तज्ज्ञांचा तसा अभिप्राय पडल्यावर सरकारांतून त्या योजनेस मंजुरी मिळविण्यांत आली. आतां मात्र चालकांचेवरील आर्थिक जबाबदारी जोरानें वाढत चालली, तेव्हां प्रतिग्रह घेण्यास सुरुवात करणें त्यांस भागच होतें. थोड्याच अवधींत त्यांना त्यांत चांगलें यश येऊन १९१४ जूनपावेतों सव्वीस हजारांचीं आश्वासनें व सात हजारांची वसुली असें प्रत्यक्ष फलहि आलें होतें. अशा तऱ्हेनें शाळेच्या इमारतीची अडचण दूर होण्याचे मार्गास लागली.

रा. देशपांडे व रा. सहस्रबुद्धे हे दोन शिक्षक यंदा (१९१४) मृत्युवश झाले. इंग्रजी शाखेकडे बरीच वाढ झाल्यामुळें नवेजुने पुष्कळ शिक्षक जात येत होते. पैकीं रा. जगन्नाथरावजी टिल्लु हे वृद्ध, अनुभवी व करारी शिक्षक शाळेंत कांहीं वर्षें होते. रा. आगाशे, रा. देशपांडे व रा. टिळक हे कांहीं वर्षें शाळेंत काम करून गेले व रा. गोखले यांची नेमणूक फर्ग्युसन कॉलेजांत झाल्यानें तेहि गेले. मागें उल्लेखिलेल्या शिक्षकांची जोडी मात्र आणखी कांहीं वर्षें राहण्याचा करार करून शाळेंत कांहीं वर्षें राहिली. मराठी शाळेचे हेडमास्तर रा. देव यांस रा. भिकाजी मोरेश्वर मांदुस्कर या अध्यापनकुशल अशा शिक्षकाची जोड देण्यांत आली. नोव्हेंबर १९१३ पासून रा. कृष्णाजीपंत डोंगरे हे मराठी शाळेचे सुपरिंटेंडेंट झाले.

प्लेगाचें भय जों जों मागें पडत चाललें तों तों संस्थेची प्रगति झपाट्यानें होऊं लागली; आणि इंग्रजी शाखेकडे वर्षअखेरीस १४०९ व मराठी शाखेकडे ५१९ मिळून १९२८ पर्यंत मुलांची संख्या जाऊन धडकली. संख्या वाढली तसें उत्पन्नहि वाढलें. ता. १७ व १८ ऑगस्ट येजीं नू. म. विद्यालयाच्या इंग्रजी शाखेची तपासणी रावसाहेब खरे यांनीं व मराठी शाखेची तपासणी डेप्युटी यांनीं केली. तपासणींत शाळेचे विषय लक्षांत घेऊन एकंदरींत समाधान व्यक्त करण्यांत आलें होतें. रा. मांदुस्कर यांनीं मराठी शाळेंत दिलेले नमुन्यांचे पाठ फारच परिणामकारक ठरून त्यांची तारीफ झाली.

स्कॉलरशिप परीक्षेंत पाटणकर, पंडित (ब्राह्मण) व बोरुडे, झोपे व घोलप (मराठे) या विद्यार्थ्यांनीं उत्तम यश मिळविलें. ड्रॉइंगचा निकाल टीक झाला. मॅट्रिक्युलेशनमध्यें १९१४ सालीं १०६ पैकीं ५९ पास झाले. या सालीं परीक्षकांनीं इंग्रजीमध्यें शेंकडा ३७ प्रमाणें विद्यार्थी पास केले असतां आमचे शाळेंतील इंग्रजीचा निकाल शें. ६२ प्रमाणें झाला. इलाख्याचा एकंदर निकाल शेंकडा ३० तर आमचे शाळेचा शें. ५५ टक्के प्रमाणें झाला. स्कूल फायनल परीक्षेंत ४९ पैकीं ३३ विद्यार्थी पास झाले. शाळेचे निकाल याप्रमाणें इलाख्यांतील निकालापेक्षां सरसच झालेले आहेत हें कोणासही दिसून येईल. इंग्रजींतील कडक निकालाबद्दल पुरतकें नेमावयाचे पद्धतीला शाळेचे अहवालांत स्पष्ट दोष दिला आहे. या परीक्षेंतील इंग्रजीसंबंधानें प्रि. फ्रेझर यांनीं केलेल्या रिपोर्टाची शाळा-चालकांनीं प्रशंसा केली आहे.

सुधारलेला अभ्यासक्रम

मॅट्रिकचा सायन्सचा अभ्यासक्रम नवीनच सुधारला होता व त्यासाठीं बरेंच सामानसुमान घेऊन बरीच तयारी करणें जरूर होतें. हें काम शाळेंतील या विषयाचे शिक्षक रा. अनंत विठ्ठल आपटे, बी. ए., यांनीं मोठ्या दक्षतेनें केलें व यासाठीं मुंबईस निघालेल्या वर्गासहि त्यांस पाठविण्यांत आलें होतें. प्रथमोपचाराचें शिक्षण विद्यार्थ्यांस डॉ. बापट यांनीं मागील सालाप्रमाणें निरपेक्षपणें, नियमितपणें व निरलसपणें दिलें. इंग्रजी चवथ्या ईयत्तेला शारीराचा विषय शाळेचे एक माजी विद्यार्थी कै. डॉ. रामकृष्ण गोविंद वझे यांनीं बापटांप्रमाणेंच निरपेक्षपणें व कुशलतेनें शिकविला. डॉ. वझे यांना आपला विषय मराठींतून सांगावा लागत होता हें विशेष होय.

रस्सीखेचची ढाल तिसऱ्यांदा

१९१४ सालच्या आंतरशालीय सामन्यांत या शाळेला तिसऱ्यांदा रस्सीखेचची ढाल आपणांकडेच ठेवण्याचा मान मिळाला व आट्यापाट्यांची ढालहि आमचे संस्थेसच मिळाली. शिवाय रानडे व वैद्य यांनीं बक्षिसें मिळविलीं. धुळवडीचे दिवशीं सुरू केलेला सदुपक्रम डेक्कन जिमखान्यानें पुढें चालविला होता. त्याचा चांगला परिणाम दिसून आला; आणि धुळवडींतील अनेक अनिष्ट प्रकारांना आळा बसला.

इचलकरंजीबक्षिस मो. ना. नातू यास, रानडे बक्षिस गद्रे यास व लिमये स्कॉलरशिप ओतूरकर व पटवर्धन या विद्यार्थ्यांना देण्यांत आली. पुण्यांतील एक प्रसिद्ध वकील कै. मोरोपंत साठे यांनीं या सालापासून दरमहा तीन रु. प्रमाणें गरीब विद्यार्थ्यांस मदत करण्याचें व ही मदत पुढें कायम करण्याचें आश्वासन दिलें व त्याप्रमाणें पुढें आरंभ केला. ब्राह्मण-विद्यार्थि-साहाय्यक मंडळातर्फे विद्यार्थ्यांना



श्री. रा. सदाशिव विष्णु रानडे बी. ए.
शिक्षण प्रसारक मंडळीचे आश्रयदाते
नूतन मराठी विद्यालयाचे माजी विद्यार्थी



श्री. रा. यशवंत विष्णु रानडे, कॉंट्रॅक्टर
१८८३ तील नूतन मराठी विद्यालयाचे विद्यार्थी
सभासद, मॅनेजिंग कौन्सिल, शिक्षण प्रसारक मंडळी.

(प्रत्येकी रु. १०००)

बालोद्यान प्रेस, पुणे.

रानडे-मंडळी.



खुर्चींवरील मधले तीन (डावीकडून क्रमांक ४।५।६) गृहस्थ सोडून बाकी बहुतेक सर्व मंडळी नूतन मराठी विद्यालयांतच शिकलेली आहेत. असें हें रानडे कुटुंब विद्यालयाशीं दृढ निगडित आहे.

बालोद्यान प्रेस, पुणें.

मदत चालू होती; तरी पुष्कळ गरीब विद्यार्थ्यांना अद्यापि लायकी असूनहि मदत मिळत नव्हती.

मुलांचें ग्रंथालय व वादसभा यांचें काम मागें सांगितलेले शिक्षक मन लावून मोठ्या कळकळीनें करीत होते आणि त्याचा परिणाम मोठा समाधानकारक दिसून आला होता.

दत्तोपंत घारपुरे आले

मार्च १९१५ चे अखेरीस इंग्रजी शाखेकडे ५९ शिक्षक होते. त्यांपैकीं २१ ग्रॅज्युएट होते. नवीन तऱ्हेचीं बाकें आतां १५ वर्गांना देण्यांत आलीं होतीं. चालकवर्गांत रा. दत्तात्रय रामचंद्र घारपुरे, एम्. ए., बी. एससी., यांचें नांव जानेवारी १९१५ त दाखल झालें. रा. घारपुरे यांनीं संस्थेची प्रगति एका विशिष्ट धोरणानें घडवून आणण्याची योजना चालकांपुढें मांडली व तिचा चालकांनीं स्वीकार केल्यास तिला आपल्या अनेक उत्साही, स्वार्थत्यागी व हुशार अशा सहकाऱ्यांचें पाठबळ मिळवून देण्याचें कबूल केलें होतें. रा. घारपुरे यांसारखा उत्साही व कर्तबगार तरुण गृहस्थ चालकमंडळानें मोठ्या उत्सुकतेनें आपणांत मिळवून घेतला.

'रिक्ताः भवंति भरिता भरिताश्च रिक्ताः' या न्यायानें नवीन भर पडली तथापि, जुने अनुभवी शिक्षकहि कमी करण्याचें काळाचें काम चालूच राहिलें. त्यास अनुसरून जुन्या शिक्षकांपैकीं रा. निसळ व नवीन शिक्षकांपैकीं रा. गणेश हरी डोंगरे व प्रसिद्ध विद्वान् संशोधक रा. त्र्यं. गु. काळे हे शिक्षक कालवश झाले.

मराठी शाळेचे हेडमास्तर रा. देव व सुपरिंटेंडेंट रा. डोंगरे हे असून रा. मांदुस्कर हे अध्यापनप्रवीण म्हणून त्यांना मदत करीत होते. मराठी शाळेंतील जुन्या शिक्षकांनीं अत्यंत कष्ट सोसून चालविलेल्या सेवेबद्दल चालकांनीं त्यांचे आभार मानले आहेत आणि त्याच भक्तीचा संस्थेच्या अभ्युदयास फार उपयोग झाला असें नमूद केलें आहे. यंदा कित्येक शिक्षकांनीं विद्यार्थ्यांना ठिकठिकाणीं सहली करण्यास नेलें होतें. त्यांचें या अहवालांत सप्रेम अभिनंदन केलें आहे. यावरून सहलीचें शिक्षणांत महत्त्व विद्यार्थी, शिक्षक व चालक यांच्याकडून चांगलें ओळखलें जाऊं लागलें होतें यांत संशय नाहीं.

व्यायामाचा नवीन उपक्रम

शाळेचे अत्यंत अभिमानी असे एक माजी विद्यार्थी आणि श्री. विनायकराव आपटे यांचे चिरंजीव श्री. सखाराम विनायक आपटे, एम्. ए., यांनीं शिक्षणाविषयीं व संस्थेविषयीं आपल्या ठायीं असलेली परमावधीची कळकळ संस्थेंत येऊन इंग्रजी तिसऱ्या ईयत्तेचा एक वर्ग रेनसाहेबांच्या नूतन पद्धतीनुरूप अत्यंत नियमानें, हुरूपानें व यशस्वितेनें गुदस्तापासून चालवून दाखविली होती व तोच क्रम त्यांनीं यंदाहि पुढें चालू ठेवला होता. रा. आपटे यांच्या शिक्षणामुळें सदरील वर्ग

एक नमुनेदार व प्रेक्षणीय वर्ग झाला होता आणि समजून व शास्त्रीय पद्धतीनें योग्य असा व्यवस्थित व्यायाम घेण्यासंबंधानें या वर्गातील मुलांस जें शिक्षण मिळालें तें अत्यंत बहुमोल गणलें जाईल.

सरकारतर्फे ग्रँटचा जो उपक्रम झाला होता, त्याचें रूपांतर जादा ग्रँटमध्ये होऊन एक नवीनच व्यवस्था पुढें अमलांत आली. तसेंच नूतन सशास्त्र अध्यापन-पद्धतीनें विशेषतः इंग्रजी विषयासंबंधानें शिक्षकांस मार्गदर्शन करून देण्यासाठीं रा. आचार्य व रा. साने या दोन अत्यंत हुषार व अध्यापनपटु अशा गृहस्थांची फिरती नेमणूक केली होती. ती जरी एकाएकीं शाळेच्या चालकांच्या स्वतंत्रपणास मान-वण्याजोगी नव्हती तरी जिज्ञासु शिक्षकांस या उभय शिक्षकांपासून पुष्कळच फायदा करून घेतां येण्यासारखा होता.

मजला चढवला

इंग्रजी शाळेसाठीं मराठी शाळेचे इमारतीवरच तिसरा मजला चढवून सुमारें ४०० मुलांची सोय करावी असा चालकांनीं विचार करून तिला सरकारची मंजुरी मिळविण्याचें काम चालू केलें होतें. या योजनेमुळें एकंदर इमारतीचा खर्च रु. १,०६,५०० पर्यंत जात असून इंग्रजी भागासाठीं बांधलेल्या इमारतीच्या खर्चापैकीं सरकारकडून ½ मदत मिळावयाची होती. मराठी भागासाठीं निम्मी मदत सुमारें ४२ हजार रुपये व इंग्रजी भागासाठीं ६ हजार मिळून ४८ हजार रु. मदत सरकारकडून व बाकी सुमारें ५८ हजार रुपये हे या विद्यालयाच्या शिक्षकांनीं व चालकांनीं केवळ स्वतःचे पोटास चिमटा घेऊन आजवर सांठविलेल्या निधींतून खर्च करण्यांत आले. हा चालकांनीं व शिक्षकांनीं केलेला स्वार्थत्याग महाराष्ट्रांतील शिक्षणसंस्थांच्या इतिहासांत फारच उच्च दर्जाचा व आमचे माहितीप्रमाणें अभूतपूर्व असाच आहे. तीस वर्षें सोसलेल्या अपरिमित संकटांचें व कष्टांचें हें नूतन शिक्षणमंदिररूपी फळ पाहून ज्यांनीं हें झाड मूळ लावलें त्या संस्थापकांस आपल्या जन्माची केवढी सफलता वाटली असेल हें वर्णन करून सांगणें अशक्य आहे. किंबहुना शि. प्र. मंडळीच्या इतिहासांत वरील उदाहरण अत्यंत प्रभावशाली आणि चालकांच्या व एकनिष्ठ शिक्षकांच्या संस्थेवरील व आपल्या कार्यावरील प्रेमाचें विलक्षण निदर्शक म्हणून सतत संस्मरणीय असेंच राहील यांत तिळप्राय संशय नाहीं.

वास्तु पुरी झाली

मराठी शाळेच्या इमारतीचा नकाशा नामदार दिवाणबहादूर काशिनाथपंत गोडबोले यांनीं तयार केला होता. इमारत बांधून काढण्यास ठेकेदार कै. नाना बाडेकर हे होते. मोजमाप व अंदाजपत्रकें वगैरे तयार करण्याचे कामीं आबासाहेब माटे यांची मदत झाली. कै. गणपतराव खरे यांनीं आपले सल्लामसलतीचा फायदा दिला. रा. दत्तोपंत भोसेकर यांनीं कामावर देखरेख केली आणि स्वतःच्या वाड्या-

कै. हिज् हायनेस् श्रीमंत शंकरराव चिमणाजी पंतसचिव
अधिपति संस्थान भोर



शिक्षण प्रसारक मंडळीचे आश्रयदाते.

बालोद्यान प्रेस, पुणे.

श्रीमंत रघुनाथराव शंकरराव ऊर्फ बाबासाहेब पंतसचिव
अधिपति संस्थान भोर.



शिक्षण प्रसारक मंडळीचे आश्रयदाते

लगतची एक चिंचोळी पट्टी शाळेच्याकरितां भरपूर उजेड मिळावा या हेतूनें जव्हारचे राजे के. विक्रमशहा पतंगशहा यांनीं संस्थेस मोफत देऊन कायमचें ऋणी करून ठेविलें. अशा प्रकारें या इमारतीचें काम झपाट्यानें चालून अकरा हजार चौरस फुटांची ही तिमजली अशी इमारत तयार झाली. २२′×१८′ चे १४, २२½′×१८½′ चे १२ असे २६ वर्ग व ४८′×२२′ चा एक भव्य दिवाणखाना एवढी सोय सुमारें आठशें विद्यार्थ्यांकरितां म्हणून मराठी शाळेकरितां तयार झाली आणि २२½′×१८½′ चे १२ वर्ग, आणि ४८½′×२२½ ची एक प्रयोगशाळा याप्रमाणें व्यवस्था हायस्कूलसाठीं झाली. मिळून ३६ वर्गांतून इंग्रजी मराठी या दोन्ही शाखा मिळून १२०० विद्यार्थ्यांची बसण्याची उत्कृष्ट सोय या इमारतींत झाली. खालीं शहाबादी फरशा, भोंवतालीं सुंदर दगडी १४ फूट उंचीच्या भिंती व भिंतींत योग्य ठिकाणीं भरपूर उजेडासाठीं खिडक्या, आंत बसण्यासाठीं नवीन तऱ्हेचीं बाकें, प्रवेशासाठीं एक किंवा दोन दारें व सामानाकरितां लहानसें फडताळ, अशा तऱ्हेची म्हणजे सुखावह व आरोग्यदायक रचना पाहून कोणाहि विद्यार्थ्याचें मन प्रसन्नच होईल. या सुंदर इमारतीचा उद्घाटनसमारंभ ता. २५ जून १९१५ रोजीं ने. ना. लॉर्ड विलिंग्डनसाहेब यांचे हस्तें झाला. याच सुमारास पूर्वी ज्या ठिकाणीं पूर्णानंद थिएटर होतें, व जिला विद्यार्थी ग्राउंड किंवा राउंड म्हणत ती जागाहि १६,००० रुपयांस संस्थेनें खरेदी केलेली होती. वरील इमारतीचे सिद्धतेमुळें शाळेच्या लौकिकांत व लोकप्रियतेंत साहजिकच भर पडली आणि खासगीवाल्यांच्या प्राचीन मराठी वास्तूशेजारीं ही नू. म. ची वास्तु शोभून दिसूं लागली.

घारपुऱ्यांची कॉलेजची कल्पना

ही इमारत तयार होत आली होती त्याच सुमारास मागें वर्णिल्याप्रमाणें रा. दत्तोपंत घारपुरे यांचा प्रवेश चालकांत झाला होता. रा. दत्तोपंत यांचे मनांत नू. म. विद्यालयासारख्या संस्थेची वाढ एका निराळ्या दिशेनें व्हावी अशी महत्त्वाकांक्षी कल्पना होती. ती कल्पना अशी—ज्याअर्थी या शाळेंतील विद्यार्थ्यांची संख्या दोन हजारांच्या घरांत गेली आहे व ज्याअर्थी तिचा लौकिकहि अत्यंत वाढला आहे आणि ज्याअर्थी पुण्यांत त्या वेळेस लोकांनीं चालविलेलें खासगी कॉलेज एकच असून त्यांत मुलांची दाटी होत होती, त्याअर्थी पुण्यास एक नवीन खासगी कॉलेज स्थापन होण्यास अत्यंत अनुकूल परिस्थिति आहे व तिचा फायदा आपल्यांतील नवीन दमाच्या बुद्धिमान् तरुणांनीं अवश्य घेतला पाहिजे, असा अभिप्राय झाल्याकारणानें रा. घारपुरे यांनीं आपली कल्पना चालकांपुढें ठेविली. रा. घारपुरे इकडे चालकांस येऊन मिळण्याचे पूर्वीहि चालकांचे मनांत कॉलेजचा विचार घोळत होता हें आम्हांस माहीत आहे. तथापि घारपुरे यांनीं जी कित्येक

हुषार व तरुण मंडळी आपल्या कल्पनेस अनुकूल करून घेतली होती तशा प्रकारची मंडळी जुन्या चालकांना सुसाध्य नव्हती. या व इतर अनेक अडचणींमुळें आपल्या विचारांना लौकर मूर्त स्वरूप देणें चालकांच्या आटोक्याबाहेरचें होतें. मात्र कॉलेजची आवश्यकता चटकन् पटण्यासारखी होती. परंतु तिला जर नू. म. विद्यालयासारख्या संस्थेचा कष्टानें भरलेला मजबूत पाया उपलब्ध झाला नसता तर अशा कॉलेजची स्थापना होणें बरेंच कठीण गेलें असतें. नू. म. च्या चालकांनीं आत्मविश्वासाच्या बळावर लोकांचा विश्वास संपादन केला होता आणि म्हणूनच चालकांनीं आपलें विद्यालय मंडळीचे हवालीं केलें. त्या वेळेस मराठी-शिक्षण-प्रसारक मंडळीचें अध्यक्षत्व, सरकार व जनता या उभयतांनाहि आपल्या शोधक विद्वत्तेनें व शुचिर्भूत वर्तनानें आदरणीय असलेले डॉ. रामकृष्ण गोपाळ भांडारकर यांनीं मोठ्या प्रेमानें पत्करलें. डॉ. भांडारकर यांचें वजन मुंबईच्या विद्यापीठांत व सरकारांतहि अतिशयच होतें; त्यामुळें त्यांची शिफारस अमान्य होण्याचें भय फारच कमी होतें.

हरिभाऊ आपटे

डॉ. भांडारकर यांच्याहि पूर्वीपासून किंबहुना नू. म. विद्यालयाचे अगदीं स्थापनेपासून कै. हरि नारायण आपटे यांचा हरएक बाबतींत संस्थेस पूर्ण पाठिंबा होता. प्रख्यात कादंबरीकार म्हणून आणि कै. महादेव चिमणाजी आपटे यांनीं स्थापलेल्या आनंदाश्रमाचे चालक म्हणून आणि एक वजनदार पुढारी म्हणून हरिभाऊंची ख्याति सर्वत्र होती. मुंबई विद्यापीठांतहि हरिभाऊ पदवीधर नसतांनाहि त्यांची विद्वत्ता व मार्मिकता लक्षांत घेऊन, त्यांना एम्. ए.चे परीक्षेंत परीक्षक नेमण्यांत येत असे. ज्या विष्णुशास्त्र्यांनीं निबंधमालेच्या द्वारें नवमहाराष्ट्राचीं अंतःकरणें उत्साहानें प्रफुल्लित केलीं, त्याच विष्णुशास्त्र्यांच्या स्फूर्तिगंगेंत हरिभाऊंनींहि मनसोक्त मज्जन केलें होतें आणि विष्णुशास्त्र्यांच्या निधनाचा धक्का तत्कालीन तरुणांस किती जोरानें बसला होता याचा पुरावाहि हरिभाऊंच्या 'शिष्यजनविलाप'नें जनतेस पटवून दिलेला होता. ज्या दिवशीं शास्त्रीबुवांचें निधन झालें त्या दिवशीं (१७ मार्च १८८२ रोजीं) ज्या ट्रेनिंग कॉलेजांतून बाहेर पडलेल्या कित्येक उत्साही तरुणांनीं शास्त्रीबुवांचें स्मारक म्हणून पुढें नूतन मराठी विद्यालयाची स्थापना केली ते तरुण, रावजीशास्त्री देवकुळ्यांसारख्या मान्य गुरूच्या विनवणीस भीक न घालतां आणि आपल्या होणाऱ्या भावी नुकसानीची पर्वा न करितां सहामाही परीक्षेची पहिली प्रश्नपत्रिका तशीच टाकून देऊन शास्त्रीबुवांचें शेवटचें दर्शन घेण्याकरितां म्हणून तडक ओंकारेश्वराकडे धांवले. हरिभाऊ व या तरुण मंडळींचा १८८३ सालापासून जो एकजीव झाला तो हरिभाऊंच्या या जगतीतलावरील अखेरच्या घटकेपर्यंत कायम राहिला. नू. म. विद्यालयाची हांक केव्हांहि व कोठेंहि येवो, तिला हरिभाऊंनीं ओ दिल्ली नाहीं असें केव्हांहि झालें



कै. हरि नारायण आपटे

नूतन मराठी विद्यालयाचे एक प्रथम पासूनचे
स्नेही, सल्लागार, शिक्षक, कौन्सिलर इ.

बालोद्यान प्रेस, पुणे.

क्रमानें येणारी पुढली जी कॉलेजची पायरी ती चढणें असा दोरीसूत आंखल्याप्रमाणें संस्थेचा विकासमार्ग आपणांस स्पष्ट दिसतो.

ता. २५ जून १९१५ रोजीं मराठी शाळेची इमारत उघडण्याचा समारंभ नामदार लॉर्ड विलिंग्डन यांच्या हस्तें झाला. त्या वेळीं भाषण करतांना नामदारसाहेबांनीं नू. म. विद्यालयासारखी उत्कृष्ट संस्था यशस्वी रीतीनें चालविल्याबद्दल चालकांचें अभिनंदन केलें आणि एक आणा फंडाची कल्पना पुढें मांडली. आपल्या देशाच्या शिक्षणाच्या संस्था आपण स्वतःच चालविणें ही खरी स्वदेशी होय असें सांगून सरकारास शिक्षणाचे कामीं हें विद्यालय किती साह्य देत आहे याची जाणीव आपणांस असल्याचें दाखवून संस्थेस मदत करण्यास सरकार अनुकूल राहील असें सांगून त्यांनीं भाषण पुरें केलें.

गव्हर्नरसाहेबांनीं याच वेळीं परमपूज्य सर रामकृष्णपंत भांडारकर यांच्या तैलचित्राचें अनावरण केलें. सदरहू तैलचित्र पुण्यांतील सुप्रसिद्ध चित्रकार प्रो. पिंपळखरे यांनीं अगदीं हुबेहुब असें तयार करून मंडळीस निरपेक्षबुद्धीनें नजर केलें होतें.

१९१६ सालापासून मॅट्रिक्युलेशन परीक्षेचे दिवस युनिव्हर्सिटीकडून बदलण्यांत आले. म्हणजे परीक्षा आतां मार्चमध्यें होण्याचें ठरलें. यामुळें सन १९१५ मार्च साली एक पुरवणीपरीक्षा घ्यावी लागली व तिला शाळेतून ७० चालू व ७ जुने इतके विद्यार्थी बसले व त्यांपैकीं २७ व १ असे पास झाले. मार्चमधील पुरवणीपरीक्षेस १०३ चालू व ३ जुने असे विद्यार्थी बसले, त्यांपैकीं ६८ व ३ पास झाले. युनिव्हर्सिटीचा निकाल शें. ६८ तर शाळेचा शें. ४८ झाला व फडतळे या मागासलेल्या मुलानें सबंध इलाख्यांत दहावा नंबर मिळविला. स्कूल फायनल व ड्रॉइंग परीक्षा यांचेहि निकाल शें. ३९ व ४५ म्हणजे साधारण बरे झाले.

शाळेची वार्षिक तपासणी इंग्रजी शाखेची ४ ऑक्टोबर १९१५ व मराठी शाखेची ३० जून व २ जुलै रोजीं झाली. इंग्रजी शाखेविषयीं रा. खरे यांनीं प्रशंसापर अहवाल सादर केला व मराठी शाळेचें कामहि दिवसेंदिवस प्रगतिपर होत चालल्याचें अधिकाऱ्यांचें मत पडलें.

जुलै १९१४ पासून ड्रॉइंग परीक्षेचे नियम सरकारनें बदलले व नवा अभ्यास चालू केला. त्यामुळें अर्थात् पहिल्या वर्षी विद्यार्थी थोडेच बसले.

शाळेतल्या शाळेंत शिकावयाच्या बहुतेक शाखांचा अभ्यासक्रम बराच बदलण्यांत आल्यामुळें तत्प्रीत्यर्थ सुमारें १००० रु. खर्चून नवें सामान मागविलें व रा.गोखले व रा. जोशी या त्या विषयांतील शिक्षकांकडे तें काम देऊन रा. घारपुरे



श्री दाजीसाहेब नातू.

सरदार नातू घराण्यांतील शाळेचे एक अभिमानी

[माजी विद्यार्थी; शि. प्र. मंडळीचे आश्रयदाते;

पुणें म्युनिसिपॅलीटीचे माजी कौन्सिलर]



श्री. पुरुषोत्तम विनायक रानडे, एल्. सी. ई.

नू. म. वि. चे माजी विद्यार्थी व शि. प्र. मं. चे

आश्रयदाते

बालोद्यान प्रेस, पुणें.



गु. कृष्णाजीपंत डोंगरे
नूतन मराठीचे संस्थापक



गु. विनायकरावजी आपटे

बालोद्यान प्रेस, पुणें.

नाहीं. या विद्यालयांतील विद्यार्थ्यांना दरसाल वासंतिक रसपानप्रसंगीं जो उपदेश करण्यांत येत असे, तो उपदेश पुष्कळ वर्षे हरिभाऊच लिहीत. अगदीं प्रारंभींच्या काळांत एक पैहि न घेतां केवळ निरपेक्ष बुद्धीनें हरिभाऊंनीं कित्येक वर्षे, प्रसंग पडेल त्या वेळेस, शिक्षकाचें काम मोठ्या आनंदानें केलें होतें. अर्थात् हरिभाऊंच्या 'करमणुकी'चीं कामें कुलकर्णी (दामुआण्णा) आणि मंडळी व शाळेचे चालक यांनीं आपलेपणानें करावीं यांत नवल तें काय? असा अकृत्रिम लोभ या गरीब संस्थेवर हरिभाऊंचा जडलेला होता. संस्थेचा अभिमान तर त्यांना इतका वाटे कीं, दुसऱ्या मोटमोठ्या संस्थांच्या नियामक मंडळांत काम करण्याविषयीं अत्यंत वंदनीय पुरुषानें केलेला पराकाष्ठेचा आग्रहहि त्यांनीं मानिला नाहीं आणि असें व्रतच आचरलें म्हटलें तरी चालेल कीं, खासगी शिक्षण-संस्थांमध्यें जर कोठें निरंतर संबद्ध राहावयाचें असेल तर तें मराठी शिक्षण प्रसारक मंडळीशींच होय. असा आपला बाणा आहे असें त्यांनीं आम्हांसच खुद्द सांगितलें होतें. अर्थातच कॉलेजच्या कल्पनेला त्यांनीं मनापासून पाठिंबा दिला, इतकेंच नव्हे तर स्वतःजवळील बहुमोल व वेंचक ग्रंथांचा मोठा संग्रहहि त्यांनीं संस्थेस मोठ्या प्रेमानें अर्पण केला. डॉ. भांडारकर यांचा हरिभाऊ यांचेवर पराकाष्ठेचा विश्वास असे. चालकांची निष्ठा कितीहि मोठी असली, पुण्यांत दुसऱ्या खाजगी कॉलेजची जरूरी कितीहि स्पष्ट असली, नवीन कॉलेज चालवण्यासाठीं आपणास वाहून घेण्यास कितीहि बुद्धिमान् तरुण पुढें सरसावले असले तरी भांडारकर व आपटे यांच्या सारख्यांच्या बजनावांचून व शिफारशींवांचून त्यांचें काम सिद्धीस जाणें अत्यंत मुष्किलीचें होत. तूर्त कांहीं वर्षे शाळेंतच शाळेचे शेजारीं नवी इमारत बांधून कॉलेज सुरू करावयाचें व पुढें सोईची जागा पाहून तें बाहेर न्यावयाचें असा चालकांचा विचार ठरला होता. सर्व सोंगें आणतां येतात, पण पैशाचें सोंग आणतां येत नाहीं. त्यामुळें कॉलेजसारखा मोठा उपक्रम कसा सिद्धीस जातो ही चालकांस मोठी काळजी होती. परंतु ज्यांनीं पूर्वी शाळेंत गरीब विद्यार्थ्यांस फुकट कोट वाटले म्हणून मागें सांगितलें आहे, त्या नागपूरच्या श्री. गणपतराव गोखले यांचे मनांत कॉलेजच्या इमारतीसाठीं अत्यंत हलक्या व्याजानें सुमारें पंचवीस हजारांची मोठी रक्कम देण्याचें येऊन संस्थेची मोठी चिंता निवारण झाली. रा. गोखले यांची ही मदत संस्थेच्या—कॉलेजच्या—इतिहासांत खरोखरच चिरस्मरणीय आहे. कॉलेजच्या वाढीचा इतिहास तूर्त येथें सोडून देऊं. एवढें मात्र लक्षांत ठेवलें पाहिजे कीं, नू. म. विद्यालयाचे चालक आपली वाढ क्रमानें व शिस्तीनें करीत होते आणि तशी ती करण्याविषयीं ते दक्ष होते हें आपण लक्षांत ठेविलें पाहिजे.

नवीन कॉलेज काढून गांवांतील गरज भागविणें या उद्देशापेक्षां आरंभीं मराठी शाळा, मग क्रमानें इंग्रजी वर्ग तिला जोडणें, एकेक ईयत्ता वाढवीत वाढवीत मॅट्रिक्युलेशनपर्यंत पूर्तता करणें व ही पूर्तता झाल्यानंतर बीस वर्षांनीं वाढीची

क्रमानें येणारी पुढली जी कॉलेजची पायरी ती चढणें असा दोरीसूत आंखल्याप्रमाणें संस्थेचा विकासमार्ग आपणांस स्पष्ट दिसतो.

ता. २५ जून १९१५ रोजीं मराठी शाळेची इमारत उघडण्याचा समारंभ नामदार लॉर्ड विलिंग्डन यांच्या हस्तें झाला. त्या वेळीं भाषण करतांना नामदारसाहेबांनीं नू. म. विद्यालयासारखी उत्कृष्ट संस्था यशस्वी रीतीनें चालविल्याबद्दल चालकांचें अभिनंदन केलें आणि एक आणा फंडाची कल्पना पुढें मांडली. आपल्या देशाच्या शिक्षणाच्या संस्था आपण स्वत:च चालविणें ही खरी स्वदेशी होय असें सांगून सरकारास शिक्षणाचे कामीं हें विद्यालय किती साह्य देत आहे याची जाणीव आपणांस असल्याचें दाखवून संस्थेस मदत करण्यास सरकार अनुकूल राहील असें सांगून त्यांनीं भाषण पुरें केलें.

गव्हर्नरसाहेबांनीं याच वेळीं परमपूज्य सर रामकृष्णपंत भांडारकर यांच्या तैलचित्राचें अनावरण केलें. सदरहू तैलचित्र पुण्यांतील सुप्रसिद्ध चित्रकार प्रो. पिंपळखरे यांनीं अगदीं हुबेहुब असें तयार करून मंडळीस निरपेक्षबुद्धीनें नजर केलें होतें.

१९१६ सालापासून मॅट्रिक्युलेशन परीक्षेचे दिवस युनिव्हर्सिटीकडून बदलण्यांत आले. म्हणजे परीक्षा आतां मार्चमध्यें होण्याचें ठरलें. यामुळें सन १९१५ मार्च साली एक पुरवणीपरीक्षा घ्यावी लागली व तिला शाळेंतून ७० चालू व ७ जुने इतके विद्यार्थी बसले व त्यांपैकीं २७ व १ असे पास झाले. मार्चमधील पुरवणीपरीक्षेस १०३ चालू व ३ जुने असे विद्यार्थी बसले, त्यांपैकीं ६८ व ३ पास झाले. युनिव्हर्सिटीचा निकाल शें. ६८ तर शाळेचा शें. ४८ झाला व फडतळे या मागासलेल्या मुलानें सबंध इलाख्यांत दहावा नंबर मिळविला. स्कूल फायनल व ड्रॉइंग परीक्षा यांचेहि निकाल शें. ३९ व ४५ म्हणजे साधारण बरे झाले.

शाळेची वार्षिक तपासणी इंग्रजी शाखेची ४ ऑक्टोबर १९१५ व मराठी शाखेची ३० जून व २ जुलै रोजीं झाली. इंग्रजी शाखेविषयीं रा. खरे यांनीं प्रशंसापर अहवाल सादर केला व मराठी शाळेचें कामहि दिवसेंदिवस प्रगतिपर होत चालल्याचें अधिकाऱ्यांचें मत पडलें.

जुलै १९१४ पासून ड्रॉइंग परीक्षेचे नियम सरकारनें बदलले व नवा अभ्यास चालू केला. त्यामुळें अर्थात् पाहिल्या वर्षी विद्यार्थी थोडेच बसले.

शाळेंतल्या शाळेंत शिकावयाच्या बहुतेक शाखांचा अभ्यासक्रम बराच बदलण्यांत आल्यामुळें तत्प्रीत्यर्थ सुमारें १००० रु. खर्चून नवें सामान मागविलें व रा.गोखले व रा. जोशी या त्या विषयांतील शिक्षकांकडे तें काम देऊन रा. घारपुरे



श्री दाजीसाहेब नातू.

सरदार नातू घराण्यांतील शाळेचे एक अभिमानी

[माजी विद्यार्थी; शि. प्र. मंडळीचे आश्रयदाते;
पुणें म्युनिसिपॅलीटीचे माजी कौन्सिलर]



श्री. पुरुषोत्तम विनायक रानडे, एल्. सी. ई.

नू. म. वि. चे माजी विद्यार्थी व शि. प्र. मं. चे
आश्रयदाते

बालोद्यान प्रेस, पुणें.

क्रमानें येणारी पुढली जी कॉलेजची पायरी ती चढणें असा दोरीसूत आंखल्याप्रमाणें संस्थेचा विकासमार्ग आपणांस स्पष्ट दिसतो.

ता. २५ जून १९१५ रोजीं मराठी शाळेची इमारत उघडण्याचा समारंभ नामदार लॉर्ड विलिंग्डन यांच्या हस्तें झाला. त्या वेळीं भाषण करतांना नामदारसाहेबांनीं नू. म. विद्यालयासारखी उत्कृष्ट संस्था यशस्वी रीतीनें चालविल्याबद्दल चालकांचें अभिनंदन केलें आणि एक आणा फंडाची कल्पना पुढें मांडली. आपल्या देशाच्या शिक्षणाच्या संस्था आपण स्वतःच चालविणें ही खरी स्वदेशी होय असें सांगून सरकारास शिक्षणाचे कामीं हें विद्यालय किती साह्य देत आहे याची जाणीव आपणांस असल्याचें दाखवून संस्थेस मदत करण्यास सरकार अनुकूल राहील असें सांगून त्यांनीं भाषण पुरें केलें.

गव्हर्नरसाहेबांनीं याच वेळीं परमपूज्य सर रामकृष्णपंत भांडारकर यांच्या तैलचित्राचें अनावरण केलें. सदरहू तैलचित्र पुण्यांतील सुप्रसिद्ध चित्रकार प्रो. पिंपळखरे यांनीं अगदीं हुबेहुब असें तयार करून मंडळीस निरपेक्षबुद्धीनें नजर केलें होतें.

१९१६ सालापासून मॅट्रिक्युलेशन परीक्षेचे दिवस युनिव्हर्सिटीकडून बदलण्यांत आले. म्हणजे परीक्षा आतां मार्चमध्यें होण्याचें ठरलें. यामुळें सन १९१५ मार्च सालीं एक पुरवणीपरीक्षा घ्यावी लागली व तिला शाळेंतून ७० चालू व ७ जुने इतके विद्यार्थी बसले व त्यांपैकीं २७ व १ असे पास झाले. मार्चमधील पुरवणीपरीक्षेस १०३ चालू व ३ जुने असे विद्यार्थी बसले, त्यांपैकीं ६८ व ३ पास झाले. युनिव्हर्सिटीचा निकाल शें. ६८ तर शाळेचा शें. ४८ झाला व फडतळे या मागासलेल्या मुलानें सबंध इलाख्यांत दहावा नंबर मिळविला. स्कूल फायनल व ड्रॉइंग परीक्षा यांचेहि निकाल शें. ३९ व ४५ म्हणजे साधारण बरे झाले.

शाळेची वार्षिक तपासणी इंग्रजी शाखेची ४ ऑक्टोबर १९१५ व मराठी शाखेची ३० जून व २ जुलै रोजीं झाली. इंग्रजी शाखेविषयीं रा. खरे यांनीं प्रशंसापर अहवाल सादर केला व मराठी शाळेचें कामहि दिवसेंदिवस प्रगतिपर होत चालल्याचें अधिकाऱ्यांचें मत पडलें.

जुलै १९१४ पासून ड्रॉइंग परीक्षेचे नियम सरकारनें बदलले व नवा अभ्यास चालू केला. त्यामुळें अर्थात् पहिल्या वर्षी विद्यार्थी थोडेच बसले.

शाळेंतल्या शाळेंत शिकावयाच्या बहुतेक शाखांचा अभ्यासक्रम बराच बदलण्यांत आल्यामुळें तत्प्रीत्यर्थ सुमारें १००० रु. खर्चून नवें सामान मागविलें व रा.गोखले व रा. जोशी या त्या विषयांतील शिक्षकांकडे तें काम देऊन रा. घारपुरे

यांजकडे तत्संबंधीं इतर व्यवस्था सोपविली. डॉ. बापट व डॉ. वझे यांनीं चालू केलेली निरपेक्ष सेवा याहि वर्षी चालविली.

क्रिकेटच्या सामन्यांत शाळेस यश आलें नाहीं, तरी आट्यापाट्यांची ढाल पुन: शाळेस मिळून एकंदर सतत तीन वर्षे लागोपाठ मिळाल्यानें ती शाळेकडे राहिली असें झालें.

डेक्कन जिमखान्यातर्फे सप्टेंबर १९१६ मध्यें भरलेल्या सामन्यांत शाळेला निरनिराळीं बक्षिसें मिळालीं. सातव यास कुस्तीचें बक्षिस मिळालें. मार्च १९१६ मध्यें डेक्कन जिमखान्यानें चालविलेल्या शिमग्यांतील खेळांच्या सामन्यांत शाळेचा खोखोचा संघ विजयी झाला व वैद्य या विद्यार्थ्यानें १७ फूट ११½ इंच लांब उडी मारून मैदानी खेळांची सरनायकी मिळविली. या सर्व यशाचें बरेंचसें श्रेय रा. शिदोरे यांचे प्रयत्नास दिलें पाहिजे.

इचलकरंजी व रानडे हीं बक्षिसें बोडस यांस, लिमयेछात्रवृत्ति गद्रे यांस व साठेशिष्यवृत्ति गोडबोले यांस देण्यांत आली.

वादसभा व ग्रंथालय यांचें काम पूर्ववत् पूर्वी सांगितलेल्या गृहस्थांचे देखरेखीखालीं अत्युत्साहपूर्वक चालू होते.

पोतदार, हर्डीकर चालक-वर्गांत आले

शिक्षकवर्गापैकीं रा. ढवळे व रा. त्रिं. रा. आपटे यांनीं एस्. टी. सी.ची परीक्षा देऊन तींत यश मिळविलें. चालक मंडळांतहि रा. दत्तो वामन पोतदार, बी. ए., व रा. त्र्यंबक भिकाजी हर्डीकर, एम्. ए., या दोघांचा प्रवेश डिसेंबर १९१५ पासून करण्यांत आला. सदरील दोघे तरुण गृहस्थ या शाळेचे अभिमानी व माजी विद्यार्थी होते आणि यापूर्वी त्यांनीं कशा प्रकारचें काम केलें होतें तें सर्व चालकांपुढें होतें. स्वत:चे शाळेबर या गृहस्थांची भक्ति होती.

रामभाऊ गोखल्यांना काळानें नेलें

दोन नवे चालक आले खरे; परंतु ता. २ जून १९१५ रोजीं जुन्या चालकांपैकीं एकाला काळानें ओढून नेलें. ता. २ जून नंतर ३ च दिवसांनीं म्हणजे ता. ५ जून रोजीं शाळेच्या नव्या इमारतींत वर्ग जावयाचे होते. तेथें गेल्यावर त्या नवीन हवाशीर जागीं 'आपण आपले वर्ग मोठे उमेदीनें घेऊं तेव्हांच राहूं,' अशी एक प्रकारची हुटहूटच ज्यांनीं आपले मनाचे मांगें लावली होती, ते रा. रामचंद्र जनार्दन गोखले हे वर सांगितल्याप्रमाणें कालवश झाले. रा. गोखले हे रा. विनायकरावजींबरोबर शाळेचे सेवेस लागले. मात्र त्यांचा चालक-मंडळांत प्रवेश अलीकडे कांहीं वर्षे झाला होता. रा. रामभाऊ यांनीं संस्थेची सेवा २२ वर्षे केली. ते संस्कृत हा विषय, विशेषत: त्यांतील



श्री. **यशवंत अनंत गोडबोले**, बी. ए., आय्. सी. एस्.
नू. म. वि. तून १९०५ सालीं मॅट्रिक, इलाख्यांत चवथे.
दुसरी जगन्नाथ शंकरशेट स्कॉलर्शिप मिळविली. संस्थेचे आश्रयदाते.

बालोद्यान प्रेस, पुणें.

यांजकडे तत्संबंधी इतर व्यवस्था सोपविली. डॉ. बापट व डॉ. बझे यांनीं चालू केलेली निरपेक्ष सेवा याहि वर्षी चालविली.

क्रिकेटच्या सामन्यांत शाळेस यश आलें नाहीं, तरी आट्यापाट्यांची ढाल पुनः शाळेस मिळून एकंदर सतत तीन वर्षे लागोपाठ मिळाल्यानें ती शाळेकडे राहिली असें झालें.

डेक्कन जिमखान्यातर्फे सप्टेंबर १९१६ मध्यें भरलेल्या सामन्यांत शाळेला निरनिराळीं बक्षिसें मिळालीं. सातव यास कुस्तींचें बक्षिस मिळालें. मार्च १९१६ मध्यें डेक्कन जिमखान्यानें चालविलेल्या शिमग्यांतील खेळांच्या सामन्यांत शाळेचा खोखोचा संघ विजयी झाला व वैद्य या विद्यार्थ्यानें १७ फूट ११½ इंच लांब उडी मारून मैदानी खेळांची सरनायकी मिळविली. या सर्व यशाचें बरेंचसें श्रेय रा. शिदोरे यांचे प्रयत्नास दिलें पाहिजे.

इचलकरंजी व रानडे हीं बक्षिसें बोडस यांस, लिमयेछात्रवृत्ति गद्रे यांस व साठेशिष्यवृत्ति गोडबोले यांस देण्यांत आली.

वादसभा व ग्रंथालय यांचें काम पूर्ववत् पूर्वी सांगितलेल्या गृहस्थांचे देखरेखीखालीं अत्युत्साहपूर्वक चालू होते.

पोतदार, हर्डीकर चालक-वर्गांत आले

शिक्षकवर्गापैकीं रा. ढवळे व रा. त्रिं. रा. आपटे यांनीं एस्. टी. सी.ची परीक्षा देऊन तींत यश मिळविलें. चालक मंडळांतहि रा. दत्तो वामन पोतदार, बी. ए., व रा. त्र्यंबक भिकाजी हर्डीकर, एम्. ए., या दोघांचा प्रवेश डिसेंबर १९१५ पासून करण्यांत आला. सदरील दोघे तरुण गृहस्थ या शाळेचे अभिमानी व माजी विद्यार्थी होते आणि यापूर्वी त्यांनीं कशा प्रकारचें काम केलें होतें तें सर्व चालकांपुढें होतें. स्वतःचे शाळेवर या गृहस्थांची भक्ति होती.

रामभाऊ गोखल्यांना काळानें नेलें

दोन नवे चालक आले खरे; परंतु ता. २ जून १९१५ रोजीं जुन्या चालकांपैकीं एकाला काळानें ओढून नेलें. ता. २ जून नंतर ३ च दिवसांनीं म्हणजे ता. ५ जून रोजीं शाळेच्या नव्या इमारतींत वर्ग जावयाचे होते. तेथें गेल्यावर त्या नवीन हवादार जागीं 'आपण आपले वर्ग मोठे उमेदीनें घेऊं तेव्हांच राहूं,' अशी एक प्रकारची हुटहूटच ज्यांनीं आपले मनाचे मागें लावली होती, ते रा. रामचंद्र जनार्दन गोखले हे वर सांगितल्याप्रमाणें कालवश झाले. रा. गोखले हे रा. विनायकरावजींबरोबर शाळेचे सेवेस लागले. मात्र त्यांचा चालक-मंडळांत प्रवेश अलीकडे कांहीं वर्षे झाला होता. रा. रामभाऊ यांनीं संस्थेची सेवा २२ वर्षे केली. ते संस्कृत हा विषय, विशेषतः त्यांतील

रूक्ष व कंटाळवाणा असा जो व्याकरणाचा भाग तो, इतक्या लीलेनें व मनोरंजक तऱ्हेनें शिकवीत असत कीं, विद्यार्थी अगदीं खूष होऊन जात व इतर मंडळी थक्क होऊन जाई. भांडारकरांचीं दोन पुस्तकें व आपटयांचें गाईड हीं त्यांच्या डोळ्यांपुढें नुसतीं नाचत असत. त्यांचा ताप चालू असतांना विद्यार्थ्यांचे चेहरे अगदीं प्रसन्न दिसत. 'फार बोलूं नये वगैरे' असें त्यांनीं आपल्या विशेष वाणीनें निक्षून सांगतांच जिकडेतिकडे सामसूम होई. त्यांची मूर्ति लहान पण कीर्ति मोठी होती. अत्यंत थोडया वेळांत व उल्हसित वृत्तीनें संस्कृत व्याकरणांतील आवश्यक भाग ते मुलांना समजावून देत आणि पुढें घटवूनहि घेत. रामभाऊंसारखी गुणी शिक्षक मंडळी केव्हांही झालें तरी थोडीच असणार; यामुळें रामभाऊंचा मृत्यु सर्वांस फार जाणवला. मात्र नव्या इमारतींत आपला वर्ग घेण्याची रामभाऊंची हौस विधात्यानें पुरवली नाहीं.

रा. देव, डोंगरे व मांदुस्कर हे मागें सांगितल्याप्रमाणें मराठी शाळेचें काम या सालीं पाहात होते.

माजी विद्यार्थि-संघ

ऑगष्ट १९१५ मध्यें संस्थेच्या कांहीं माजी विद्यार्थ्यांनीं सभा भरवून एक माजी विद्यार्थि-मंडळ (Past Students' Union) स्थापन केलें. शाळेंत होत नाहींत असे कांहीं उपयुक्त शैक्षणिक उपक्रम क्रमाक्रमानें हातीं घेण्याचा या माजी विद्यार्थ्यांचा उपक्रम होता. संघामार्फत विद्यार्थ्यांच्या खेळांचे सामने आणि एक लहानसा बक्षिससमारंभहि करण्यांत आला. तसेंच रा. गोखले, भिडे व गोडबोले या त्रिवर्ग आय. सी. एस्. माजी विद्यार्थ्यांना वरील संघानें पानसुपाऱ्या केल्या.

सखारामपंत आपटे यांनीं संस्थेची चालविलेली निरपेक्ष सेवा याहि वर्षी चालविली व संस्थेस उपकृत केलें.

कॉलेजला मंजुरी ५ वर्षांपुरती सरकारांतूनहि देण्यांत आली होती.

विनायकराव प्रिन्सिपॉल झाले

या सालचें काम संपून रा. विनायकरावजी आपटे यांजकडे मंडळीच्या नवीन निघालेल्या कॉलेजच्या प्रिन्सिपॉलचें काम देण्यांत यावयाचें होतें. त्यामुळें आज सतत २१ वर्षें नू. म. विद्यालयाशीं रा. विनायकराव यांचा जो अत्यंत जिव्हाळ्याचा संबंध होता तो तुटला नाहीं तरी पूर्वीइतका निकट राहणें शक्य नव्हतें. कॉलेजच्या या उपक्रमाचा विषय या लेखाच्या मर्यादेंतला नाहीं; सबब तो येथेंच सोडून देऊं. चालकांनीं रा. आपटे यांच्या जागीं रा. घारपुरे यांची नेमणूक केली.



कै. श्रीमंत विक्रमशहा पतंगशहा राजेसाहेब जव्हार
शि. प्र. मं. चे एक प्रमुख आश्रयदाते (रु. ५०००)

बालोद्यान प्रेस, पुणे.



श्रीमंत नारायणराव बाबासाहेब घोरपडे, चीफ् ऑफ् इचलकरंजी.

शि. प्र. मं. चे आश्रयदाते—यांनीं नू. म. वि. त इचलकरंजी बक्षिस ठेवलें आहे (एकूण रु. ५३००).

बालोद्यान प्रेस, पुणें.

चवथा खंड

कार्याचा विस्तार आणि भावंडांची जोड

इ. स. १९१६ ते १९३२

सिंहावलोकन

कॉलेजच्या स्थापनेचा काळ हा नू. म. विद्यालयाच्या एकंदर आयुष्यक्रमांतील तिसरा महत्त्वाचा टप्पा होता; तेव्हां तूर्त येथेंच थांबून थोडें सिंहावलोकन करणेंच योग्य ठरेल.

१८८३ पासून १९१६ पर्यंत सुमारें ३२ वर्षांवर काळ होतो. या अडीच तपांत अगदीं एका लहानशा प्राथमिक शाळेपासून उगम पावलेली ही ज्ञानगंगा एकेका ईयत्तेचे ओहोळ मिळून सारखी बाढत व फुगत चालली होती. अधिकाऱ्यांच्या रोषाचे खांचखळगे, प्लेगच्याकरवीं सहकाऱ्यांच्या मृत्यूच्या रूपानें झालेलें काळदऱ्यांचें दर्शन, आर्थिक अडचणींचे खडक या सर्व विरोधांना न जुमानतां वरील ज्ञानगंगेचा ओघ धो धो करीत पुढेंच कसा चालला होता, हें येथवरच्या वृत्तांतावरून स्पष्ट होईल. या ज्ञानगंगेचें पवित्र पाणी पिऊन पुष्ट व हृष्ट झालेले विद्यार्थिमत्स्य कसे डौलानें विहार करीत होते, तेंहि आपण पाहिलें; आणि त्यांतील कित्येक श्रेष्ठांची ओळखहि करून घेतली. आतां या ज्ञानगंगेच्या दोन विस्तृत शाखा होण्याचा समय जेथें येऊन ठेपला त्या स्थलसीमेवर उभें राहून आतां आपण आपल्या मूळ ओघाचे अनुरोधानें दोन्ही तटांची शोभा पहात पुढला मार्ग आक्रमूं.

मागें लिहिल्याप्रमाणें प्रो. दत्तात्रय रामचंद्र घारपुरे हे सन १९१६–१७ सालीं सुमारें एक वर्षभर नू. म. विद्यालयाचे सुपरिंटेंडेंट होते.

कॉलेजच्या स्थापनेमुळें बुद्धिमान्, विद्वान् व जबान अशा अध्यापकांचा लाभ थोडाथोडा वेळ शाळेस मिळूं लागण्यास एव्हांपासून सुरुवात झाली आणि ती पद्धति आजतागाईत चालू आहे. या नवीन मंडळींत कांहीं परदेशीय पदवीधरहि होते हें लक्षांत ठेवण्यासारखें आहे. कॉलेजच्या शेजारामुळें हें सहज घडून आलें.

कायमचे शिक्षक

शाळेंतील शिक्षकवर्गांतहि कायमचे ग्रॅज्युएट शिक्षक मिळवण्याची जरूरी अधिकच उत्पन्न झाली. सन १९०९ सालीं २५ मार्च रोजीं कौन्सिलनें सभा भरवून आपले नियम सुधारले होते. त्या वेळीं 'मंडळीच्या शिक्षणसंस्थेंत निदान तीन वर्षे ज्यांनीं लागोपाठ काम केलें असेल व पुढें आणखी दहा वर्षे तरी राहूं असे जे करार करून देण्यास तयार असतील त्यांना लाईफ मेंबरांच्या पंक्तीनें व..

कौन्सिलच्या मंजुरीनें कायमचे शिक्षक करण्यांत येईल,' असा नियम केला होता. पुढें एप्रिल १९१३ व ऑक्टोबर १९१४ मध्यें पुनः नियमदुरुस्ती होऊन 'पंचवीस वर्षे संस्थेची सेवा करण्याचें अभिवचन देणारास कायम शिक्षक करण्यांत येईल' अशा अर्थाचा सांप्रतचा नियम मंजूर झाला; आणि रा. वि. गो. केळकर, रा. दा. ना. गोखले व भा. ब. परांजपे या तीन ग्रॅज्युएट शिक्षकांना कायम करण्यांत आलें. रा. शिवराम लक्ष्मण दाणी हे व आणखी दोन शिक्षक या सालीं मृत्यु पावले. पैकीं रा. दाणी हे कायम शिक्षक असून त्यांनीं बीस वर्षे संस्थेची सेवा इमानेइतबारें केली होती.

प्लेग यंदा थोडा डोकावलाच. झोंपड्यांवर वर्ग भरले. त्यांत सुमारें ६०० विद्यार्थी आले. आतां नेहमींच विद्यार्थ्यांची संख्या साधारणपणें दीड हजारांवर (१६५८) गेली होती. ऑगष्टमध्यें तर १९८७ संख्या झाली. तरीहि विद्यार्थी येतच होते. जागा पुरी पडेना, तेव्हां जागा वाढविण्याचे विचार चालकांचे मनांत येऊं लागले. मॅट्रिक्युलेशन परीक्षेला पटावरील नेहमींचे १००+३ बाहेरील असे विद्यार्थी बसले. पैकीं ६८+३ पास झाले. आमचा निकाल शेंकडा ६६ व युनिव्हर्सिटीचा शें. ४८ असें आमचें वरचढ मान कायमच राहिलें. १९१६ मार्च मधील मॅट्रिक्युलेशन परीक्षेंत फडतळे या मागासलेल्या वर्गातील विद्यार्थ्यानें सबंध इलाख्यांत १० वा नंबर मिळविला. १९१७ सालीं १२२ + १ इतके विद्यार्थी मॅट्रिकचे परीक्षेला पाठविले. स्कॉलरशिप परीक्षा व इतर शाळेंतील बक्षिसें मारवाडी, गद्रे, खरे, घोलप वगैरे विद्यार्थ्यांच्या वाट्यांस गेलीं. मि. मार्स यांनीं जुलै १९१६ मध्यें शाळेची तपासणी करून माजी सुपरिंटेंडेंट रा. आपटे यांची तारीफ करून शाळेच्या प्रगतीविषयीं समाधान व्यक्त केलें. अलीकडे राजनिष्ठेचीं शपथपत्रकें सरकारी अधिकाऱ्यांसमोर शिक्षकांस भरून द्यावीं लागत व तीं इन्स्पेक्टरलोकहि तपासीत. पुढें बऱ्याच खटपटीनंतर हा शंकेखोरपणाचा व अपमानकारक प्रकार बंद झाला. शाळेंतील भौतिक शास्त्रांतील विद्यार्थ्यांची तपासणी करण्यास स्वतंत्र अधिकारी नेमण्याचा उपक्रम झाला व जुलै १९१७ मध्यें मि. प्रॅट यांनीं तपासणी केली.

क्रिकेट-शील्ड मिळालें

खेळांमध्यें शाळेला सीनियर क्रिकेट शील्ड मिळालें. देशमूख, फाटक, गोखले, जाधव व वैद्य या विद्यार्थ्यांना याचें श्रेय दिलें पाहिजे. लहान विद्यार्थ्यांनीं डेक्कन जिमखान्याच्या शिमगा-सामन्यांत खो खो चें बक्षिस मिळविलें. या कामीं आर्यक्रीडोद्धारक मंडळी या नांवाची या शाळेंतील कित्येक माजी विद्यार्थ्यांनीं काढलेली क्रीडा-संस्था होती तिचें शाळेस फार साह्य झालें. वार्षिक वासंतिक-रसपान (एप्रिल १९१६) समयीं रा. लेलेशास्त्री यांनीं रामायणावर लिहिलेला उपदेश विद्यार्थ्यांस वाचून दाखवून वांटण्यांत आला. रा. सखाराममंत आपटे यांचें कार्य



शि. प्र. मंडळीच्या कॉलेजच्या इमारतीच्या अनावरणाचा समारंभ.
मध्ये **नामदार गव्हर्नर सर लेस्ली विल्सन** (सन १९३२)
भोंवतालीं विद्यार्थी व अध्यापकवर्ग.


चालोद्यान प्रेस, पुणें.

२१ जुलई १९१९ रोजीं

नूतन मराठी विद्यालय-मराठी शाळा

नवीन इमारतीचें उद्घाटन

ने. ना. सर जॉर्ज लॉइड्, गव्हर्नर, मुंबई, हे जाहीर करीत आहेत.



प्रो. ह. वि. तुळपुळे, सेक्रेटरी, शिक्षण प्रसारक मंडळी;

ने. नामदार सर जॉर्ज लॉइड्;

प्रो. द. वा. पोतदार, सुपरिंटेंडेंट, मराठी शाळा;

प्रि. वि. ग. आपटे.

बालोद्यान प्रेस, पुणें.

पुढें चालूच राहिलें व त्यांनीं या कामीं शिक्षकांसहि तयार करण्याचें कबूल केलें. माजी विद्यार्थि-मंडळाचें काम यशस्वी रीतीनें पुढें सुरू राहिलें.

वाढच वाढ होऊं लागली

अशी संस्थेची भरभराट झाली. शाळेचा जमाखर्च चाळीस हजारांवर गेला. चालकांत भर पडली, तशी जबाबदारी वाढली, संस्था वाढली, खर्च वाढले, उत्पन्नहि वाढलें तरी तूटहि वाढली. यासाठीं वाढता लोकाश्रय मिळविण्याचे प्रयत्नहि वाढूं लागले. अशी सर्वत्र वाढच वाढ आतां होऊं लागली.

मराठी शाळेकडे रा. देव हे हेडमास्तर असून रा. दत्तो बामन पोतदार यांची नेमणूक सुपरिंटेंडेंट म्हणून करण्यांत आली. मुलांची संख्या वाढत वाढत ऑगस्ट मध्यें ७२७ झाली. रा. मांदुस्कर यांस सर्वस्वीं मराठी शाळेकडेच देण्यांत आलें. रा. पंडितराव कायम झाले.

शाळातपासणी रावसाहेब दीक्षित यांनीं रा. बापट, वाळिंबे व जोगळेकर यांचे साह्यानें ऑगस्ट १९१६ मध्यें केली आणि निस्संशय चांगली प्रगति झाल्याबद्दलचा आपला अभिप्राय नमूद केला. शाळेमध्यें पुष्कळ नवीन चित्रें, नकाशे व सामान यांचा भरणा करण्यांत आला. बागकाम, मातकाम, हातकाम यांना नवीन चालना मिळाली. गायन-समाजानें चालविलेलें गायनाचें शिक्षण चालू राहिलें आणि शिक्षकांना नवीन शिक्षणपद्धतीचीं तत्त्वें समजून प्रत्यक्ष नमुनेदार पाठ देण्याची अधिक संवय व्हावी याकरतां शिक्षकांच्या साताहिक पाठसभा भरविण्याचा उपक्रम सुरू झाला; तो आजतागाईत चालू आहे.

संस्थेंतील एक जुने शिक्षक शिवराम विष्णु दीक्षित यांनीं आपल्या अल्प पुंजीपैकीं पन्नास रुपयांची मोठी देणगी शाळेस आपले नांवचें बक्षिस ठेवण्याकरितां दिली व अशा रीतीनें मोठें प्रशंसनीय उदाहरण घालून दिलें.

पोतदार मराठी व सबनीस इंग्रजी शाळेवर

ता. १ एप्रिल १९१६ पासून नऊ वर्षेपर्यंत मराठी शाळेच्या सुपरिंटेंडेंटच्या जागेवर रा. पोतदार यांचीच पुनः पुनः निवड करण्यांत आली; आणि ता. १ मार्च १९१७ पासून प्रो. राजाराम परशुराम सबनीस यांचीहि त्याचप्रमाणें नऊ वर्षे इंग्रजी शाळेवर सुपरिंटेंडेंट म्हणून पुनः पुनः नेमणूक करण्यांत आली. या नऊहि वर्षांचा इतिहास अलीकडील असल्यामुळें बहुतेकांच्या माहितीचा आहे व या काळांतील शाळेचे अहवाल बरेच विस्तृत स्वरूपाचे असे प्रसिद्ध झालेले असून उपलब्धहि आहेत. त्यामुळें यापुढील हकीकत सालवार देण्याचें येथें कारण दिसत नाहीं. सामान्यतः ठोकळ स्वरूपांत उभय संस्थांची प्रगति कसकशी झाली याचें संकलित वर्णन केल्यानें काम भागणार आहे. दोन्ही शाखांत प्रवेश मिळवूं इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या या काळांत सालोसाल वाढत राहिली व त्यामुळें सर्वांस

प्रवेश देणें अशक्य झालें. नवीन इमारती उभ्या केल्याशिवाय आतां यापुढें काम चालणार नाहीं, अशी वेळ येऊन ठेपली. कॉलेजची नवी जबाबदारी ही अर शिरावर होतीच आणि वर वर्णिलेलें ओझें शिरीं बागविणें भाग होतें. चालकांनीं या वेळेस ठिकठिकाणीं मदत मिळविण्यासाठीं शिकस्तीचे प्रयत्न चालू केले. संस्थेचे दूरदूर पसरलेले अभिमानी, संस्थेस तत्परतेनें साह्य करतील अशी चालकांची अपेक्षा फलद्रूप होऊं लागली. केलेल्या कामाला आणि घेतलेल्या श्रमाला योग्य तें फळ आतां आल्यावांचून राहणार नाहीं असा भरंवसा चालकांस मनांतून वाटत होताच. नागपूरचे रा. गणपतराव गोखले या वृद्ध वकिलांनीं कित्येक हजारांची रक्कम अत्यंत हलक्या व्याजानें संस्थेस देऊन कॉलेजच्या इमारती उभ्या केल्या; पण कॉलेज केव्हां तरी बाहेर नेणें भागच होतें व त्याकरितां लक्षावधि रुपये मिळविणें अवश्य होतें. कॉलेजला परवानगी मुदतबंदीची होती आणि प्रथमची सुरुवात मध्यम कॉलेजची केल्यामुळें तें एका वाङ्मयशाखेंत तरी परिपूर्ण करणें चालकांस प्राप्त होतें. त्यांतच कॉलेजमुळें ज्यांची जोड झाली अशा एका अत्यंत यशस्वी व बुद्धिमान तरुणास आपल्या खर्चानें विलायतेस पाठविण्याचें चालकांनीं ठरविलें. अशीं खर्चाचीं तोंडें एकामागून एकसारखीं वाढत होतीं. खात्या तोंडांना पुरवणीसाठीं मिळतीं तोंडेंहि तितकींच समर्थ असावीं लागतात, त्याविना व्यक्तीचा, कुटुंबाचा किंवा संस्थांचा संसार सुखाचा होत नाहीं.

अशा स्थितींत मराठी शाळेसाठीं, तिच्या सुधारणेसाठीं, तिला अनुरूप अशा शाळामंदिरासाठीं खर्च मागणें किंवा तो देणें या दोन्हीहि गोष्टी अत्यंत कष्टाच्या होत्या. तथापि या दोन्हीहि गोष्टी शक्य तोंवर साधावयाच्या असा चालकांनीं निर्धार केला होता.

मराठी शाळेपायीं बूड

येथें हें सांगितलें पाहिजे कीं, मराठी शाळा उत्तरोत्तर स्वतंत्र व संपूर्ण म्हणून चालविणें आणि तिच्या जमाखर्चाची तोंडमिळवणी करणें हें काम फार अवघड होत चाललें होतें. एक तर फीचें उत्पन्न या शाळेंत अत्यंत कमी व तेवढ्या उत्पन्नावरच मोठ्या सुधारणा करणें, इमारती बांधणें, सामानसुमान आणणें व इतर ज्या अनेक इष्ट त्या सुधारणा करणें हें कदापिहि शक्य नव्हतें. त्यांतून सरकारी मदत जी एकदां कित्येक वर्षांपूर्वी सालीना रु. १८११ अशी बसली होती तीच, खर्च वाढला तरी, वाढली नाहीं. खुद्द सरकार प्राथमिक शिक्षण सक्तीचें व मोफत करण्यासंबंधानें आपली जबाबदारी ओळखून वागण्यास तयार होत होतें; म्युनिसिपॅलिट्या व डि. लोकलबोर्डें या विषयासंबंधीं आपलीं कर्तव्यें करण्यास अधिकाधिक प्रमाणांत पुढें पुढें सरसावत होतीं. राज्यघटना बदलून शिक्षणखातें, विशेषतः प्राथमिक शिक्षणखातें—अधिकाधिकच प्रमाणांत लोकायत्त करण्याचे प्रयत्न चालू



क्षत्रियकुलावतंस हिज् हायनेस श्रीमंत
छत्रपति शाहू महाराज, सं. कोल्हापूर.
संस्थेचे आश्रयदाते.

बालोद्यान प्रेस, पुणें.


होते. जेथें प्राथमिक शिक्षण मोफत होणार तेथें त्याला फी भरून येतो कोण? आणि अशा स्थितींत फी वाढविण्याचें नांव तरी कशाला! वाढविणें तर राहोच, आहे ती फीमुद्दां वसूल होणें हें अवघडच होतें. रोजच्या कारभारामध्यें म्हणजे चालू खर्चामध्यें जर अशा अडचणी तर इमारती, उपकरणें वगैरे कायम स्वरूपाच्या खर्चासंबंधानें किती अडचणी आल्या असतील त्याची कल्पनाच केलेली बरी. जेथें स्वतः सरकार अथवा म्युनिसिपॅलिट्या अथवा लोकलबोर्डें हीं आपल्या खर्चानें नव्या इमारती बांधून मोफत शिक्षण करण्याचे उपक्रमांत होतीं तेथें शुद्ध खासगी प्राथमिक शाळांची परिस्थिति किती नाजूक झाली असेल तें निराळें वर्णन करण्याची गरज नाहीं. त्यांना लोकांकडून देणग्या मिळविणें व त्यांच्या आधारावर इमारती उभ्या करणेची हिंमत धरणें हें कसें शक्य होतें! त्यांना जगण्याचा व वाढण्याचा आतां एकच मार्ग होता. There is room enough at the top पर्वताच्या शिखरावर चढा, सारें मैदान मोकळें आहे; एवढा एकच विचार त्यांना उत्साहित करण्यास समर्थ होता. आपले गुण वाढवावे, किंवा व्यापारी भाषेंत बोलावयाचें म्हणजे, बाजारापेक्षां आपला माल सरस निपजवावा आणि त्या आधारावर आपली प्रगति करावी; आणि याच व्यवहारन्यायाला अनुसरून वागण्याचें धोरण चालकांनीं मुकर केलें. शिक्षणशास्त्राची प्रगति फार झगाट्यानें होत होती. सुधारलेल्या जगांत तात्यापंतोजी पद्धति मागें पडून छडीच्या युगाला केव्हांच अर्धचंद्र मिळाला होता. घोड्या, मिरच्यांचा धूर, खोडे, अंगठे हे सर्व प्रकार आतां जवळजवळ गुन्ह्याच्या सदरामध्यें पडूं लागले होते. आतां एक प्रकारचें मुलांचें युग सुरू झालें होतें; म्हणजे त्या मुलांना खेळवावें, त्यांच्या वृत्ति उल्हसित कराव्या, त्यांना रंजवावें, त्यांना प्रसन्न ठेवावें, त्यांच्या कलानें घ्यावें, त्यांच्या मागें जावें आणि त्याच बेळीं त्यांच्या पुढें रहावें अशी प्रथा आतां सुरू झाली होती. सूर्याला पाहतांच कमळानें विकसित व्हावें, त्याप्रमाणें शिक्षकाला पाहतांच मुलानें फुलावें अशी अपेक्षा आतां उत्पन्न झाली होती. बावन्न मातृकांच्या राज्यांत केवढी मोठी उलथापालथ आतां झाली होती. 'श्री गणेशा'चें राज्य ही आतां गतगोष्ट झाली होती; आणि सिद्धांचे नमस्कार आतां कोठेंच ऐकूं येत नव्हते. आतां शिक्षण म्हणजे खेळ व खेळ म्हणजे शिक्षण असा न्याय सुरू झाल्यामुळें पुष्कळांच्या समजुतीचा घोंटाळा उडाला होता. अशा काळांत आपलें नू. म. विद्यालय टिकविणें आणि वाढविणें ही विशेष जबाबदारीची गोष्ट होती. परंतु ज्यांनीं कॉलेजची जड धुरा अंगावर घेऊन नवीन दिशेनें पुढें पाऊल टाकण्यास किंचित्हि भय दर्शविलें नाहीं, त्या चालकांना हीहि गोष्ट आपण पार पाडूं, असाच विश्वास आंतून वाटत असला पाहिजे; आणि म्हणून समय ओळखून दोन हजार म्हणा, तीन हजार म्हणा रुपयांवरतीं बूड दरसाल आली तरी ती सोसून आपला

ही मराठी शाळा पुढें चालवावयाची, तिला उत्कृष्ट रूप आणावयाचें, वगैरे निश्चय चालकांनीं मनाशीं केले व त्यांपैकीं बरेचसे सिद्धीसहि नेले.

इंग्रजी व मराठी शाळांना स्वतंत्र इमारती

या वेळीं इंग्रजी शाळा कांहीं भटांचे वाड्यांत, कांहीं राउंडांत व कांहीं खासगीवाल्यांचे वाड्यांतील शाळेचे स्वतःच्या इमारतींत भरत असे. कित्येक वर्गांना अक्षरलेखनासाठीं वगैरे लांबलांब येरझाऱ्या (हुजूरपागेपासून आप्पा बळवंत चौकापर्यंत) कराव्या लागत व पावसाळ्यांत त्यांची कोण दशा उडत असेल हें न सांगतां कळण्यासारखें आहे. तशांत राउंडमधील वर्ग अत्यंत जुजवी स्वरूपाचे बांधलेले आतां पडावयास झाले होते; कित्येक तर केव्हां कोसळतील याचा नेम नव्हता. तेव्हां ही दुःस्थिति दूर करण्यासाठीं चालकांनीं आपल्याच बळावर एक तिमजली इमारत आंपल्या सोईची अशी बांधण्याचें काम हातीं घेतलें; आणि पुढें थोडें काम बांधून झालें तोंच शि. प्र. मंडळीचे त्या वेळचे चिटणीस यांना एक अत्यंत योग्य कल्पना सुचली. दुमजलीऐवजीं तिमजली इमारत करून पुढेंमागें शक्य तर या राउंडच्या जागेंत संपूर्ण मराठी शाळा आणावी आणि जेव्हां कॉलेज बाहेर जाईल तेव्हां खासगीवाल्यांच्या जागेंतील शाळेच्या इमारती शाळेस पुरून उरतील. ही कल्पना सर्वांस पटली व त्या धोरणानें काम चालू झालें. पण मराठी शाळा राउंडमध्यें आणण्यास सरकारी मंजुरी अवश्य होती. कारण १९१५ मध्यें बांधलेल्या मराठी शाळेच्या दगडी इमारतीस सरकारनें निम्मा खर्च दिल्यामुळें व त्याविषयीं रीतसर करारनामा सरकारशीं झाल्यामुळें त्या जागेंतून मराठी शाळा हलवितांच किंवा ती जागा इंग्रजी शाळेकडे देतांच सरकारशीं केलेला करार मोडला असता. पण कल्पना अत्यंत योग्य असल्यामुळें सरकार सहानुभूतिपूर्वक या गोष्टीचा विचार करील अशी चालकांना आशा होती व त्या दिशेनें चालकांनीं आपले प्रयत्न पुढें सुरू केले. हा बहुतेक कार्यभाग मराठी शाळेचे व्यवस्थापक यांच्यावरच टाकण्यांत आला. कै. नामदार साठे (सोलापूर) हे त्या वेळीं शि. प्र. मंडळीचे कौन्सिलर होते. त्यांच्या मदतीनें त्या वेळचे मुंबई सरकारचे एक मंत्री सर इब्राहिम रहिमतुल्ला यांची सहानुभूति संपादून व इन्स्पेक्टर मि. मार्स व डायरेक्टर मि. कॉव्हर्नटन यांसहि सर्व विषय समजावून देऊन व त्यांची सहानुभूति संपादून कित्येक वर्षांच्या मेहनतीनंतर हें प्रकरण अनुकूल स्वरूपांत सिद्ध झालें.


या तिमजली इमारतीचे जोडीला अजमासें सव्वा लक्ष रुपयांची एक भव्यशी पुरवणी इमारत बांधण्याच्या योजना चालकांनीं सरकारांत गुजरल्या होत्या व त्याचा निदान $\frac{3}{4}$ खर्च (शक्य तोंवर सर्वच्या सर्व खर्च) सरकारांतून मिळावा अशी खटपट चालली होती; आणि मुंबई इलाख्याच्या सरकारची सांपत्तिक स्थिति



नूतन मराठी विद्यालय–मराठी शाळा

मुख्य इमारत–दर्शनी देखावा.

बालोद्यान प्रेस, पुणे.



नूतन मराठी विद्यालय–इंग्रजी शाळा

इमारतीचा एक देखावा.

पुढें बिघडली ती बिघडली नसती तर सर जॉर्ज लॉइड यांनीं १९१९ सालीं चालकांस जें अत्यंत सहानुभूतिपूर्वक भरपूर मदतीचें आश्वासन दिलें होतें तेंहि चालकांना पुरवून घेतां आलें असतें. परंतु सरकारी यंत्रें कधीं कधीं फारच मंद गतीनें चालतात; आणि तसेंच होऊन शेवटीं सरकारनें शब्दांनीं मंजूर केलेली योजना साक्षात् पुरी करीत नाहीं असें जरी म्हटलें नाहीं, तरी पुरी होण्याची आशा बिलकूल उरली नाहीं असें दिसून आल्यावरून चालकांनीं तो नाद सोडून दिला आणि आणखी एक सहा वर्गांची आपल्याच सोईप्रमाणें पुरवणी इमारत बांधून आपली अडचण स्वतःच भागवून घेतली.

तिमजली इमारतीचा उद्घाटण समारंभ ना. सर जॉर्ज लॉइड यांच्या हस्तें ऑगस्ट १९१९ मध्यें झालाच होता. पुढें जागेचे अदलाबदलीला मंजुरी मिळवून ३७ हजार रुपयांची ग्रँट (सुमारें खर्चाचा $\frac{1}{3}$ भाग) एवढी सरकारांतून घेऊन पुढली आशा सोडून देण्यांत आली. या खटपटींत आप्पा बळवंत चौक ते लकडीपूल रस्ता या पट्ट्यावर शाळेचें दर्शनी तोंड आणून पलीकडील मेहेंदळे वाड्यापलीकडच्या गलिच्छ बोळांतून करावा लागणारा प्रवेश रद्द करावा अशी योजना करणें जरूर पडलें. त्यासाठीं श्री. सरदार मेहेंदळे, श्री. पंडित मोतीवाले, श्री. सरदार नातू यांच्या जागा घ्याव्या लागल्या. सरकारी अधिकाऱ्यांमार्फत योग्य ठरली ती किंमत देऊन सरकारनें या खरेद्या आम्हांस पुऱ्या करून दिल्या.

सुमारें दहा हजार रुपये खर्च यासाठीं आला. खेरीज मराठी शाळेची दगडी इमारत (खासगीवालेबाडा) हा इंग्रजी शाळेकडे दिल्याकारणानें आणि मग सरकारी नियमांप्रमाणें इंग्रजी शाळेच्या इमारतीला द्यावयाचे मदतीचा दर बराच कमी असल्यामुळें सरकारनें हिशेबाचा बारकावा करून आपले बीस हजार रुपये हिशेबी येणें काढून तें वळतें करून घेतलें. असा या इमारत प्रकरणाचा इतिहास मोठा गुंतागुंतीचा आहे; आणि इ. स. १९१७ मध्यें सुरू होऊन सुमारें सात वर्षेपर्यंत हें प्रकरण अधूनमधून धुमसत राहिलें. आलेला हातचा योग दुर्दैवानें गेला व मराठी शाळेला जी एक सुंदर व नमुनेदार इमारत बांधून मिळावी म्हणून योजिलें होतें ती तशी इमारत पदरीं न पडून जरा दुय्यम प्रतीच्याच इमारती चालवून घ्याव्या लागल्या. कसेंहि असो, मराठी शाळा आतां प्रशस्त पटांगण असलेल्या शांत पण भरवस्तींत स्वतंत्र जागीं सुखानें नांदत आहे.

मराठी शाळेंतील नवीन उपक्रम

या नऊ वर्षांत शाळेमध्यें शिक्षणशास्त्रदृष्ट्या सर्वांत महत्त्वाचा प्रयोग म्हणजे अक्षरलेखनासंबंधीं होय. पाटीवर असो कीं वहीवर असो, घरीं असो कीं दारीं असो, नमुन्याचें असो कीं साधें असो, जें जें लिहावयाचें तें लिहिणें विशिष्ट आकाराचें आंखीव असेंच इयत्तेच्या क्रमानुरूप असलें पाहिजे असें अनेक प्रयोगांतीं

ठरवून त्याप्रमाणें पाट्या आखून देण्यांत आल्या, वह्या आंखून देण्यांत आल्या, अंतरें बसाविण्यांत आलीं, नियम करण्यांत आले व सर्रास त्याप्रमाणें अंमल होऊन त्याचीं उत्कृष्ट फलें सर्वांचे ध्यानांत आलीं.

सरकारी अधिकाऱ्यांनींहि या प्रयोगाची उपयुक्तता मान्य केली व अद्यापहि तदनुसार प्रयोग चालू आहेत. कदाचित् इतरांनीं या प्रयोगाकडे लक्ष पुरविल्यास त्यांचाहि फायदा झाल्याबांचून राहणार नाहीं असा हा प्रयोग अत्यंत महत्त्वाचा होता.

सर्व मुलांना एकत्र जमवून शाळेच्या आरंभीं त्यांच्याकडून प्रार्थना करवावी असाहि प्रघात या काळांत सुरू झाला व रेव्हरंड टिळकांचें 'प्रियकर हिंदुस्थान। आमुचा प्रियकर हिंदुस्थान', हें सुंदर पद्य अगदीं लहानपणापासून या प्रार्थनेच्या रूपानें मुलांच्या कोमल मनावर देशसेवेचे सुसंस्कार शाळेंत करूं लागलें.

याखेरीज ता. १७ मार्च रोजीं विष्णुशास्त्र्यांच्या स्मरणदिनानिमित्त लहान मुलांच्या समजुतीस पटेल अशा रीतीनें त्यांना विष्णुशास्त्र्यांची माहिती चित्ररूपानें, श्लोकरूपानें करून देण्यांत येऊं लागली आणि तशा मजकुराचीं लहानलहान सुबोध पत्रकें त्यांना वाटण्यांत येऊं लागलीं. हाहि उपक्रम नवाच होता. यालाच जोडून मकरसंक्रमणाचे दिवशीं फार मोठ्या प्रमाणावर तिळगूळ वांटण्याचें कामहि शाळेंत चालू झालें.

वार्षिक रसपान हा या शाळेचा अत्यंत मोठा विशेष. परंतु तन्निमित्त व्हावयाचा उपदेश ८ वर्षांच्या मुलांपासून तों १६ वर्षांच्या मुलांपर्यंत एकच होत असे. ही पद्धति मोडून मराठी शाळेंतील ७ ते १० वयांच्या विद्यार्थ्यांना सहज समजेल अशा पद्धतीनें निराळा उपदेश लिहून तो मराठी शाळेंत वांटावा असें ठरून दोन उपदेश होऊं लागले आणि मराठी शाळेंतील उपदेश अगदीं लहान मुलांकरितां व इंग्रजी शाळेंतील उपदेश त्याहून प्रौढ विद्यार्थ्यांकरितां असा क्रम सुरू झाला. असे लहान उपदेश बालवाचकांच्या अत्यंत उपयोगी पडण्यासारखे आहेत, असा पुष्कळ लोकांनीं त्यासंबंधीं आपला अभिप्राय दिला आहे.


वार्षिक परीक्षांसंबंधानें छापील वह्निक टाइपांत ठोसर रीतीनें अगदीं लहान मुलांसहि समजेल असे, प्रसंगीं सचित्र असे, प्रश्नपत्रकांचे नमुने या शाळेंत सुरू झाले तसे अन्यत्र कोठें दृष्टीस पडत नाहींत. प्रश्नांची दिशा व भाषा हींहि मोठ्या काळजीनें ठरविण्यांत येऊन हा उपक्रम अगदीं पहिल्या इयत्तेपासूनहि सुरू करण्यांत आला होता, याचें पुष्कळांस कौतुक वाटे.

या विशेषांखेरीज मातकाम, हातकाम वगैरेंचीहि सोय स्वतंत्र शिक्षक नेमून करण्यांत आली.

'आनंद ग्रंथालय' या नांवाचें एक लहानसें ग्रंथालय कै. वासुदेवराव आपटे यांच्या देणगींतून त्यांचा प्रिय मुलगा आनंद याच्या नांवानें सुरू करण्यांत


नूतन मराठी विद्यालय–मराठी शाळा

नवी इमारत–पश्चिम पार्श्व.



श्रीहनुमंताचें देऊळ; समोरील पटांगणांत मुलें कवाइतीची तयारी करीत आहेत.–(१९३२)

बालोद्यान प्रेस, पुणें.



नूतन मराठी विद्यालय–मराठी शाळा

इमारती समोरील क्रीडांगणावर मुलें व्यायाम करीत आहेत. सन १९३२

आलें. तसेंच शिक्षकांकरितांहि बेंचक व उपयुक्त अशा पुस्तकांचा भरणा शाळत करण्यांत आला.

दसरा आणि दिवाळी यांच्या दरम्यानचे दिवस अनेक कारणांकरितां उत्सवाच्या दृष्टीनें अत्यंत सोईचे आहेत, असें पाहून श्रीशारदादेवीच्या म्हणजे विद्यादेवीच्या नांवानें एक महोत्सव शाळेंत सुरू करावा व सतत नऊ दिवस नानाविध कार्यक्रमांनीं शाळा गजबजून टाकावी अशी महत्त्वाकांक्षी कल्पना मनांत येऊन चालकांनीं ती अंमलांतहि आणली. खेळ, गाणीं, संवाद, प्रदर्शन आणि अखेर रात्रौ लहान मुलांचे नाट्यप्रवेश यांचा रंग सालोसाल असा भरूं लागला कीं, हा शारदोत्सव दर डोई दोन आणे दर ठेवून स्वतंत्र उत्पन्न करून त्यांतून बराचसा चालूं लागला. या निमित्तानें शाळेंतील कित्येक शिक्षकांनीं लिहिलेलीं छोटीं नाटकें प्रसिद्ध झालीं. (उदाहरणार्थ, हणमंत कृष्ण कुलकर्णीकृत 'स्वराज्य-तोरण' व रा. वैद्य यांचीं नाटकें 'प्रल्हाद' वगैरे) मराठी शाळेंत असा उपक्रम यापूर्वी कधीं झाला नव्हता.

शिक्षकांचे संबंधानें विचार केला तर कायम झालेले परंतु अनट्रेंड असे बरेच शिक्षक शाळेंत होते. त्यांना उत्साहित करून त्यांचेकरितां पाठसभा वगैरे चालून हरतऱ्हेनें मदत करून बाहेरून ट्रेनिंगास बसण्यास त्यांस उत्तेजन दिल्या-मुळें बऱ्याच शिक्षकांस ट्रेनिंगचीं माफीचीं सर्टिफिकिटें मिळवतां आलीं. नवीन शिक्षकांची भरती अर्थातच ट्रेनिंगांतूनच केली होती. अशा तऱ्हेनें अन्-ट्रेंडपणाचा दोषहि शाळेंतून बहुतेक कमी झाला.

शिक्षकांत परस्पर सहानुभूति वाढावी व त्यांची आर्थिक स्थिति सुधारावी या हेतूनें एक शिक्षकफंडाची खाजगी रीतीनें सहकारी तत्त्वावर योजना करण्यांत आली. कायम शिक्षकांकडून दरमहा चार आणेप्रमाणें सक्तीच्या खुषीनें कापून घेण्यांत येऊं लागले. पुढें त्याची उपयुक्तता सर्वांस अतिशय पटून आज त्या शिक्षकनिधीची रक्कम दोन हजारांवर गेली असून बऱ्याच शिक्षकांची स्वतःची शिल्लक १०० वर रुपयांची आहे. अनेक शिक्षकांस त्यांतून कर्ज मिळतें व त्यांची मोठी सोय होते. या फंडामुळें शिक्षकांस ही मोठी समाधानाची व आधाराची जागा झाली असून त्याचीं कामें ते मोठ्या व्यवस्थेनें करतात आणि विशेषतः रा. प. सी. सबनीस यांची हिशेबाच्या कामीं दक्षतेची नजर राहिल्यामुळें एक प्रकारचा निर्धास्तपणाहि या कामांत आला आहे. पोस्टल कॅश सर्टिफिकिटांच्या रूपानें कांहीं शिलकी निधीहि यांतून निर्माण करण्यांत आला आहे व हा शिक्षकनिधीचा प्रयोगहि खरोखरीच अनुकरणीय आहे.

आतां हें सांगावयाचें कारण नाहीं कीं, १९१६ सालींच मराठी शाळेचें दप्तर सर्वस्वीं निराळें करण्यांत आलें व त्याची व्यवस्था लावण्यांत आली.

या कामीं कांहीं दिवस कै. विनायक बळवंत शेंडे व तदनंतर रा. प. सी. सबनीस (पेन्शनर हेडमास्तर) यांची योजना करण्यांत आली. रा. त्र्यं. रा. कवडे (पेन्शनर हेड मास्तर) यांचीहि मदत या कामीं होत असे.

सरकारी ग्रँट वाढवून ती ½, निदान निम्मी तरी मिळावी असा पुष्कळ प्रयत्न करण्यांत आला व तो पुढें यशस्वीहि झाला. तसेंच शाळेमध्यें मुलांना उत्तेजन मिळण्याकरितां म्हणून शाळेंतील शिक्षक रा. दीक्षित यांचे नांवें व रा. शेंडे यांचे नांवानें कायमचीं बक्षिसें मिळालीं. डॉ. पळसुले, रा. घारपुरे वगैरे मंडळींनींहि याप्रमाणें कायमच्या बक्षिसांची योजना केली. शाळेंत नवीन तऱ्हेचें प्रगतिपुस्तक मुलांकरितां करण्यांत आलें. बागकामासाठीं मुलांकडून थोडेफार बाफे लावण्यांत आले. आगीची प्रेक्षणीय कवाईत मुलांस शिकवून अवघ्या दोन मिनिटांत शाळा भ्युगल होतांच रिकामी व्हावी व पुनः दोन मिनिटांत मुलांनीं परत आपापल्या जागीं जाऊन बसावें, अशी व्यवस्था बसवण्यांत आली. ही कवाईत बघण्यास व शाळेचें इतर काम बघण्यास नामांकित लोक, विद्वान् व पुष्कळ प्रेक्षक शाळेंत येऊं लागले व त्यांचे अभिप्राय शाळेंत दाखल आहेत.

ही शाळा कै. विष्णुशास्त्र्यांचें स्मारक असल्याचें सर्वांचे ध्यानांत यावें म्हणून शास्त्रीबुवांचा लहानसा मुखवटा असलेला शिक्का तयार करून ही भावनाहि कायम करण्यांत आली.


येणेंप्रमाणें सन १९१६–१९२५ या काळांत हरतऱ्हेचे प्रयत्न चालकांनीं केले व नू. म. विद्यालय ही एक नमुन्याची प्राथमिक शाळा म्हणून पुण्यांत गणण्यांत येऊं लागली.

पुढील सहा सात वर्षें १९२५ ते १९३२ अखेर या शाळेचीं सूत्रें श्री. गोपाळ सदाशिव गोडबोले यांस व्यवस्थापक नेमून त्यांच्या हवालीं करण्यांत आलीं.

मागील सर्व गोष्टी यथासांग या काळांत पुढें चालू राहिल्या. खेळांचे व्यवस्थेंत अधिक भर घालण्यांत आली. शाळेंतील मुलांना अक्षरलेखनासाठीं व परीक्षांसाठीं एकत्र बसण्यास स्वतंत्र मोठी मोकळी जागा नव्हती आणि सव्वा लाखाची इमारत आतां कागदांतच राहिली हें निश्चित झालें. सबब सुमारें चार हजार रुपये खर्चून एक विस्तृत लेखनशाळा अगदीं साधी अशी बांधण्यांत आली. आज तिचा फार उपयोग होत आहे.

आनंद ग्रंथालयाकरितांहि लहानशी जागा बांधण्यांत आली व शिक्षकनिधींतून एक स्वदेशी वस्तुभांडारहि चालवण्यास सुरुवात झाली.

या काळांत शहरांतून प्राथमिक शिक्षणाची सर्व सत्ता शहर म्युनिसिपॅलिटीकडे गेल्यामुळें शाळातपासणी व मदत साक्षात् सरकारांतून न होतां लोकल-ऑथॉरिटीकडून होण्यास सुरुवात झाली.



नूतन मराठी विद्यालय-मराठी शाळा
शिक्षक सम्मेलन १९३२.

बालोद्यान प्रेस, पुणें.



नूतन मराठी विद्यालय
विद्यार्थी संघ

बालोद्यान प्रेस, पुणें.

सन १९३२ सालीं व्यवस्थापकांचे जागीं प्रो. त्र्यं. भि. हर्डीकर यांची नेमणूक करण्यांत आली. रा. गोपाळ सदाशिव गोडबोले हे फर्लोवर गेले. तथापि अजूनहि आपणांस होईल तेवढी संस्थेची सेवा हौसेनें व आनंदानें त्यांनीं चालू ठेवलीच आहे.

इंग्रजी शाळेची प्रगति

सन १९१७ ते १९२६ अखेर नऊ वर्षे मागें सांगितल्याप्रमाणें इंग्रजी शाळेचे मुख्य अधिकारी रा. रा. प. सबनीस हे होते. या काळांत शाळेच्या कामांत नियमितपणा राखण्यांत अत्यंत कटाक्ष ठेवण्यांत आला. वेळचे वेळीं योजिलेल्या गोष्टी वेळच्यावेळीं घडवून आणण्याविषयीं फार काळजी घेण्यांत आली. इंग्रजी शाळेचा कारभार म्हणजे जवळजवळ दोन हजार विद्यार्थी व सुमारें ७५ शिक्षक व अजमासें अर्धा पाऊण लाख रुपयांची साळीनाची उलाढाल असा व्याप होता. हा मोठा भार ज्यांना शिरीं वाहावा लागला असेल त्यांजवर केवढी मोठी जबाबदारी येऊन पडत असेल याची कल्पना बारीक विचार केल्यावांचून येणार नाहीं.

आरंभींच मागें वर्णिलेल्या जागेच्या अपरिहार्य अडचणी सोसाव्या लागल्या. जितका व्याप मोठा, तितकी संतापाला जागाहि मोठी व त्यांत जर जागेच्या त्रिस्थळीसारखी अडचणीची भर पडली तर मग बोलावयासच नको. विद्यार्थी, पालक, शिक्षक, वर्ग, अभ्यासक्रम, चढाओढी, सामने, परीक्षा, बक्षिसें, सभा, संमेलनें, संघ, मासिकें, तक्रारी अशी सर्व गर्दी या कारभारांत दिसून येते. आणि असा भार जर एकट्यादुकट्यांसच शिरीं वहावा लागेल तर खरोखरच त्याचें निम्में आयुष्य सांप्रतच्या स्थितींत तरी घटेल. हें जाणून चालकांनीं मुख्य व्यवस्थापकांच्या मदतीस आजीव सेवक मंडळांतून दोनपासून चारांपर्यंत मंडळी वेळोवेळीं नेमून दिली होती व त्याला अनुसरून रा. गो. स. गोडबोले, रा. लक्ष्मणशास्त्री लेले, रा. म. रा. परांजपे, रा. प्र. गो. पाध्ये, रा. वा. पु. पटवर्धन, रा. म. शं. गोडबोले, रा. रा. गं. तेलंग वगैरे मंडळींच्या नेमणुका कामाच्या सोईप्रमाणें होत असत.


एकदोन कारकून, एखादा ग्रंथगणक म्हणजे लायब्रेरियन, पांच सात गडी वगैरे नोकरवर्गहि या संस्थेच्या दिमतीस द्यावा लागे. अर्थात् याकरितां निराळी कचेरीच ठेवावी लागे. दप्तरहि याचें मोठें असे. शिवाय ड्रॉइंग व सायन्स हे जरासे स्वतंत्रच विषय मानतां येत असल्यामुळें त्यांची व्यवस्था निराळीच करावी लागे. याच कारणास्तव नेहमींचे तपासनीस असतांहि सरकारनें या दोन विषयांकरितां स्वतंत्र तपासनीस परवांपर्यंत कायम ठेवले होते.

जागेची अडचण, मराठी शाळेची पूर्वीची इमारत सर्व इंग्रजी शाळेच्या दिमतीस दिल्यापासून, बहुतांशीं निवारली गेली. परंतु नवीन शास्त्रीय पद्धतीची

बाकांची वगैरे व्यवस्था अद्याप सर्व वर्गांत झाली नव्हती. हें खर्चाचें काम होतें व खर्चहि या काळांत बराच करावा लागला.


खासगीवाले यांच्या जागेंत ठेवण्याजोगा असा एक खासगीवाल्यांचा, जुना भव्य असा दुपाखी दिवाणखाना होता, त्याचे बरचे बाजूस माळा असे व त्या कौलारू माळ्यांतच पुष्कळ दिवस शाळेची अक्षरशाळा होती. एवढीच जागा आतां खासगीवाले वास्तूंत अशी मोडकळीस आलेली राहिली होती; तो माळा व तो जिना पाहतांच भोंवतालच्या नवीन सुंदर इमारतींना तें गालबोटच आहे असें वाटे. जिकडे तिकडे चालक नवेंजुनें करीत होते, इमारती बांधीत होते, कर्जे काढीत होते आणि देणग्याहि मिळवीत होते. तसाच हिय्या करून एकदा हेंही लचांड निकालांत काढावें असें ठरवून चालकांनीं तज्ज्ञांच्या सल्ल्यानें खासगीवाल्यांच्या तळमजल्यावरचा प्रशस्त दुपाखी दिवाणखाना व त्यांतील मेहरपदार कोनाडे वगैरे काम होतें तसेंच शाबूद ठेवून अगदीं जमीनींत वाळूपर्यंत घेतलेल्या १८ फूट खोलीच्या प्राचीन पायावर संगीन दगडी भिंती रचून व त्यांत भक्कमसे स्तंभ उभारून त्यांवर कैच्या देऊन, भोंवतालीं आंतून सज्जा बांधून, त्यांतून एक जिना काढून, भव्य असा चौकोनी दिवाणखाना उर्फ **सभागृह** तयार केलें. सुमारें ५०′×४०′ अथवा २००० चौ. फुटांचें हें सभागृह आंतील सज्जासुद्धां दाटीदाटीनें बसल्यास ७०० मंडळींचा तरी समावेश करूं शकतें. प्रथम कांहीं दिवस या सभागृहाचा उपयोग कॉलेजचा एक वर्ग बसवण्यास आपणांस करतां येईल व तदनंतर हें सभागृह शाळेच्या उपयोगीं पडेल अशी दूरदृष्टीची योजना मनांत आणून चालकांनीं ही सर्व धडामोड केली व या कामीं सुमारें पस्तीस हजार रुपये खर्च केले. आज हें सभागृह अनेक उपयुक्त विद्याविषयक कार्यास बाहेरचे लोक मोठ्या हौसेनें मागतात व पसंत करतात. असें हें स्थळ संस्थेच्या सर्वस्वीं मालकीचें असून संस्थेनें त्यावर सरकारी ग्रँट मिळवण्याचीहि खटपट केली नाहीं.

या सभागृहासमोरच शाळेच्या उपयोगासाठीं एक सुंदरसा **तालीम-खानाहि** याच गडबडींत बांधून घेतला आणि पुढें मुलांस कांहीं उपयुक्त पोटभरी विद्या शिकविण्यासाठीं विद्यार्थि-संघाकडून जो उपक्रम शाळेंतील शिक्षक रा. नवाथे व रा. देवगीरकर या शिक्षकांचें जोडीनें उत्साहानें केला त्याकरितांहि एक लहानशी तात्पुरती खोली या सभागृहासमोर बांधण्यांत आली. विद्यार्थिसंघ व तालीमखाना यांच्या मधल्या जागेवर विद्यार्थ्यांस '**स्वदेशी हें स्वराज्याचें साधन होय.**' या तत्त्वाचें प्रत्यक्ष शिक्षण देण्यासाठीं जें विद्यार्थि-भांडार संस्थेचे एक आजन्म सेवक प्रो. नारळकर यांनीं मोठ्या चिकाटीनें आज सतत १५ वर्षे चालविलें आहे व ज्याचा वृत्तांत स्वतंत्रपणें या ग्रंथांत अन्यत्रपणें दिला आहे, त्या विद्यार्थि-भांडाराची स्वतंत्र व शोभिवंत इमारत आहे.



नूतन मराठी विद्यालय, हायस्कूल, उत्तर पाखे

बालोद्यान प्रेस, पुणे.



नूतन मराठी विद्यालय, हायस्कूल दक्षिण पाखे.

बालोद्यान प्रेस, पुणें.

मराठी शाळेला, शाळेसमोर तिचे पोटापुरतें पटांगण तरी आहे; परंतु इंग्रजी शाळेची या बाबतींत अत्यंत कुचंबणा झालेली आहे. गांवांतच शाळेच्या गृहांत मोठें विस्तीर्ण सपाट मैदान मुलांस खेळण्यासाठीं मिळणें जवळजवळ अशक्यच आहे. अशी भाग्यवंत शाळा एखादीच. नू. म. विद्यालयास ही क्रीडांगणाची अडचण तिचे जन्मापासूनच भोंवलेली आहे. या स्थितींत कांहीं अंतर पडलें असेल किंवा पडूं लागलें असेल तर तें आतां अगदीं अलीकडे होय. जागेची ही अडचण हें या विद्यालयांतील विद्यार्थ्यांच्या क्रीडाविषयक प्रगतीस एक मोठें विघ्नच होऊन बसलें आहे; परंतु त्याला कोणाचाच इलाज नाहीं. मध्यवर्स्तींत वास्तू लाभली हींच गोष्ट भाग्याची झाली.

कॉलेजसाठीं बाहेर जागा पाहण्याची जी खटपट मंडळींची चालू होती, तिचीं अनेक स्वरूपें होतां होतां अखेर सांप्रतची 'भाऊमहाराज बाग' या नांवानें प्रसिद्ध असलेली बाबामहाराज यांची २५ एकर जागा कायम करण्यांत आली. ही जागा संस्थेस मिळवून देण्याची कल्पना खाजगीवाले यांची जागा मिळविणाऱ्या कै. डोंगरे मास्तरांचीच होती हें या ठिकाणीं मुद्दाम नमूद केलें पाहिजे. या श्रेयाचे दुसरे प्रमुख वांटेकरी कै. लोकमान्य टिळक हे होत. त्यांच्या आठवणीचे संग्रहांत या विषयाची सविस्तर हकीगत जिज्ञासूंना पहावयास सांपडेल. या जागेवर कॉलेजच्या इमारती होऊन शिवाय बरेंच मोठें मैदान मुलांस खेळावयास राखावयाचें होतें. या मैदानावर शाळा व कॉलेज या दोन्ही संस्थांतील विद्यार्थ्यांची खेळण्याची सोय करावी, असें चालकांनीं ठरविलें. शाळेला ही जागा फार लांब होती, पण त्याला चालकांचा नाइलाज होता. आज तो भाग वस्तीनें गजबजून गेलेला आहे. परंतु थोड्या वर्षांपूर्वी हें सारें रान होतें. ही सारी जमीन शेतकीची होती. मुरूम यांत अगदीं कमी होता; आणि ती खेळण्याच्या उपयोगाची करणें हें काम अर्थातच फार खर्चाचें होतें. तथापि तो खर्च क्रमाक्रमानें करण्याचें ठरवून शेतजमीनीची टणक खेळाडू मुरमी जमीन बनविण्याकरितां संस्थेनें सुमारें १६ हजार रुपये खर्च केला आहे. पैकीं निम्मा खर्च इंग्रजी शाळेनें केलेला आहे.

या जागेवर मुलांना खेळण्यास नेण्याविषयीं चालकांना निरनिराळ्या युक्त्या कराव्या लागल्या. इतक्या लांब जाऊन खेळून वेळेवर येतां यावें, यासाठीं शाळेच्या अभ्यासाच्या वेळाहि फिरवाव्या लागल्या, आणि अखेर शिक्षकांना आळीपाळीनें नियमित वेळां नेमून देऊन आपापला वर्ग त्या ठिकाणीं खेळावयास नेण्यास त्यांच्या कामाचा एक भाग म्हणून सांगण्यांत आलें. अशा अडचणी या क्रीडांगणाबाबत संस्थेस सोसाव्या लागल्या आहेत व त्यांतून पार पडण्याकरितां चालक शक्य ती खटपट करीत आहेत व त्याला यशहि येत आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं.


या सहा वर्षांत शाळेतील व्यायाम-शिक्षणाचा एक भाग म्हणजे मर्दानी शिक्षणाचा भाग येथील महाराष्ट्रीय मंडळावर सोंपविला होता. सदर मंडळाचे चालक रा. शि. वि. दामले हे या संस्थेचे अभिमानी असे माजी विद्यार्थी असल्यामुळें त्यांनीं या कामांत लक्ष घातलें आणि विद्यार्थ्यांत व्यायामाची आवड उत्पन्न केली.

मुलांच्या व्यायामासाठीं मुलांचें एक क्रीडांगण मुक्रर करण्यांत येऊन त्याची सुधारणा करण्यांत येऊन त्यासाठीं स्वतंत्र शिक्षकाची नेमणूक करून आणि अखेरीस शाळेच्या उपयोगासाठीं एक तीन हजारांचें क्रीडामंदिर उभारून अनेक सोई चालकांनीं केल्या.

तालीमखाना, क्रिकेटचे व आट्यापाट्यांचे संघ, यांचे सामने, जयपराजय वगैरेंची माहिती या पुस्तकांत रा. गोखले यांनीं स्वतंत्रपणें दिली असल्यामुळें त्याचा येथें विस्तार करीत नाहीं. क्रीडाविषयक गोष्टींबद्दल आपण लिहीत आहोंत तर येथेंच पुणें शहरामध्यें जी एक चळवळ या काळांत नांवारूपास आली, तिचा व आपले शाळेचा संबंध सांगणें युक्त होईल. याहि विषयाबद्दल याच पुस्तकांत अन्यत्र स्वतंत्र लेखांत विवेचन झालें असल्यामुळें प्रसंगापुरतांच त्याचा उल्लेख येथें करणें योग्य होईल. ही चळवळ म्हणजे स्काउट ऊर्फ बालवीर चळवळ ही होय. या चळवळीचा पुणें शहरशीं जो संबंध घडून आला, तिचें बरेंच श्रेय रा. रा. प. सबनीस, रा. द. प. जोशी, रा. मो. ना. नातू, रा. य. वि. आपटे, रा. त्र्यं. भि. हर्डीकर, रा. वि. मा. देशमुख, रा. झांजलेप्रभृति या शाळेंतील शिक्षकांना व विद्यार्थ्यांसच बहुतांशीं आहे.

अलीकडे मुलांत लिहिण्याची व वाचण्याची हौस पूर्वापेक्षां निस्संशय वाढली आहे; आणि म्हणूनच या वृत्तीचें योग्य मार्गानें पोषण करण्यासाठीं बऱ्याच शिक्षणसंस्था आपापलीं नियतकालिकें चालवीत आहेत. नू. म. विद्यालयाचेंहि असेंच चांगलें नियतकालिक असावें असें व्यवस्थापकांचे मनांत येऊन त्याप्रमाणें नियतकालीक चालूं झालें. रा. मुकुंदशास्त्री मिरजकर, रा. वाटवे, रा. गुणेप्रभृति शिक्षकांनीं संपादकीय कामाचा बराच बोजा अंगावर घेऊन या उपक्रमास साह्य केलेलें आहे व विद्यार्थ्यांनीं याचा उत्तम फायदा करून घेतला असून त्याची उपयुक्तता व लोकप्रियता वाढत आहे. असें हें नवीन साधन आतां उपलब्ध झाल्यामुळें शाळेंतील अनेक विद्यार्थी, शिक्षक व शाळेच्या हकीकती यांची बरीच माहिती या नियतकालिकांतून पहावयास मिळून पुढील इतिहासकाराचें काम बरेंच सुकर होईल.

मुलांच्या शरीराच्या जोपासनेबरोबरच त्यांच्या आरोग्याची काळजी त्यांच्या पालकांनीं व शिक्षकांनीं वाहणें हें त्यांचें कर्तव्य आहे. त्यास अनुसरून आपल्या



कै. रावब. लक्ष्मण जनार्दन आपटे वकील.
न्यू. म. वि. चे माजी विद्यार्थी, आश्रयदाते व कौन्सिलर.

बालोद्यान प्रेस, पुणे.

या सहा वर्षांत शाळेंतील व्यायाम-शिक्षणाचा एक भाग म्हणजे मर्दानी शिक्षणाचा भाग येथील महाराष्ट्रीय मंडळावर सोंपविला होता. सदर मंडळाचे चालक रा. शि. वि. दामले हे या संस्थेचे अभिमानी असे माजी विद्यार्थी असल्यामुळें त्यांनीं या कामांत लक्ष घातलें आणि विद्यार्थ्यांत व्यायामाची आवड उत्पन्न केली.

मुलांच्या व्यायामासाठीं मुलांचें एक क्रीडांगण मुक्रर करण्यांत येऊन त्याची सुधारणा करण्यांत येऊन त्यासाठीं स्वतंत्र शिक्षकाची नेमणूक करून आणि अखेरीस शाळेच्या उपयोगासाठीं एक तीन हजारांचें क्रीडामंदिर उभारून अनेक सोई चालकांनीं केल्या.

तालीमखाना, क्रिकेटचे व आट्यापाट्यांचे संघ, यांचे सामने, जयपराजय वगैरेंची माहिती या पुस्तकांत रा. गोखले यांनीं स्वतंत्रपणें दिली असल्यामुळें त्याचा येथें विस्तार करीत नाहीं. क्रीडाविषयक गोष्टींबद्दल आपण लिहीत आहोंत तर येथेंच पुणें शहरामध्यें जी एक चळवळ या काळांत नांवारूपास आली, तिचा व आपले शाळेचा संबंध सांगणें युक्त होईल. याहि विषयाबद्दल याच पुस्तकांत अन्यत्र स्वतंत्र लेखांत विवेचन झालें असल्यामुळें प्रसंगापुरतांच त्याचा उल्लेख येथें करणें योग्य होईल. ही चळवळ म्हणजे स्काउट ऊर्फ बालवीर चळवळ ही होय. या चळवळीचा पुणें शहरशीं जो संबंध घडून आला, तिचें बरेंच श्रेय रा. रा. प. सबनीस, रा. द. प. जोशी, रा. मो. ना. नातू, रा. य. वि. आपटे, रा. त्र्यं. भि. हर्डीकर, रा. वि. मा. देशमुख, रा. झांजलेप्रभृति या शाळेंतील शिक्षकांना व विद्यार्थ्यांसच बहुतांशीं आहे.

अलीकडे मुलांत लिहिण्याची व वाचण्याची हौस पूर्वापेक्षां निस्संशय वाढली आहे; आणि म्हणूनच या वृत्तीचें योग्य मार्गानें पोषण करण्यासाठीं बऱ्याच शिक्षणसंस्था आपापलीं नियतकालिकें चालवीत आहेत. नू. म. विद्यालयाचेंहि असेंच चांगलें नियतकालिक असावें असें व्यवस्थापकांचे मनांत येऊन त्याप्रमाणें नियतकालीक चालूं झालें. रा. मुकुंदशास्त्री मिरजकर, रा. बाटवे, रा. गुणेप्रभृति शिक्षकांनीं संपादकीय कामाचा बराच बोजा अंगावर घेऊन या उपक्रमास साह्य केलेलें आहे व विद्यार्थ्यांनीं याचा उत्तम फायदा करून घेतला असून त्याची उपयुक्तता व लोकप्रियता वाढत आहे. असें हें नवीन साधन आतां उपलब्ध झाल्यामुळें शाळेंतील अनेक विद्यार्थी, शिक्षक व शाळेच्या हकीकती यांची बरीच माहिती या नियतकालिकांतून पहावयास मिळून पुढील इतिहासकाराचें काम बरेंच सुकर होईल.

मुलांच्या शरीराच्या जोपासनेबरोबरच त्यांच्या आरोग्याची काळजी त्यांच्या पालकांनीं व शिक्षकांनीं वाहणें हें त्यांचें कर्तव्य आहे. त्यास अनुसरून आपल्या

शाळेंतील विद्यार्थ्यांची वैद्यकीय तपासणी करण्यासंबंधानें कांहीं व्यवस्था शाळेंतील एक शिक्षक डॉ. आठवले यांचेमार्फत करण्यांत आली होती. त्यावरून विद्यार्थ्यांची आरोग्यविषयक स्थिति बरीच चांगल्या प्रकारें समजून आली. तथापि, तो उपक्रम पुढें खंडित झाला. सांप्रत डॉ. जोशी, डॉ. नातू, डॉ. साने वगैरेंच्या साह्यानें तो पुन्हा सुरू झाला आहे व त्याचा उत्तम उपयोग होईल अशी आशा आहे.


विद्यार्थ्यांची सामुदायिक प्रार्थनाहि इंग्रजी शाखेकडे चालू करण्यांत आली. आळीपाळीनें वर्ग बोलावून विद्यार्थ्यांकडून 'भारत हमारा देश है' हें सुप्रसिद्ध पद म्हणवून घेण्यांत येत असे. याचाहि सुपरिणाम दिसून आल्याशिवाय राहिला नाहीं.

विद्यार्थ्यांस स्वतंत्रपणें आपल्या विद्यार्थि-जीवनांतील प्रश्नांचा विचार करतां यावा व थोडाफार व्यवहारहि करतां यावा, अशा हेतूनें शाळेमध्यें विद्यार्थ्यांनीं निवडलेल्या एका प्रातिनिधि-सभेस 'स्वराज्य सभा' अथवा 'Boys' Republic' असें नांव देऊन उपक्रम करण्यांत आला. तो जरी व्हावा तितका यशस्वी झाला नाहीं, तरी याचें रहस्य विद्यार्थी व शिक्षक अधिकाधिक ध्यानांत घेतील तर त्याचें महत्त्व त्यांना सहज पटेल. विद्यार्थ्यांतील पुढाऱ्यांची निवड त्यांना करतां यावी, गुणांची पारख करतां यावी, दोषांचें माप घेतां यावें, आपलीं कामें आपल्या गुरुवर्याच्या देखरेखीखालीं पण स्वतःच करतां यावींत असे कितीतरी हेतु या उपक्रमाच्या मुळाशीं आहेत. आज नाहीं तरी कालांतरानें ते सफल होतील अशी आपण आशा करूं या.

विद्यार्थ्यांचें संमेलन हा अशापैकीं एक प्रसंग आहे कीं, ज्या वेळीं विद्यार्थ्यांस अनेक प्रकारचीं कामें स्वतःच करावयास सांपडून पुष्कळ प्रकारचे उपयुक्त अनुभव घेण्याची संधि मिळते. एवढ्या मोठ्या शाळेचीं संमेलनें संख्येच्या दृष्टीनें अनावर होतात; परंतु तीं शिस्तीनें पार पाडण्यांतच खरें कौशल्य आहे. हे संमेलनाचे प्रसंगहि बहुधा सालोसाल येत असतात. याशिवाय आपापले वर्ग आपापलीं छोटीं संमेलनें भरवितात. तींहि परिचयाच्या दृढीकरणास एका प्रकारें अधिकच फायदेशीर होतात. सुटसुटीतपणाचे सर्व फायदे अशा संमेलनांत हटकून घेतां येतात. हीं वर्गसंमेलनें या शाळेचे विद्यार्थीहि अत्यंत उत्साहानें भरवीत असतात.

या संमेलनाचे प्रसंगांतून नाट्यप्रवेश किंवा नाटकें करून दाखविण्याची चाल आहे. या कामीं संस्थेचे माजी विद्यार्थी व महाराष्ट्रांतील प्रसिद्ध किर्लोस्कर संगीत मंडळींतील श्री. शंकरराव मुजुमदारांचे चिरंजीव श्री. बाळासाहेब मुजुमदार व सुप्रसिद्ध नट व नाटककार रा. ज्यं. सी. कारखाननीस यांची संस्थेस वेळोवेळीं मदत झाली आहे, हें येथें नमूद करणें अवश्य आहे.

तसेंच संमेलनादि प्रसंगीं उपयोगी पडावें म्हणून आणि वारंवार अशा कार्यासाठीं हुकुमी स्थळ आपल्या हातीं असावें म्हणून शाळेच्या चौकांत एक कच्ची



१९२७ सालचे संमेलनाध्यक्ष श्री. म. दा. भट, आय्. सी. एस्., बक्षिसें वाटीत आहेत.
टेबलापलीकडे उभे–श्री. भट, अध्यक्ष; प्रो. पोतदार (सुष.); शिवाय रा. रा. गं. तेलंग; श्री. बि. ग. आपटे.

शाळेंतील विद्यार्थ्यांची वैद्यकीय तपासणी करण्यासंबंधानें कांहीं व्यवस्था शाळेंतील एक शिक्षक डॉ. आठवले यांचेमार्फत करण्यांत आली होती. त्यावरून विद्यार्थ्यांची आरोग्यविषयक स्थिति बरीच चांगल्या प्रकारें समजून आली. तथापि, तो उपक्रम पुढें खंडित झाला. सांप्रत डॉ. जोशी, डॉ. नातू, डॉ. साने वैगेरेंच्या साह्यानें तो पुन्हा सुरू झाला आहे व त्याचा उत्तम उपयोग होईल अशी आशा आहे.

विद्यार्थ्यांची सामुदायिक प्रार्थनाहि इंग्रजी शाखेकडे चालू करण्यांत आली. आळीपाळीनें वर्ग बोलावून विद्यार्थ्यांकडून 'भारत हमारा देश है' हें सुप्रसिद्ध पद म्हणवून घेण्यांत येत असे. याचाहि सुपरिणाम दिसून आल्याशिवाय राहिला नाहीं.

विद्यार्थ्यांस स्वतंत्रपणें आपल्या विद्यार्थि-जीवनांतील प्रश्नांचा विचार करतां यावा व थोडाफार व्यवहारहि करतां यावा, अशा हेतूनें शाळेमध्यें विद्यार्थ्यांनीं निवडलेल्या एका प्रातिनिधि-सभेस 'स्वराज्य सभा' अथवा 'Boys' Republic' असें नांव देऊन उपक्रम करण्यांत आला. तो जरी व्हावा तितका यशस्वी झाला नाहीं, तरी याचें रहस्य विद्यार्थी व शिक्षक अधिकाधिक ध्यानांत घेतील तर त्याचें महत्त्व त्यांना सहज पटेल. विद्यार्थ्यांतील पुढाऱ्यांची निवड त्यांना करतां यावी, गुणांची पारख करतां यावी, दोषांचें माप घेतां यावें, आपलीं कामें आपल्या गुरुवर्यांच्या देखरेखीखालीं पण स्वतःच करतां यावींत असे कितीतरी हेतु या उपक्रमाच्या मुळाशीं आहेत. आज नाहीं तरी कालांतरानें ते सफल होतील अशी आपण आशा करूं या.

विद्यार्थ्यांचें संमेलन हा अशापैकीं एक प्रसंग आहे कीं, ज्या वेळीं विद्यार्थ्यांस अनेक प्रकारचीं कामें स्वतःच करावयास सांपडून पुष्कळ प्रकारचे उपयुक्त अनुभव घेण्याची संधि मिळते. एवढ्या मोठ्या शाळेचीं संमेलनें संख्येच्या दृष्टीनें अनावर होतात; परंतु तीं शिस्तीनें पार पाडण्यांतच खरें कौशल्य आहे. हे संमेलनाचे प्रसंगहि बहुधा सालोसाल येत असतात. याशिवाय आपापले वर्ग आपापलीं छोटीं संमेलनें भरवितात. तींहि परिचयाच्या दृढीकरणास एका प्रकारें अधिकच फायदेशीर होतात. सुटसुटीतपणाचे सर्व फायदे अशा संमेलनांत हटकून घेतां येतात. हीं वर्ग-संमेलनें या शाळेचे विद्यार्थीहि अत्यंत उत्साहानें भरवीत असतात.

या संमेलनाचे प्रसंगांतून नाट्यप्रवेश किंवा नाटकें करून दाखविण्याची चाल आहे. या कामीं संस्थेचे माजी विद्यार्थी व महाराष्ट्रांतील प्रसिद्ध किर्लोस्कर संगीत मंडळींतील श्री. शंकरराव मुजुमदारांचे चिरंजीव श्री. बाळासाहेब मुजुमदार व सुप्रसिद्ध नट व नाटककार रा. ज्यं. सी. कारखाननीस यांची संस्थेस वेळोवेळीं मदत झाली आहे, हें येथें नमूद करणें अवश्य आहे.

तसेंच संमेलनादि प्रसंगीं उपयोगी पडावें म्हणून आणि वारंवार अशा कार्यासाठीं हुकुमी स्थळ आपल्या हातीं असावें म्हणून शाळेच्या चौकांत एक कच्ची

रंगशाळा सुमारें एक हजार रुपये खर्चून उभारण्यांत आली. यामुळें गांवांतील रंग-भूमीवर अवलंबून राहण्याचें आणि तेथील अनिष्ट वातावरणापासून भय बाळगण्याचें आतां संस्थेस कारण राहिलें नाहीं.

कित्येक वर्षेपर्यंत पास्ट स्टूडंट्स् युनियन किंवा माजी विद्यार्थि-संघ या नांवाची अत्यंत उपयुक्त संस्था फार चांगलें काम करीत होती. विद्यार्थ्यांचे सामने भरविणें, जादा वर्ग घेणें, पुस्तकांचें दुकान सहकारी तत्त्वावर चालविणें वगैरे वरींच उपयुक्त कामें हा संघ करीत असे.

विजयादशमीचे मुमुहूर्तावर विद्यार्थ्यांची एक मोठी मिरवणूक काढण्याचा उपक्रम याच सुमारास सुरू झाला. त्याचप्रमाणें विष्णुशास्त्रीदिन (ता. १७ मार्च), शिवजन्मोत्सव (अलीकडे फाल्गुन वद्य ३), रामदास नवमी, गीताजयन्ती, हनुमज्जयन्ती वगैरे कित्येक उत्सव शाळेमार्फत होत असतात. निर्दीप व सदीप अशीं अनेक व्याख्यानेंहि होत असतात. विद्यार्थ्यांच्या सभा व हस्तलिखित मासिकेंहि चालतात. अशा अनेकविध लहानमोठ्या गोष्टींचा उल्लेख करतां येण्यासारखा आहे. परंतु विस्तारभयास्तव करतां येत नाहीं.

शाळेमध्यें अनेक सदगृहस्थांनीं मुलांचे उत्तेजनार्थ बक्षिसें ठेवलेलीं आहेत व छात्रवृत्त्या ठेवल्या आहेत. या सर्व सद्गृहस्थांनीं अनुकरणीय असें उदाहरण घालून दिलें असून त्याचा विद्यार्थी व शिक्षक यांना फार फायदा झालेला आहे.

या काळांत मुंबईचे गव्हर्नर सर लेस्ली विल्सन यांनीं शाळेला भेट देऊन जोमदार शाळा (live school) म्हणून तिची प्रशंसा केली. इतरहि अनेक बाहेरील सदगृहस्थ शाळा पाहण्यास येत असतात. वार्षिक वासंतिक रसपान हा एक शाळेच्या सर्व हितचिंतकांना एकत्र जमण्याचा अत्यंत रमणीय असा प्रसंग दरसाल घडवून आणण्यांत येतो. हा सुरू झाल्याला निदान ४० वर्षें झालीं असतील. आतां जरी हा प्रकार पुण्यांत सर्वसाधारण झाला असला, तथापि विद्यार्थी व शिक्षक यांनीं एकत्र बसन रसपान करण्याचा हा प्रेमळ प्रसंग रूढ करण्याचें श्रेय याच शाळेला आहे. हा वार्षिक रसपानाचा प्रसंग म्हणजे नू. म. विद्यालयाचा एक संस्मरणीय विशेष होय. हे प्रसंग खंड न पडतां चालू आहेत.

मॅट्रिक्युलेशन परीक्षेस दोनशेंहून जास्त विद्यार्थी पाठविणाऱ्या मानास पात्र अशा न्यू इंग्लिश स्कूल व नू. म. विद्यालय या दोनच संस्था इलाख्यांत आहेत. सालोसाल ही संख्या वाढत आहे. तथापि न. म. विद्यालयाचे निकाल पाहिले असतां संख्येप्रमाणेंच गुणांकडे, किंबहुना संख्येपेक्षा




मुंबईचे गव्हर्नरांची भेट

ता. २३ ऑगस्ट १९२९

मो. द. वा. पोतदार (सुप.); नामदार सर फ्रेड्रिक साइक्स, गव्हर्नर.

बालोद्यान प्रेस, पुणे.



शि. प्र. मं. च हारमाइ देवकरण हायस्कूल, सोलापूर–नवा इमारत–कमानीचा देखावा.

१ रां. प्रभाकर बाबूराव आळंदकर, ठेकेदार, २ शेठ द्विगकाका–हरिभाई देवकरण, ३ दि. ब. का. रा. गोडबोले, ४ नामदार सर फ्रेडरिक, साइक्स, ५ रा. ब. वि. वि मुळ्ये, ६ रा. ब साठ्ये, एजिनियर.

भाग २–मि. टॉटन्, कलेक्टर, ३ मि गुल्ड्, ४ ए डी. सी., ५ प्रो. गो. प. पटवर्धन, सुपरिंटेंडेंट.

गुणांकडे लक्ष देण्याची चालक अधिक काळजी घेतात असें दिसून येईल. या पराक्षस आमच्या विद्यालयांतून विद्यार्थी पाठविण्याचा उपक्रम हैद्राबाद संस्थानांतील अत्यंत प्रमुख अशी जी विवेकवर्धिनी संस्था तिनें कित्येक वर्षे चालविला होता. सुमारें बारा वर्षे या संस्थेंतील विद्यार्थी आमच्यामार्फत परीक्षेस बसत होते आणि त्यांनीं यशहि चांगल्या प्रकारचें मिळविलें हें येथें नमूद करण्यास आम्हांस संतोष वाटतो. उभय संस्थांमधील हा संबंध अशा प्रकारें फार दृढ असा जडला गेला याबद्दल या विद्यालयास केव्हांहि अभिमानच वाटेल. त्याचप्रमाणें मागासलेले वर्ग व विशेषत: अस्पृश्य वर्ग यांना फीची माफी वगैरे अनेक प्रकारच्या सवलती संस्थेनें निरंतर दिल्या आहेत. तसेंच पुणें अनाथ विद्यार्थिगृह या अत्युपयुक्त संस्थेंतील विद्यार्थी शक्यतोंवर या विद्यालयांत शिकण्यास आले असतां विद्यालयानें बहुधा मोफत शिकविले आहेत. डॉ. परुळेकर, रा. खैर वगैरे अनाथगृहीय विद्यार्थी आमच्याच विद्यालयाचे माजी विद्यार्थी होत हें सांगण्यास फार संतोष वाटतो.

प्रो. सबनीस यांचे नंतर प्रो. दत्तो वामन पोतदार यांनीं नू. म. विद्यालयाचा कारभार सहा वर्षेपर्यंत पाहून गेल्या एप्रिलपासून सूत्रें प्रो. म. शं. गोडबोले यांचे हवालीं केलीं आहेत. या सहा वर्षांत मुख्यत: आरंभींच कॉलेजची नवी इमारत झाल्यामुळें व गांवांतील शाळेच्या इमारती कॉलेजकडे दिल्यामुळें सर्व मांडणी पुन्हा नवी करावी लागली. संस्थेचा आजवरचा वाढता लौकिक लक्षांत घेऊन चालकांनीं ही मांडणी केली आणि कॉलेजची नवी इमारत होईपावेतों जागेच्या संकोचामुळें ज्या अनेक कल्पना व सुधारणा असिद्ध ठेवाव्या लागल्या होत्या, तिकडेहि या अवकाशांत चालकांनीं लक्ष पुरविलें. गेलीं कित्येक वर्षे शिक्षकांना बसण्यास आरामशीर व हवाशीर अशी जागा नव्हती. ग्रंथालय एका अंधाऱ्या जागीं ठेवावें लागलें होतें व खुद्द व्यवस्थापकासहि बसण्यास सोइस्कर नव्हतें. या सर्व अडचणी दूर करण्याचे हेतूनें नवी मांडणी करण्यांत आली. विस्तृत व हवाशीर अशी शिक्षकांची आरामशाळा, मुलांचें व शिक्षकांचें ग्रंथालय, फराळगृह वगैरेंची जोड देण्यांत आली. ग्रंथसंग्रह बराच वाढविण्यांत आला. कॉलेजच्या जुन्या इमारती जोडणारा एक मोठा लोखंडी पूल बांधण्यांत आला आणि मुलांना चित्रदीप पाहतां यावे म्हणून सभागृह तदनुकूल करण्याविषयीं सुमारें १०००।१५०० रुपये खर्च करण्यांत आला.

मागील उपक्रम याहि काळांत यथासंभव चालू राहिले. कित्येक नवीन उपक्रमांची जोड झाली. मॅट्रिक्युलेशनला जाणाऱ्या मुलांची संख्या वाढत चालली. परीक्षेंतील यशाचें मान शाळेच्या लौकिकाच्या दृष्टीनें अनुकूलतेकडे झुकतेंच राहिलें. विवेक-वर्धिनीचे जोडीला निजाम इलाख्यांतील हिप्परगें येथील शाळा विद्यार्थी आणूं लागली. या शाळेची तयारीहि उत्तम दिसून आली. शक्यतोंवर मराठींतून शिक्षण देण्याचा जो उपक्रम मागील नऊ वर्षांत झाला होता, तोच पुढें चालविण्यांत

आला. मराठी व्यवहाराचें महत्त्व वाढविण्यांत आलें, सरकारी अधिकाऱ्यांची अनुकूलता योग्य प्रकारें लाभली व खुद्द नामदारसाहेब सर फ्रेडरिक साइक्स यांनीं आपण होऊन शाळेला भेट देऊन, चालकांसमवेत चहापान करून एकंदर कार्याविषयीं आपल्या मनांतील आदर व संतोष हीं व्यक्त केलीं.


या शाळेंतील ड्रॉइंगमास्तर रा. रानडे यांनीं या रंगशाळेकरितां रंगविलेल्या पडद्यांचा संचहि शाळेजवळ या काळांत तयार झाला. माजी विद्यार्थ्यांच्या मित्रमंडळ प्रभृति संस्था यांनीं शाळेशीं संबंध कायम ठेवला व श्री. डी. बी. अभ्यंकर प्रभृति मंडळींनीं शाळेंत श्रीगणेशोत्सव सुरू करून विद्यार्थ्यांच्या उत्साह वाढविला.

शिक्षकांचें सहकार्य

शिक्षक म्हणजे शाळेचें मुख्य बळ होय. शाळेच्या लौकिकाचे व यशाचे निम्मे भागीदार चालक असले, तरी निम्मे भागीदार शिक्षक असतात असें म्हणावयास चिंता नाहीं. या संस्थेची कळकळीनें सेवा करणारे असे पुष्कळ हुषार शिक्षक तिला लाभलें हें तिचें भाग्य होय आणि जोंवर अशा शिक्षकांचा पुरवठा संस्थेस होत राहीला तोंवर संस्थेला आपल्या ऊर्जितावियर्यी चिंता करण्याचा प्रसंग कधींच येणार नाहीं.


समारोप

पन्नास वर्षें महाराष्ट्राची सेवा ज्या विद्यालयानें इमानेंइतबारें बजावली आहे, त्याचा हा जो वर वृत्तांत सादर केला आहे तो या विद्यालयाच्या विद्यमान व माजी विद्यार्थ्यांनाच अभिमानास्पद वाटेल असें नव्हे, तर यावत् महाराष्ट्रास त्याचें कौतुक वाटेल याबद्दल आम्हांस बिलकुल संशय नाहीं. पुष्कळ अधिक कामगिरी त्यानें करावयास हवी होती असें जरी म्हणतां येईल, तथापि आपला खरा धर्म केल्या कामाचा मुशाहिरा ज्याचा त्यास देणें हाच होय. अवघ्या ६० मुलांपासून आरंभ करीत त्याच्या तीसपट विद्यार्थी शिकवण्याची संधि ज्याला मिळाली आहे, अवघ्या शंभरसवाशें रुपयांच्या मासिक उत्पन्नावर आरंभ करून आज जें तिचें उत्पन्न लाखाच्या घरांत गेलें आहे, तीन भागीदारांचे ठिकाणीं जेथें आज सतरा भागीदार झाले आहेत, शून्य सरकारी मदतीचे मागें जेथें चोवीसशेंचा आंकडा हल्लीं पडूं लागला आहे, जेथें शुद्ध मराठी शिक्षणाच्या विद्यालयाचा अभिमान धरून, त्याची वडीलकी कायम ठेवून, पुढील हायस्कूलचे व कॉलेजचे मजले पायाशुद्ध रचले आहेत तेथें पन्नास वर्षांनीं सुद्धां वार्धक्याची जीर्णावस्था प्राप्त झाल्याचें भय न उद्भवतां अखंड वर्धमान असें तारुण्यच बहरलेलें दिसेल असें म्हणण्यास काय प्रत्यवाय आहे !




नूतन मराठी विद्यालय, मराठी शाळा, उत्तर पाखे.

बालोद्यान प्रेस, पुणे.




नूतन मराठी विद्यालय, मराठी शाळा, पश्चिम पाखे

बालोद्यान प्रेस, पुणें.



नूतन मराठी विद्यालय
सभागृह.

बालोद्यान प्रेस, पुणें.



नूतन मराठी विद्यालय, हायस्कूल.

बालोद्यान प्रेस, पुणें.

पांचवा खंड

परिशिष्टें

[१]

नूतन मराठी विद्यालयाच्या गेल्या पन्नास वर्षांतील ठळक गोष्टींची तारीखवार जंत्री

१–१–१८८३	नूतन मराठी विद्यालयाची मोरोबादादा बाडयांत स्थापना.
ऑगस्ट १८८३	(१) शाळेचा बक्षिससमारंभ. रावबहादूर गोपाळराव देशमुख, लोकहितवादी, यांच्या हस्तें.
	(२) मराठी शाळेला इंग्रजी शिक्षणाची जोड.
२४–८–१८८३	नामदार गव्हर्नरसाहेबांची शाळेस भेट.
१–४–१८८६	पुणें म्युनिसिपॅलिटीची दरमहा रु. बीसप्रमाणें शाळेस मदत.
५–२–१८८८	मराठी शिक्षण-प्रसारक मंडळीची स्थापना.
१८९४	इंग्रजी सहाव्या इयत्तेची जोड.
७–७–१८९५	रा. विनायक गणेश आपटे, मराठी शिक्षण-प्रसारक मंडळीचे तहाहयात सभासद झाले.
३–८–१८९५	रा. रा. रामचंद्र भिकाजी कानिटकर (कायम शिक्षक) यांचा मृत्यु.
३०–९–१८९५	रा. विनायक गणेश आपटे, नूतन मराठी विद्यालय हायस्कूलचे सुपरिंटेंडेंट झाले.
३०–९–१८९५	रा. रा. नानासाहेब मावळणकर, सुपरिंटेंडेंट, नूतन मराठी विद्यालय, यांना शाळेच्या कामांतून मुक्त करण्यांत आलें.
नोव्हेंबर १८९५	इंग्रजी सातवी इयत्ता जोडण्याची परवानगी मिळाली.
नोव्हेंबर १८९६	हायस्कूलमधून मॅट्रिक्युलेशनच्या परीक्षेस अकरा विद्यार्थी पाठविले; त्यांपैकीं अकराहि पास होऊन डॉ. वि. स. घाटे हे युनिव्हर्सिटींत पहिले येऊन त्यांना पहिली जगन्नाथ शंकरशेट संस्कृत शिष्यवृत्ति मिळाली.

१८९८ रा. महादेव विष्णु भिडे (हल्लीं हायकोर्ट जज, लाहोर) मॅट्रिकमध्यें दुसरे आले.

१९०० रा. गोविंद वामन कोकजे (हल्लीं इंजिनियर, विजापूर) मॅट्रिकमध्यें सातवे आले.

११-१०-१९०१ नामदार नॉर्थकोट गव्हर्नरसाहेबांची भेट.

१-१०-१९०२ सरकारी मदत मिळविण्याकरितां आंग्लोव्हर्न्याक्युलर शाळा रजिस्टरं केली.

१९०३ आट्यापाट्यांचें बक्षिस शाळेस मिळालें.

२६-८-१९०३ वार्षिक बक्षिससमारंभ, लॉर्ड नार्थकोट, मुंबईचे गव्हर्नर, यांच्या हस्तें.

डिसेंबर १९०४ रा. दामुअण्णा कुलकर्णी यांचा मृत्यु.

२१-९-१९०४ नामदार लॉर्ड लॅमिंग्टन, मुंबईचे गव्हर्नर, यांच्या हस्तें बक्षिस-समारंभ.

१९०५ शाळेच्या इमारतीस आग लागून महत्त्वाचे कागदपत्र जळाले.


१९०५ रा. कृष्ण विष्णु जोशी (मध्यंतरीं झेविअर कॉलेजचे प्रोफेसर) मॅट्रिकमध्यें तिसरे आले.
याच वर्षी रा. यशवंत अनंत गोडबोले (हल्लीं बिहार प्रांतांत सरकारचे सेक्रेटरी) चवथे आले.

ऑगस्ट १९०५ (नारायण गंगाधर) लागू मास्तर यांचा मृत्यू.

१९०५ रा. केसकर मास्तर यांच्या प्रोत्साहनानें नू. म. विद्यालयाचें पहिलें सम्मेलन, रा. ब. (आतांचे दि. ब.) गोडबोले यांच्या अध्यक्षतेखालीं झालें.

१-१-१९०६ रा. विश्वनाथ अनंत केसकर, बी. ए., व रा. वासुदेव गो. आपटे, बी. ए., हे तहाहयात सभासद झाले.

८-११-१९०६ नू. म. विद्यालयाकरितां रा. खाजगीवाले यांची जागा रा. मार्तंड त्रिंबक व जनार्दन त्रिंबक गद्रे यांच्याकडून खरेदी घेतली.




न्या. मू. श्री. महादेव विष्णु भिडे, आय्. सी. एस्.
नू. म. वि. चे माजी विद्यार्थी
संस्थेचे आश्रयदाते व आपटे बक्षिसाचे स्थापक.



श्री. भालचंद्र कृष्ण गोखले, आय्. सी. एस्.
नूतन मराठी विद्यालयांतून मॅट्रिक, सन १९०६
संस्थेचे आश्रयदाते.

प्रो. दिनकर बळवंत देवधर



न. म. वि. चे माजी विद्यार्थी, सुप्रसिद्ध क्रिकेटपटु व क्रीडापटु
सर परशुरामभाऊ कॉलेजचे संस्कृतचे अध्यापक.

बालोद्यान प्रेस, पुणे.

२३-२-१९०८ दामोदर सदाशिव ऊर्फ मामा करंबेळकर, तहाहयात सभासद, यांचा मृत्यु.

१-७-१९०८ रा. रामेश्वर गंगाधर तेलंग, बी. ए., हे तहाहयात सभासद झाले.

१-६-१९०९ रा. कृ. गो. लोहोकरे, बी. ए., हे तहाहयात सभासद झाले.

१९०९ ॲथ्लेटिक स्पोर्ट्स् चॅलेंज शील्ड मिळविलें.

१९१० नू. म. विद्यालयाकरितां रा. ओझे यांची जागा घेतली. डायरेक्ट मेथड सुरू झाली.

रा. गोविंद पंढरीनाथ शिदोरे, बी. ए., तहाहयात सभासद झाले.

ॲथलेटिक स्पोर्ट्स् चॅलेंज शील्ड मिळविलें.

१९११ (१) ॲथलेटिक स्पोर्ट्स् चॅलेंज शील्ड मिळविलें.
(२) टग ऑफ वॉर शील्ड मिळविलें.

१-१-१९११ रा. रामचंद्र जनार्दन गोखले, रा. लक्ष्मण गणेशशास्त्री लेले, रा. गोपाळ सदाशिव गोडबोले, तहाहयात सभासद झाले.

२९-३-१९११ रा. रा. वासुदेव गोविंद आपटे यांचा राजीनामा.

१९११ रा. सखाराम काशिनाथ आगाशे (हल्लीं शिक्षक, ठाणें हायस्कूल) मॅट्रिकमध्यें दुसरे आले.

१९१२ रा. मधुसूदन दामोदर भट (हल्लीं ठाणें जिल्ह्याचे कलेक्टर) मॅट्रिकमध्यें पांचवे आले.

१९१२ टग् ऑफ् वॉर शील्ड मिळविलें.

१९१३ (१) टग् ऑफ् वॉर शील्ड मिळविलें
(२) आट्यापाट्यांचें शील्ड मिळविलें.

१४-४-१९१३ विश्वनाथ अनंत केसकर यांचा राजीनामा.

१४-४-१९१३ डॉ. कृष्णाजी गोविंद लोहोकरे यांचा राजीनामा.

२७–६–१९१३ नामदार मि. क्लॉड हिल, सी. आय्. ई., यांच्या हस्तें व्हर्नाक्युलर स्कूलची कोनशिला बसविण्याचा समारंभ व बक्षिससमारंभ.

९–६–१९१४ नू. म. विद्यालय मराठी शाळेकरितां जागा सरदार रायरीकर यांच्याकडून खरेदी घेतली.

१–७–१९१४ मराठी-शिक्षण-प्रसारक-मंडळी या नांवाचें "शिक्षण-प्रसारकमंडळी" या नांवांत रूपांतर.

१–१–१९१५ दत्तात्रेय रामचंद्र घारपुरे, एम्. ए., बी. एस्सी., यांना तहाहयात सभासद केलें.

१८–३–१९१५ नू. म. विद्यालयाकरितां रा. निसुरे यांची जागा घेतली.

२६–३–१९१५ राजेसाहेब विक्रमशहा पतंगशहा यांच्याकडून इंग्रजी शाळेकरितां जागेची पट्टी ७०′×११′ बक्षिस.

१–४–१९१५ नू. म. वि. इंग्रजी शाळेकरितां रा. स. ना. आठवले यांची जागा खरेदी घेतली.

२–६–१९१५ रा. रामचंद्र जनार्दन गोखले, तहाहयात सभासद, यांचा मृत्यु.

६–६–१९१५ शाळा स्वतःच्या मालकीच्या नवीन इमारतींत भरूं लागली.

२५–६–१९१५ नूतन मराठी विद्यालय हायस्कूलचा उद्घाटन समारंभ नामदार लॉर्ड विलिंग्न्ड, मुंबईचे गव्हर्नर, यांच्या हस्तें.

१–१०–१९१५ रा. दत्तो वामन पोतदार, बी. ए., व रा. त्र्यंबक भिकाजी हर्डीकर, बी. ए., हे तहाहयात सभासद झाले.

१९१६ रा. नारायण हरि फडताळे, मॅट्रिकमध्यें दहावे आले.

१–४–१९१६ रा. द. रा. घारपुरे हे इंग्रजी शाळेचे सुपरिंटेंडेंट झाले.

१–४–१९१६ रा. दत्तो वामन पोतदार, मराठी शाळेचे सुपरिंटेंडेंट झाले.

१४–६–१९१६ न्यू पूना कॉलेजचा नामदार लॉर्ड विलिंग्डन् यांच्या हस्तें उद्घाटन समारंभ.

१–९–१९१६ श्री. नगीनदास माणेकलाल शहा, बी. ए., व रा. राजाराम परशुराम सवनीस, बी. ए. (कॅंब्रिज), हे तहाहयात सभासद झाले.

१९१६ सीनिअर क्रिकेट शील्ड मिळविलें.

१९१६ डेक्कन जिमखाना खोखो कप मिळाला (लहान विद्यार्थ्यांकरितां). एन. जी. बैद्य यांस ॲथलेटिक चँपियनशिप मिळाली.

१-४-१९१७ रा. रा. प. सबनीस हे इंग्रजी शाळेचे सुपरिंटेंडेंट झाले.

१-५-१९१७ रा. नारायण सीताराम फडके, एम्. ए., रा. दिनकर बळवंत देवघर, एम्. ए., रा. प्रल्हाद गोविंद पाध्ये, एम्. ए., हे तहाहयात सभासद झाले.

३१-१-१९१७ रा. हरि विठ्ठल तुळपुळे, बी. ए., एल्एल्. बी., रा. रघुनाथ दामोदर करमरकर, एम्. ए., रा. गोविंद परशुराम पटवर्धन, एम्. ए., यांना तहाहयात सभासद केलें.

१९१७ सीनिअर क्रिकेट शील्ड व ज्यूनियर क्रिकेट कप् हीं मिळविलीं. डेक्कन जिमखाना खोखो कप (१६ वर्षांच्या आंतील) मिळविला.

१-४-१९१८ हरिभाई देवकरण हायस्कूलची सोलापूर येथें स्थापना.

२०-६-१९१८ न्यू पूना कॉलेजमध्यें बी. ए. क्लास उघडण्याचा समारंभ नामदार सर इब्राहिम रहिमतुल्ला यांच्या हस्तें.

२१-७-१९१९ नूतन मराठी विद्यालयाची मराठी शाळा उघडण्याचा समारंभ नामदार सर जॉर्ज लॉईड, मुंबईचे गव्हर्नर, यांच्या हस्तें.

१-९-१९१९ रा. रामचंद्र गोविंद देव हे सेवानिवृत्त झाले.

१९२० रा. शरच्चंद्र अनंत गोपूजकर मॅट्रिकमध्यें दुसरे आले.

१९-७-१९२० विद्यार्थिभांडाराची स्थापना झाली.

१-११-१९२० रा. शंकर वामन दांडेकर, एम्. ए., रा. नारायण गणेश नारळकर, एम्. ए., एल्. टी., यांना तहाहयात सभासद केलें.

१९२० नूतन मराठी विद्यालयांत स्काउटिंग सुरू झालें.

१-१२-१९२० प्रो. ना. सी. फडके व प्रो. द. रा. घारपुरे यांचे राजीनामे.

२०- १-१९२२ नू. म. विद्यालय मराठी शाळेकरितां सरदार दादासाहेब नातू व रा. नानासाहेब पंडित मोतीवाले यांची जागा खरेदी केली.

१४–२–१९२२ रा. कृष्णांजी बल्लाळ डोंगरे, तहाहयात सभासद, यांचा मृत्यु.

१–६–१९२२ रा. वासुदेव पुरुषोत्तम पटवर्धन, एम्. ए., हे तहाहयात सभासद झाले.

१–६–१९२२ प्रि. विनायक गणेश आपटे सेवानिवृत्त झाले.

११–७–१९२२ गु. विनायक गणेश आपटे यांस माजी व विद्यमान विद्यार्थ्यांनीं मानपत्र व थैली हीं अर्पण केलीं.

१९२३ रा. विष्णु वामन काळे (हल्लीं इंजिनियर, सिंध) मॅट्रिकमध्यें पहिले आले.

याच वर्षी रा. गोपाळ लक्ष्मण पोफळे (हल्लीं प्रोफेसर, सर परशुरामभाऊ कॉलेज) दहावे आले.

१–२–१९२४ रा. महेश्वर शंकर गोडबोले, एम्. ए., हे तहाहयात सभासद झाले.

१९२४ रा. विनायक सदाशिव वझे (हल्लीं वकील, पुणें) मॅट्रिकमध्यें पांचवे आले.

१–४–१९२५ रा. गोपाळ सदाशिव गोडबोले हे मराठी शाळेचे सुपरिंटेंडेंट झाले.

याच वर्षी रा. स्वरूपराव खंडेराव दरेकर हे सहावे आले.

१–४–१९२६ रा. दत्तो वामन पोतदार हे नू. म. वि. इंग्रजी शाळेचे सुपरिंटेंडेंट झाले.

१९२५–२६ नामदार सर लेस्ली विल्सन् यांची नू. म. विद्यालय हायस्कूलला भेट.

१९२७ रा. उमाकांत शांताराम मोकाशी मॅट्रिकमध्यें सातवे आले.

१–६–१९२७ रा. विनायक केशव भागवत, एम्. ए., पीएच्. डी., हे तहाहयात सभासद झाले.

१–३–१९२८ रा. गणेश गोपाळ पाळधीकर, एम्. एससी., हे तहाहयात सभासद झाले.

१–३–१९२८ रा. बळवंत वासुदेव भिडे, एम्. एस्सी., हे तहाहयात सभासद झाले.

१–३–१९२८ रा. श्रीपाद दत्तात्रय भावे, बी. ए., एम्. एस्सी., हे तहाहयात सभासद झाले.

१९२९ रा. भालचंद्र गोपाळ बापट मॅट्रिकमध्ये तिसरे आले.

१९३० आत्माराम रघुनाथ कुर्लेकर मॅट्रिकमध्ये दुसरे आले.

१९३१ रा. मधुसूदन गोपाळ ठकार मॅट्रिकमध्ये सहावे आले.

१–४–१९३२ रा. त्र्यंबक भिकाजी हर्डीकर हे मराठी शाळेचे सुपरिंटेंडेंट झाले.

१–४–१९३२ रा. महेश्वर शंकर गोडबोले हे इंग्रजी शाळेचे सुपरिंटेंडेंट झाले.

[२]

लेखक व संपादक

१. राजाराम विनायक ओतूरकर, एम्. ए.
२. गजानन नारायण कानिटकर, बी. ए.
३. राव रामचंद्र किनीकर, बी. ए., सोलापूर
४. विष्णु घोंडो कुलकर्णी, ज्ञानप्रकाश
५. श्रीकृष्ण नीलकंठ चाफेकर, एम्. ए.
६. नारायण भिकाजी परुळेकर, पीएच्. डी., सकाळ
७. दत्तो वामन पोतदार, बी. ए.
८. नारायण सीताराम फडके, एम्. ए.
९. पांडुरंग नाथूजी राजभोज, संपादक, दलितबंधू
१०. कृष्णाची गणेश लिमये, बी. ए., एल्एल्. बी., ज्ञानप्रकाश
११. विनायक शंकर वैद्य, संपादक, समर्थ, सातारा
१२. कृष्णाजी शंकर शुक्ल, कवि व नाटककार

[३]

नू. म. विद्यालयाचे व्यवस्थापक

१ रा. कृष्णाजी गोविंद उकिडवे
२ रा. दामोदर सदाशिव करंबेळकर
३ रा. रामकृष्ण भिकाजी ऊर्फ दामुअण्णा कुलकर्णी
४ रा. बाळकृष्ण अप्पाजी सिनकर
५ रा. ना. स. पानसे, बी. ए., १८९१–९२
६ रा. बाळकृष्ण अप्पाजी सिनकर
७ रा. के. बा. मावळणकर, बी. ए., १८९४–९५
८ रा. विनायक गणेश आपटे, १८९५–१९१०

नू. म. विद्यालय हायस्कूलचे व्यवस्थापक

१ रा. विनायक गणेश आपटे, बी. ए., १९१०–१९१६
२ रा. दत्तात्रेय रामचंद्र घारपुरे, एम्. ए., बी. एससी., १९१६–१७
३ रा. राजाराम परशुराम सबनीस, एम्. ए. (केंब्रिज), १९१७–१९२६
४ रा. दत्तो वामन पोतदार, बी. ए., १९२६–१९३२
५ रा. महेश्वर शंकर गोडबोले, एम्. ए., बी. टी., १९३२–

नू. म. विद्यालय मराठी शाळेचे व्यवस्थापक

१ रा. रामेश्वर गंगाधर तेलंग, बी. ए., १९१०–१९११
२ रा. लक्ष्मणशास्त्री गणेशशास्त्री लेले, १९११–१९१३
३ रा. कृष्णाजी बल्लाळ डोंगरे, १९१३–१९१६
४ रा. दत्तो वामन पोतदार, बी. ए., १९१६–१९२५
५ रा. गोपाळ सदाशिव गोडबोले, १९२५–१९३२
६ रा. त्र्यंबक भिकाजी हर्डीकर, एम्. ए., १९३२–

हा कागद नेहमी दिसेल अशा ठिकाणी घरीं लावावा.

नूतन मराठी विद्यालय

पुणें पेठ बुधवार

१ भावें भजावें ईश्वरा, मग संकटां कुठला थारा!
२ उद्योगाचे घरीं, ऋद्धि सिद्धि पाणी भरी.
३ बोले गोड परी खरें, त्यासि भीति कोठें हिनुरे.
४ चांगल्याची धरावी संगती, सत्पुस्तकीं ठेवावी मति.
५ निश्चयाचें बळ, तुकाम्हणे तेंचि फळ.
६ राहिलां जरी एक जुटी, मग काय विचारतां बळकटी.
७ सत्कार्यीं ज्याचा दृढ निश्चय, त्याला कधींनये अपजय.
८ जेव्हांचें काम तेव्हांकरी, त्याची काय वर्णावी थोरी.
९ लवकर निजे लवकर उठे, नरा ज्ञान संपत्ति आरोग्य भेटे.
१० मनीं असावी नम्रता, आंगीं असावी स्वच्छता.
११ जो व्यायाम रोज करी, आरोग्य त्याला सदा वरी.
१२ आई बाप आणि गुरू, यांची अवज्ञा नका करूं.


१ आई, बाप आणि पालक यांची आज्ञा मानणें व त्यांचा मान ठेवणें हें पुण्य असून मोठें भूषण आहे.
२ सर्व संपत्तींत शरीर संपत्ती श्रेष्ठ आहे यासाठीं तिजबद्दल काळजी बाळगा.
३ संगती चांगल्या मनुष्याची धरा, संगतीवरून सर्वगोष्टी अवलंबून असतात.
४ गुरुजी पासून अगर पुस्तकांतून ज्ञान संपादन करणें हें मुख्य कर्तव्य होय.

याशाळेत उजवणीपासून ख्रिस्तेक्षउत्सवपर्यंत शिकविलें जातें.

हा कागद (आकार २२×१८) सर्व विद्यार्थ्यांस पूर्वी वार्षिक परीक्षा झाल्यानंतर वर्गावर्गीं होतांना बक्षिस मिळे.

शाळेच्या ध्येयांचा एक आदर्श.

बालोद्यान प्रेस, पुणें.



श्री. कृष्ण विष्णु जोशी
१९०५ मध्यें नूतन मराठी विद्यालयांतून मॅट्रिकमध्यें
इलाख्यांत तिसरें.




श्री. विनायक सदाशिव वझे
१९२४ मध्यें नू. म. वि. तून मॅट्रिकमध्यें
इलाख्यांत पांचवें.

बालोद्यान प्रेस, पुणें.




बॅ. प्रो. गोपाल लक्ष्मण पोफळे, बी. ए. (केंब्रिज).
नू. म. वि. तून मॅट्रिक १९२३; इलाख्यांत दहावे.
(प्रस्तुत आजीव शिक्षक, सर परशुरामभाऊ कॉलेज).



श्री. विष्णु वामन काळे बी. ई.
नू. म. वि. तून मॅट्रिक पास इ. स. १९२३; इलाख्यांत पहिले.

बालोद्यान प्रेस, पुणें.



श्री. सखाराम काशिनाथ आगाशे
नूतन मराठी विद्यालयाचे माजी विद्यार्थी
मॅट्रिकला इलाख्यांत दुसरे, सन १९११



श्री. गोविंद विठ्ठल कोकजे
१९०० मध्यें नूतन मराठी विद्यालयांतून मॅट्रिक;
इलाख्यांत तिसरे.

बालोद्यान प्रेस, पुणे.

[४]

हायस्कूलचे विद्यार्थिश्रेष्ठ

(मॅट्रिकमध्यें पहिल्या दहांत आलेले)

वर्ष	नांव		क्रम
१८९६	विनायक सखाराम घाटे	ज. शं. पहिली स्कॉलर्शिप	१
१८९८	महादेव विष्णु भिडे		२
१९००	गोविंद वामन कोकजे		७
१९०५	कृष्णाजी विष्णु जोशी		३
१९०५	यशवंत अनंत गोडबोले	ज. शं. दुसरी स्कॉलर्शिप	४
१९११	सखाराम काशिनाथ आगाशे		२
१९१२	मधुसूदन दामोदर भट		५
१९१६	नारायण हरि फडताळे		१०
१९२०	शरच्चंद्र अनंत गोपूजकर	ज. शं. पहिली स्कॉलर्शिप	२
१९२३	विष्णु वामन काळे		१
१९२३	गोपाळ लक्ष्मण पोफळे		१०
१९२४	विनायक सदाशिव बझे		५
१९२४	स्वरूपराव खंडेराव दरेकर		६
१९२७	उमाकांत शांताराम मोकाशी		७
१९२९	भालचंद्र गोपाळ बापट		३
१९३०	आत्माराम रघुनाथ कुर्लेकर	ज. शं. दुसरी स्कॉलर्शिप	२
१९३१	मधुसूदन गोपाळ ठकार		६


[५]

वेळोवेळीं शिष्यवृत्ति मिळविणारे विद्यार्थी

१९०७–१९०८	ओपन् मिडल् स्कूल	आर. व्ही. आपटे
		डी. एस्. जोशी
१९०८–१९०९	हायस्कूल	एन्. व्ही. आपटे
	ओपन् मिडल् स्कूल	एस्. डी. गोखले
		डी. व्ही. वर्तक
	क्लोझ मिडल् स्कूल	व्ही. आर. दांडेकर
१९०९–१९१०	ओपन् हायस्कूल	डी. एस्. जोशी
	ओपन् मिडल् स्कूल दुसरी	आर. व्ही. ओतुरकर
	क्लोझ् मिडल्स्कूल	डी. बी. गवंडी
१९१०–१९११	ओपन् हायस्कूल पहिली	आर. व्ही. आपटे
	ओपन् मिडल् स्कूल पहिली	एस्. एम्. कस्तुरे
	क्लोझ् मिडल् स्कूल पहिली	एन्. एच्. फडतरे
	रिझर्व्ह मिडल् स्कूल पहिली	अबदुल अझिझखान मुनशी
१९११–१९१२	क्लोझ् हायस्कूल	व्ही. आर. दांडेकर
	रिझर्व्ह	अबदुल अझिझ मुनशी
	ओपन् मिडल स्कूल	एम्. एन्. नातू
१९१२–१९१३	ओपन् हायस्कूल	एम्. एन्. नातू
	क्लोझ् हायस्कूल	एन्. एम्. फडताळे
१९१३–१९१४	ओपन् हायस्कूल	ए. आर. साने
	क्लोझ हायस्कूल	डी. बी. गवंडी
	ओपन् मिडल्	जी. डी. खरे
	रिझर्व्ह	गुलाब जेनुभाई
१९१४–१९१५	ओपन् हायस्कूल	एस्. आर. पाटणकर




श्री. मधुसूदन गोपाळ ठकार
१९३१ नूतन मराठी विद्यालयांतून मॅट्रिकमध्यें
इलाख्यांत सहावा.



श्री. आत्माराम रघुनाथ कुर्लेकर
१९३० नू. म. वि. तून मॅट्रिकमध्यें
इलाख्यांत दुसरा. दुसरी जगन्नाथ शंकरशेट
शिष्यवृत्ति मिळविली.

बालोद्यान प्रेस, पुणें.



श्री. भालचंद्र गोपाळ बापट
नू. म. वि. मधून मॅट्रिकमध्यें इलाख्यांत तिसरा,
सन १९२९




श्री. शरच्चंद्र अनंत गोपुजकर, एम. ए.
नू. म. वि. तून मॅट्रिक, सन १९२०
इलाख्यांत दुसरें; पहिली जगन्नाथ शंकरशेट
संस्कृत छात्रवृत्ति मिळविली.

बालोद्यान प्रेस, पुणें.

	ओपन् मिडल स्कूल	बी. आर. घोलप
		के. जी. पंडित
	क्लोझ् मिडल् स्कूल	सी. ए. बोरुडे
		व्ही. के. झोपे
१९१६–१९१७	ओपन् हायस्कूल	जी. डी. खरे
	बॅकवर्ड हायस्कूल	बी. आर. घोलप
१९१७–१९१८	क्लोझ् हायस्कूल	सी. ए. बोरुडे
	ओपन् मिडल् स्कूल	सी. एस्. भागवत
	क्लोझ् मिडल् स्कूल	एम्. आर. आगरवाले
१९१८–१९१९	मिडल् स्कूल	के. एन्. शिरोळे
१९१९–१९२०	हायस्कूल	बाकरे
	,,	डी. डी. कविटकर
	,,	शेख अमिन शेख रमजान
	,,	बी. एस्. सुदामे
१९२२–१९२३	,,	एच्. व्ही. चौधरी
१९२७–१९२८	,,	व्ही. आर. तळाशीकर
१९२९–१९३०	,,	दिगंबर केशव कोंडेजकर
१९३०–१९३१	,,	के. टी. हंडे
१९३१–१९३२	,,	चंद्रकांत भास्कर जोशी


[६]

आलेख



नू. म. वि. इंग्रजी शाळेंतील विद्यार्थ्यांच्या संख्येची वाढ दाखविणारा आलेख

नू. म. वि. इंग्रजी शाळेंतील मॅट्रिकमध्यें पास झालेल्या विद्यार्थ्यांची शेंकडेवारी



आडवी रेघ वर्षे व उभी रेघ शेंकडावारी दाखविते.

विद्यालयाची पासाची शेंकडेवारीची आलेखाची रेषा अखंड

युनिव्हर्सिटीच्या पासाची ,, ,, ,, तुटकी

[७]

वार्षिक वासंतिक उपदेशांची यादी

१९१२पर्यंत सभ्यता, उद्योग, आत्मसंयमन, जुन्या काळचा उपदेश, आनंद, मुलांनीं काय करावें! बालपणीं काय शिकावें! वाचन, वेळ कसा घालवावा! खेळ, विश्रांति, पहावें काय आणि तें कसें! मुलांचीं कर्तव्यें वगैरे उपदेशाचे विषय होते.

लेखकाचें नांव पुस्तकांवर घांतलेलें नाहीं. पण ते सर्व उपदेश कै. हरि नारायण आपटे यांनीं लिहिले आहेत.

१९१२	कै. ह. ना. आपटे	सावधान
१९१३	,, ,,	दुश्चितपणा
१९१४	प्रो. ल. ग. लेले	महाभारताची थोरवी
१९१५	कै. ह. ना. आपटे	सध्यां चाललेल्या युद्धाचीं कारणें
१९१६	प्रो. ल. ग. लेले	रामकथेचें रहस्य
१९१७	,,	भगवद्गीतेचा परिचय
१९१८	प्रो. ना. सी. फडके	शिक्षण
१९१९	प्रो. द. वा. पोतदार	नागरिकत्व
१९२०	प्रो. ना. ग. नारळकर	राष्ट्रकार्याची पूर्वतयारी
१९२१	प्रो. रा. प. सबनीस	वैभवशाली महाराष्ट्र
१९२२	प्रो. त्र्यं. भि. हर्डीकर	बालवीर
१९२३	रा. श्री. म. माटे	अस्पृश्यांचा प्रश्न
१९२४	प्रो. म. रा. परांजपे	व्याधिणीचें दूध
१९२५	प्रो. शं. वा. दांडेकर	सद्गुणांचा चौकडा
१९२६	प्रो. द. वा. पोतदार	भाग्यपुरुष
११२७	,, ,,	पुढें पाऊल
१९२८	प्रि. रा. प. सबनीस	थोर पुरुषांचीं चरित्रें
१९२९	प्रो. द. वा. पोतदार	परीक्षा
१९३०	,, ,,	मनाची मशागत
१९३१	,, ,,	आपल्या विद्यालयाचें साफल्य
१९३२	,, ,,	एका सकाळचे विचार किंवा दोषदर्शन

भाग दुसरा

क्रीडाविषयक

क्रीडाविषयक अहवाल

१८८३ सालीं नूतन मराठी विद्यालय स्थापन झालें. त्या काळच्या कल्पनांप्रमाणें शाळेत शिक्षण व खेळ यांचा थोडासा विरोधच होता. खेळणारा मुलगा हा त्या वेळच्या वर्गाच्या रचनेप्रमाणें शिक्षकाच्या उजव्या हाताला च असायचा व 'मर्यादेच्या' कल्पनेप्रमाणें मोठ्या माणसांच्या देखत खेळणें हें अविनयाचें लक्षण समजलें जात असे. तथापि शिक्षणविषयक कल्पनांचा जसजसा विकास होत गेला तसतशी ही परिस्थिति पालटली. शिक्षणाचें ध्येय फक्त वर्गातले धडे देणें इतकें संकुचित नसून विद्यार्थ्यांच्या सर्व स्वाभाविक शक्तींचा विकास करणें हें होय, हें तत्त्व पटूं लागलें. अर्थात् शालेय शिक्षणाची कक्षा शारीरिक स्वास्थ व बलवर्धन येथपर्यंतहि पोचूं शकतें व शारीरिक शिक्षणाची जबाबदारीसुद्धां अंशतः शाळेकडे येते ही गोष्ट नू. म. विद्यालयाचे संस्थापकांचे प्रथम पासूनच लक्षांत आली. ज्या ज्या वेळीं शाळेच्या आकांक्षा व गरजा जनतेपुढें मांडल्या त्या त्या वेळीं त्यांत त्यांनीं क्रीडांगणाची व क्रीडासाहित्याची गरज महत्त्वाची म्हणून नमूद केली आहे.

नूतन मराठी विद्यालय गरीबी पत्करलेल्या सेवकांनीं गरीबीच्या परिस्थितींत काढलें. त्यामुळें प्रारंभींचीं कांहीं वर्षें त्यांना शारीरिक शिक्षणाच्या व्यवस्थेवांचून काढावीं लागलीं; परंतु लोकाश्रयानें जशीजशी आर्थिक परिस्थिति अनुकूल होत गेली तशीतशी शारीरिक शिक्षणाच्या सोईची वाढ होत गेली. क्रीडांगणाचा व्याप वाढला व क्रीडासाहित्याचा लाभहि विद्यार्थ्यांना वाढत्या प्रमाणांत होत गेला.

प्रथम कांहीं वर्षें शाळेला स्वतःचे मालकीचें क्रीडांगण नव्हतें. मेहुणपुऱ्यांतील श्रीमंत जमखिंडीकर यांचे वाड्यांतील पटांगणांत मुलें बदाबदीचा खेळ खेळत. पुढें 'राउंड' घेतलें. तेहि व्यापून हा 'मासा उरलाच'! तेव्हां हसबनीसांची बखळ भाड्यानें घेतली तीहि अपुरी पडूं लागली. तेव्हां नातूंचा बाग घेतला. तोहि शाळेच्या वाढत्या विद्यार्थि. संख्येपुढें टिकाव धरीना. तेव्हां डेक्कन जिमखान्याचे जागेकीं सुमारें १॥ एकर जागा भाड्यानें घेतली. इतकें झालें तरी स्वतःच्या जागेशिवाय जमणें कठीण म्हणून हल्लींची जागा दीर्घ मुदतीच्या पट्ट्यानें घेतली. हल्लींच्या आपल्या क्रीडांगणासारखें विस्तृत व सुंदर क्रीडांगण असण्याचें भाग्य फारच थोड्या संस्थांचें असेल.

जशीजशी साधनांची व्यवस्था झाली तसतशी खेळांची संख्याहि वाढली. तालीम, सिंगल बार डबल बार, आट्यापाट्या, क्रिकेट वगैरे यथाक्रम आले व

हल्लीं सर्व देशी परदेशी खेळांची व्यवस्था, कुस्तीचा आखाडा व इतर तदनुषंगिक उपकरणें शाळेंत उपलब्ध आहेत.

खेळांपासून शिस्त हा मुख्य गुण उत्पन्न झाला पाहिजे या दृष्टीनेंहि कवाईत वगैरे रूपानें तो आणण्याचा उपक्रम केला गेला.

याहीपुढें जाऊन हल्लीं विद्यार्थ्यांचे प्रकृतीसंबंधीं तपासणी करून कांहीं उणीवा किंवा रोग असल्यास पालकांना कळविण्यांत येतात याप्रमाणें शाळेनें खेळासंबंधीं जबाबदारींतून पार पडण्याचा शक्त्यनुसार यत्न केला आहे असें दिसून येईल.

पूर्वीपासून अनेक शिक्षक हौसेनें कामें करीत असत व स्वतःच्या गुणांचा विद्यार्थ्यांना उपयोग करून देत; परंतु हे शिक्षक शाळा कांहीं कारणांनीं सोडून गेल्यास त्यांचें काम तसेंच राही व पुढें कोणी तें चालूं न केल्यास बंद पडे. म्हणून शाळेनें व्यवस्थितपणा आणण्यासाठीं व परंपरेचा भंग होऊं नये म्हणून अल्प वेतनें देऊन शाळेतर्फे शिक्षक नेमिले. त्याचा परिणाम अर्थात् चांगला झाला. हल्लीं वेगवेगळ्या खेळांचीं खातीं करून सर्वसाधारण व्यवस्थेकरितां कांहीं, व प्रत्येक खात्याकरितां एक एक असे शिक्षक नेमले असून त्यांचेकडे व्यवस्था दिली आहे. क्रीडांगण विस्तृत झालें असून प्रत्येक खेळाला स्वतंत्र जागा मिळतें. याशिवाय हल्लीं Volley Ball व Rugby Foot ball खेळ सुरू आहेत. गतवर्षी सामान ठेविण्याकरितां व विद्यार्थ्यांना निवाऱ्याकरितां प्रशस्त अशी इमारत बांधली आहे. त्याचे पुढें कुशलतेनें उतरता ओटा रचिला आहे.

हल्लीचें क्रीडांगण विविध प्रकारचे खेळ खेळणाऱ्या विद्यार्थ्यांनीं फुलून गेलेलें पाहून मन आल्हादित होतें. विस्तार व व्यवस्था पाहून शाळेच्या गरिबी स्थितींत विद्यार्थी असलेल्या उतारवयाच्या माजी विद्यार्थ्याला आश्चर्य व आल्हाद वाटेल. एकीकडे आट्यापाट्या खेळणारे सर्पाप्रमाणें नजर न ठरेल अशा हुलकावण्या देताहेत; दुसरीकडे Footballची गगनचुंबी Kick व चेंडूला पुन्हा लत्ता, प्रहार करण्याकरितां सज्ज असलेले खेळाडू; तिसरीकडे Hockey चे खेळाडू चपलतेनें चेंडूला तडाका देत आहेत; कांहीं लहान मुलें दमून ओट्यावर बसलीं आहेत- हा देखावा पाहून एकाद्या क्षयी माणसाला सुद्धां एखाद्या पैलवानाची उमेद वाटेल. विशेष कौतुक करावेंसें वाटतें तें अगदीं लहान मुलांचें ! मिळेल तसलें फळकूट व चेंडूवजा गोळा घेऊन एकाद्या Test-match खेळाडूच्या ईर्षेनें व हौसेनें मोठ्या मुलांना वाटून दिलेल्या हिरशांत पाचरीसारखें राहून तीं खेळत असतात ! !

बदाबदी

मागें लिहिल्याप्रमाणें शाळेच्या स्थापनेनंतरचीं २।४ वर्षें क्रीडांगणाचे संकोचामुळें विद्यार्थी फक्त बदाबदीचा खेळ खेळत. हा खेळ हल्लींच्या—विशेषतः परदेशी

खेळांप्रमाणें निरनिराळ्या उपकरणांनीं सजविलेला नसल्यामुळें डोळ्यांत भरत नसेल. तथापि या खेळांत शरीराचें व दृष्टीचें चापल्य, नेम धरण्याची कला, नाना प्रकारांनीं चेंडू हुकविण्याच्या हिकमती वगैरे अनेक गुण लागतात. उपकरणें सर्व लागतील तीं स्वतःच जमा करावयाचीं ! वाळू व शेवाळें यांचे साहाय्यानें चेंडू घट्ट करायचा ! ! या खेळापासून आत्मसंयमनाची संवय लागते. एकाद्याला पाठीवर किंवा पाठींखालीं चेंडू बसला म्हणजे बाकीचे हंसून तो माणूस चिडण्याचा संभव असतो. अशा वेळीं मन ताब्यांत ठेवण्यास शिकणें हा एक लाभच होय. हा खेळसुद्धां कोणी शिक्षक-विशेषतः रा० दामुअण्णा कुलकर्णी आले म्हणजे बंद ! या खेळास खर्च नाहींच ! त्यामुळें शाळेमार्फत काय किंवा खासगी काय हिशेबाचें कारणच नाहीं.

'राऊंड'

शाळेचें चालकांस क्रीडांगणाची उणीव लक्षांत असून लवकर त्यांनीं 'राउंड' संज्ञेनें प्रसिद्ध असलेली जागा घेतली. या नांवामध्यें इतकें प्रेम भरलेलें आहे कीं, त्याची कल्पना फक्त तेथें ज्यांनीं बालपण अभ्यासांत व खेळण्यांत घालविलें त्यांनाच येईल.

या जागीं पूर्वी एक नाटक-गृह होतें असें म्हणतात. तें पाहिलेलें लोक अजून हयात आहेत.

मराठी-शाळेच्या पायाच्या खोदाईचें काम चालूं असतां गाडीभर बाटल्यांच्या कांचा सांपडल्या ! कदाचित् पूर्वी नाटकगृह व 'बाटली' यांचा फारच निकट संबंध असेल !

या 'राउंड'चे दक्षिण व पश्चिम बाजूस दुमजली इमले असून त्यांत जुन्या पद्धतीचे लांबट वर्ग व बसण्यास भिंतीला 'ब्रॅकेट' मारून त्यांवर फळ्या बसवून 'कायम' केलेलीं बांकें असत.

पश्चिमेच्या इमल्यापुढें थोडी मोकळी जागा असून त्यापुढें ४ वर्गांचा एकमजली इमला होता. तो 'राउंड'चे मध्येंच असून चारी बाजूनीं खेळण्याच्या जागेनें वेढलेला असल्यामुळें त्याला 'बेट' असें म्हणत.

वायव्य कोपऱ्यांत वर्ग असून उत्तरेच्या बाकीच्या जागेंत सिंगल बार, डबल बार, ट्रीझ, उड्या मारण्याचा (Vaulting) घोडा वगैरे व्यवस्था होत्या. पूर्वेस एक लहान खोली—यांत मलखांब असे, व एक हौदा होता.

या सर्वांमध्यें एक पटांगण सरासरी ९०'×८०' असे. यांत शाळेचे वेळीं ड्रिल व सायंकाळीं खोखो, आट्यापाट्या वगैरे चालत. कांहीं मुलें हौसेनें 'घोड्या'वर (Stilts) बसून बेटाभोंवतालीं मिरवत असत.

पटांगणाचे उत्तर बाजूस ५।६ गुलमोहोराचे वृक्ष होते, त्यांपैकीं कांहीं अजून शिल्लक आहेत. हे वृक्ष फुलले म्हणजे फार बहारीचे दिसत. यांपैकीं एका झाडाला

बुडाजवळ एक व वर एक अशा दोन भक्कम कप्प्या बसवून त्यावरून टग्-ऑफ-वॉरचा दोर नेऊन त्याच्या टोंकाला दोन पिपें टांगलीं होतीं. वजन ओढण्याच्या सरावाकरितां त्यांत वाळू व पाणी घालून मुलांना ओढण्यास लावीत.


वर वर्णन केलेले पद्धतशीर खेळ असून शाळा सुरू होण्याचे आधीं १०।५ मिनिटें किंवा मधले सुटींत सांखळी वगैरे धावण्याचे खेळ, किंवा गोट्या मुलें खेळत. गोट्यांच्या नादीं मुलें लागत म्हणून गोट्या जप्त करण्याचा 'ऑर्डिनन्स' या वेळीं असावा असें वाटतें. हें जप्तीचें काम थोरला गोविंदा गडी बजावी. हा गडी आपल्या अल्पमतीप्रमाणें शाळेचे हितविषयीं फार दक्षता दाखवी व अधिकाराचा आव आणी. यामुळें विद्यार्थ्यांनीं विनोदानें याचें नांव 'बालू सुपरिंटेंडेंट' असें ठेविलें होतें. गोट्या जप्त केल्या, कीं मुलें दगडांनीं खेळत. याबद्दल मात्र लहान विद्यार्थ्यांना 'चल इनिकरावकडं' म्हणून गोविंदा कचेरींत उचलबांगडी करून नेत असे!

आट्यापाट्या

हा खेळ नूतन मराठी विद्यालयांत १९०० च्या सुमारास सुरू झाला असें दिसतें. खेळाचें पूर्वीचें स्वरूप हल्लींपेक्षां बरेंच भिन्न होतें. मुख्य गोष्ट म्हणजे एक गडी मेला म्हणजे डाव संपत असे. त्यामुळें सर्व गड्यांना फार धीमेपणानें व सावधानतेनें खेळावें लागत असे. एकाच्या चुकीचें प्रायश्चित्त सर्वांना भोगावें लागावयाचें. १९०३ सालीं शाळेला सामन्यांत जय मिळून बक्षिस मिळालें होतें. त्या वेळच्या संघांतील खेळाडूंचें छायाचित्र प्रस्तुत ग्रंथांत बघावयास सांपडेल.

त्या संघास शिक्षण दिलेले शिक्षक रा. **आबाजी कृष्ण कुलकर्णी** ऊर्फ थोरले आबा यांचे संग्रहांत तें चित्र मिळालें. त्या संघांतील एक खेळाडू रा. **दत्तोपंत बापट** हे सर परशुरामभाऊ कॉलेजांत सर-कारकून आहेत.


त्या वेळचे खेळाडू रा. **यशवंतराव बाक्रे, मांडे, आगटे** वगैरे यांचीं नांवें ते शाळेंतून गेल्यानंतरसुद्धां ऐकूं येत असत. रा. बाक्रे पाटी धरणें व पाटी खेळणें यांत फारच निष्णात आहेत. एका सामन्यांत तर ते एका दमांत १०।१२ पाट्या खेळले असें त्या वेळचे प्रेक्षक सांगतात. प्रौढ वयांतसुद्धां एकदां ते चौपाटी (मुंबई) संघातर्फे डेक्कन जिमखान्याच्या दंगलींत खेळण्यास आले होते. १९०४-०५ सालीं आट्यापाट्या हसबनीसांचें बखळींत खेळत. विद्यार्थ्यांचा उत्साह इतका दांडगा कीं, स्वतः जमीन उकरून, खड्डे वगैरे काढून तयार करीत आणि कॉंपऱ्यांतल्या विहिरीच्या २५।२५ पायऱ्या चढून पाणी आणून जमीनीवर घालीत. या वेळीं मोठ्या मुलांचा एक व लहान मुलांचा एक असे दोन संघ खेळत असत. त्या वेळीं सुद्धां कांहीं जुने व नवे चांगले खेळाडू खेळत. या काळांत कबुतरखान्यांत शिमग्यांत आट्यापाट्याचे सामने होत असत. त्यांतही शाळेचे विद्यार्थ्यांनीं नांव मिळविलें. या वेळचे रा. **मुकुंदराव वैद्य**, रा. **विष्णुपंत गोखले** वगैरे विद्यार्थी



नूतन मराठी विद्यालय, पुणें.

आटचापाटचाची ढाल मिळविणारे विजयी खेळाडू, १९१४

बालोद्यान प्रेस, पुणें.



नूतन मराठी विद्यालय, पुणें.

आट्यापाट्याची ढाल मिळविणारे विजयी खेळाडू, १९१३

पुढेंही बरींच वर्षें खेळत असत. रा. मुकुंदराव वैद्य तर १९२२ पर्यंत सामन्यांत सुद्धां खेळत असत. हे सूर धरण्यांत निष्णात आहेत व 'मधून' जाण्याच्या कांहीं युक्त्या तर त्यांनीं स्वतःचे डोक्यानें बसविल्या होत्या.

१९०६ सालीं हसबनीसांची बखळ सोडून नातूंची बाग भाड्यानें घेतली. ही जागा फार प्रशस्त आहे. तेथें क्रिकेटसुद्धां खेळतां येत असे. यापुढें दोन चार वर्षें मात्र आट्यापाट्यांचा खेळ व्यवस्थितपणें चालूं नव्हता. सामन्यापुरतें प्रॅक्टिस १०।५ दिवस जेमतेम करावयाचें; त्यामुळें सामन्यांत नेहमीं हार खावी लागे. पुढें रा. **शिदोरे** यांनीं त्यांत लक्ष घालून ही स्थिति सुधारली. हे स्वतः मुलांत खेळून पद्धतशीर रीतीनें शिकवीत. मुलें 'राऊंड' मध्यें येऊं लागलीं, कीं प्रथम 'पडून जाण्यास' शिकवीत. मग 'कौंडी' व नंतर पूर्ण डाव मांडीत. डाव चालूं असतांना सुद्धां अनेक खुब्या सांगत. अंधार पडला म्हणजे पाट्या धरण्यास शिकवीत. अंधेरांतसुद्धां जो हुलकावणी खात नाहीं त्याला उजेडांत हुलकावणी मिळणें जवळजवळ अशक्य ! पाऊस वगैरे पडला व क्रीडांगणांत चिखल झाला तरी त्यांतल्यात्यांत जो भाग खेळण्याजोगा असेल, त्यांत पाटी धरतां आली पाटी, कौंडी करतां आली कौंडी, जें कांहीं शक्य असेल तें करून घेत !! कांहीं कांहीं वेळां पाऊस प्रत्यक्ष असल्यामुळें क्रीडांगणावर खेळणें अशक्य! अशा स्थितींत मोरोबादादाचें वाड्यांतील मागील सोप्यांत खडूनें पाट्या आंखून पाटी खेळण्याचा सराव करावयास त्यांनीं लाविलें !!

त्या वेळीं फर्ग्युसन कॉलेजमध्यें पुण्यांतील सर्व शाळांचे आट्यापाट्याचे खेळाडू जमत. त्यामुळें तेथील आट्यापाट्या संघ फार बलवान् असे. त्या संघाचा सुद्धां अनेक वेळां शाळेनें पराभव केला.

त्या वेळचे सूर कै. खानगांवकर हे कित्येक वेळां चपळाईनें कांडें चिरून दुसऱ्या पार्टीतच कौंडी करीत. त्याच्या कडेनें जाणें अतिशय मुष्किलीचें होई. रा. **चंद्रचूड** (हल्लीं बडोद्यास डॉक्टर आहेत) व **खानगांवकर** यांची कौंडी म्हणजे जवळजवळ 'जन्मठेपे' चा तुरुंग ! यांतून गडी बाहेर पडायचा म्हणजे 'मेलेलाच'!

रा. **गंगाधरराव लागवणकर** हे पाटी खेळणें व कौंडींतून मधून जाणें यांत फार तरवेज. सापासारखें आंग चोरून पार्टीवाल्याला कल्पना येण्यापूर्वीच पाटी ओलांडून पार !

दुर्दैवानें या संघास सामने खेळण्याचा प्रसंगच मिळूं दिला नाहीं. त्यामुळें दाद मिळण्याची योग्यता त्यांना प्रत्यक्ष पटवून देतां आली नाहीं. १९१३ सालीं यांतील बरेच विद्यार्थी शाळेतून पास होऊन गेले. परंतु त्यांचेबरोबर खेळणारे इतर लोक पुढें सरसावले व संघ पूर्वीप्रमाणेंच बलवान् झाला. आट्यापाट्यांचें प्रेम इतकें वर्धमान् होतें कीं, दोन ठिकाणीं डाव मांडून सुद्धां कित्येकांना हात

जोडून उभे रहावें लागे. अशांची सोय (कॉमन) लिंबें म्हणून लावीत. या गर्दीचा फायदा पुढें मिळाला. परंपरा बरींच वर्षें टिकली. रा. नानासाहेब भोंडे, मुकुंदराव वैद्य वगैरे माजी विद्यार्थी हौसेनें येत. गु. शिदोरे गु. दत्तोपंत पोतदार, गु. हर्डीकर गु. विष्णुपंत गोखले वगैरे शिक्षकही खेळत. त्या वर्षी झालेले बहुतेक सर्व सामने शाळेनें जिंकले.

१९१० ते १९१७ चे दरम्यानच्या खेळणाऱ्यांत विशेष प्रवीण येणेंप्रमाणेंः—

(१) पाटी खेळण्यांतः—कै० करमेळकर, गंगाधर लागवणकर जेजुरीकर, गोवंडे, जनार्दन करंदीकर.

(२) पडून जाण्यांतः—पु. ग्रं. जोशी, दावलभक्त; मोरेश्वर पां. नातू, कै० परांजपे, आबासाहेब नातू, केशवराव बेडेकर.

(३) मधून जाण्यांतः—गंगाधर लागवणकर, जेजुरीकर, गोखले, करंदीकर, कै० देशपांडे, गोवंडे.

(४) पाटी धरण्यांतः—चंद्रचूड, दावलभक्त, धारवाडकर, पैठणकर श्रीपाद गोखले.

(५) सूरः—देवधर, शंकर जोशी.

रत्नु, रामा हे गडीसुद्धां पाणी घालण्यांत आस्था दाखवीत.

१९२३ सालचा ढालीचा सामना कबुतरखान्यांत न्यू इंग्लिश स्कूलशीं झाला. त्या वेळीं बरीच गडबड झाली. तथापि २ गुणांनीं आपल्या शाळेचा जय झाला. बरोच दिवसांनीं आट्यापाट्याची ढाल मिळाल्यामुळें फार आनंद झाला. विशेष म्हणजे अपजयाची परंपरा तुटली.


१९१४ सालीं नवीन खेळाडू तयार झाले. जुने कांहीं शिल्लक होतेच, यांनीसुद्धां फार तयारी दाखविली. न्यू इंग्लिश स्कूलच्या कोंडीवाल्यांचे हात लांब असल्यामुळें कोंडी फुटेना. कांहीं वेळ खेळाडू निराश झाले. पण धीर न सोडतां त्यांनीं तिसरीकडेच तोंड पाडलें. दुसऱ्या पार्टीवरील गडी कच्चा होता त्याच्या पार्टीतून २।३ गडी फुटून खालीं बऱ्याच पाट्या खेळत गेले. **करमेळकर; गोवंडे** वगैरे खेळाडूंनीं फार कौशल्य प्रगट केलें.

करमेळकर हे तर त्याच वर्षी दसऱ्याचे दिवशीं झालेल्या सामन्यांत न्यू इंग्लिश स्कूलच्या दहा पाट्या एका दमांत खेळून गेले.

ही परंपरा ३।४ वर्षें टिकली व ढाल ओळीनें ३ वर्षें शाळेनें मिळविली. पुढें महायुद्धाचे गर्दीत कांहीं वर्षें सामने तहकूब राहिले. या अवधींत डेक्कन जिमखान्यातर्फे सामने भरूं लागले. त्यांत पहिल्याच वर्षी खोखोची ढाल आपल्या शाळेचे छोट्या संघानें मिळविली. त्यांत सर्वच खेळाडू चांगले खेळले. **वसंतराव गोडांबे** तर एका सामन्यांत एकटे ४ मिनिटें खेळले. **आबासाहेब नातू, जनुभाऊ करंदीकर** वगैरेही चांगले खेळले. त्या वर्षी आट्यापाट्याचे सामन्यांत

नूतन मराठी विद्यालय


१९३१ आटचपाटचाचा विजयी संघ (अंतरशालीय सामने)



बालोद्यान प्रेस, पुणे.

नूतन मराठी विद्यालय, पुणें, १९२०–२१

आट्यापाट्याचे व खोखोचे खळाडू



रा. **शंकरराव जोशी, रा. खांबे, रा. नातू** वगैरे फार उत्तम खेळले. याचे पुढील वर्षी सुद्धां खोखोचें पारितोषिक आपले शाळेनेंच मिळविलें.

यापुढें माल ज्या वेळीं मराठी शाळेचे इमारतीचें काम सुरू झालें, त्याचा परिणाम या खेळावर फार परिणाम झाला. परंपरा तुटली तथापि जुने मांडवलाचा उपयोग अगदींच नाहींसा झाला नाहीं. रा. **राजाभाऊ वैद्य, रा. नानू साठ्ये रा. गोळे** वगैरे खेळाडूंनीं अनेक सामन्यांत मोठ्या खेळाडूंशीं टक्कर देऊन रोजचा सराव नसतांनासुद्धां आपले अंगांत मुरलेला खेळ प्रगट केला.

यापुढें हा खेळ नामशेष होतो कीं काय, अशी भीति वाटूं लागली. एकीकडची तयार झालेली जागा गेली व दुसरीकडची तयार नाहीं अशा परिस्थितींत नवीन खेळाडू तयार होईनात.

जुने पास होऊन पुढें गेले. नवीन क्रीडांगण तयार झालें, परंतु पूर्वीची परंपरा तुटलेली व नवीन खेळाडू यावे तर क्रीडांगण गांवाबाहेर; शिवाय शेजारींच भपके दार खेळ, तिकडे विद्यार्थी ओढले जात ! अशा स्थितींत दरवर्षी प्रयत्न होऊन सुद्धां खेळाचा जम बसेना. परंतु १९३० सालीं रा. **शांतारामपंत देशपांडे** शिक्षक यांचे परिश्रमाला यश येऊन खेळाचा जम चांगला बसूं लागला आहे. त्या वर्षीच्या सामन्यांत शाळेला २०० चे वर गुणांनीं जय मिळाला. **टिकेकर, मेढेकर, पवार, लागू** वगैरे खेळाडूंनीं कौशल्य प्रगट केलें. गतवर्षी ढालीचे सामने झाले नाहींत. तरी शाळेचा संघ तयार होता. यंदा न्यू. इं. स्कूल विरुद्ध जय मिळविला या सामन्यांत **जयराम टिकेकर, मेढेकर व जोगळेकर** यांचा खेळ उत्तम झाला

ही यशपरंपरा हल्लींचे विद्यार्थ्यांनीं लक्षांत ठेवावी. हल्लीं खेळासंबंधीं पालक व शालाधिकारी यांचा दृष्टिकोण बदललेला आहे. पूर्वापेक्षां सोई जास्त आहेत. याचा फायदा विद्यार्थ्यांनीं घेऊन शाळेचा कीर्तिध्वज फडकत ठेवावा याखेरीज माजी विद्यार्थ्यांची दुसरी काय अपेक्षा असणार !

खोखो

शाळेनें 'राउंड' घेतलें, त्या वेळीं गु. दामुअण्णा कुलकर्णी यांचे प्रेरणेनें खोखो सुरू झाला. त्या वेळीं खोखोच्या खेळाला बक्षिसें ठेवलीं गेलीं नसल्यामुळें डावांत व्यवस्थितपणाकडे फारसें लक्ष नसे. 'राउंडच्या' स्वाभाविक मर्यादा याच खेळाच्या मर्यादा. तथापि नियम कसेही असले तरी मूळ तत्त्व हल्लींचेंच असल्यामुळें त्यांत हल्लीं असलेले गुण पूर्वीही होतेच. मात्र सामन्याकरितां खेळाडू जितके त्यांत बुद्धि घालून खेळतो तितके एरवीं खेळत नाहीं.

पूर्वीपैकीं रा. **शंकरराव भागवत** यांचें एक नांव चांगले खोखो खेळणारे म्हणून तत्कालीन विद्यार्थी घेतात.

खोखो व्यवस्थित तऱ्हेनें सुरू डेक्कन जिमखान्यानें सामने सुरू केले तेव्हां-पासून, त्या वेळीं रा. **गोवंडे, जेजुरीकर** वगैरे खेळाडू चांगले खेळत.

नवीन नियमांत मर्यादा कमी केल्यामुळें मधल्या पाटीवर नागमोडी गतीनें खेळणें अवश्य झालें. या प्रकारचा खेळ रा. गोवंडे चांगला खेळत.

डेक्कन जिमखान्यानें १६ वर्षांचे आंतील मुलांचे सामने सुरू केले. त्याकरितां शाळेचा संघ रा. **नाना गोखले** यांनीं फार परिश्रम घेऊन तयार केला. त्यांत रा. **वसंतराव गोडांबे, रा. जनार्दन करंदीकर, आबासाहेब नातू--व मोरेश्वर पांडुरंग नातू** वगैरे खेळाडू फार तयारीचे झाले. १९१६ व १९१७ या दोन वर्षीं आपल्या शाळेला बक्षिसें मिळालीं. रा. गोडांबे तर एका सामन्यांत ४ मिनिटें खेळले !

यानंतर 'राउंड'मधील क्रांतीचा परिणाम खोखोवर झाला व खोखो मागें पडला. तथापि या मंदाईच्या काळांतसुद्धां रा. **शंकरराव पाटणकर** यांचेसारखे उत्कृष्ट खेळाडू निर्माण झाले. हे १३।१४ वर्षांचे असतांना मोठ्या वयाच्या कसलेल्या खेळाडूंशीं सामन्यांत २॥। मिनिटें खेळले.

हुतूतू


हा खेळ पुरातन असल्यामुळें शाळेमध्यें चालू होताच. परंतु त्याचेंसुद्धां सामने नसल्यामुळें तिकडे लक्ष कमी. खेळ गम्मत म्हणून कधीं तरी खेळला जाई. शिम-ग्यामध्यें रात्रीं धांगडधिंग्यांत हा खेळ असायचा. मात्र १।२ महिने असे होते कीं, त्या वेळीं नेमानें रोज हुतूतू चाले. पूर्वी सामने साधारण ऑक्टोबरचे सुमारास संपत. त्याचे पुढेंच वार्षिक परीक्षा येत त्यामुळें कांहीं विद्यार्थी नेहमीचे खेळांचा कंटाळा करीत. त्या दिवसांत व उन्हाळ्याचे सुटींत कांहीं विद्यार्थी गांवाला जात व थोडें उरत ते 'राउंड'मध्यें येऊन करमणूक करीत. **१९१०-१२** चे सुमारास **रा. मामा अभ्यंकर** (वांईकर), **रा. केशवराव बेडेकर** वगैरे विद्यार्थी चांगले खेळत असत.

'राउंड'च्या क्रांतीचा या खेळावर मात्र सुपरिणाम झाला. क्रीडांगण मोठ्या खेळांना निरुपयोगी झाल्यामुळें सांपडेल त्या कोपऱ्यांत खेळावें लागें. असल्या वेळीं हुतूतूखेरीज कोणता खेळ सांपडणार ? या वेळीं अभ्यंकर, श्रीपाद गोखले, मामा फडके वगैरे खेळाडू नांवाजले होतें. यांतले मामा फडके हे बेटकुळी-सारख्या उड्या मारीत खेळत व मध्येच 'गण्या'सारखी झांप घेऊन गडी मारीत. या क्रियेला 'चोंच मारणें' अशी संज्ञा प्रात झाली होती व होतां होतां ती संज्ञा त्या खेळाडूंनाच मिळाली.

पुढें 'शिवाजी मंदिर', 'रामदास आखाडा' वगैरे ठिकाणीं सामने सुरू झाले. डेक्कन जिमखान्यानें पुढाकार घेऊन नियम नवीन करून खेळाला व्यवस्थित व आकर्षक स्वरूप आणलें. या कामीं रा. दत्तोपंत व सदूभाऊ गोडबोले यांनीं

नूतन मराठी विद्यालय

आटयापाट्या विजयीसंघ, सुमारें सन १९०५



डेक्कन जिमखाना शिमगा सामने,

खोखोचा विजयीसंघ, (सोळा वर्षांखालील) ९ मार्च १९१७



बालोद्यान प्रेस, पुणें.

नूतन मराठी विद्यालय

१९३०।३१–रस्सीखेंच विजयढाल मिळविणारा क्रीडकसंघ.



बालोद्यान प्रेस, पर्णे.

मन घातलें व नवीन स्वरूपांत खेळ कसा दिसतो याची चांचणी 'राउंड'मध्यें मुद्दाम सामने भरवून घेतली. ठिकठिकाणीं भरलेल्या सामन्यांत आपल्या शाळेच्या विद्यार्थ्यांनीं नांव काढलें आहे. रामदास आखाडा या संस्थेनें सुरू केलेल्या छोट्या संघाचें पारितोषक मिळविण्याचा पहिला मान आपले शाळेनेंच मिळविला.

खेळ शिकविणारे शिक्षक व माजी विद्यार्थी

रा. दामुआण्णा कुलकर्णी:—यांचे प्रोत्साहनानें खो खो प्रथम सुरू झाला असें तत्कालीन विद्यार्थी सांगतात. हे स्वतः मुलांमध्यें खेळत असत. यांची महिती अन्यत्र दिलेलीच आहे. रा. **आबाजी कृष्ण कुलकर्णी**:—हे प्राथमिक शाळेंत ४१ वर्षें शिक्षक होते. अलीकडे ते सेवानिवृत्त झाले आहेत. यांनीं १९०३ सालीं ज्या संघानें जय मिळविला तो संघ तयार केला.

रा. **शिदोरे**:—यांनीं आट्यापाट्याचें पुनरुज्जीवन केलें. हे स्वतः चांगले खेळत असत व रोज नेमलेल्या कामाप्रमाणें हें काम समजून करीत असत. एकदां तर असें आठवतें कीं, शाळेची शील्ड मॅच व यांच्या घरीं कोणी आजारी पडल्याची तार आली; त्यामुळें जरी त्यांना परगांवीं जावें लागलें तरी एक मन सारखें मॅचकडे लागलें होतें व त्यांनीं बजावून तारेनें निकाल कळविण्यास सांगितलें व सुदैवानें जय झाल्याची तार करताच त्यांनीं उलट अभिनंदनपर तार केली. सोलापुराला नवीन शाळा निघून तेथें व्यवस्थापक म्हणून जाईपर्यंत यांचें आट्यापाट्याकडे लक्ष होतें.

रा. तेलंग व कै. लोहोकरे यांना आस्था असून ते अनेकदां 'राउंड'मध्यें खेळ बघण्यास येत. **रा. पोतदार, रा. विष्णुपंत गोखले, रा. हर्डीकर** हे त्रिकुट रोज 'राउंड' मध्यें येऊन विद्यार्थ्यांनां प्रत्यक्ष शिक्षण देत व हरएक बाबतींत यांचा सल्ला फार उपयोगी पडे. प्रो. **हरिभाऊ तुळपुळे** हेही उत्साहानें विद्यार्थ्यांशीं खेळत व सामन्याचे वेळीं हजर राहून प्रोत्साहन देत.

रा. **दत्तोपंत बापट**, रा. **नानासाहेब भोंडे**, रा. **मुकुंदराव वैद्य** वगैरे अनेक माजी विद्यार्थी मुद्दां फार उपयोगी पडले.

रा. **नाना गोखले** यांनीं लहान मुलांचे संघ फार मेहनत घेऊन तयार केले व त्या संघांना डेक्कन जिमखान्यांत यश मिळालें.

आर्यक्रीडोद्धारक मंडळीचे अनेक सभासद रा. **दत्तोपंत साठे, डॉ. जेजुरीकर** रा **शंकरराव गोखले** वगैरे विद्यार्थ्यांना शिकवीत असत.

१९१९-१९२३

रा. **भिंगे** यांनीं मोठ्या मुलांचे संघ तयार करण्याचे कामीं पुढाकार घेतला

होता. रा. शंकरराव गोखले, कृष्णराव जेजुरीकर, कै. कान्होबा भोंडे यांची त्यांना मदत झाली.

रा. **दुमाले** व रा. **स. दा. भिडे** यांनीं लहान मुलांचे खोखोचे संघ तयार केले. त्या विद्यार्थ्यांचापुढें उपयोग झाला.

१९२३ च्यापुढें

भाऊमहाराज–बागेंतील जागा तांबडी माती वगैरे घालून तयार करण्यांत रा. **कापडे** यांनीं बरीच मेहनत घेतली. रा. **शंकरराव पाटणकर, गोवंडे**, रा. **बोकील** मास्तर वगैरेनीं विद्यार्थ्यांना मदत केली.

१९३०

१९३०-३१ सालांत शिक्षक रा. **शांतारामपंत देशपांडे** यांनीं पुढाकार घेऊन उत्तम रीतीनें संघ तयार केले आणि आट्यापाट्या संघाला मोठा विजय प्राप्त झाला व ढाल मिळाली. या कामीं त्यांना त्यांचे बंधु, रा. **गोवंडे**, रा. **त्र्यंबकराव गोडबोले** रा. **धारवाडकर** वगैरे माजी विद्यार्थ्यांनीं मदत केली.

सध्यां रा. **राजाभाऊ वैद्य** यांचेकडे तें काम सोंपविलें आहे.

क्रिकेट


१९०० चे सुमारास नू. म. विद्यालयाचे विद्यार्थी लहान क्लब काढून मिळतील तशीं फळकुटें व चिंध्याचे चेंडूपासून मिळतील तसे चेंडू व तीनचार काटक्या घेऊन खेळत. क्लबाची फी एक आणा ! ही रक्कमसुद्धां विद्यार्थ्यांचें हातीं मिळणें कठीण ! एकाद्या श्रीमंताच्या मुलाच्या 'आश्रयाखालीं' क्लब असावयाचा ! अशा सामुग्रीनेंसुद्धां कांहीं कांहीं चांगले खेळाडू निर्माण झाले व त्यांनीं शाळेचे अधिकाऱ्यांचें लक्ष. आपलेकडे वेधून घेतलें व शाळेनें खेळाची व्यवस्था करण्यास सुरुवात केली.

दोन तीन वर्षांतच शाळेचा संघ पुढें आला व उत्तम संघांत त्याची गणना होऊं लागली. परंतु या खेळाचे बाबतींत नशीब म्हणा किंवा न समजण्याजोगें अन्य कांहीं कारण म्हणा शाळेचें नेहमीं आड येतें. प्रथमपासूनच शाळेंत असे बरेच खेळाडू निर्माण झाले कीं, पुढें त्यांनीं चांगलें नांव कमाविलें, परंतु शाळेला मात्र यशाचा लाभ क्वचित्च झाला.

रा. **त्र्यंबकराव खरे**, रा. **चोभे** त्यांचे नंतर रा. **वसंतगडकर**, रा. **समेळ** वगैरे यांचीं नावें ऐकूं येत व मोठाल्या जिमखान्यातूनसुद्धां त्यांची चांगलें खेळाडू म्हणून गणना आहे. यानंतरच्या पिढींतील उत्तम खेळाडू प्रो. **देवधर** हे होत. यांचे नांव ऐकिलें नाहीं असा माणूस सांपडणें कठीण, अशी दिगंत कीर्ति त्यांनीं मिळविली आहे. त्यांचे लहानपणीं इतक्या वयाचा लहान चांगला खेळाडू विरळा व हल्लीं त्यांच्या इतक्या मोठ्या वयाचा चांगला खेळाडू विरळा ! बॅटिंग, बोलींग, तर अजून चांगलें

नूतन मराठी विद्यालय

सन १९१७ ची सीनिअर क्रिकेटची विजयढाल मिळविणारा क्रीडकसंघ.



बालोद्यान प्रेस, पुणें.

नूतन मराठी विद्यालय

सीनिअर क्रिकेटची ढाल मिळविणारे विजयी खेळाडू, इ. स. १९१६



हरिदास प्रेस पुणे

करतातच; परंतु फील्डिंगमध्यें त्यांची नजर व चापल्य ऐन पंचविशीतल्या तरुणांना मान खालीं घालावयास लावतात.

रा. **बाबूराव जगताप**, रा. **देशपांडे** वगैरे खेळाडूही देवधरांचे बरोबरीचे. देवधरांचे थोरले **बंधु दामोदरपंत** हेही अजून बरे खेळतात व त्यांची परंपरा हल्लींचे संघांतील त्यांचे चिरंजीव चालवितील अशी आशा आहे.

यांचेपुढें १९१०--१९१३ चे कालांत रा. **खानगांवकर**, रा. **कापडे**, रा. **दाते**, रा. **सोनटक्के** रा. **शेटे**, वगैरे खेळाडू चांगले खेळले. रा. खानगांवकर यांनीं एका शील्ड मॅचमध्यें १२३ धावा काढल्या. या वेळचे एक खेळाडू रा. **कृ. प. परांजपे** हे जरी पद्धतशीर खेळत नसत, तरी एकादी ओव्हरबाउंडरी मारीत. यांनीं १९१३ सालीं डेक्कन जिमखान्यावर बाउंडरीचे पलीकडे असलेल्या गवताचे गंजीवरून चेंडू मारला.

बरींच वर्षें **गु. केसकर**, हल्लीचे श्री. **विश्वनाथ महाराज** यांनीं या खेळाकडे लक्ष देऊन विद्यार्थी तयार केले. ते स्वतः खेळाशीं इतकें तादात्म्य पावत कीं, स्वतः खेळत नसून नुसते बघत उभे आहोत हें विसरत. उंच उडी मारण्याचा सराव खेळाडू करूं लागले की केसकरांचा पाय आपोआप वर झालाच! खेळाडूंना चागल्या खेळाडूंबरोबर खेळण्याचा सराव व्हावा म्हणून त्यांनीं कांहींना डेक्कन जिमखान्याचे सभासद केले व याचा फायदाही मिळाला.

केसकरांचे नंतर रा. **गोपाळराव गोडबोले**, रा. **शिदोरे** वगैरे क्रिकेट शिकवीत. शिकविण्याच्या कामांत रा. **कापडे** यांचा उपयोग अजूनपर्यंत होत आहे. कापडे क्रिकेट, फुटबॉल वगैरे खेळ व उडया मारणें यांत स्वतः निष्णात असल्यामुळें ग्राउंडचे तयारीपासून शिकविण्यापर्यंत सर्व कामें उत्तम करूं शकतात.

१९१६-१९१८ या सुमारास शाळेचा क्रिकेटचा संघ चांगला जमला त्या वेळचे रा. **नवले** हे पुढें चौरंगी सामन्यांत 'छोटा विकेटकीपर' म्हणून प्रख्यातीस आले. तो लौकिक त्यांनीं वाढविला व परवां हिंदुस्थानी संघ इंग्लंडमध्यें गेला, त्यांतही त्यांनीं उत्तम विकेटकीपिंग केलें. या खेरीज रा. **जाधव**, रा. **हिरासिंग परदेशी**, रा. **पु. रा. गोखले**, रा. **लक्ष्मणराव फाटक** यांनीं चांगलें नांव कमाविलें व चौरंगी सामन्यापर्यंत जरी त्यांचा शिरकाव झाला नाहीं, तरी जवळजवळ तितक्या योग्यतेला ते पोंचले. रा. **विष्णुपंत भोपटकर** यांच्याविरुद्ध खेळतांना कॉलेजच्या उत्तमोत्तम खेळाडूंच्या छातींतसुद्धां धडकी भरे. मध्यप्रांताच्या चौरंगी सामन्यांत हिंदूंकडून एक वर्षी त्यांनीं चांगलें बोलिंग केलें. यंदा दुर्दैवानें ते अकालीं कालवश झाले!

इतक्या चांगल्या खेळाडूंचा संघ जमल्यावर जयश्री माळ कां न घालील? १९१७ व १९१८ या वर्षीं या संघानें ढाल मिळविली. याच वर्षीं छोट्या खेळाडूंनींसुद्धां पारितोषिक मिळविलें यांत रा. **देशमुख**—(डोडो), रा. **खरे**, रा.

साठे (बगोपंत) वगैरे चांगले खेळले. रा. देशमुख हे एकदां चौरंगी सामन्यांत खेळले व अजून पुण्यांत देवधरांचे खालोखाल गणले जातात.

पुढें क्रीडांगणाच्या उलाढालींचा परिणाम याही खेळावर झाला. मध्यंतरीं क्रिकेट फार मंदावलें व त्या वेळीं शाळेचा संघ तयार होण्याचीही मुष्कील झाली. परंतु पूना हायस्कूल बंद पडून त्यांतील बरेच विद्यार्थी नूतन मराठींत आले व त्यांनीं या खेळाला पुन्हा चालना दिली. रा. **आगाशे**, रा. **तुळपुळे** (हल्लीं डॉक्टर) रा. **पाटसकर**, रा. **रानडे**, रा. **अंबेडकर** वगैरे खेळाडू नांवाजलेले होते. यांचा विशेष म्हणजे यांनीं न्यू इंग्लिश स्कूलचा पराभव केला. त्या शाळेचा संघ अजिंक्य गणला जात असे व नूतन मराठीनें त्यांना जिंकणें अशक्य गणलें जात असे! ही परंपरा त्या वेळच्या विद्यार्थ्यांनीं प्रथम तोडली. त्याचे पुढचे वर्षी रा. **मकरंद** भावे यांचे नेतृत्वाखालीं पुन्हा न्यू इं. स्कूलचा पराभव केला; पण शेवटच्या सामन्यांत 'भावे' स्कूलकडून मार खाल्ला! छोट्या संघांत **वाळिंबे, ठोसर, वामनराव दामले, गोविंदराव नातू, राजा दामले, पानसे** वगैरे विद्यार्थी चांगले खेळले. पण शेवट तोच!!

अगदीं अलीकडे **गरुड बंधू, फडके, करमरकर, देवधर, पवार, कुर्लेकर**, वगैरे विद्यार्थी चांगले खेळले,

फूटबॉल

हा खेळ पूर्वी याचे सामने नसल्यामुळें फारसा प्रचारांत नव्हता. १९०६ चे पूर्वीसुद्धां नातूंचे बागेंत वगैरे हा खेळ चाले. परंतु जितकें असावें तितकें लक्ष या खेळांत कोणाचें नसे. क्रिकेटचे सामने वगैरे संपल्यानंतर दिवाळीचे पुढें हा खेळ गंमत म्हणून खेळत. शिस्त व पद्धत किंवा खेळ सुधारण्याची दृष्टि फारशी नव्हती. तरीसुद्धां प्रो. **देवधर, कापडे, भोपटकर**, वगैरे खेळाडू प्रवीण झाले. प्रो. देवधर यांच्या क्रिकेटमधील प्रावीण्यामुळें त्यांचे फुटबॉलमधील प्रावीण्य झांकलें गेलें. देवधरांप्रमाणें Dribbling पुण्यास तरी फार क्वचित् पहाण्यास मिळे. म्हैसुरी लोक या खेळांत फार निष्णात; पण देवधरांना आवरण्यांत त्यांचे तीन गडी अडले जात देवधरांचेबरोबर पळण्याला फार थोडे खेळाडू टिकत; अलीकडे वयोमान व प्रकृतिमानाप्रमाणें त्यांना खेळणें अशक्य झालें आहे.

१९१९ सालीं पी. वाय्. सी. हिंदु जिमखान्यानें शाळेंतील विद्यार्थ्यांचे संघाकरितां खतंत्र बक्षिस लावण्यास सुरुवात केली. पहिलें वर्षी आंपले शाळेनेंच तें बक्षिस पटकाविलें. **जाधव, पाटील** व विशेषतः कै. **वाळिंबे** यांचा खेळ चांगला झाला. वाळिंब्यांच्या हुलकावण्या आट्यापाट्यांतील हुलकावण्याप्रमाणें बसत. १९२० सालीं पुन्हा हें बक्षिस मिळालें. त्यांत **रामस्वामी** यांचा खेळ उत्तम झाला. त्यांना तर शाळेचे विद्यार्थ्यांत जोडच नव्हती.

या खेळाचीही पुढें ग्राउंड तयार नसल्यामुळें इतर खेळांसारखींच दुर्दशा झाली. संघ तयार होण्यास ३।४ वर्षें लागलीं. त्यांत **यशवंत लिमये, सुळे** वगैरे खेळाडू चांगले खेळले; पण परगांवच्या भारी संघांचे पुढें त्यांना हार खावी लागली. हल्लीं विद्यार्थ्यांचे लक्ष हॉकीकडे जास्त आहे. हा खेळ २।३ वर्षेंच सुरू करण्यांत आला आहे. त्यामुळें अजून चांगला जम बसलेला नाहीं. तथापि कांहीं खेळाडू होतकरू आहेत.

शर्यतीचे खेळ

या शर्यती पूना स्कूल्स् ॲथेलेटिक ॲसोसिएशन या संस्थेनें १९०० चे सुमारास सुरू केल्या. आरंभीं कांही वर्षें हे प्रकार नवीन असल्यामुळें यशाचा मक्ता टेलर हायस्कूल, बिशप्स स्कूल वगैरे युरोपिअन मुलांच्या शाळांना मिळे. परंतु गांवांतील शाळांत या प्रकारांची ओळख हळुहळू झाली. प्रथम थोडीं बक्षिसें मिळण्यास सुरुवात झाली. बक्षिसांची संख्या वाढत जाऊन १९०९ सालीं सर्व शाळांत पहिला नंबर येऊन जयचिन्ह ढाल आपलें शाळेला मिळाली. त्या वेळीं **खानगांवकर, कापडे, आगाशे, सोनटक्के, शेटे** वगैरे खेळाडू या शर्यतींत प्रामुख्यानें चमकत. ही ढाल ओळींनें तीन वर्षें आपले शाळेकडे होती. त्यानंतर मात्र या बाबतींत फार मंदाई दिसून येत आहे. मध्यंतरीं लढाईचे धामधुमींत हे खेळ बंद पडले. पण डेक्कन जिमखान्यातर्फें शर्यती भरविण्यांत येऊं लागल्या. त्यांत जाधव, वैद्य विद्यार्थ्यांनीं आपली करामत करून दाखविली. अलीकडे १५ वर्षें मात्र शाळेचें फारसें नांव निघत नाहीं. पण यंदा बऱ्याच विद्यार्थ्यांची तयारी चांगली आहे असें कळतें. आपलेकडून तयारी केल्यावर मग जय आला न आला याची पर्वा नाहीं. रा. सुळे यांनीं यंदा अनेक बक्षिसें पटकावलीं.

कुस्ती

'राउंड' घेतल्यानंतरही बरेच दिवस आखाडा असा शाळेंत नव्हता. पूर्वी पांढरपेशांतसुद्धां कुस्तीचा बराच नाद असे. श्री. **भाऊसाहेब गोखले** यांचेसारखे कसलेले विद्यार्थी पैलवान असत. परंतु हे विद्यार्थी बहुशः बाहेरच्या तालमींत जात. भटांची तालीम, नगरकरांची तालीम व इतर ठिकाणीं मुलें तयार होत. त्यांत भाऊसाहेब गोखले, हल्लीं सातारा न्यू. इं. स्कूलचे तालीममास्तर **दामोदरपंत भिडे** वगैरे नू. म. विद्यालयाचे विद्यार्थी आदर्शवत् होते.

प्रारंभीचे विद्यार्थी असें सांगतात कीं, रा. सिनकर–त्या वेळचे हेडमास्तर— हे वर्गांत कुस्ती लावीत असत! क्वचित् प्रसंगीं शिक्षा म्हणून एकाद्याला भाऊसाहेब गोखल्यांशीं कुस्ती खेळण्यास सांगत!!

प्रत्यक्ष शाळेंत माती घालून हौदा केल्यावरसुद्धां शाळेंतल्या खेळावर समाधान न मानतां विद्यार्थी बाहेरच्या तालमींत खेळण्यास जात. तथापि शाळेंत खेळणारेही

कांहीं होते. १९१० चे सुमारास **तोडमल, प्रल्हाद देशमुख, मेढेकर, दाते, सोनटक्के, न. वि. गाडगीळ** वगैरे तडफीनें खेळत. **तोडमल, देशमुख** यांनीं डेक्कन जिमखान्यातर्फे होणाऱ्या कुस्तीच्या फडांत बक्षिसेंही मिळविलीं.

पुढें १९१६ चे सुमारास माजीविद्यार्थीमंडळातर्फे भरलेल्या कुस्त्यांत कै. वाळिंबे, नवाथे, भागवत, शिवा दामले वगैरे विद्यार्थ्यांनीं बरेंच कौशल्य प्रगट केलें.

या पुढील पिढीचे हगवणे वगैरे विद्यार्थी यांनींही डेक्कन जिमखान्याचे कुस्त्यांत नांव मिळविलें.

कसरतीचे खेळ

शाळेनें 'राउंड' घेतल्याबरोबर प्रथम व्यवस्था सिंगल बार, डबल बार; ट्रॅपीझ यांचीच केली. या खेळांत प्रथम शिक्षक रा. **लक्ष्मणराव पाटणकर** यांचें नांव ऐकूं येतें. यांना विशेषतः कवाईत व त्यांतील व्यूहरचना फार चांगल्या अवगत होत्या. (Pyramids) मानवी बुरूज वगैरे शोभेचे भाग त्यांनीं फार उत्तम शिकविले.


यांचे वेळचें छायाचित्र उपलब्ध आहे. पण त्यांतील विद्यार्थ्यांची ओळख देणारा मात्र आढळत नाहीं !

यांचेनंतर १९०१-१९०२ सालीं इन्स्पेक्टर मि. प्रायर यांचे सूचनेवरून पेटिट इन्स्टिटयूटमध्यें तयार झालेले रा. पटवर्धन यांना नेमण्यांत आले. हे एकच वर्ष टिकले. यांचेनंतर सुप्रसिद्ध शिक्षक रा. **गणपतराव पाटणकर** यांस नेमण्यांत आले. हेही त्यांचे बंधु रा. लक्ष्मणराव यांजप्रमाणेंच पेटिट इन्स्टिटयूटचे प्राविण्यपत्र मिळविलेले आहेत. देशी तालीम व सिंगल बार वगैरे प्रकार यांत त्यांचा हातखंडा. देह जरा ठेंगणा पण पीळदार व सकस. यांनीं त्या व्यायामशाळेंत एक शिष्यपरंपरा सुरू केली हा त्यांचा विशेष आहे. यांचे विद्यार्थ्यांत शिस्तीची आवड व गुरुजनांविषयीं आदर हे गुण प्रामुख्यानें दिसतात.

शाळा पाहण्यास कोणी आल्यास यांचे विद्यार्थी खेळ करून दाखवीत. साखळदंड तोडणें, माणसांनीं भरलेली बैलगाडी छातीवरून नेववितें, छातीवर मोठा दगड ठेवून तो फोडविणें वगैरे शक्तीचे प्रयोग स्वतः गणपतराव करीत असत. यांचे शिकविण्यावर सरकारी अधिकारीसुद्धां खूष असत.


रा. गणपतराव हे चित्रकलेंतही निष्णात आहेत व पुढें सरकारी शाळांत ड्रॉइंग-टीचर म्हणून काम करून सेवानिवृत्त झाले आहेत. हल्लीं त्यांचें वास्तव्य धुळे येथें आहे. रा. पाटणकर हे आपल्याच शाळेचे माजी विद्यार्थी असल्यामुळें शाळेची नोकरी सोडल्यावरसुद्धां पुण्यास असेतोंपर्यंत आपले शाळेंतील विद्यार्थ्यांना सायंकाळीं शिकवीत. रा. लक्ष्मणराव पाटणकरांच्या शिष्यांपैकीं रा. **शंकरराव भागवत** हे ट्रपीज-मध्यें फार निष्णात आहेत. हे खोखोही उत्तम खेळत. त्यांचे समकालीन विद्यार्थी त्यांना 'जनरल जोचर्ट' म्हणतात !

रा. गणपतराव पाटणकरांच्या शिष्यांत वैद्य **त्र्यंबकराव आपटे, प्रो. सखाराम**



नूतन मराठी विद्यालयांतील माजी विद्यार्थ्यांनीं स्थापन केलेल्या " आर्य क्रीडोद्धारक "
मंडळाचे कांहीं सभासद.

बालोद्यान प्रेस, पुणें.



सुवर्णमहोत्सवानिमित्त नू. म. विद्यालयाच्या माजी विद्यार्थ्यांनीं केलेल्या "एकच प्याला"
ह्या प्रयोगांतील नटवर्ग व कार्यकर्ती मंडळी.

बालोद्यान प्रेस, पुणे.

पंत आपटे रा. **अनंतराव आपटे, वझे, गोरे** हे प्रमुख. हे सर्व Gymnastics मध्यें निष्णात. रा. अनंतराव आपटे सिंगलबारचे Grand circle इतकें चांगलें करितात कीं, त्या काळीं त्यांना 'सर्कल आपटे' म्हणून ओळखीत. या सर्वांनीं पास होऊन पुढें गेल्यावरसुद्धां विद्यार्थ्यांना शिकवून आपल्या कलेचा फायदा शाळेला दिला.

रा. **सखारामपंत आपटे** यांची शरीरसंपत्ति हेवा वाटण्याजोगी आहे. त्यांनीं व्यायामविषयाचा सांगोपांग अभ्यास केलेला असल्यामुळें त्यांच्या ज्ञानाचा शाळेस फार उपयोग झाला. रा. **मल्हारराव** व **यशवंतराव आपटे** यांनीं आपापल्या बंधूचाच क्रम चालविला व उभयतांनीं डेक्कन जिमखान्यांत बक्षिसें मिळविलीं. रा. **म. वि. आपटे** व रा. **पु. रा. गोखले** ही जोडी ट्रॅपीझचीं कामें चांगलीं करीत असे. रा. **मोहन गुजराथी** बार चांगले करीत.

रा. **सखारामपंत आपटे** यांचें हाताखालीं तयार झालेले रा. **हगवणे** रा. **गजाननराव आपटे** वगैरे विद्यार्थ्यांनीं पूर्वपरंपरा चालू राखिली. यापुढें मात्र पूर्वीची व्यवस्था बदलावी लागल्यामुळें मध्यें खंड पडला.

हल्लीं ट्रॅपीझ गांवाबाहेरचे मैदानावर टांगलें आहे. इतर व्यवस्थाही तेथें आहे.

माजी विद्यार्थ्यांनीं काढलेल्या व्यायामसंस्था

आर्यक्रीडोद्धारक मंडळी ही संस्था १९१४ सालीं नूतन मराठी विद्यालयाचे तत्कालीन वर्तमान व माजी विद्यार्थ्यांनीं स्थापिली. त्यांचा हेतु देशी मैदानी खेळांची वाढ करावी हा आहे. यांतील **गु. पोतदार, गु. हर्डीकर, गु. विष्णुपंत गोखले, रा. य. गो. मोडक डॉ. आबासाहेब नातू** वगैरे सभासदांनीं डेक्कन जिमखान्याच्या या खेळांचे नियम बसविण्याच्या कामांत त्यांना मदत केली.

नूतन मराठी विद्यालयाचे आट्यापाट्या-खोखोचे संघ तयार करण्याचें काम, रा. **नाना गोखले**, रा. **दत्तोपंत साठे**, रा. **शंकरराव गोखले**, रा. **गोवंडे**, रा. **धारवाडकर**, रा. **राजाभाऊ वैद्य** , रा. **त्र्यंबकराव गोडबोले**, रा. **शंकरराव पाटणकर**, वगैरे सभासद करीत आले आहेत व शाळेनें त्यांची सेवा मान्य करून घेतली आहे.

'महाराष्ट्रीय मंडळ पुणें' ही क्रीडासंस्था स्थापन करणारांत रा. **शिवा दामले**, रा. **'मास्तर' करंदीकर**, रा. **दाभोळकर**, रा. **राजाभाऊ द्रवीड**, रा. **कुशाभाऊ जेजुरीकर** वगैरे प्रमुख होत. यांनीं ही संस्था फार उदयाला आणली.

रामदास आखाडा याचे संस्थापक रा. **नारायणराव झांजले** हे नूतन मराठी विद्यालयाचे माजी विद्यार्थी आहेत त्यांचीही संस्था भरभराटींत आहे.

नू. म. विद्यालय–मिळालेलीं बक्षिसें

१९०३ आट्यापाट्या

१९०४ ॲथलेटिक खेळांत वैयक्तिक बक्षिसें.

१९०५ आगटेः—चेंडूफेक २ रें
शिंदे २२० यार्ड पळणें १ लें

१९०८ आठ बक्षिसें

१९०० **ॲथेलेटिक शील्ड**

वैयक्तिक बक्षिसें

तिखे	१ लें	चेंडूफेक	
भणगे	,,	उंची उडी	(मोठे विद्यार्थी)
खानगांवकर	,,	,, ,,	(छोटे विद्यार्थी)
मळेकर	,,	१०० यार्ड पळणें	(१४ चे आंतील)
कांबळे	,,	,, ,,	(१२ ,, ,,)
खानगांवकर	२ रें	पाव मैल शर्यत	(मोठें)
,,	,,	लांब उडी	(१६ पेक्षां लहान)
मोरगांवकर	,,	उंच उडी	(,, ,, ,,)
आगाशे	,,	पाव मैल दौड	(,, ,, ,,)
शेटे	,,	२२० यार्ड दौड	(१४ ,, ,,)

ॲथेलेटिक शील्ड


१९१० मेढेकर	१ लें	चेंडूफेक	
परचुरे	,,	१०० यार्ड दौड	(१४ पेक्षां लहान)
आगाशे	,,	लांब उडी	(१६ ,, ,,)
,,	,,	१०० यार्ड दौड	(१६ ,, ,,)
कापडे	,,	उंच उडी	(मोठे विद्यार्थी)
आगाशे	,,	पाव मैल दौड	(१६ पेक्षां लहान)
कापडे	२ रें	पाव ,, ,,	(मोठे विद्यार्थी)
खानगांवकर	,,	उंच उडी	(,, ,,)
वाकनीस	,,	२२० यार्ड दौड	(१६ पेक्षां लहान)

१९११ **ॲथेलेटिक शील्ड**

वैयक्तिक बक्षिसें.


कापडे	१ लें	ताऱ्यांची शर्यत	(मोठे विद्यार्थी)
खानगांवकर	,,	उंच उडी	(,, ,,)
सोनटक्के	,,	अर्धा मैल दौड	(,, ,,)
खानगांवकर	२ रें	१०० यार्ड ,,	(,, ,,)
कापडे	,,	अर्धा मैल ,,	(,, ,,)

नूतन मराठी विद्यालय–इंग्रजी शाळा. रस्सीखेंच विजयी संघ.



नूतन मराठी विद्यालय

रस्सीखेंचची विजयढाल आणणारा संघ, सन १९१३



बालोद्यान प्रेस, पुणे.

१९११ परांजपे ,, उंच उडी ,, (१६ पेक्षां लहान)
१९१२ **टग्-ऑफ्-वॉर शील्ड**
वैयक्तिक बक्षिसें
पंडित १ लें १०० यार्ड दौड (१२ पेक्षां लहान)
रानडे २ रें उंच उडी (१६ ,, ,,)
शेटे ,, अर्धा मैल (मोठे विद्यार्थी)
कापडे व शेटे डेक्कन जिमखान्यांत बक्षिसें
१९१३ **टग्-ऑफ्-वॉर शील्ड**
आट्यापाट्या ,,
१९१४ **टग्-ऑफ्-वॉर शील्ड**
आट्यापाट्या ,,
वैयक्तिक बक्षिस
रानडे २ रें उंच उडी (मोठे विद्यार्थी)
वैद्य ,, २२० यार्ड दौड (१४ पेक्षां लहान)
१९१५ **आट्यापाट्या शील्ड**
टग्-ऑफ्-वॉर (डेक्कन जिमखाना)
खो खो (,, ,, १६ पेक्षां लहान)
टप्प्याची शर्यत (,, ,,)
वैयक्तिक बक्षिसें
सातव कुस्ती (१६ पेक्षां लहान) वैद्य प्रवीण (,, ,, १६ पेक्षां लहान)
१९१६ **क्रिकेट शील्ड** (मोठे विद्यार्थी)
खोखो कप (डेक्कन जिमखाना)
१९१७ **क्रिकेट शील्ड** (मोठे विद्यार्थी)
क्रिकेट कप (छोटे ,,)
१९१९ **फुटबॉल कप** (पी. वाय. सी.)
शांतावसंत पारितोषिक (डेक्कन जिमखाना-मराठी शाळांकरितां)
कांबळे प्रवीण (,, ,, ,, ,,)
ब्रह्मे २ रा
१९२० झांजले ५० मैल सायकल, कुस्ती (डेक्कन जिमखाना)
शांतावसंतपारितोषिक(डेक्कन जिमखाना-मराठी शाळांकरितां)
लोखंडे, नलावडे, काळे, यांस पदकें. खोखोचें बक्षिस.
१९२५ **टग्-ऑफ्-वॉर शील्ड**
१९२९-३० **टग्-ऑफ्-वॉर शील्ड**
१९३२ **आट्यापाट्या ,,**

विद्यालयांतील बालवीर

१९१८ च्या डिसेंबर मध्यें डॉ. ॲनी बेझंट यांनीं स्थापिलेल्या Indian Boy Scouts Associationच्या विद्यमानें प्रो. वेंकटेश्वरम् यांनीं पुणें येथें स्काउट-मास्तरांचा वर्ग चालविला. या वेळीं डॉ. ॲनी बेझंट यांनीं राजकारणांत प्रामुख्यानें भाग घेतल्यानें त्यांनीं काढलेल्या संस्थेंत सामील होण्याबद्दल अधिकाऱ्यांचीं मनें साशंक होतीं. पण कोठलाहि शिक्षणविषयक नवीन गोष्टीचा प्रयोग करण्याची चालकांची सदैव उत्सुकता असल्यानें त्यांनीं विद्यार्थ्यांस बालचमूंत सामील होण्यास उत्तेजन दिलें व त्यामुळें या वर्गांत न्यू पूना कॉलेज व नूतन मराठी विद्यालय या संस्थांतील विद्यार्थ्यांचा व शिक्षकांचा बराच मोठा भरणा होता. १९१९ च्या जानेवारींत पुण्यांत स्थानिक बालवीर संस्थेची स्थापना नूतन मराठी विद्यालयांत रा. न. चिं. केळकर यांच्या अध्यक्षतेखालीं झाली. प्रो. त्र्यं. भि. हर्डीकर यांना चिटणीस निवडण्यांत आलें, व ते अजूनहि हें काम करीत आहेत. प्रो. हर्डीकर हे नूतन मराठी विद्यालयाचे माजी विद्यार्थी असून शि. प्र. मंडळीचे तहाहयात सभासद आहेत. पुणें शहर स्थानिक संस्थेला आजची स्थिति आणून देण्यास प्रो. हर्डीकर हे पुष्कळसे कारणीभूत आहेत. स्थानिक संस्थेस स्वतःची जागा नव्हती; स्थानिक संस्थेच्या आश्रयाखालील पथकांस जमण्यास एकत्र ठिकाण नव्हतें; पण वेळोवेळीं नूतन मराठी विद्यालयाच्या चालकांनीं स्थानिक संस्थेस सर्व प्रकारची मदत दिली. संस्थेच्या स्थापनेपासून संस्थेची स्वतःची जागा होईपर्यंत संस्थेची कचेरी शाळेमध्येंच होती. स्थानिक संस्थेची स्थापना झाल्यावर, रा. त्रिंबकराव आपटे (वैद्य), रा. मो. ना. नातू, रा. वि. मा. देशमुख, रा. द. प. जोशी, (हे इंग्रजी पहिलींत नूतन मराठींत होते) रा. म. गो. देशपांडे, रा. अ. गो. कानिटकर वगैरे आमच्या संस्थेच्या विद्यार्थ्यांनीं बालवीर पथकें भराभर काढलीं. ही सर्व मंडळी आमच्या संस्थांचे विद्यार्थी असल्यानें त्यांनीं काढलेल्या पथकांतील मुलांत आमच्याच संस्थांच्या विद्यार्थ्यांचा भरणा होता. तरी पण इतर शाळेच्या विद्यार्थ्यांस या पथकांतून दाखल होण्यास मज्जाव नव्हता. पथकांत नूतन मराठी-शिवाय इतर शाळांतील विद्यार्थी असतांहि पथकास नूतन मराठीच्या चालकांनीं सर्व प्रकारची मदत केली आहे. याच सुमारास शि. प्र. मंडळीच्या हरिभाई देवकरण हायस्कूलमधील शिक्षक रा. धारपुरे (त्यांनीं हल्लीं संन्यासवृत्ति घेतली असून ते 'यशेश्वर यति' या नांवानें प्रसिद्ध आहेत) यांनीं सोलापूरच्या शाळेंत बालवीर पथक सुरू केलें.

नूतन मराठी विद्यालयाच्या मराठी शाळेची इमारत उघडण्याचे वेळीं त्या वेळचे गव्हर्नर सर जॉर्ज लॉईड (लॉर्ड लॉईड) यांनीं आमच्या शाळेच्या पथकाची पाहणी करून समाधान व्यक्त केलें.

१९२१ च्या ऑगस्ट महिन्यांत मुंबई स्काउट कौन्सिलनें रा. द. प. जोशी यांस बालवीरशिक्षणाकरितां इंग्लंडला पाठविलें. त्यांनीं तेथील शिक्षण संपवून बालवीरशिक्षकांना मिळणारा 'काष्ठमणि' बिल्ला मिळविला. रा. जोशी यांचे मागून त्यांचे शिष्य व आमच्या शाळेंतील उत्तम खेळाडू रा. ऋ. धों. वैद्य यांनींहि मिलर यांचे कँपांत शिक्षण घेऊन 'काष्ठमणि' बिल्ला मिळविला आहे.

याच वेळीं आमच्या शाळेंतील विद्यार्थी व त्या वेळच्या शिवाजी पथकाचे स्काउटमास्तर रा. वि. मा. देशमुख यांना बेडन-पॉवेल संस्थेची 'प्रतिज्ञा' मान्य नसल्यानें त्यांनीं प्रामाणिक मतभेदामुळें 'महाराष्ट्र बालचरमंडळ' या नांवाची संस्था स्थापन केली व नूतन मराठी विद्यालयांतील विद्यार्थ्यांच्या हृदयांत सदैव वसलेल्या "निर्वाहः प्रतिपन्नवस्तुषु" या ध्येयाप्रमाणें त्यांनीं ती संस्था चिकाटीनें चालविली असून तिच्या उत्कर्षार्थ ते झटत आहेत.

१९२१ सालीं हिंदुस्थान बालवीर संस्थेची स्थापना झाली व जाहीर रीतीनें सरकारानें चळवळीस पाठिंबा दिला. याच वेळीं मि. मिलर यांनीं बालवीरशिक्षकांचे वर्ग सुरू केले. त्यामुळें पुष्कळ पथकें निघालीं व बालवीरांची संख्याहि वाढली. १९२२ मध्यें शाळेचें म्हणून (Controlled) ४ थें पुणें श्रीकृष्ण पथक असें शाळेचे माजी विद्यार्थी व शिक्षक रा. य. वि. आपटे यांनीं सुरू केलें. १९२३ चे सुमारास नूतन मराठी विद्यालयाचे त्या वेळचे सुपरिंटेंडेंट प्रि. सबनीस यांनीं बेडन-पॉवेलच्या 'स्काउटिंग-गेम्स' या पुस्तकाचें भाषांतर करून 'स्काउट'संबंधींच्या मराठी वाङ्मयाचा पाया यातला. कांहीं दिवसांनीं नू. म. विद्यालयाचे माजी विद्यार्थी रा. अनंत विठ्ठल आपटे व यशवंत विठ्ठल आपटे यांनीं बंगाली बालवीरांच्या कथा, कोमलपद, मध्यमपद, बालवीरगीतें वगैरे बालवीरविषयक लहान लहान पुस्तकें लिहिलीं. १९२४ च्या नोव्हेंबर महिन्यांत रा. द. प. जोशी यांनीं इंग्रजी न जाणणाऱ्या लोकांकरितां बालवीरशिक्षकांचा वर्ग मराठींतून चालविला. बालवीर विषयावरील सर्व वाङ्मय इंग्रजींत असल्यानें मराठींतून हा वर्ग चालवितां येईल किंवा नाहीं याबद्दल अधिकारीवर्ग साशंक होता; पण रा. द. प. जोशी यांनीं रा. त्रिंबकराव आपटे, रा. द्वा. आ. गडकरी (हे हल्लीं कराचीस असिस्टंट एंजिनिअर आहेत), रा. ऋ. धों. वैद्य वगैरे आपल्या सहकारी मित्रांच्या साहाय्यानें तो वर्ग उत्तम रीतीनें चालविला. १९२४ सालीं त्या वेळच्या इलाखाधिपतींच्या उत्साहामुळें किंवा चळवळीच्या नाविन्यामुळें बालवीरांचीं कितीतरी पथकें निघालीं होतीं व आमच्या शाळेंतील बालवीरांचा आंकडाहि २५० पर्यंत गेला होता.

१९२५ च्या जानेवारी महिन्यांत नू. म. विद्यालयाचे त्या वेळचे सुपरिंटेंडेंट रा. रा. प. सबनीस यांनीं, नूतन मराठी विद्यालयासारख्या मोठ्या संस्थेच्या व्यवस्थापकाचें काम करीत असतांहि वेळांत वेळ काढून बेडन-पॉवेलच्या 'Aids to Scout-mastership' या पुस्तकाचें मराठींत भाषांतर केलें. त्या पुस्तकास नेक

नामदार सर लेस्ली विल्सन यांनीं प्रस्तावना लिहिली. त्या प्रस्तावनेंत त्यांनीं सुपरिंटेंडेंट सबनीस यांच्या बालवीरविषयक वाङ्मयकामगिरीचा गौरव केला आहे.

२३ जून १९२५ रोजीं नेक नामदार सर लेस्ली विल्सन यांनीं नूतन मराठी विद्यालयास भेट दिली. त्या भेटीच्या संबंधींचा अभिप्राय त्यांनीं २५ जून, १९२६, रोजीं पाठविला त्यांत ते लिहितातः—

The Boy Scouts form a particular feature of the school and the Scout room, affording as it does so many facilities both to the scout masters and to scouts is a very good institution. I always knew that Professor Subnis and his colleagues were anxious to do all in their power to form as many troops as possible and make them efficient and I was indeed glad to find that their efforts had met with such success. The turn-out of the Scouts and Cubs was very good.

१९२५ सालीं रा. द. प. जोशी यांची संयुक्त प्रांतांमध्यें इलाखा चिटणीस म्हणून नेमणूक झाली. ते तेथें एक वर्षभर होते. या वेळीं डॉ. नातू हे आपला मुंबईचा अभ्यासक्रम संपवून पुणें येथें आले व तेव्हांपासून ते स्काउट चळवळीच्या उत्कर्षाकरतां झटत आहेत. डॉ. नातू हे उत्तम विद्यार्थी, उत्कृष्ट खेळाडू, स्वभावानें शांत व दिलदार असल्यानें ते आदर्शभूत स्काउटमास्तर आहेत असें म्हटल्यास अतिशयोक्ति होणार नाहीं.

१९२५ सालीं डॉ. नातू यांनीं आपल्या शाळेंतील माजी विद्यार्थी व सातारच्या आनंद छापखान्याचे मालक रा. विनायक शंकर वैद्य यांचे मदतीनें 'बालवीर' नांवाचें मासिक काढलें व गेल्या सालपर्यंत तें नियमितपणें चालविलें. गेल्या वर्षी काटकसरीची कात्री सर्वत्र लागल्यानें शिक्षकांस निरनिराळीं मासिकें घेणें अशक्य झालें व म्हणून तें बंद केलें.


आमच्या शाळेंतील माजी विद्यार्थी रा. य. द. जोशी यांनीं बेडन-पॉवेलचें चरित्र मराठींत लिहून स्काउटविषयक मराठी वाङ्मयांत भर घातली आहे. रा. अ. वि. आपटे, प्रो. य. द. जोशी, रा. द्वा. आ. गडकरी, रा. मे. प. आठवले, रा. ना. वि. परचुरे वगैरे माजी विद्यार्थ्यांनीं रत्नागिरी, सुरत, सोलापूर, सांगली, भोर वगैरे ठिकाणीं बालवीरविषयक उपयुक्त कामगिरी केली आहे.

हल्लीं पुण्याच्या कँप व खडकी स्काउट संस्थेच्या चिटणिसांचें कार्य रा. ल. ग. जोगळेकर व पुणें शहर स्थानिक संस्थेच्या चिटणिसांचें कार्य रा. ल. कृ. गोडबोले हे करीत आहेत. हे दोघेहि नू. म. विद्यालयाचे माजी विद्यार्थीच आहेत.

नूतन मराठी विद्यालयांतील व शिक्षण-प्रसारक मंडळीच्या आश्रयाखालील इतर संस्थांतील विद्यार्थ्यांनीं बालवीर चळवळींत उपयुक्त व भरीव कामगिरी केली आहे, हें या सुवर्णमहोत्सव स्मृति-ग्रंथांत नमूद करण्यांत आम्हांस अभिमान वाटतो.

भाग तिसरा

विद्यालयासंबंधीं आठवणी




कै. डॉ. विनायक सखाराम घाटे, एम. ए.
डी. लिट् (पॅरिस) नू. म. वि. तून १८९६ सालच्या
पहिल्या अकरा मॅट्रिक मंडळींत व इलाख्यांत पहिले.
पहिली जगन्नाथ शंकरशेठ स्कॉलार्शिप मिळविली.



श्री. रघुनाथ चिंतामण सोहोनी, पुणें
नू. म. वि. चे माजी विद्यार्थी व
शि. प्र. मं. चे आश्रयदाते.

बालोद्यान प्रेस, पुणें.



मीमांसा-विद्यालय.

बालोद्यान प्रेस, पुणें.

Dr. V. S. GHATE, M. A., D. Litt.

The fourteenth of June 1916 will ever be a memorable day in the life of the Nutan Marathi Vidyalaya. As the name shows, it began with the Marathi *bigārī yattā*, and passing gradually through the different stages of a Marathi primary school, an Anglo-Vernacular school, a high school, it has now grown into a second-grade college, and will before long be a first-grade college too. The progress has been necessarily slow; for it has taken not less than thirty-three years to build the edifice as it stands to-day. But all through this period there stand out conspicuously certain traits which have characterised the institution, and which have gone to make it what it is to-day. It is but natural that the whole of the past of the institution should rise before the mind of one who had the good fortune of once belonging to it, and who can never forget all that he owes to it; and it would not be out of place to briefly refer to some of the little incidents in the past in this first number of the New Poona College Magazine, as it would help to give some idea of the spirit which has always inspired this institution to the young men who receive instruction here; and what I am going to say will be, I believe, specially interesting to the enthusiastic and self-sacrificing band of young men who have voluntarily come forward to steer it successfully through its future course.

I need not refer to the spirit of self-sacrifice and independence which has always actuated the conductors of this institution. It is a fact too well-known. What I wish to refer to on this occasion is their love of the work they undertook and specially the spirit of sympathy which pervaded the relations between the teachers and the taught. For it is often forgotten that the qualities which go to make a successful teacher are not only a thorough knowledge of his subject, and a capability of demonstration, but above all a frank sympathy with the scholars. That teacher is best understood and proves most effective, who can enter into the spirit of the scholars, who can make himself not only respected but liked by them, and who can make them feel quite at home with him. If this fact is borne in mind by teachers, I think, no boys would hate their schoo and they would be only glad to be relieved from the dull monotony of the home. It was this spirit of homeliness which marked the relations between the teachers and the taught.

It was about 22 years ago when the school taught only upto the fifth English Standard. The annual examination was over and the students who completed their fifth standard had no course but to leave the school and join some other for the sixth standard. We were all really very sorry; for we all felt a strong attachment to our school and the idea of leaving it was simply unbearable. A group of about forty students, all about fourteen years old, went together to see our beloved master, whom we called by the familiar name 'Dāmu Aṇṇā,' and told him what we felt. He was moved by our prayer, as we had expected, and he took up the matter seriously. In a fortnight we had the Sixth Standard opened, and everything went on well. Next year naturally provision had to be made for the Seventh Standard; and thus we had the satisfaction of completing the school course of the Nutan Marathi Vidyalaya.

I may give another little instance of how much we loved Dāmu Aṇṇā. As we entered the Sixth Standard, we were naturally entrusted to the care of some graduate teacher; and Dāmu Aṇṇā told us that he would have nothing to do with us as a teacher; for as he said funnily he had nothing to teach us. But we could not do without Dāmu Aṇṇā, and we forced him to give us one hour a week to teach astronomy (only nominally, according to the time-table), but really to amuse us with his instructive stories which he had a very funny way of narrating; and I assure you that though we learnt little or no astronomy we gained a lot of useful information, not to speak of the fun which we enjoyed.

Dāmu Aṇṇā possessed a rare tact of managing students. single glance of his was sufficient to produce silence in a class howsoever noisy. His influence was felt not only in the class-room, but on the play-ground also. He actually took part in games with us; and those who were lazy or not strong enough he encouraged by adapting himself to them. He at once could see through a student; and though he loved them, he never unnecessarily flattered caprices. Once we had a teacher who always made a mess of the whole thing; and in spite of his good intentions he appeared to us a complete failure. It was scarcely a fort-night since he had come, and a deputation of students went to Dāmu Aṇṇā to complain against him. I still remember the stern look and the strong words which we had to face. He made us feel ashamed of our impatience; and we returned crest-fallen and not a little surprised,

too. But it was only a week after that, and we were agreeably surprised to have another teacher take his place.

In the beginning, when the Matriculation Class was opened, there were naturally some difficulties and troubles. As for Mathematics, English and Sanskrit we were in good hands and very happy, too. But Science was a new subject and one that cannot be tackled by everybody. New graduates were imported; but they could not imbibe the spirit of the institution; besides they were inexperienced. So several means were tried, but without success until at last the old teachers had to come forward to teach the new subjects. That Mechanics was taken up by the Veteran Mathematics-teacher there is nothing strange about it. What would, however, appear most funny at first sight was that the teacher in charge of English grammar undertook to teach chemistry; and he who taught Paradise Lost taught astronomy. And all my friends of that year will yet bear testimony to how thoroughly and satisfactorily we did these subjects.

That year every teacher tried to do his best, even sometimes to the great inconvenience of the taught. We had extra hours almost for every subject; and even Sundays were turned into working days; but all this tended to bring us together all the more closely, and to confirm the feeling that we all belonged to a common family where the interest of one was the interest of all.

At last came the examination; and I still remember the eagerness and anxiety of the teachers to question us and to know how we had done in the papers every evening as we returned from the Mandap. Every one of us felt pleased and not a little proud for the attention shown; and the encouraging words of the teachers buoyed us up the better for the ordeal which we had to face.

The result was declared; and at last the moment came when we had to bid good-bye to our dear old school. We had a pretty little gathering on the eve of our separation; and the memory of the scene, even at this moment, fills me with a deep sorrow; and I cannot help shedding a tear. There was feeling of joy at the prospect of joining a College—which we then thought to be something grand and magnificent—for higher education; but it was completely merged in the thought that we would no longer have the privilege of sitting at the feet of our dear old teachers, and of being

fondled by them; and this thought screwed our heart with deep agony; and those who were present at that very small but memorable meeting would yet remember how every one was in tears, deeply moved, and unable to speak a word. Dāmu Aṇṇā made a small speech to advise us and to give his loving message to us. He tried to speak, but he could not. He was so much affected that after every word he had to stop; he could with great difficulty control the emotion. I remember some of his words. He said, "My boys, you cannot imagine what I feel at this moment. We have done everything we can for you; and now it is my duty to bid adieu to you; for you must leave our little school now to pursue higher studies. Remember a mother who has to see her daughter go to her husband's place, but who, all the same, finds the separation unbearable, with all the care and love she has bestowed on her." There was a complete silence, and every one was moved; but the occasion, howsoever insignificant it may be to outsiders, had its influence on us; and it can never be blotted from our memory.

I hope the same spirit of love ever inspires the teachers and the taught; and I am sure nothing but success would be in store.

Reproduced from '*The New Poona College Magazine.*'

ले. दत्तात्रेय केशव जोशी, पेन्शनर शिक्षक नूतन मराठी विद्यालय, पुणें

[शाळेंत लागले, इ. स. १८९६, पेन्शन १९२७. स्वतःच्या कमाईतून नऊ रुपयांचें बक्षिस शाळेंत व २५ रुपयांचें बक्षिस कॉलेजांत अशीं दोन बक्षिसें इतिहासविषयांत कायम ठेविलीं आहेत. संस्थेकरितां आर्थिक मदतहि बरीच मिळविली आहे. साठी उलटून गेल्यावर स्काउट काम शिकून वाहवा मिळविली. १८९४ त कै. राजवाडे यांस 'भाषांतर' या मासिकाचे कामांत मदत करीत.

काव्यसंग्रहांत मोरोपंती महाभारतांतील कांहीं पर्वांवर यांनीं टीपा दिल्या आहेत.

संगीतावर बरेच ग्रंथ केले आहेत.

लखनौस संगीत-कॉलेजांत अध्यापक होते.

यांचीं संस्कृत शब्दरूपाकर व धातुरूपाकर हीं पुस्तकें प्रसिद्ध आहेत.]

आपली शाळा निघाली त्या वेळचा काळच अनुकूल होता. त्याचे आधीं न्यू इंग्लिश स्कूल निघालें होतें. त्यामुळें अशा तऱ्हेनें स्वासगी शाळा काढणाऱ्या

मंडळींबद्दल एक प्रकारचें आदरयुक्त कौतुक असे व अशा मंडळींना शक्य तोंवर मदत करण्याची लोकांची इच्छा असे. ह्याचें प्रत्यंतर म्हणजे येथील प्रसिद्ध सावकार भट यांनीं आपल्या शाळेला केलेली मदत होय. त्या वेळीं शाळा माड्याचे जागेंत होती. बुधवारांतील भटांचा वाडा (आप्पा बळवंत गेटानजीक) त्यासाठीं घेतला होता. तो त्यांनीं शाळेसाठीं म्हणून केवळ चार आणे खणाप्रमाणें भाड्यानें दिला.

शाळा, कॉलेजें वगैरे ज्या खाजगी शिक्षणसंस्था आहेत त्यांना सरकार दरवर्षी मदत देत असतें. अशी मदत शाळेला सरकारी मान्यता मिळाल्यावर मुरळीत काम चालून सरकाराला तें पसंत पडलें म्हणजे मिळते. आपल्या शाळेनें या सर्व गोष्टी पूर्ण करून दाखविल्या. तरी पण शाळेला मदत मिळेना याचें नवल वाटूं लागलें. पण त्याचें कारण निराळेंच होतें. आपल्या शाळेच्या चालकांपैकीं कै० दामुआण्णा कुलकर्णी हे डायरेक्टरचे ऑफिसांत एक उत्तमांपैकीं कारकून होते. त्या वेळचे डायरेक्टर मि० चाटफील्ड यांची त्यांच्यावर फार मर्जी होती. दामुआण्णांचे मनांतून सरकारी नोकरी सोडून शाळेला येऊन मिळावयाचें होतें व तो विचार त्यांनीं आपल्या साहेबास बोलून दाखविला. परंतु त्यानें नोकरी सोडूं नका असें सांगितलें इतकेंच नव्हे तर दुप्पट पगार करण्याचें वचन दिलें ! परंतु दामुआण्णांनीं तो पैशाचा मोह सोडला व सेवाशृंखला तोडली आणि ते शाळेस येऊन मिळाले ! व यामुळें योग्य वेळीं मिळाली असती ती शाळेची ग्रँट लांबली.

ह्या वेळीं पुण्याचें हायस्कूल म्हणजे मोठी नांवाजलेली शाळा. त्याच्या हेडमास्तराचे जागीं मोठमोठी विद्वान मंडळी होऊन गेलेली. आपली शाळा निघाली त्या वेळीं "पुण्याची तोफ" अशी ज्यांची ख्याति असे ते प्रसिद्ध विद्वान् कै. तात्या कुंटे हे हेडमास्तर होते. ते जसे विद्वान् होते, तसेच स्वभावानें तऱ्हेवाईक होते. तेव्हां अशा नांवाजलेल्या शाळेशीं तुलनेनें नूतन मराठी विद्यालयासारखी नवी शाळा अगदींच कमी प्रतीची ठरणार अशी चालकांना भीति वाटे. परंतु शाळेचें भाग्य चांगलें कीं कुंटे यांच्यासारखे हेडमास्तर देखील त्यांना उत्तेजन देऊन शक्य ती मदत देण्यास व आपल्या ज्ञानाचा व अनुभवाचा फायदा देण्यास तयार झाले.

आपली शाळा निघाली त्याच वेळीं रा. केळकर या नांवाच्या ब्रह्मचारी गृहस्थानें शाळा काढली. ती शाळा तुळशीबागेंतील मागच्या माडीवर होती. त्या शाळेमधील कांहीं शिक्षक वेळींअवेळीं, माणसें जमलेलीं असतील अशा खाणावळी वगैरे ठिकाणीं आपल्या शाळेची निंदा करीत. ती ऐकून मला राग येई. पण निंदा

केलेली शाळा भरभराटीस आली आणि ती शाळा मात्र नामशेष झाली! अंगांतील गुण आज ना उद्यां प्रगट झाल्याशिवाय राहावयाचे नाहींत.

माझे वडील जमखिंडी दरबारचेतर्फे येथील गव्हर्नरकडे वकील होते. त्यामुळें माझें विद्यार्थीदशेतील सर्व वास्तव्य शनवार पेठेंतील भव्य अशा जमखिंडीकरांचे वाड्यांतच होतें. कै. प्रो. भानु हे माझ्या परमस्नेह्यांपैकीं एक असून ते आमचेच जवळ रहात असत. त्या वेळीं भानु डेक्कन कॉलेजांत फेलो होते व पुढें न्यू इंग्लिश स्कूलमध्यें जाण्याचें त्यांचें घाटत होतें. हरिभाऊ आपटे आमच्याच स्नेह्यांपैकीं व दामुअण्णा त्यांचे स्नेही म्हणून ते आमचे वाड्यांत भानूंकडे शाळेसंबंधींच्या वाटाघाटी करण्यास व सल्लामसलत घेण्यास येत असत. पण त्या वेळीं या शाळेंत मी शिक्षक होईन ही कल्पना नव्हती.

नदीचें मूळ पाहूं नये अशी आपणांत म्हण आहे ती यथार्थ आहे. कारण कोणतीहि मोठी वाटणारी गोष्ट सुरवातीला कशी क्षुल्लक किंवा अपेक्षेहून निराळी असते हें दृष्टीस पडतें. असो. आपल्या शाळेचे बऱ्याच काळचे सुपरिंटेंडन्ट व कालेजचे पहिले प्रिन्सिपल रा. विनायकराव आपटे यांचा या शाळेशीं कसा संबंध आला याची हकीकत अशीः—

रा. विनायकरावांचे मधले बंधु कै. त्रिंबकरावजी हे माझे फार स्नेही. ते व मी एकाच दिवशीं एका वर्गात दाखल झालों. हा स्नेह त्यांच्या मरणापर्यंत होता. विनायकराव मजपेक्षां सुमारें १० वर्षांनीं लहान आहेत. मी माझे गांवीं असतांना त्रिंबकरावांचें पत्र आलें, "तुमचे मित्र हरिभाऊ आपटे यांनीं शाळा काढिली आहे. विनायकराव फर्स्ट बी. ए. नापास झाले; तरी त्यांचे शाळेंत मास्तरची जागा मिळाल्यास बरें होईल." त्याप्रमाणें मीं हरिभाऊंस पत्र लिहिलें व त्यांनीं विनायकरावांस नूतन मराठींत जागा दिली. विनायकरावांचें काम पसंत पडल्याबद्दल दोनतीन महिन्यांनीं हरिभाऊंचें पत्र आलें. यानंतर विनायकराव बी. ए. झाले व मग हेडमास्तर झाले, तो इतिहास सर्वविश्रुत आहे.

लेखक: प्रो. रा. वि. ओतूरकर, एम्. ए.

(१९०७ ते १९१४)

१. पंचवीस वर्षांपूर्वी ऑफिसची जागा

त्या वेळीं वार्षिक परीक्षा हल्लींप्रमाणें एप्रिलांत न होतां सप्टेंबर-ऑक्टोबरांत होत असत व युनिव्हर्सिटीच्या परीक्षा नोव्हेंबर महिन्यांत होत. इ.स. १९०७च्या

जानेवारींत मराठी चवथ्या इयत्तेंत श्री. आबा कुलकर्णी यांच्या वर्गात माझा प्रवेश झाला. त्या वेळीं नू. म. विद्यालयाचें ऑफिस भटांच्या वाड्याच्या पाठीमागल्या बाजूस किर्ब्यांच्या वाड्यांत पश्चिमेकडे तोंड करून होतें व त्याच्या समोरच हल्लीं जेथें मराठी शाळा भरते त्या जागेकडे जाण्यास लहानसा बोळ असे. त्या जागेस आम्ही सर्व मुलें 'ग्राऊंड' म्हणत असूं. ऑफिसमध्यें त्या वेळीं श्री. दत्तात्रय केशव जोशी हे क्लार्क असत. या ऑफिसांत नांव घालण्याचा विधि झाल्यानंतर ४ थी ड तुकडींत म्हणजे ग्राउंडांत दक्षिणेकडील बाजूस पूर्वी एक साधी इमारत असे तींत दुसऱ्या मजल्यावर माझ्या वर्गात मला नेऊन बसविण्यांत आलें.

२. आबा मास्तरांची छडी

त्या वेळीं श्री. आबा कुलकर्णी मास्तरांना पाहून, खरें म्हटलें तर मला भीति वाटली. त्यांचे एक दोन दांत पुढें असत; डोळे जरा मोठेच असून ते मुलांवर वटारतांना अधिकच मोठे होत; व त्यांच्याजवळ जी छडी असे त्या छडीस्न बोंडशी असे व ते छडी त्याच बाजूनें मारीत. मला आठवतें कीं त्या वेळीं माझ्या वर्गात महाजन नांवाचा एक एकाक्ष विद्यार्थी असे, त्यास फार मार मिळे. ह्या मारानें अंमळ भिऊन जाऊन मी घरीं वडिलांस सांगितलें कीं, मी शाळेंत जात नाहीं. त्यावर वडील शाळेंत गेले व आबांना त्यांनीं मी शाळेंत येण्यास कां तयार नाहीं तें सांगितलें. त्यावर आबांनीं दिलेलें उत्तर लक्षांत ठेवण्यासारखें आहे. श्री. आबा म्हणाले "शाळेंत चार दिवसांपूर्वी येणारा मुलगा शाळा सोडून कां जातो याची आमचे वरिष्ठ (प. पू. विनायकरावजी आपटे) चौकशी केल्याशिवाय राहणार नाहींत व त्यांनीं विचारल्यास त्यांचें समाधान करणें जड जाईल. तरी तुम्ही मेहेरबानी करून असें करूं नका." अर्थात् त्या वेळीं मला शाळेंतून काढण्याचा विचार रहित झाला व श्री. आबांच्या बोंडशीच्या छडीचा मला सहसा प्रसाद मिळाला नाहीं व इतरांवरही तिचा पूर्वीहून सौम्य प्रमाणांत प्रयोग झाला!

३. टिळक शिक्षेचा दिवस

इंग्रजी १ लींत मी ड तुकडींत गेलों, तेव्हां आम्हांस श्री. निसळ व श्री. चापेकर हे शिक्षक असत व आमचा वर्ग ग्राउंडच्या तोंडाशींच दुसऱ्या मजल्यावर असे. त्या वेळीं माझ्या वर्गामध्यें म. रा. पाळंदे, हल्लीं सुरत कॉलेजचे प्रोफेसर, श्री. राजाभाऊ वर्तक, श्री. ग. ति. वैद्य, हल्लीं शिक्षक न्यू. इं. स्कूल, ही मंडळी असलेली आठवतात. कै. लो० टिळकांस याच वर्षी जुलैच्या २२ तारखेस शिक्षा झाली. त्या दिवसाची स्मृति मला चांगली आहे. कोणत्या तरी कारणानें शाळा

सकाळची होती. घरांत कांहीं तरी भयंकर प्रकार झाला किंवा कोणी दगावलें म्हणजे मोठीं माणसें चिंतातुर असतात व लहान मुलें आपल्या जागीं अंग चोरून चूप बसतात तसा प्रकार आम्हां मुलांचा झाला.

४. गु. चाफेकरांचा मृत्यु

त्याच सालीं आमचे मराठीचे शिक्षक श्री. चाफेकर वारले. तेव्हां आम्ही मुलें आमचे मित्र भगीरथ वल्लभसिंग परदेशी यांच्या नेतृत्वाखालीं चाफेकरांच्या घरीं त्यांच्या जडदेहाचे दर्शनास गेलों होतों.


५. विद्यार्थ्यांबद्दलची काळजी

त्या वेळीं मिडल स्कूल, हायस्कूल स्कॉलरशिप्सकरितां आपली शाळा फार व्यवस्थितपणें खटपट करीत असे. त्या स्कॉलरशिपला वय असलेलीं मुलें निवडून काढून त्यांना खास शिक्षकांकडून शाळेमार्फत शिकवीत. हें काम त्या वेळीं इंग्लिश दुसरीचे मराठीचे शिक्षक कै. साठे मास्तर यांजकडे असे. त्या काळांत बहुधा कोणी ना कोणीतरी विद्यार्थी स्कॉलर येत असे. श्री. रघुनाथ वामन आपटे, सब जज्ज भोर; श्री. राजाभाऊ वर्तक, श्री. शंकरराव गोखले, प्रस्तुत लेखक यांना त्या वेळीं आगेमागें स्कॉलरशिप्स मिळालेल्या आठवतात. इ. स. १९०९ सालीं मी मराठी ४ थीच्या स्कॉलरशिपला बसणार होतों. त्या वर्षी ग्राऊंडवर मधल्या सुट्टींत आमचा साखळीचा खेळ चालूं होता. हा खेळ हल्लीं मुलांना येतो कीं नाहीं, तें मला माहीत नाहीं. प्रारंभीं एका मुलानें इतरांपैकीं एकास धरावयाचें; नंतर दोघांनीं हात धरून तिसऱ्यास धरावयाचें व पुढें धरलेल्या मुलांच्या दोघादोघांच्या जोडीनें पळणारीं मुलें घेऊन पकडावयाचीं, असा हा खेळ आहे. ह्या खेळांत दुसऱ्या एका मुलानें गंमत म्हणून मला 'चाट घालून' म्हणजे धांवत असतां मागून पायांत पाय अडकवून पाडलें व माझा हात दुखावला. त्याबरोबर ताबडतोब मला ऑफिसांत नेण्यांत येऊन माझा हात बँडेजनें बांधण्यांत आला. हें काम त्या वेळीं डॉ. लोहोकरे शाळेंत शिक्षक होते त्यांनीं केलें; पण प. पू. विनायकराव आपटे हे तेथें एकसारखे उभे होते व माझा हात बांधून झाल्यावर त्यांनीं श्री. दत्तोपंत जोशी मास्तर यांस—यांची माझ्या वडिलांची ओळख असे—बरोबर देऊन तांग्यांतून घरीं पाठविलें व माझ्या पथ्याबद्दल घरीं मातोश्रीस जरूर त्या सूचना दिल्या. ह्या सर्व गोष्टी कांहींशा पार्श्वाळिकपणें सांगणें हें कोणास पोरकट वाटेल; पण या सर्वांत त्या वेळच्या माझ्या शिक्षकांचें जें शाळेंतील मुलांशीं घरोब्याचें व आपुलकीचें वर्तन असे त्याची कांहींशी कल्पना यावी हा हेतु आहे. हात बांधून होत असतां प. पू. विनायकराव डॉक्टरांस म्हणाले, "डॉक्टर, ह्याला लवकर बरा करा, याला स्कॉलरशिपला बसावयाचें आहे."

६. शाळेची घंटा

त्या वेळीं शाळा तीन ठिकाणीं भरत असे—भटांचा वाडा, मोरोबादादांचा वाडा व ग्राऊंड. कॉपी व ड्रॉइंगचे वर्ग मोरोबादादांच्या वाड्यांत असत.

खालील चित्रांत दाखविल्याप्रमाणें घंटा मोरोबादादांच्या वाड्यांत गच्चीवर असून तिच्या दोऱ्या भटांच्या वाड्यांतील खिडकीला बांधलेल्या असत व भटांच्या



वाड्यावर जी एक पाटी लावलेली होती त्या पाटीवर 'येथून मुलें जातात येतात सबब गाडी सावकाश चालवावी' अशी सूचना लिहिलेली होती. कॉपीच्या तासाला आम्हांस ग्राऊंडांतून रांगेनें मोरोबादादाच्या वाड्यांत यावें लागे. केव्हां केव्हां शाळेचा 'बालू'—त्या वेळीं शाळेतल्या गड्याचें 'बालू' हें सामान्यनाम होतें, कारण एक कोंकणी बालू गोविंदा नांवाचा गडी 'जांऊं? इनाईकरांवना (विनायकराव) सांगू?' असें दांडगाई करणाऱ्या मुलांस धमकावीत असे, त्यास सर्व मुलें 'बालू' म्हणत व तो गेल्यावर इतरांसही त्याचेंच नांव पडलें—भटांच्या वाड्यांतून दोरी हालवून तासाची घंटा देतांना दृष्टीस पडे. तेव्हां मला त्याच्याजवळ जाऊन ती घंटा वाजवावीशी वाटे, पण आम्हांस कोण जाऊं देतो! त्या वेळीं आमच्यापैकीं एकानें शाळेवद्दल कटवाच्या चालीवर एक गाणें रचलें होतें. तें आठवतें तेवढें खालीं देतों.

नूतन मराठी शाळा, पहा कशी बाळा विद्या शिकवीति।
धन्य होत आईबाप मुला पाठविती।
अहो मुलें, येति शाळेसी साडे अकासी, येऊनी बसती।
तों शिक्षक ऑफिसिं जाऊनि वर्गीं येती।

अहो मजा, दिसे पोरांसि एका घांटेसि उंच टांगीती ।
किति दोन्या तिजला लांब लांब लावीती ।
आपटे हो विनायक, शाळा चालक, तयांना वदती ।
वासुदेव खालचे शाळा चालकही असती ।

हे वासुदेव म्हणजे आनंदकर्ते कै. वासुदेव गोविंदराव आपटे. पद एवढेंच आठवतें. पण पुढील ओळींतून त्या वेळचे केसकर मास्तर—हल्लींचे केसकरमहाराज—यांचाहि उल्लेख असल्याचें स्मरतें.—काव्यशास्त्रनिष्णुर लोकांना आम्हीं या काव्यांत शब्दांचे किती हाल केले तें दिसेल. पण सहृदय जनास त्या ओळींत व्यक्त होणारा बालस्वभाव व शाळेवरील प्रेम हीं त्याबरोबर ध्यानांत येतील.

७. विनायकरावांचा दरारा

प. पू. विनायकरांवाच्या या वेळच्या एक दोन आठवणी सांगण्यासारख्या आहेत. विनायकरावांचा शाळेंत विलक्षण दरारा असे. मधल्या सुटीनंतर घंटा होऊन वर्ग भरल्यानंतरहि कांहीं वेळ मुलांचा गलका चालू असतो. अशा वेळीं विनायकराव घाईघाईनें हातांतली छडी घेऊन ग्राऊंडच्या तोंडाशीं येऊन उभे रहात व त्यांच्या–हार्मोनियमच्या खालच्या पट्टींतील खोल कर्कश आवाजांत ते 'काय रे, काय दंगा आहे!' असें म्हणत. तेव्हां सगळीकडे एकदम थारेपालट होऊन गुपचूप होत असे. हीच परिचयाची आरोळी ते मधून मधून वर्ग चालू असतां मारीत व ग्राउंडच्या तोंडाशीं मारलेली आरोळी ग्राऊंडमधील २०।२२ वर्गांत स्तब्धता उत्पन्न करण्यास समर्थ होत असे. विनायकरावांचा 'काय रे' हा आवाज ऐकला, कीं मुलें खडबडून आपापल्या जागीं बसत, शिक्षक आवाज चढवून शिकवूं लागत, व दुर्लक्षाच्या आडवळणावर गेलेलीं मुलें व शिक्षक अध्ययन-अध्यापनाच्या चाकोरींत येऊन बसत व शाळेची गाडी सुरळीत चालूं होई. विनायकरावांची अशी आरोळी महिन्या पंधरा दिवसांनीं एकादे वेळीं ऐकूं येई.

८. विनायकरावांचा उत्साह

शाळेसंबंधीं विनायकरावांना उत्साह किती असे याची एक गंमत सांगतों. रस्सीखेंच(टग-ऑफ-वॉर)ची संवय करण्यासाठीं सायंकाळीं मुलें ग्राऊंडवर येत. तेव्हां विनायकरावही कधीं कधीं येत व मुलांना उत्तेजन देतांना, ते केव्हां केव्हां सामना चालू असतां दुर्बळ बाजूकडे आपण जाऊन दोरी ओढूं लागत. विनायकराव आपला तांबडा रुमाल, उपरणें घालून टग-ऑफ-वॉरमध्यें मिसळले म्हणजे मोठी गम्मत दिसे व या गोष्टीबद्दल आम्ही पुढें मोठे झाल्यावरही आपापसांत 'विनुकाकांची' थट्टा करीत असूं!

९. साधेपणा

इ. स. १९११ त इंग्रजी ४ थी इयत्तेंत असतांना मला इंग्रजी ३ रीच्या स्कॉलरशिपला बसण्यासाठीं शिक्षक हवे होते, तेव्हां माझे आजोबा मला घेऊन विनायकरावांच्या घरीं गेले; तेव्हां विनायकराव रात्रीच्या वेळीं धाबळी नेसून संध्या करीत होते. एवढया मोठया जागीं असलेल्या पदवीधर गृहस्थास त्या साध्या शुचिभूत वेषांत पाहून माझ्या आजोबांचा त्यांच्याबद्दलचा आदरभाव अधिक वाढला. आमच्या येण्याचा कंटाळा न करितां अगत्यानें त्यांनीं विचारपूस केली व एका यशस्वी शिक्षकास आपल्या मध्यस्थीनें अंमळ कमी रुपये फी घेऊन मला शिकविण्याची सोय करून दिली.

१०. कै० डोंगरे मास्तर

इंग्रजी तिसऱ्या इयत्तेपर्यंतच्या माझ्या शाळेंतील आठवणींचें स्मरण करीत असतां, ज्यांचें आदरपूर्वक स्मरण होतें असे गृहस्थ कै० डोंगरे मास्तर होत. हे कॉपी, इंग्रजी हस्ताक्षर, शिकवीत. अक्षराचें नीट वळण समजावून सांगण्यास ते येट मुलाजवळ येऊन बसत व अक्षराचें वळण चुकलें असल्यास ते मुलाच्या मांडीला असा चिमटा घेत, कीं ज्याचें नांव तें; व मुलगा 'हा हुई–आयाई' करूं लागला तर म्हणत, 'अरे, मलासुद्धां तुझें वाईट अक्षर पाहून असेंच वाईट वाटतें. पुनः असें वाईट अक्षर काढूं नको.' असें म्हणून हलकेंच एक छडी चमकावून ते दुसऱ्या मुलाकडे वळत. डोंगरे मास्तर आपल्याजवळ आले, कीं आतां चिमटा बसणार अशी जवळजवळ मुलांची खात्री असे.

पण यांचीच एक दुसरी आठवण सांगतों. श्री. डोंगरे दर तासाला कॉपी दोन पानें घरून काढून आणावयास सांगत, त्या तासांत दोन पानें लिहून घेत व चारी कॉप्यांवर पेन्सिलीनें मार्क देत. एक वेळ प्रस्तुत लेखकानें घरून कॉपी काढून न आणतां काढलेल्या कॉप्यांवरचे मार्क रबरानें खोडले. वर्गातील ४० मुलांच्या प्रत्येकीं ४ कॉप्यांवर एकंदर ५ मिनिटांत मार्क द्यावयाचे असतांना, तितक्या झपाट्यांतही श्री. डोंगरे यांच्या बारीक नजरेंतून रबरानें मार्क खोडले गेल्याचें सुटलें नाहीं व त्यांनीं 'मार्क खोडलेत कां!' म्हणून विचारलें. त्याबरोबर चेहरा गोरामोरा होऊन मीं 'हो' असें उत्तर दिलें व खालीं पाहूं लागलों. आतां छडीचा यथेच्छ प्रसाद मिळणार अशी अपेक्षा करतों तों काय! श्री. डोंगरे यांनीं आपला प्रेमळ हात पाठीवरून फिरवला व 'बाळ, पुनः असें करूं नकोस. खरं बोललास म्हणून तुला क्षमा केली आहे,' असें ते म्हणाले. मला राहवेना, मी रडूं लागलों. विद्यार्थ्यांच्या मनावर विलक्षण नैतिक परिणाम करण्याचें शिक्षकाच्या अंगांत केवढें सामर्थ्य असतें याचा प्रत्यय आला.

११. नव्या वळणाचे शिक्षक—बापूसाहेब सहस्रबुद्धे

इंग्रजी चवथ्या इयत्तेंत असतांना आम्हांस ज्या एका शिक्षकांचा लाभ झाला त्यांच्या शिकवण्यानें व एकंदर वागण्यानें आमच्या मनावर कायमचा परिणाम झाला. हे शिक्षक म्हणजे श्री. गं. नी. ऊर्फ बापूसाहेब सहस्रबुद्धे हे होत. हल्लीं हे सोशल सर्व्हिस लीगमध्यें यावज्जीव सभासद आहेत व अंबरनाथ मॅच फॅक्टरी-तील मजूरवर्गांत संघटनेचें काम करतात. शाळेंतील रोजच्या शिक्षणाखेरीज ते आम्हांस नवीं नवीं सोपीं इंग्रजी पुस्तकें वाचावयास देत. रॉबिन्सन् क्रूसोची गोष्ट त्यांनीं आम्हांस फार चांगल्या रीतीनें शिकविली. निव्वळ शाळेंत येणाऱ्या संबंधाखेरीज मुलांवरील प्रेमानें त्यांच्यासाठीं आपला वेळ व बुद्धि खर्च करण्यास हे तयार असत. डायरेक्ट मेथडचा प्रवेश नूतन मराठींत पहिल्यानें करून देणारे गृहस्थ माझ्या समजुतीनें हेच होत. गौर वर्ण, पाणीदार डोळे, फॅशनेबल रहाणी, बारीक आवाज, भुरे केस, अशा वेषांत श्री. बापूसाहेब मोठे मोहक दिसत व त्यांच्याबद्दल विद्यार्थ्यांस प्रेम वाटे. शिकवतांना विद्यार्थ्यांची समजूत पाडण्या-साठीं ते बोलतांना डाव्या खांद्यावर मान लववीत व एक एक शब्द सावकाश स्पष्ट बोलत. शाळेच्या बाहेरहि मुलांच्या संगतींत राहून मुलांवर प्रेम करणाऱ्या बापूसाहेबांबद्दल आजही आम्हांस फार आदर वाटतो.

१२. तारकुंड्यांचा तरतरीत तऱ्हेवाईकपणा

इंग्रजी पांचव्या इयत्तेंतील सांगण्यासारखी गोष्ट म्हणजे श्री. तेलंग हे आम्हांस जॉमेट्री शिकवीत. ह्या वेळीं श्री. तारकुंडे नांवाचा विद्यार्थी त्यांना चांगलेंच छेडीत असे. विद्यार्थी बुद्धिमान असल्यामुळें तो थोडासा मुद्दाम विक्षिप्तपणा करून त्यांना चकवीतही असे. एकदां एका रेषेचे दोन सारखे विभाग करणें ही कृति करून दाखवितांना कंपास घेऊन प्रयोग सुरू करण्याऐवजीं त्यानें हातांत सेट स्क्वेअर घेतले व फळ्याजवळ आला. श्री. तेलंग, 'हा काय करतो!' अशा मुद्रेनें त्याजकडे पहात होते व ही स्वारी फळ्याकडे तोंड करून मिस्किलपणें हसत आपलें काम करूं लागली. शेवटीं एका रेषेचे हवे तेवढे सम विभाग करा-वयाचे या कृतींत दिलेल्या पद्धतीप्रमाणें त्यानें सेट स्क्वेअरच्या साह्यानें दिलेल्या रेषेचे दोन सारखे विभाग केले व आपण आपल्या जागेवर जाऊन बसला. श्री. तेलंग यांस लवकरच तें सर्व उमगलें व ते हसत त्याजकडे पाहूं लागले!

१३. कै. रामभाऊ गोखले

इंग्रजी पांचव्या इयत्तेंत त्या वेळीं संस्कृतला कै. रामभाऊ गोखले मास्तर असत. गोखले मास्तरांचें संस्कृत शिकवणें आम्ही कधींच विसरणार नाहीं. ठेंगणी मूर्ति, डोईस पांढरा रुमाल, पांढरें उपरणें, आंखूड कोट, झुबकेदार मिशा व गरगरीत आवाज असें त्यांचें थोडक्यांत

वर्णन करता येईल. रस्त्यांत मुलें भेटलीं तर मुलांना आपल्या ओळखीची खूण देण्याकरितां ते मुलाकडे पाहून मान एका खांद्यावर कलवीत व मोठें प्रेमळ हंसत. त्या वेळीं मुलांस जो आनंद होई तो सांगतां पुरवत नाहीं. पाय आखूड असल्यानें खुर्चीवर बसल्यावर त्यांना पाय सोडून बसण्यापेक्षां मांडी घालून बसणें सोइस्कर वाटे. खुर्चीवर असें बसल्यावर ते खड्या आवाजांत शिकवूं लागत. भांडारकरांच्या पुस्तकांतील कोणत्याही धड्यांतले धड्याबरहुकूम नेमके तेवढेच शब्द मुलांस विचारतांना त्यांना समोर पुस्तक लागत नसे व विचारलेले शब्द ठराविक क्रमानेंही विचारले जात नसत. मुलांच्या लक्षांत रहाण्यासाठीं ते कांहीं गमती करीत. 'वह्' धातूचें आज्ञार्थी द्वितीयपुरुषी एकवचनी रूप 'उडि' असें समजावून सांगतांना गोखले मास्तर बुट्टीची आठवण करून देण्यास व वर्गातील मुलांस हंसविण्यास चुकत नसत. विशेषणें तिन्ही लिंगांत ओळीनें चालविण्यास मुलांना सांगतांना ते मुलांकडे पाहून 'तुम्ही पुल्लिंगीं, तुम्ही स्त्रीलिंगीं, तुम्ही नपुंसकलिंगीं' (चालवा) असें म्हणत. तेव्हां मुलें साहजिक हसत, त्यावरोबर एकदां डाव्या बाजूस, एकदां उजव्या बाजूस, वळून स्वतः किंचित् स्मित करून 'काय झालं हो! कांहीं गंमत झाली! असं!' असें विचारून 'बरं चला पुढें' असें म्हणत व पुढें शिकविण्यास प्रारंभ करीत. इं. ६ वीच्या वर्गांत तेच पुढें संस्कृत शिकवूं लागले तेव्हां 'मधुकर मदिराक्ष्याः शंस तस्याः प्रवृत्तिम्' चा ते अर्थ सांगत होते. मधल्या सुट्टीची घंटा झाली होती. हे शिकविण्याच्या ऐन रंगांत होते. इतर वर्गांतून सुटलेलीं मुलें दाराशीं घोळका करून उभीं होतीं. शिकविण्याच्या ऐन भरांत दाराशीं येऊन गोखले त्यांना म्हणाले, 'चला रे व्हा बाजूला. तुम्हांला सध्यां यांत कांहीं लाभ व्हावयाचा नाहीं.' नंतर लागलीच वर्गाकडे वळून, मुलें हसूं लागलेलीं पाहून, 'काय झालं हो! गम्मत झाली होय!' असा त्यांनीं प्रश्न केला व शिकविण्याचें काम पुढें चालूं केलें. पांचव्या इयत्तेंत 'दमयन्त्याः स्वयंवरकाले बहवो राजानः मामियं वृणीत मामियं वृणीतेति मन्यमानाः' या उताऱ्याचा अर्थ सांगतांना रामभाऊ, आपल्या गडबडीच्या आविर्भावानें सगळा वर्ग खदखदां हंसवून सोडीत. बहुतेक संस्कृत व्याकरण आम्हांस त्यांनींच शिकविलें असल्यानें संस्कृत व्याकरण शिकणें नीरस, अवघड व कंटाळवाणें आहे याची आम्हांस कधीं कल्पनासुद्धां आली नाहीं. असे ते शिक्षक होते.

१४. कै. लेलेशास्त्री

आमचे संस्कृतचे दुसरे शिक्षक कै. ल. ग. लेलेशास्त्री हे होत. यांचीही शिकविण्याची पद्धति मोठी आकर्षक असे. आकृति धीरोदात्त, उमदा चेहरा, दाढीचा ऐटदार तंग पोषाख, पायांत स्लिपर, गजगति अशा थाटानें ते

नाटकांतील मुख्य नायकाच्या आविर्भावानें मोठ्या थाटांत शिकवीत असत. त्यांची वाणी रसाळ असे. भाषा प्रौढ व संस्कृतप्रचुर असे. भाषेवर हुकमत चांगली असल्यानें वेंचक शब्द टिपून रेखल्या जागीं येत. बोलतांना आवाजास आरोह अवरोह आणीत व शब्दांवर आघात देत. लेलेशास्त्री एकसारखे बोलूं लागले म्हणजे त्यांच्या समोरचा छात्रवर्ग त्यांनीं आपल्या भाषणानें उत्पन्न केलेल्या रसांत अवगाहन करून चित्राप्रमाणें डोलूं लागे. शाकुंतलांतील दुष्यंताच्या विरहावस्थेंत त्याला कोणतें चित्र काढावेंसें वाटलें तो प्रसंग वर्णन करणारा श्लोक

कार्या सैकतलीनहंसमिथुना स्रोतोवहा मालिनी
पादास्तामभितो निषण्णहरिणा गौरीगुरोः पावनाः ।
शाखालम्बितवल्कलस्य च तरोर्निर्मातुमिच्छाम्यधः
शृंगे कृष्णमृगस्य वामनयनां कंडूयमानां मृगीम् ॥

कै. लेलेशास्त्री यांनीं इतका रसाळ, उठावदार व हृदयगंम तऱ्हेनें शिकविला, कीं तो प्रसंग रम्य, कीं त्याचें कालिदासानें केलेलें वर्णन रम्य, कीं लेले शास्त्र्यांनीं त्याची केलेली फोड रम्य, यांतील अधिक रम्य कोणतें तें सांगणें मोठें कठीण आहे.

१५. श्री. गोपाळराव गोडबोले

इंग्रजी सहाव्या इयत्तेंतील आठवण रहाण्याजोगे आणखी एक शिक्षक म्हणजे श्री. गोपाळराव गोडबोले हे होत. हे आलजिब्रा जॉमेट्री शिकवीत. यांना आम्ही मुलें 'पिंचर' गोडबोले म्हणत असूं. कारण हे मुलांस पुष्कळ वेळां चिमटे घेत. नख न लावतां चिमटा काढला तर तो अधिक लागतो तसा यांचा चिमटा असे. शिकवितांना सर्व इंग्रजींतच स्पष्ट करून सांगण्याची यांना मोठी हौस, व मुलांस समजलें नाहीं असें वाटलें तर श्री. गोपाळराव तेंच वाक्य फिरून एकवार मानेला गरका मारून हाताचें बोट पुढें करून, डोळे मोठे करून, आवाज चढवून व किंचित् टांचा उंच करून म्हणत. दिसण्यांत हे उग्र व गंभीर दिसत म्हणून मुलें त्यांना भीत असत. यशस्वी शिक्षक म्हणून त्यांची आमच्या-ही पूर्वीपासून कीर्ति असे.

१६. श्री. द. वा. पोतदार

इंग्रजी सहाव्या इयत्तेंत ज्यांची ओळख झाल्यावर पुढील आयुष्यांत ज्यांचा अखंड दृढ परिचय राहिला, असे शिक्षक श्री. द. वा. पोतदार (हल्लीं प्रोफेसर) हे होत. यांच्यासंबंधानें पुष्कळसें लिहावयाचें मनांत असूनही अतिपरिचयामुळें मनांत असणारा संकोच आडवा येतो; पण इतकें निःसंशय म्हणावेंसें वाटतें कीं, शाळेच्या उम्या आठ वर्षांच्या आयुष्यांत मजप्रमाणेंच माझ्या त्या वेळच्या इतर

मित्रांनाही ज्यांची आठवण राहिली व ज्यांच्या सहवासाचा आयुष्यक्रमावर परिणाम झाला असे शिक्षक प्रो. पोतदार हे होत. इंग्रजी चवथ्या इयत्तेंत श्री. बापूसाहेब सहस्रबुद्धे यांनीं तात्या पंतोजीचें जुनें वळण विसरावयास लावून शिक्षक म्हणजे ज्ञानाच्या शोधाच्या मार्गातील प्रेमळ मित्र अशी शिक्षकाची कल्पना आणून दिली, तर प्रो. पोतदार यांनीं विद्यार्थ्यांच्या विचारांत ध्येयवादित्व उत्पन्न केलें. श्री. बापूसाहेब म्हणजे प्रेमळपणा व प्रो. पोतदार म्हणजे स्फूर्ति अशी मी दोघांची सुटसुटित आठवण करतों. 'नूतन मराठी विद्यालय' या नांवांतील सुप्त जादू जागृत करण्याचें श्रेय यांना आहे. मराठीच्या अभिमानानें नूतन मराठी निघाली ही जाणीव प्रो. पोतदार यांनीं चालकांस करून दिली व ज्या विष्णुशास्त्र्यांच्या स्मरणार्थ ही शाळा निघाली त्यांचा केवळ नाममात्र संबंध न ठेवतां त्यांच्या जीवितसंदेशाची परंपरा शाळेंत अखंड वहात ठेवली पाहिजे हा आग्रह प्रो. पोतदार यांनीं धरला. मराठी भाषेंत विष्णुशास्त्र्यांचा उदय व नूतन मराठींत प्रो. पोतदारांचें आगमन ह्या गोष्टींत बरेंचसें साम्य नीट पाहणारास दिसेल यांत शंका नाहीं.

अगदीं आल्या दिवसापासून ह्यांचा ठराविक चाकोरीशीं उभा दावा! परीक्षेचे पेपर काढावयाचे तर प्रश्नपत्रिकेवर शाळेचें नांव इंग्रजींत असे तें मराठींत पाहिजे असा त्यांचा हट्ट. कॅटलॉगमध्यें लिहावयाचीं नांवें इंग्रजी पद्धतीप्रमाणें आडनांवाच्या प्रारंभानें सर्व लिहीत असत, तर यांचा नेहमींप्रमाणें नांव, बापाचें नांव व आडनांव लिहिण्याचा आग्रह. रीडरचें पुस्तक हातांत आल्यावर ओळीनें धडे शिकविण्याऐवजीं बेंचक धडे निवडून ज्याच्या वाचनानें दृष्टि फांकेल, स्फूर्ति उत्पन्न होईल, विचार स्फुरण पावेल असे धडे निवडून काढून ते शिकविण्याचा त्यांचा आग्रह. भाषांतर शिकवितांना त्यांनीं काळ्यांचें ठराविक ट्रान्सलेशन सोडून निवडक इंग्रजी उतारे आपण काढून त्यांचें मराठी भाषांतर केलें व त्या उताऱ्यांचें पुस्तक मुलांना भाषांतरासाठीं दिलें. इंग्रजी कविता शिकवितांना उगाच थिल्लर कविता वाचावयास न देतां सर वाल्टर स्काटच्या Breathes there the man सारख्या कविता शिकवावयाचें त्यांनीं ठरविलें. प्रस्तुत कविता वर्गांत शिकविली जात असतां प्रस्तुत लेखकास आठवतें कीं, शिक्षक व शिक्षित यांच्यांत उत्साह नुसता भरून गेला होता. मधल्या सुटीची घंटा केव्हां झाली याची उभयतांसही पर्वा राहिली नाहीं. तास संपून सुट्टीही संपण्याची वेळ आली अशा सुमारास कविता शिकविणें संपलें, उभयतांच्या मनावरील उत्साहाचा ताण ढिला पडला व मोठा श्वास टाकून सर्व बाहेर पडले. वर्गाबाहेर ऐकणाऱ्या विद्यार्थ्यांचा मोठाच घोळका जमला होता. तास संपला, पण तासाची आठवण बराच वेळ रेंगाळत राहिली.

थोडें विनोदानें नाटकी भाषेंत बोलावयाचें तर असें म्हणतां येईल कीं, कै. लेलेशास्त्री यांची वर्गांत होणारी 'एंट्री' ग्रेसफुल असे; श्री. रामभाऊ

गोखले येणार हें कळलें कीं, मनावरचा ताण ढिला पडून हंसवत्या पात्राच्या प्रवेशानें होणारा आनंद विद्यार्थ्यांना होई, आणि पोतदार येणार हें कळलें कीं, नाटकांत एखादें अनपेक्षित पात्र धाड् धाड् प्रवेश करतें व घटकाभर आतां काय होणार तें सामान्य प्रेक्षकास कळत नाहीं तसें विद्यार्थ्यांस होई. श्री. पोतदार हे जवळ जवळ अक्षरशः धांवतच वर्गांत प्रवेश करीत, व वर्गाच्या दारांत ते आले ही कल्पना विद्यार्थ्यांच्या मनांत स्थिर होण्यापूर्वीच खुर्ची टेबलाच्या खड-खडाटांत ते आपल्या जागीं स्थिर होत व शिकविणें सुरू होई. तरुण वयांतच पांढरा रुमाल, उपरणें घालून साध्या पोषाखांत वावरण्याची तरुण देशभक्तांची प्रथा इकडे जवळ जवळ यांनींच पाडली असें प्रस्तुत लेखकास वाटतें. हे त्या वेळीं अर्धा चष्मा घालीत. कै. आण्णा विजापुरकरांचाही अर्धा चष्मा असे. पोतदार, हर्डीकर, वि. द. गोखले ही कोणीतरी निराळीच मंडळी शाळेंत आली असें आम्हां विद्यार्थ्यांस तर वाटेच पण त्या वेळच्या शिक्षकांसही वाटे, असें मानण्यास जागा आहे. इंग्रजी सहावींत असतांना गु. पोतदारांच्या नेतृत्वाखालीं आम्हीं वादविवादोत्तेजक मंडळ चालविलें. त्या मंडळामार्फत झालेल्या व्याख्या-नांत गु. पोतदार यांनीं अनेक गोष्टी मुलांच्या नजरेस आणल्या. त्या वेळेसारखी वादविवादोत्तेजक सभा—कारणें कांहींही असोत पण—पुनः पहावयास सांपडली नाहीं. या सभेखेरीज गु. पोतदारांनीं मुलांसाठीं अनेक प्रयोग केले व त्यांत स्वतःचे पुष्कळ पैसे खर्च केले.

इंग्रजी सातवींत प्रो. पोतदार हे आम्हांस मराठी शिकवूं लागले. त्याच सुमारास त्यांनीं इंग्रजी ४ थीचा एक स्पेशल वर्ग शिकविण्यास घेतला. या विद्यार्थ्यां-बरोबर ते आट्यापाट्या खेळत; त्यांना ट्रिप्सना नेत; सारांश विद्यार्थ्यांच्या विविध जीवनांत पोतदार हे केवळ शिक्षक म्हणूनच नव्हे तर लंबगडी म्हणून अंशभाक् होत असत. एकंदरींत विद्यार्थ्यांच्या मनावर ध्येयवादी विचाराचा ठसा स्पष्टपणें व कायमचा उमटविण्याचें सामर्थ्य असणाऱ्या व अंधपरंपरेच्या चाकोरीशीं उभा दावा मांडणाऱ्या विरळ शिक्षकांपैकीं प्रो. पोतदार हे एक होते.

१७. श्री. ह. वि. तुळपुळे

शिक्षक या नात्यानें ज्यांचें प्रेमादरपूर्वक स्मरण होतें असे आणखी एक शिक्षक म्हणजे श्री. तुळपुळे (हल्लीं प्रोफेसर) हे होते. निर्दोष (Faultless) इंग्रजी शिकविणारे नामांकित शिक्षक म्हणून त्यांची आम्हांस चांगलीच आठवण आहे. प्रारंभीं दरारा बसविण्यासाठीं वर्गांत ते चारदोन दिवस नारसिंहाचा अवतार आणीत. पण हरिभाऊंचा स्वभाव व गंभीर नारसिंहाचा अवतार यांत छत्तिसाचा आंकडा आहे असें म्हटलें तरी चालेल. टाईम्सच्या अग्रलेखांत किंवा इतरत्र एखादी उत्कृष्ट इंग्रजी फ्रेज सांपडली कीं, त्यांना पुत्रप्राप्तीचा आनंद होई व ते संधि

साधून ती वर्गात विद्यार्थ्यांस धड्याच्या ओघांत समजावून सांगत. त्या वेळीं हरिभाऊंच्या इंग्रजी क्लासाला हल्लींच्या श्री. माटे यांच्या क्लासासारखी गर्दी होत असे. गरीब विद्यार्थ्यांस हे तत्परतेनें द्रव्यसाह्य देत.

१८. गु. नाना हर्डीकर

हे आम्हांस सातवीला गणित शिकवीत. यशस्वी, पद्धतशीर व प्रेमळ शिक्षक असा नानांचा तेव्हांच लौकिक असे. पोतदार गडगडाट करतील तर हे शांत राहतील असा दोघांच्या वागणुकींत फरक असे. पुष्कळांना नानांची शांतता व प्रेमळपणा–पोतदारांच्या धांदलीपेक्षां अधिक सात्त्विकपणाचा वाटे व त्यांच्या मनांत नानाबद्दल आदर उत्पन्न होई. आज इतक्या वर्षांनंतरही गु. पोतदार व हर्डीकर या उभयतांबद्दल आदर असणारे माजी विद्यार्थ्यांचे दोन वर्ग आहेत. शांततापिय, सहनशील, स्वार्थत्यागी विद्यार्थ्यांस नाना अधिक आवडतात. चळवळ्या धडाडीनें काम करणाऱ्या महत्त्वाकांक्षी विद्यार्थ्यांस पोतदार अधिक आवडतात. पण हे दोन्ही त्यांच्या विद्यार्थ्यांचें वर्ग 'पोतदारहर्डीकरयोः अभेदः' हें जाणून आहेत.

१९. श्री. देवमास्तर

या शिक्षकस्मृतींत एक शिक्षक राहिले ते म्हणजे देवमास्तर होत. प्रस्तुत लेखक वर्गाचा सेक्रेटरी म्हणून फी भरण्यास त्यांचेकडे येई. तेव्हां त्यांचा तो साधा चष्मा व साधी मूर्ति सराफी गादीवर बसलेली पहावयास सांपडे. वर्गाच्या फीचे पैसे घेतांना प्रत्येक नाणें निरखून घेत. कित्येक वेळां चवलीसारखें बारीक नाणें नीट पाहण्यासाठीं ते डोळ्यावरचा चष्मा कपाळावर ढकलून आपल्या डोळ्यांजवळ तें नाणें नेऊन गरगर फिरवीत व स्वतःची खात्री झाल्यावर पुढील उद्योगास लागत. शाळेच्या ऐन गरीबीच्या स्थितींत स्वतः भोजनाचें आमंत्रण आल्यास तें पतकरून अल्प पगारावर निर्वाह करणाऱ्या शाळेच्या स्वार्थत्यागी कळकळीच्या चालकांपैकीं ते एक होते. शाळेची संस्था ज्यांच्या पुण्याईनें मोठी झाली त्या व्यक्तींत त्यांना महत्त्वाचें स्थान द्यावें लागेल.

वर आठ वर्षांच्या दीर्घ कालांत ज्यांचा सहवास घडला, अशा शिक्षकांपैकीं कांहींचें स्मरण केलें आहे. ज्यांचें स्मरण केलें नाहीं ते स्मरणांत नाहींत असें मुळींच नाहीं. इंग्रजी चवथ्या इयत्तेंत आम्हांस भाषांतर व इंग्रजी कविता शिकविणारे आमचे ढवळे मास्तर आजही विद्यालयांत शिक्षक आहेत. इंग्रजी तिसरींत मराठी शिकविणारे श्री. पांडुरंगराव कुळकर्णी यांनीं मराठी चांगल्या रीतीनें शिकविल्याचें स्मरतें. इंग्रजी आंकडे घटवून घेणारे श्री. फडके आज हयात नाहींत. आवाजानें इंग्रजी शिकविणारे श्री. करमरकर–आजच्या प्रो. करमरकरांचे वडील बंधु–

यांचें विस्मरण होणें शक्य नाहीं. श्री. बापूसाहेब परांजपे, श्री. जगन्नाथरावजी टिळू, श्री. एस्. आर्. मराठे यांचा सादर उल्लेख करतों.

शाळेच्या इमारतीचें स्थित्यंतर

शिक्षकस्मृतीचें गोड काम केल्यानंतर एक प्रश्न मनास सुचतो तो हा, कीं शाळेंतील आठ वर्षांच्या आयुष्यांत मनावर काय संस्कार झाला. तेव्हांही शाळा प्रिय वाटे ती काय म्हणून! आजही शाळेबद्दल तिच्या माजी विद्यार्थ्यांच्या मनांत जें प्रेम वाटतें त्याचें बीज काय! एका अर्थानें मुलांनीं फी दिली, शिक्षकांनीं पगार घेतला, चालकांनीं व्यवस्था पाहिली व त्या व्यवस्थेचा बराबाईट मुखाहिरा व जनतेकडून लोकशिक्षणाचें कार्य करीत असल्याबद्दलचा आदर संपादिला; यांत प्रत्येकास त्याच्या मेहेनतीचा मेहेनताना मिळाला. अशा स्थितींत कोण कुणाचें काय लागतो! दिवसेंदिवस कित्येक शाळांत हें बाजारी वातावरण निर्माण होत आहे, इकडे डोळेझांक करण्यांत अर्थ नाहीं; पण नूतन मराठीबद्दल तिच्या माजी विद्यार्थ्यांच्या मनांत असलें वातावरण निर्माण झालें नाहीं. आम्ही शिकलों त्या ग्राउंडांत हल्लीं पूर्वीची मातीचें काम केलेली साधी इमारतही नाहीं, भटांच्या वाड्यांत दुकानें आलीं आहेत, व मोरोबादादांच्या वाड्यांत जेथें आमचा ७ व चा वर्ग होता तेथें हल्लीं हॉटेल आलें आहे. नूतन मराठीचें ठाणें मोरोबादादांच्या वाड्यांतून उठल्यावर कांहीं दिवस लोकसंग्रह प्रेस, माटे, भोपटकरांचे वर्ग यांनीं त्या वाड्यांची लाज राखली होती; पण आज बाजारवस्तींत असलेला तो वाडा दुकानांनीं गजबजलेला पाहून, इतिहासप्रसिद्ध मोरोबादादांच्या वाड्यांची पेशवाईपासून तों तहत आजपर्यंतचीं स्थित्यंतरें मनांत आलीं, म्हणजे त्या आठवणीनें ऊर भरून येतो व 'कालाय तस्मै नमः' म्हणण्याची इच्छा होते.

नूतन मराठींत कोणतीं मुलें येत?

नूतन मराठीबद्दल प्रेम वाटण्याचें तसेंच कांहीं एक कारण आहे. कां कुणास ठाऊक? पण पारशी, मुसलमान, ख्रिस्ती, किंवा हिंदु असून पाश्चात्य चालीरीतींत वाढलेला, हिंदी संस्कृतीच्या परंपरेपासून अंमळ निराळे विचार बोलणारा असला मुलगा पुण्यांतील शाळा पसंत करतांना सहसा नूतन मराठी पसंत करावयाचा नाहीं. 'जाऊं द्या, त्या भटजी लोकांच्या शाळेंत कोण जातो!' असें म्हणून तो स्वतःशींच नाक मुरडील, व सहसा नूतन मराठींत जाणार नाहीं. तसेंच वयस्क, थोराड, टोंगळ, दाढीमिशावालीं निबर मुलें नूतन मराठी पसंत करावयाचीं नाहींत. कोणत्या शाळेंत कोणतीं मुलें यावयाचीं याची एक अलिखित परंपराच पडत असते. ती मुद्दाम कोणी पाडीत नाहीं; पण पडते मात्र खरी. दोष म्हणून असेंहि सांगतों, कीं चौफेर, गुंड, खेळाडू व भावी आयुष्यांत फोफावून यशस्वी होणारीं व आपल्या मनुष्यत्वाची उंची झेप घेऊन वर

नेणारीं अशीं मुलेंहि नूतन मराठींत थोडींच. नूतन मराठींतील मुलें बाळबोध, मध्यम स्थितींतील पांढरपेशा वर्गाचीं मुलें. हुशार असतील ते स्कॉलरशिपा मिळवितील, आय्. सी. एस्. होतील, नाहीं तर बरच्या सरकारी नोकऱ्या मिळविण्याचें प्रावीण्य संपादन करतील; मध्यम, वकील डॉक्टर शिक्षक होतील; सामान्य कारकून, रेल्वे नोकर बनतील, व कोणी आपल्या शाळेच्या आठवणी काढीत आपला घरचा धंदा पहात रहातील. अशीं मुलें नू. म. विद्यालयांत येण्याची परंपराच असे. अगदीं टाकाऊ व अति धाडशी, अट्टल बिलंदर व नवी प्रथा पडणारे बहादर अशा समाजाच्या दोन टोंकांवरच्या व्यक्ति नू. म. विद्यालयानें समाजास पुरविल्या नाहींत. ज्यांच्या हालचालींवर व श्रमावर जगाचा रोजचा व्यवहार व रहाटगाडगें चालतें अशीं विश्वाच्या रहाटगाडग्यांतील लहान मोठीं चक्रें नेहमींप्रमाणें पण सचोटीनें फिरविणारे विद्यार्थी नूतन मराठींतून निघाले.

शिक्षकांचे स्वभावविशेष

नूतन मराठीला नांवाजलेले टिळक-आगरकर कधीं लाभले नाहींत. पण नूतन मराठीसंबंधानें असें म्हटलें पाहिजे कीं, तिला लाभलेला कायमचा शिक्षकवर्ग बहुंशीं आपला शिक्षकाचा पेशा आवडणाऱ्या जातिवंत शिक्षकांचा होता. त्यांची उंची लहान असेल, पण त्यांची संस्थेविषयींची काळजी मोठी होती. राजकारणांत त्यांना कळत नसेल, पण संस्था चालविण्याची त्यांना जबाबदारी वाटे, व ती पार पाडली पाहिजे अशी त्यांना सदैव जाणीव असे. म्युनिसिपालिटींत त्यांच्यापैकीं कोणी निवडून आलें नसेल, पण गांवकारभारापेक्षां शाळेच्या कारभारांत त्यांना आपलें विश्व वाटे, व तेथेंच ते आपुलकीनें गुंतून रहात. संस्थेची काळजी विनायकरावांना व त्यांच्या सहकाऱ्यांना झोंप येऊं देत नसे व अमूक एका बाबतींत आपण मागें पडतों असें वाटून आपल्या विशिष्ट कृतीनें तें सिद्ध होईल व उणीव भरून निघेल असें वाटलें तर नूतन मराठीचे चालक तें करून दाखविण्यास सिद्ध असत.

त्याचा विद्यार्थिवर्गावर परिणाम

अत्यंत कळकळीच्या चालकवर्गानीं चालविलेल्या शाळेंत मध्यम वर्गाचीं शिकणारीं मुलें त्याच मासल्याचीं बनावयाचीं हें उघड आहे. नूतन मराठीबद्दल जर माजी विद्यार्थ्यांना आपलेपणा वाटत असेल तर तो प्रारंभीं मध्यम असूनही आपल्या सत्त्वस्थरणानें व कळकळीनें उंचावलेल्यांच्या बरोबरीचें स्थान पटकावणाऱ्या चालकवर्गाच्या चिकाटीमुळें होय असें प्रस्तुत लेखकाचें स्पष्ट मत आहे.

नू. म. विद्यालयाच्या विद्यार्थ्यांचें आणखी एक लक्षण सांगून ही आठ वर्षांची कंथा पुरी करतों. साध्या राहणींत राहून समाजसेवा करणाऱ्यांत नू. म. विद्यालयाचे बरेच विद्यार्थी सांपडतील.

सात वर्षांतील स्थित्यंतर

प्रस्तुत लेखकास सात वर्षांनंतर म्हणजे इ. स. १९२१ सालीं त्याच शाळेंत शिक्षक होण्याचा योग आला तेव्हां इ. स. १९१४ च्या मानानें शाळेंत कितीतरी स्थित्यंतर झालें होतें. जुनी इमारत गेली, नवी तिमजली शोभिवंत ऐसपैस इमारत व भव्य वर्ग त्या जागीं आले; बाकें गेलीं, डेस्कें आलीं; खडूचे गोळे गेले, खडूच्या कांड्या आल्या; द फक्त अगदीं वरच्या वर्गांसच पदवीधर शिक्षक पूर्वी लाभत ते आतां खालीं इंग्रजी चवथीपर्यंत सर्वत्र दिसूं लागले. शाळेंत एम्. ए. मास्तर हा पूर्वी 'वदतो व्याघातः' असे. एम्. ए. म्हणजे प्रोफेसर असा पर्याय असे. तो संकेत बदलून एम्. ए. मास्तर दिसूं लागले. स्पष्ट कबूल करावयाचें तर पूर्वीचे तुटपुंजे पगार मागें पडून वरच्या शिक्षकांस एकंदरीनें कमी असले तरी पूर्वीच्या मानानें बरेच पगार मिळूं लागले. शिक्षकांस प्रथम १०० रुपये पगार देतांना जुन्या वळणाच्या देव मास्तरांत अंमळ निराळें निराळें वाटूं लागल्याचें त्या शिक्षकांनीं आम्हांस सांगितल्याचें स्मरतें.

१९२१ च्या विद्यार्थ्यांत व पूर्वीच्या विद्यार्थ्यांत काय फरक दृष्टीस पडला तें सांगणेंही मोठें मनोरंजक होईल. पण इ. स. १९२१-२६ तील माझी आठवण म्हणजे शिक्षक म्हणून आठवण. तेव्हा त्यांत दृष्टिभेदाचा फरक असावयाचाच. तो पतकरून हें तुलनेचें अप्रिय काम करण्यापेक्षां इ. स. १९२१ त जे विद्यार्थी होते अशा एखाद्या तरतरीत गृहस्थाकडे हें काम सोंपवून नू. म. विद्यालयाच्या माजी व विद्यमान विद्यार्थ्यांची रजा घेतों.

लेखकः—शि. ल. करंदीकर, एम्. ए., एल्एल्. बी.

नूतन मराठींत कां आलों?

१९१४ सालीं डिसेंबर अखेरीस मी पुण्यास आलों. मॅट्रिकपर्यंतचें शिक्षण महाड येथें झालें; पण तेथील म्युनिसिपल स्कूलला त्या वेळीं मॅट्रिकचा वर्ग जोडलेला नसल्यानें मला महाड सोडावें लागलें. महाडहून पुण्यास येणारे विद्यार्थी प्रायः न्यू. इं. स्कूलमध्यें जात. कै० कृष्णाजीपंत ओक, कै. बंडोपंत गोरे, गु. रा. चिंतोपंत धारप इत्यादि न्यू इंग्लिश स्कूलमधील शिक्षकांचा महाडाशीं जिव्हाळ्याचा संबंध असल्याकारणानें महाडकर विद्यार्थ्यांना न्यू इं. स्कूल जवळचें वाटत असे हें स्वाभाविक होतें. माझ्यापूर्वी एक वर्ष महाडाहून पुण्यास आलेले श्री. खांडेकर,

श्री. केशवराव ओक प्रभृति मंडळी न्यू स्कूलमध्येंच होती. माझ्याबरोबर आलेले माझे वर्गबंधु कै. मोघे हेहि न्यू स्कूलांत जाण्याचें ठरवून आले होते. असें असून मी मात्र नूतन मराठी विद्यालयाकडे वळलों याचें कारण गु. रा. हरिभाऊ तुळपुळे (हल्लींचे प्रो० तुळपुळे) यांची ओळख हें होय. मी पांचवींत महाडास असतां प्रो. तुळपुळे हे सुमारें चार महिने शिक्षक म्हणून महाडास आले होते व आमच्या वर्गावरच त्यांचे फार तास असत. त्या वेळींच त्यांनीं मोठ्या अगत्यानें मला बजाविलें होतें कीं, पुण्यास आलास तर आमच्या नूतन मराठी विद्यालयांत ये. हरिभाऊंमुळें मी नूतन मराठी विद्यालयांत आलों व माझे महाडचे एक सहाध्यायी रा. कुशाभाऊ अधिकारी हेहि माझ्याबरोबरच आले.

पहिल्या दिवसाची आठवण

नाताळची सुटी संपून शाळा सुरू होण्याच्या दिवशीं म्हणजे ३ जानेवारी १९१५ या दिवशीं नांव घालण्याच्या निमित्तानें मी शाळेंत गेलों. त्या वेळीं शाळेची कचेरी भटांचे वाड्यांत होती व मॅट्रिकचे वर्ग मोरोबादादांचे वाड्यांत असत. माझें सर्टिफिकेट महाडाहून यावयाचें होतें; मजजवळ सहावीच्या वार्षिक परीक्षेचा निकाल-तक्ता मात्र होता. मी कचेरींत गेलों व बाकावर बराच वेळ बसलों. सर परशुरामभाऊ कॉलेजचे सरकारकून रा. दत्तोपंत बापट हे त्या वेळीं शाळेच्या कचेरी-कामाकडे असत. त्यांच्या पायांतील बूट, पोषाखाची टापटीप, डोळ्यांतील चमक वगैरेंमुळें मला बराच वेळ असें वाटत राहिलें कीं, शाळेचे मुख्याधिकारी हेच असावे. पुढें कांहीं वेळानें प्रो. तुळपुळे आले व माझी पूसतपास करून गेले. त्यांच्या बोलण्यावरून मला कळलें कीं, सुपरिंटेंडंट निराळेच आहेत. सरकारकून जर इतके रुबाबदार तर शाळेचे मुख्याधिकारी काय असतील असें सम वैराशिक मी आपल्या मनांत सोडवीत बसलों असतां प्रि. विनायकरावजी आपटे आपल्या साध्यासुध्या पोषाखांत बाहेर आले. त्या वेळीं त्यांच्या अंगांत जाकीट होतें व डोक्याला हंगेरियन टोपी वांकडी बसवलेली होती असें मला चांगलें स्मरतें. याराेच्या सौंदर्याबद्दल अवाच्यासवा कल्पना बांधून बसलेल्या वर्ड्स्वर्थला "And, is this Yarrow ?" असा निराशागर्भ प्रश्न विचारावा लागला तसाच प्रसंग त्या वेळीं मजवरहि आला.

मोरोबादादांच्या वाड्यांत ३॥ महिने

जानेवारीच्या आरंभीं मी सातवी-अ मध्यें दाखल झालों, तेव्हांपासून उन्हाळ्याची सुटी होईपर्यंत आमचे वर्ग मोरोबादादांच्या वाड्यांत होते. नंतर जूनपासून बहुतेक सर्व वर्ग नव्या इमारतींत आले. मोरोबादादांच्या वाड्यांतील या साडेतीन महिन्यांची मला फार चांगली आठवण राहिली आहे. त्या वेळीं आम्हांला जे शिक्षक होते त्यांत कै. **दामुआण्णा चिपळूणकर** हे इंग्रजी, व्याकरण वगैरे

कांहीं विषयांचे शिक्षक होते. दामुअण्णा मोठे प्रेमळ व विनोदी गृहस्थ होते. त्यांच्या स्वभावांतील उमदेपणा मला पुढें १९२१ सालीं चांगला पटला. (या वेळीं ते व मी दोघेहि शिक्षक म्हणून म. ए. सोसायटीच्या हायस्कूलांत होतों.) पण या साडेतीन महिन्यांत दामुअण्णांनीं चांगलीच आठवण राहील अशा रीतीनें आम्हांला वागविलें. नेस्फील्ड च्या व्याकरणांतील 'Water to drink is scarce in this place' 'Drinking write is scarce in this place' या नमुन्याचीं २०।२५ वाक्यें ते आम्हांला पाठ करून आणायला सांगत व तीं पाठ झालीं नाहींत म्हणजे 'Write it out a hundred times' असें फर्मावीत. प्रसंगविशेषीं शंभरांवर एक शून्यहि सहज येऊन बसे. एकदोन प्रसंगीं हें सहन केल्यावर मग असें वाटूं लागलें कीं, नको तें व्याकरण व नको ती मानहानि! मधल्या सुटींनंतरच्या या व्याकरणाच्या तासाला 'बुट्टी' मारण्याला मीं सुरुवात केली व वर्गांत येण्याला जिन्याच्या बाजूनें जो चोर-दरवाजा असे त्यांत येऊन अलगत उभें राहण्याचा क्रम सुरू केला! या ठिकाणीं मला रा. गणपतराव (कै. हरिभाऊ आपटे यांचे सापत्न बंधु) हे वारंवार भेटत व वर्गांतील इतरहि बालगोपाल अधूनमधून भेटत असत.

लेखक : श्री. भास्कर भुंडिराज ओंकार.

इ. स. १८८८ च्या सुमारास मी इंग्रजी पहिल्या इयत्तेंत अगर दुसऱ्या इयत्तेंत होतों. आमचा वर्ग मोरोबादादा फडणीस यांचे वाड्यांत तळमजल्यावर पहिल्या चौकांतील एका दालनांत बसत असे. त्या वेळीं त्याच चौकांतून परभारें श्रीजोगेश्वरीच्या बोळाकडे जाण्याकरितां खासगी दरवाजा व रस्ता असे व त्या बाजूलाच एक मोठा शेवाळ असलेला पाण्यानें भरलेला हौद असे. उन्हाळ्यांत एक दिवस सकाळची शाळा असतां सहज लीलेनें हौदाचे कांठावर चढून चालत होतों तों पाय घसरून हौदांत पडलों. पोहतां येत नव्हतें. जवळच्या वर्गांतून शिक्षक व मुलें धांवून येऊन त्यांनीं मला बांचविलें.

त्या वेळचे शिक्षक केवळ ठराविक घंटे शिकवीत नसत. त्याच्याबरोबर त्या वेळच्या सामाजिक व राजकीय गोष्टींचीहि माहिती देऊन मुलांना नैतिक शिक्षणहि देत असत. त्यांचीं कांहीं उदाहरणें:

श्री. सिनकर हे 'सद्वर्तन' वाचनपुस्तक शिकवीत असतांना ओघानें पुस्तक मिटून सर्व तासभर त्या वेळच्या राजकीय व सामाजिक पुढारी लोकांचें चरित्र परिणामकारक रीतीनें मुलांच्या हृदयांत बिंबवीत असत. ज्याचें त्यानेंच शुद्धलेखन तपासणें किंवा परीक्षेतील लेखी उत्तरें तपासणें वगैरे किरकोळ गोष्टींत

आरंभ करून मुलांना असत्यापासून दूर राहण्यास शिकवून, मुलांची नीतिमत्ता त्यांनीं हळुहळू फारच वाढविली. अंकगणित शिकविण्याची त्यांची विलक्षण हातोटी होती.

प्रोफेसर नानासाहेब पानसे त्या वेळीं आम्हांला संस्कृत शिकवीत असत. प्रत्यक्ष शिक्षा ते सहसा करीत नसत; परंतु त्यांचा नुसता वाग्बाण इतका परिणामकारक असे कीं, त्यानें शिक्षेच्या दसपट कामगिरी होत असे. त्यांचा स्वभाव तितकाच विनोदीहि असे. कित्येक गोष्टी सांगून तासचे तास हंसविण्यांत व विनोदांत जात असत. रसिकतेचें शिक्षण मुलांना ते मार्मिक रीतीनें देत. त्या वेळचे त्यांचे सहकारी शिक्षक कै. हरिभाऊ आपटे यांची 'पण लक्षांत कोण घेतो!' ही कादंबरी 'करमणूक' पत्रांतून प्रसिद्ध होत होती. त्यांतील 'आईच्या मरण्या'चें प्रकरण अभ्यास बाजूला ठेवून वर्तमानपत्रांतून त्यांनीं विद्यार्थ्यांस वाचून दाखविलें व तें ऐकतांच पुष्कळ विद्यार्थ्यांच्या डोळ्यांतून पाणी गळूं लागलें व त्यांच्या स्वतःच्या डोळ्यांतहि अश्रु आले. अशा रीतीनें मुलांबरोबर समरस होऊन करुणरस म्हणजे काय हें त्यांनीं समजावून दिलें. या सर्व गोष्टींचा त्या वेळीं मनावर फारच परिणाम झाला, हें अजूनहि त्या गोष्टी डोळ्यांपुढें दिसत आहे यावरून समजण्यासारखें आहे.

कै. हरिभाऊ आपटे आम्हांला इंग्रजी शिकवीत असत. पोएट्री शिकवीत असतांना ते अगदीं तल्लीन होऊन जात व एक तासाचें शिक्षण कधीं कधीं सबड पाहून दीड दोन तासापर्यंतहि चालत असे.

कै. दामुअण्णा (रा. भि. कुलकर्णी) हे सुपरिंटेंडेंट असत. त्यांचा विद्यार्थ्यांच्यावर विलक्षण दरारा असे.

शिक्षकांविषयीं आदर व शिक्षकांचें मुलांविषयीं प्रेम हीं त्या काळीं जास्त दिसून येत असत.

मॅट्रिक पास होण्याकरितां पहिल्या पांच वर्षांत नूतन मराठी विद्यालयांत जें शिक्षण मिळालें तें पुढील दोन वर्षांत पुणें येथें व मुंबई येथें सरकारी इंग्रजी हायस्कूलांतहि मला मिळालें नाहीं असेंच मला वाटलें.

लेखक : रा. नारायण शंकर ब्रह्मे, बी. ए. (१९०३ ते १९१३)

रा. विनायकराव आपटे आम्हांला शाळेचे अधिकारी असें कधींच वाटलें नाहीं. आम्ही त्यांच्याकडे नेहमीं घरांतील कोणीतरी कर्ता वडील मनुष्य या नात्यानेंच पहात असूं. त्यांची शिस्तहि कडक असे. माझें शाळेंतील सर्व शिक्षण विनामूल्य झालें याचें सर्व श्रेय त्यांनाच आहे.

लेखक : ह. शि. सहस्रबुद्धे, सांगली

दोन वर्षांपूर्वी पुण्यांत आल्यावेळीं शाळेंत हिंडून आलों, त्या वेळीं भलत्याच शाळेंत शिरलों असा मला भास झाला. नवीन इमारती व सामान वगैरे पाहून मी थक्क झालों. मी हल्लीं शिक्षकाचा धंदा करीत आहें त्यामुळें मला निरनिराळे अनुभव येतात व विद्यार्थिदशेंत असतांना घडलेल्या तसल्याच प्रकारांची आठवण होते. कित्येक वेळां या गोष्टी मला मार्गदर्शक होतात; म्हणून मला असें वाटतें कीं, मी माझे शाळेंत अजून शिकत आहें.

लेखक : र. वि. करंदीकर, बी. ए., एल्एल्. बी., वकील, वऱ्हाड

गुरुवर्य विनायकराव आपटे यांची आठवण झाल्याबरोबर शाळेचें पूर्वीचें स्वरूप व संस्थेची आजची स्थिति डोळ्यांपुढें उभी राहते. प्रि. विनायकराव हे आम्हांला मॅट्रिकचे वर्गांत असतांना जनरल इंग्लिश शिकवीत असत. त्यांची अध्यापनपद्धति जरी विशेष आकर्षक नसली तरी कोणताहि विषय सुलभतेनें समजावून सांगून तो विद्यार्थ्यांच्या मनावर ठसला आहे किंवा नाहीं हें पाहण्यासाठीं ते फार काळजी घेत असत. त्यांचें सर्व विद्यार्थ्यांकडे लक्ष असे. त्यांची शिस्त फार कडक असे. शाळेचें कॉलेजमध्यें यशस्वी रूपांतर होऊन शि. प्र. मंडळी ही एक आदर्शभूत संस्था आहे, असा महाराष्ट्रांत लौकिक होण्यास पुष्कळ अंशीं त्यांचेच श्रम कारणीभूत आहेत.

सन १९१२-१३ सालचे सुमारास गुरुवर्य पोतदार, हर्डीकर व गोखले ही त्या वेळची अभेद्य त्रयी मंडळीचे शाळेला येऊन मिळाली. त्या वेळचें त्यांचें ध्येय आजन्म ब्रह्मचारी राहून लोकशिक्षणाला स्वार्थत्यागपूर्वक वाहून घेण्याचें होतें त्यामुळें व आपल्या शिकविण्याच्या चित्ताकर्षक पद्धतीमुळें ते विद्यार्थ्यांना आदर्श शिक्षक म्हणून वाटत असत. गुरु व विद्यार्थी यांच्यामध्यें तोंवेळपर्यंत असलेला परकेपणा त्यांनीं विद्यार्थ्यांशीं समरस होऊन प्रथम घालवून टाकला. गुरुजींबद्दल विद्यार्थ्यांना केव्हांहि आदर हा वाटलाच पाहिजे व त्यांनीं (गुरुजींनीं) तो आपल्या आचरणानें उत्पन्नहि केला पाहिजे. पाश्चिमात्य देशांत छात्र व आचार्य यांच्यांमध्यें जो एक तऱ्हेचा प्रेमभाव व आपलेपणा दिसून येतो, तो आमच्या संस्थेंत उद्भूत करण्याचें श्रेय वरील त्रिमूर्तीबरोबर प्रो. हरिभाऊ तुळपुळे यांनाहि दिलें पाहिजे. हे सर्व आचार्य छात्रगणांबरोबर मिसळून मिसळून राहून व्यायामविषयक खेळहि खेळत असत. त्यामुळें त्यांचेवर विद्यार्थ्यांचा फारच लोभ जडला. आमच्या मध्यें स्वाभिमानबुद्धि व स्वदेशावरील प्रेम उत्पन्न करण्यास हे सर्व कारणीभूत झाले. परंतु त्यांतील मुख्य वाटा प्रो. दत्तोपंत पोतदार यांच्याकडेच येतो.

गणितासारखा रूक्ष विषय फारच लीलेनें व विद्यार्थ्यांना पटेल अशा तऱ्हेनें शिकविण्याची गुरुवर्य प्रोफेसर हर्डीकरांची हातोटी वाहवा करण्यासारखी असे.

पुढें कांहीं दिवसांनीं प्रो. गोखले फर्ग्युसन कॉलेजांत गेले. बाकींच्या उपरि-निर्दिष्ट आचार्यांनीं आपली संस्था नांबारूपाला आणून त्यांत ते आजन्म सेवक म्हणून काम करीत आहेत. अजूनहि मी व आमचे वेळचे व नंतरचे विद्यार्थी पुण्याला आले म्हणजे ते आम्ही काय काय करतों याची मोठ्या आस्थेनें विचारपूस करतात. यशस्वी आचार्य म्हणजे काय व त्याची गुरुकिल्ली कशांत आहे यांचें प्रत्यक्ष उदाहरण म्हणजे प्रो. दत्तोपंत पोतदार, प्रो. त्र्यंबकराव हर्डीकर व प्रो. हरिभाऊ तुळपुळे हे होत. प्रो. पोतदार यांच्या शिकवणीमुळेंच मी येथें शिक्षणप्रसारक मंडळ नांवाची संस्था सन १९२८ मध्यें काढली.

इंग्रजी ५ व ६ वर्गांत असतांना गुरुवर्य रामभाऊ गोखले आम्हांला डॉ. भांडारकरांचें २ रें संस्कृत पुस्तक शिकवीत असत. डॉ. भांडारकरांचीं दोन्ही पुस्तकें त्यांना इतकीं तोंडपाठ असत कीं, एखाद्या विद्यार्थ्यानें एखादें वाक्य सोडून पुढचें वाचल्यास लगेच ते त्याची चूक त्याचे नजरेस आणीत असत. त्यांचें पाठांतर इतकें अपूर्व होतें कीं अमक्या पानावर अमुक शब्द अगर अमुक वाक्य आहे असें ते सहज सांगून विद्यार्थ्यांना चकित करून सोडीत. दोन्ही वर्षांत शिकवितांना एकदांहि पुस्तक त्यांना हातांत घ्यावें लागलें नाहीं इतका त्यांचा आपल्या स्मरणशक्तीवर दांडगा विश्वास होता. इन्स्पेक्टर सुद्धां त्यांच्या स्मरणशक्तीमुळें आश्चर्य चकीत होत असत. विद्यार्थ्यांना ते फारच प्रेमळपणानें वागवीत असत.

मी व माझे सहाध्यायी नू. म. विद्यालयांत असतांना आम्हांला लेलेशास्त्री संस्कृत व मराठी शिकवीत असत. काव्यांतील पदच्छेद व अलंकार समजावून देतांना त्यांच्या चित्तवृत्ति तल्लीन होऊन जात असत. त्यांची वाणी फार मधुर व रसाळ असल्यामुळें काव्यांत ते रस उत्पन्न करीत असत. कालिदासाचे रघु-वंशांतील, मेघदूतांतील व शाकुंतलांतील कांहीं प्रसंग ते फारच बहारीचे शिकवीत व अभिजात अभिनयानें ते विद्यार्थ्यांवर छाप बसवून त्यांना आपल्या विद्वत्तेनें गार करून टाकीत असत. मोरोपंतांची केकावली त्यांनींच शिकवावी. त्यांची काव्य म्हणण्याची पद्धति, उपमा व अलंकार खुलवून सांगण्याची हातोटी, रसपरिपोषाकरितां प्रसंगोपात्त अभिनय, रुबाबदार व आकर्षक चेहरा व गाढ विद्वत्ता, चिकित्सक बुद्धि या समुच्चयामुळें ते यशस्वी शिक्षक झाले. त्यांचा तास कधींच कंटाळवाणा वाटत नसून उलट लवकर कां संपला असें वाटे.

लेखकः श्री. अनंत बळवंत आगाशे

सन १९०४ मध्यें शाळेचें सम्मेलन करण्यांत आलें. त्या वेळीं मनोरंजनाकरितां म्हणून संस्कृत, मराठी व इंग्रजी नाटकांपैकीं कांहीं प्रवेश करून दाखविण्यांत आले होते. नाटकाच्या कामीं लागणारें शिक्षण म्हणजे अंगविक्षेप, प्रसंगानुरूप चेहेऱ्यावर उमटणारे विचारतरंग वगैरे त्या वेळचे शिक्षक रा. रा. **विश्वनाथपंत केसकर** यांनीं दिलें. ग्यादरिंग झाल्यानंतर शाळेला आठ दिवसांची सुट्टी झाली. पुन्हां शाळा सुरू झाल्यानंतर एकदोन दिवसांनीं मी व बळवंतराव मुजुमदार उशिरां आलों. हजेरीच्या वेळीं आम्ही दोघे त्यांच्या दृष्टीस पडलों. त्याबरोबर **गु. बाबा केळकर** म्हणाले, " दोन दिवस तुम्ही दिसलां नाहीं, म्हणून मला वाटलें कीं, तुम्हीं नाटक कंपनी काढण्याच्या विचारांत गुंतलां आहांत. " बाबांना असें वाटण्याचें कारण, नाटकांच्या प्रवेशांत आम्ही दोघांनीं प्रमुख भाग घेतला होता व ग्यादरिंग सुरू करण्याची खटपट आम्हांलाच करावी लागली.

गुरुवर्य बाबांच्याकडे इंग्रजी ६ व ७ इयत्तांना संस्कृत शिकविण्याचें काम होतें. शिकविण्याच्या नादांत तास संपून गेल्याचें त्यांना भान रहात नसे म्हणून ते नेहमीं शेवटचा तास घेत असत. इंग्रजी सहावींत असतांना तास संपून शाळेची घंटा होऊन गेली होती. बराच वेळ झाल्यानंतर सखारामपंत आपटे यांची व्यायाम करण्याची वेळ झाली आहे, सबब त्यांनीं व्यायामशाळेंत जाण्याकरितां परवानगी मागितली. बाबांना फार राग आला व म्हणाले कीं, जर संस्कृतचें अध्ययन जास्त झालें आहे असें वाटत असेल तर घरीं स्वस्थ बसावें, शाळेंत येण्याचें कारण नाहीं. सखारामपंत गप्पच बसले. थोड्या वेळानंतर वर्ग सोडून दिला. बाबांच्या मनाविरुद्ध कोणतीहि गोष्ट करणें फार कठीण जात असे.

लेखकः श्री. वि. कृ. जोशी, बी. ए., एल्एल्. बी. (एडन)

शाळेसंबंधीं आठवणी लिहावयाच्या म्हणजे आयुष्यांतला एका अत्यंत उत्साहयुक्त आणि आनंददायक भागाचा इतिहास लिहावा लागेल. शाळेंत मी प्रथम इंग्रजी दुसरींत दाखल झालों. तेव्हांपासून मॅट्रिक होईपर्यंतचा माझा सर्व काळ माझ्या अनेक संवगड्यांच्या आणि प्रेमळ शिक्षकांच्या आठवणींनीं भरलेला आहे. शिक्षकांशीं भांडणेंहि होत. पण त्या भांडणांतहि मौज असे. अभ्यासाशिवाय इतर अनेक गोष्टींत भाग घेण्याची संधि मला शाळेंत असतांना मिळाली. त्याचा मला आयुष्यांतल्या ' धकाधकीं 'त पुष्कळ उपयोग होत आहे, अशी माझी समजूत आहे. ज्या वेळीं दुःखानें मन ग्रस्त होतें, त्या वेळीं शाळेंतल्या आणि कॉलेजांतल्या आठवणींनीं त्या दुःखाचा भार कित्येक वेळीं हलका केला आहे. त्या आठवणींचा

सांठा हा माझा मौल्यवान् खजीना आहे. सर्व आठवणी लिहिणें शक्यहि नाहीं आणि इष्टहि नाहीं. आपल्या आज्ञेप्रमाणें दोन आठवणी खालीं देत आहें.

मी सहावींत होतों त्या वेळीं वर्गसंमेलन झालें त्या दिवशीं रात्रीं कांहीं नाट्यप्रयोग झाले, त्यामुळें बहुतेक रात्र जाग्रणांत गेली. दुसरे दिवशीं सकाळीं ६॥ वाजतां वार्षिक उपदेशाला यावयाचें होतें. परंतु कार्यक्रमांत किंचितहि उशीर सुपरिंटेंडेंट रा. सबनीस यांनीं खपूं दिला नाहीं व उशीरा येणारांस कडक शिक्षा केली. मला फार राग आला होता. लिमयेप्रभृति गुरुवर्यांनीं मला आवरून धरिलें व माझी समजूत केली. त्या वेळच्या त्यांच्या प्रेमळ कृतीचें स्मरण माझ्या मनांत कायमचेंच राहील.

सातवींतील गोष्ट. मी डिबेटिंग क्लबचा सेक्रेटरी होतों. अत्यंत विद्यार्थिप्रिय शिक्षक प्रो. नारळकर यांचे प्रेरणेनें डिबेटिंग क्लब फारच जोमानें चालला होता. प्रत्येक व्याख्यानास २०० । २५० लोक हजर असत. एकदां एक राजकारणी विषय आम्हीं बादास सुचविला तो सुपरिंटेंडेंट रा. सबनीस यांनीं नापसंत केला. विद्यार्थ्यांच्या हक्कांचा उपमर्द समजून मीं चिटणीसाच्या जागेचा राजीनामा दिला. दुराग्रह धरूं नये म्हणून सबनीस यांनीं मला उपदेश केला, त्या वेळीं मला तो पटला नाहीं आणि मीं राजीनामा दिला तो दिलाच. पण त्यांच्या उपदेशाचें महत्त्व मला नंतर कळून आलें. केवळ सार्वजनिक कामांतच नव्हे पण खाजगी व्यवहारांतहि सबनिसांच्या म्हणण्याचें महत्त्व पदोपदीं पटतें. नेहमीं आठवणींत ठेवण्यासारखा हा उपदेश नाहीं असें कोण म्हणेल !

लेखकः वि. रा. देशपांडे, बी. ए.

१९११ सालची गोष्ट. त्या वेळीं मॅट्रिकला इंग्रजीसाठीं ठराविक पुस्तकें नसत; यामुळें नापास होण्याची फार भीति वाटे. गु. विनायकराव आपटे जनरल इंग्लिश शिकवीत असतां त्यांनीं आम्हांस मिसेस हेन्री वुडची 'चानिंग' ही कादंबरी सुरू केली.

रोज सकाळीं नियमितपणें मोरोबादादांच्या बाड्यांतील कॉफीहालांत विनायकरावजी ओव्हरकोट घालून शिकविण्यास हजर असत ! आम्हां विद्यार्थ्यांचा आनंद त्या वेळचा काय सांगावा ! पुणें शहरांत ठिकठिकाणीं खाजगी क्लास सुरू असतांना व त्या त्या विषयांचे तज्ज्ञ मास्तर शिकवण्यास तयार असतांना केवळ "पैसा नाहीं" म्हणून विन्मुख परत येण्याचा अनुभव असणाऱ्यांना रा. विनायकरावांनीं अत्यंत कळकळीनें वरील मोफत क्लास चालवल्याचें पाहून किती आनंद वाटला असेल, याची कल्पनाच करावी ! त्या वेळीं आमची शाळा चुन्या मोरोबादादांच्या बाड्यांत, तर न्यू इंग्लिश स्कूल हल्लींच्या त्यांच्या नाना बाड्यांत !

परंतु विनायकरावांसारख्या निःस्वार्थी व अत्यंत कळकळीचे सुपरिंटेंडेंटाशिपखालीं शाळेची अत्यंत भरभराट झाली व इतर कोणत्याहि शाळेपेक्षां आपले शाळेचा रिझल्ट उत्तम लागतो आहे याला कारण रा. विनायकरावांची तादात्म्य पावून शिकाविण्याची कळकळ! मॅट्रिकच्या परीक्षेंत उत्तम निकाल लागण्याची परंपरा अजूनहि टिकली आहे. याला कारण त्यांच्या तालमींत तयार झालेला शिक्षकवर्ग होय.

आज शाळेच्या व कॉलेजच्या अध्यापकवर्गांत महाराष्ट्रांतील कसलेले साहित्यसेवक असून कोणी भारत इतिहास संशोधनकार, तर कोणी कवि, कोणी ग्रंथकार तर कोणी अंत्यजोद्धारक, कोणी क्रिकेटर तर कोणी तत्त्वज्ञानी अशी नाना तऱ्हांचीं व नाना व्यवसायांची मंडळी एक ध्येयानें प्रेरित होऊन आपल्या शाळेच्या लौकिकांत भर घालीत आहेत या सर्वांस कारण रा. विनायकरावांची अंतःप्रेरणाच कारणीभूत असली पाहिजे. "निर्वाहः प्रतिपन्नवस्तुषु" हें तर शाळेचें ब्रीदच आहे. त्यांतच विनायकरावजींच्या आयुष्याचें सर्व सार आहे. त्याचप्रमाणें आम्हा संसारचक्रांत सांपडणाऱ्या प्रत्येकाचें ब्रीद तेंच असलें पाहिजे; म्हणजे शाळेच्या ब्रीदवाक्याची शिकवण अखेरपर्यंत रोमरोमीं आपल्या प्रत्येक व्यवसायांत उतरल्यास आपल्याला आयुष्यांत कोठेंच कमी पडणार नाहीं.

लेखकः—साठे बंधु, बिस्किटांचे कारखानदार, पुणें

कारखान्याच्या दृश्य स्वरूपाचें मागें मूळ शोधीत जातां जातां, नूतन मराठी विद्यालयांतील शिक्षणपद्धतीपर्यंत जाऊन पोंचतां येईल. नूतन मराठी विद्यालयाच्या स्वावलंबी व काटकसरी विद्यार्थी तयार करणाच्या लौकिकाचा उल्लेख कै. ह. ना. आपट्यांनींहि आपल्या एका कादंबरींत केला आहे. त्यांत गुरुवर्य पोतदार, गु. हर्डीकर, गु. आपटे, कै. गु. डॉ. बझे या विशेष उत्साही व विद्यार्थ्यांबद्दल विशेष कळकळ बाळगणाऱ्या स्वावलंबनप्रिय आदर्शभूत शिक्षकांची जोड मिळालेली. अशा गुरुजनांपासून अल्पांशानें घेतलेले श्रमोपजीवी धंद्यांबद्दल आवड व आदर, स्वावलंबन, शील, चिकाटी, महत्त्वाकांक्षा वगैरे गुण हेंच या कारखान्याचें मूळचें खरें भांडवल होतें.

लेखकः—शांताराम नारायण नगरकर, बी. ए., एल्एल्. बी., मुन्सफ, जव्हार

शाळेची पहिली आठवण म्हणजे शाळेंत नांव घातल्याच्या दुसऱ्या दिवसाचीच होय. बिगर इयत्तेवर पुरंदरे नांवाचे म्हातारे मास्तर असत. उंच मूर्ति, पिकलेले केस, डोक्याला तांबडा रुमाल, कानांत रुद्राक्ष, अंगांत अंगरखा अशी ती व्यक्ति आजहि डोळ्यांसमोर उभी राहते. शाळेंत असा जाण्याचा तो पहिलाच

दिवस होता. शेजारच्या मुलाशीं कुजबूज केल्याच्या आरोपावरून मास्तरांनीं इतकी भडकावून दिली कीं त्या शिणशिण्यांची आठवण अजून आहे. आतांच्या दृष्टीनें पाहतां मुलांना मारण्याच्या बाबतींत क्रांति घडून आली आहे असें वाटतें.

इंग्रजी तीन इयत्तांपर्यंत कॉपी शिकविण्याकरितां डोंगरे मास्तर असत. त्यांचें हस्ताक्षर छान असे. तासाच्या सुरवातीला वळण दाखवीत जात आणि शेवटीं मार्क देण्याकरतां फेरी करीत. त्या वेळची त्यांची मूर्ति आजहि आठवते. काळा शॉर्ट कोट, डोक्याला टोपी, पांढऱ्या फ्रेमचा चष्मा, कोटाच्या आंतल्या खिशांत ठेवलेली एक फूट लांबीची "पंचकल्याणी" आणि अचानक डाव्या हातानें मुलाच्या बोटांवर मारलेले तडाखे, उजव्या हातानें भराभर दिलेले मार्क यांची आजहि गंमत वाटते. एक गंमत विशेष वाटते कीं त्यांनीं दिलेले मार्क कधींच चुकत नसत. घरून कॉपीचीं दोन पानें लिहून आणावयाचीं असत. कित्येक वेळां कांहीं मुलांनीं त्यांनीं दिलेले मार्क बेमालूम खोडून पुन्हा तींच पानें दाखवाबींत. आश्चर्य हें कीं, मार्क मागल्या खेपेला जितके पडले तितकेच पडत. एकहि मार्क जास्त अगर कमी पडत नसे.

इंग्रजी पांचवीवर इंग्रजी शिकविण्याकरतां केळकर मास्तर असत. ते स्वत: फार टापटिपींनें वागणारे असून मोठे हौशी होते. एकदोन वेळां ट्रिप्स् काढल्या होत्या व थोडा पदरखर्चहि केला होता. कॅमेराबद्दल एकदोन घडे होते; ते शिकवितांना प्रिंटस् वगैरे कसे घेतात हें त्यांनीं घरून सामान आणून प्रत्यक्ष दाखविलें होतें. रोजच्या व्यतिरिक्त, त्यांनीं आग्रह होऊन दर रविवारीं शेलकीं मुलें निवडून 'जनरल इंग्लिश'चा तास चालविला होता व व्हिकार ऑफ बेकफील्ड, ही कादंबरी लाविली होती. सदरचा तास हा केवळ हौसेखातर त्यांनीं चालविला होता.

इंग्रजी सहाव्या इयत्तेला य. गो. जोशी नांवाचे मास्तर इतिहास शिकविण्यास असत. त्यांच्या वागणुकीमुळें व शिकविण्याच्या पद्धतीमुळें ते विद्यार्थिवर्गांत फारच प्रिय असत. त्या वेळीं महायुद्ध चालू असल्यानें विद्यार्थ्यांनीं लढाई संबंधीं माहिती देत चला अशी विनंति त्यांना केली व त्यांनीं ती मान्य करून दर पंधरा दिवसांनीं लढाईवर एक व्याख्यान देण्याचें ठरवलें. पंधरा दिवसांची माहिती ते इतक्या मनोरंजक तऱ्हेनें व संगतवार सांगत असत कीं, "वॉर लेक्चर"चा दिवस केव्हां येतो, याची आम्ही आतुरतेनें वाट पहात असूं.

त्या वेळीं आमचा वर्ग ग्राउंडमध्यें (हल्लीं मराठी शाळा आहे तेथें) होता. वर्ग चालू असतां एका मुलाचें लक्ष बाहेर चाललेल्या ड्रिलकडे गेलें व तो त्यांतच रंगून गेला. जोशी मास्तर हे वर्गांत फेऱ्या घालतां घालतां शिकवीत असत. ते दोनतीन वेळां त्याच्या जवळून गेले, तरी त्या मुलाचें लक्ष बाहेरच. शेवटीं त्यांनीं त्या मुलाच्या पाठीवर मुसता हात ठेवला. मुलगा तंद्रीतून जागा झाला व थोडासा

ग्यालाहि. पण जोशी मास्तर विशेष कांहींच न बोलतां शिकवूं लागले. मुलाचा खजील झालेला चेहरा पाहून जवळपासचीं मुलें हंसलीं तेव्हां मास्तर म्हणाले, "त्या मुलाचा दोष यांत फारसा नाहीं. दोष माझाच आहे. माझी शिकविण्याची रीत इतकी उत्तम असावयास पाहिजे कीं, त्या मुलाचें लक्ष, समोर चाललेल्या खेळापेक्षां माझ्या सांगण्यांतच अधिक गुंतून राहील. माझ्या शिकविण्यांत कमीपणा आहे म्हणून त्याचें चित्त बाहेर गेलें. " मास्तरांच्या या बोलण्यानें आमचें प्रेम त्यांच्या ठिकाणीं जास्तच बाढलें.

लेखकः—गणेश गोविंद देव, बी. ए., एल्एल्. बी.

या शाळेंत इंग्रजी पहिल्या इयत्तेपासून आलों. सुरुवातीस ढापरे मास्तरांच्या वर्गांत बसल्याचें स्मरतें.

आमचे वर्ग त्या वेळीं 'राउंड' नांवाची जागा असे तेथें असत. शाळेंत येण्यास उशीर झालेला विद्यार्थी अगदीं भीत भीत व बिचकत येत असे. कारण दामूआण्णांची छडी अचानक केव्हां पाठीवर चमकेल याचा थांग लागत नसे! दामूआण्णांना 'काशीपासून रामेश्वरापर्यंत' लावलेलें लांबलचक आडवें गंध अगदीं आवडत नसे.

बहुतेक पांचव्या इयत्तेंत असेल. गोपाळराव गोडबोले यांचें इंग्लिश कविता-शिक्षण चांगलें आठवतें. 'साम ऑफ लाइफ' ही कविता त्यांनीं आम्हांस शिकवली. शिकवण्याची हातोटी उत्तम. इंग्लिश कवितेची गोडी येथूनच लागली.

विनायकराव आपटे यांच्या शिक्षणपद्धतीची स्मृति कधींहि बुजणें शक्य नाहीं. इंग्रजी अगर संस्कृत कोणताहि विषय असो, तो शिकविण्याची त्यांची हातोटी दुसऱ्यास साधणें अशक्य असें अद्यापहि आम्हांस वाटतें. त्यांची भाषा सोपी, साधी, सरळ पण मोहक. विद्यार्थ्यांना चट्कन् रुचेल व पटेल अशी. तींत अगडबंबपणा बिलकुल नाहीं. आपल्याला पुरकळ येतें, याचा विद्यार्थ्यांपुढें डौल मिरवण्यापेक्षां हातीं घेतलेला विषय त्यांना जास्तींत जास्ती उत्तम कसा समजेल इकडे त्यांचें सारें लक्ष. त्यामुळें ते शिकवीत असलेल्या विषयांत आम्ही अगदीं रंगून जात असूं. आणि भवभूतीनें म्हटल्याप्रमाणें ". अविदितगतयामा रात्रिरेव व्यरंसीत् " असा प्रकार होई. तास केव्हां संपे समजतहि नसे. तो संपल्यानंतर लवकर संपल्याबद्दल वाईट मात्र वाटे.

॥ श्री ॥

परमपूज्य गुरुवर्य प्रि. विनायकरावजी आपटे, बी.ए., यांचे सेवेसी,

कृ. सा. न. वि. वि. ता. ११ जुलई १९२२ पासून आपण शिक्षण-प्रसारक-मंडळीच्या सेवाबंधनांतून मुक्त होऊन विश्रांति घेणार हें कळल्यापासूनच आम्हां शिष्यवृंदांचीं मनें सुखदुःखांच्या संमिश्र भावनांनीं व्याकुळलीं ! आपण सुमारें १८९२ सालीं आमच्या परमप्रिय नूतन मराठी विद्यालयाची सेवा पत्करिली. या गोष्टीला उणीपुरीं तीस वर्षें होत आलीं. एवढ्या अवधींत पुष्कळ परिवर्त झाले गेले. पैकीं प्रेमचें नांव निघतांच अजूनहि थरकांप होतो. आपल्या कित्येक प्रेमळ सहकाऱ्यांचे त्यानें बळी घेतले ! परंतु आपण नूतन मराठीच्या सेवेचें व्रत एकनिष्ठपणें व चिकाटीनें तसेंच न डगमगतां पुढें चालविलें.

आपणच मंडळीचे पहिले ग्रॅज्युएट यावज्जीव सदस्य. आपल्याच शुभ-दायक अमदानींत १८९६ सालीं नूतन मराठीचे पहिले एकादशरुद्र मुंबई-च्या मॅट्रिक्युलेशन् परीक्षेंत एकजात चमकले ! या अकरांचे मेरुमणि म्हणजे विद्वद्रत्न कै. डॉ. घाटे हे होत ! पहिल्या झटक्यास असें अपूर्व यश आल्या-मुळें नूतन मराठी गरीब होती तरी तिची कीर्ति सर्वत्र पसरली व पुढल्या बीस वर्षांत पुण्यांतली एक अत्यंत लोकप्रिय पाठशाळा म्हणून ती गाजून राहिली. आपल्या दक्षतेमुळें व कडक काटकसरीच्या धोरणामुळें आणि आपल्या शिक्षकांच्या व सहकाऱ्यांच्या त्यागबुद्धीमुळें पन्नास हजारांची शिलक मंडळीनें अल्पावधींत गांठीं पाडली व १९१५ सालीं शहरच्या भर मध्य-वस्तींत खाजगीवाल्यांच्या ऐतिहासिक वास्तूंत मराठी शाळेसाठीं टोलेजंग इमारत उठविली ! स्वावलंबनाचें बळ व फळ आपण लोकांच्या प्रत्ययाला उत्तम प्रकारें आणून दिलें.

पाया भक्कम भरला, तेव्हां त्यावर पुढील इमारत उठविण्यासाठीं उत्साही, स्वार्थत्यागी व तरुण विद्वानांना ईर्ष्या उत्पन्न होऊन सन १९१६ सालीं न्यू पूना कॉलेजाची स्थापना झाली व सर्वानुमतें आपली प्रिन्सिपॉल-पदावर नेमणूक झाली. आपला अनुभव व आपलें दोन तपांचें अध्यापन-कार्य यांचा असा अनुरूप गौरव झालेला पाहून आपल्या जुन्या शिष्यवृंदांना मोठें समाधान वाटलें. गेलीं पांचसहा वर्षें आपण न्यू पूना कॉलेजचे प्रमुखा-ध्यापक या नात्यानें जी कामगिरी केली तिनें आपला पूर्वोक्त लौकिक व कीर्ति यांत भरच पडली आहे. प्रथम लहानशी मराठी शाळा, पुढें त्याचें उत्कृष्ट व लोकप्रिय हायस्कूल व नंतर त्यावर नवीन उच्च विद्येच्या कॉलेजचा कळस असें सुयंत्र वाढलेलें हें शिक्षणकार्य यशस्वी होण्यास आपले श्रम पुष्कळ कारणीभूत झालेले आहेत. ही गोष्ट जशी आपणांस तशीच आपल्या विस्तृत

व इतस्ततः पसरलेल्या शेंकडों शिष्यांस व मित्रांस सदैव अभिमान वाटण्यास निःसंशय साधनीभूत होईल. हें आपलें चरित्र एक प्रकारें आदर्शभूत आहे. अगदीं गरिबींत वाढलेल्या परंतु कृतनिश्चयानें ईश्वराला स्मरून एखादें सत्कार्य हातीं घेऊन चालविणाऱ्या एकट्यादुकट्या माणसालाहि किती उच्च यश संपादितां येतें याचें मूर्तिमंत उदाहरण आपण आहां.

गुरुवर्य ! आपला साधेपणा, कर्तव्यनिष्ठा व मोहवश न होतां व बिलकुल गाजावाजा न करितां शांतपणें सत्कार्यांत झटण्याझिजण्याची शिस्त यांची वाखाणणी करावी तेवढी थोडीच होईल. विद्यार्थ्यांचे मनांत ठसविण्याची आपली शैली उत्तम परिणामकारक असे. केवळ पुस्तकी विद्येवरच भर न देतां विद्यार्थ्यांचें शील तयार करण्यावर आपला योग्य कटाक्ष असे.

आपण मुद्दामच नूतन मराठीशिवाय अन्य व्यापांत विशेष लक्ष पुरविलें नाहीं. तथापि शिक्षाविचारमंडळाचे अध्यक्ष, भारतवर्षीय महिलाविद्यापीठ व मुंबई विद्यापीठ यांचे सिंडिक् व आनंदाश्रमाचे चालक ट्रस्टी अशीं जबाबदारीचीं पदें आपण भूषविलीं आहेत.

आज तीस वर्षें आपण आपलें तनमन शिक्षण-प्रसारक-मंडळीच्या सेवेस वाहिलें होतें. आतां आपण विश्रांति अनुभविण्यास जाणार किंबहुना आपला तो हक्कच आहे व तो बजाविण्याची सुसंधि ईश्वरानें आणली यामुळें आपल्या वियोगानें होणाऱ्या दुःखांत आनंदाचीहि छटा उमटलेली आढळेल.

तथापि आमची खात्री आहे कीं, आपण जरी येथून जाण्याचें ठरविलें आहे, तरी आपलें मन आपणांस स्वस्थ बसूं देणार नाहीं. तें सदैव आपल्या प्रिय नूतन मराठी विद्यालयाच्या व न्यू पूना कॉलेजच्या या पवित्र आवारांतून घिरट्या घालीत राहील ! आपली निगर्वी, शांत, साधी व कष्टाळू मूर्ती याच आवारांत रसपानादि प्रसंगीं आमच्या नेहमीं दृष्टीस पडत राहील व अन्य प्रसंगीं आपलें मानसिक दर्शन आम्हां सर्वांना घडून नेहेमीं स्फूर्ति देईल व ' निर्वाहः प्रतिपन्नवस्तुषु ' हा आपला ध्येयमंत्र आमच्या कानांत गुणगुणेल !

गुरुजी ! आपले सद्गुण स्मरून आम्ही आज आपणांस भक्तिपुरस्सर हें मानपत्र व अल्प गुरुदक्षिणा देत आहों. त्यांचा आपण प्रेमानें स्वीकार करावा व आम्हांस आशीर्वाद द्यावा ! ईश्वर चिरकाल आपणांस आयुरारोग्य देवो व आपल्या इच्छा पूर्ण करून आमच्या हातून आपणांस संतोष होईल अशीं सत्कृत्यें घडवून आपल्या मायभूमीचा उद्धार करो ही त्या दयाघनाची नम्रभावानें करुणा भाकणारे

रविवार, ता. १३ ऑगस्ट १९२२
मि. श्रावण वद्य शके ५,१८४४

आपले
नम्र हितचिंतक व शिष्य

भाग चवथा

संकीर्ण माहिती

मराठी व इंग्रजी शाळांतील शिक्षकांची यादी

कुलकर्णी रामकृष्ण भिकाजी
करंबेळकर दामोदर सदाशिव
सिनकर बाळकृष्ण अप्पाजी
लागू नारायण गंगाधर
करंदीकर भास्कर गोविंद
चिंतामण सखाराम देवळे
बाक्रे पांडुरंग महादेव
काळे त्र्यंबक गुरुनाथ
जोगळेकर गंगाधर नारायण
पंडित सखाराम अनंत
ढापरे शंकर धोंडो
जोशी गोविंद विनायक
गोडबोले वासुदेव गणेश
चक्रदेव लक्ष्मण वासुदेव
पाटणकर गणेश विष्णु
पेंडसे बापू रामचंद्र
बापट मोरेश्वर नारायण
वाडेकर पांडुरंग गंगाधर
कीर्तने बाळकृष्ण केशव
कुलकर्णी शिवराम जिवाजी
करंदीकर वामन दिनकर
कुलकर्णी नारायण पुरुषोत्तम
मनोहर कृष्णाजी रघुनाथ
होनप महादेव गणेश
देशपांडे नारायण रामचंद्र
कुवळेकर विष्णु श्रीधर
जोशी गोपाळ नारायण
सहस्रबुद्धे महादेव नारायण
वझे गोपाळ दिवाकर
पित्रे श्रीधर विनायक
जोगळेकर भालचंद्र नारायण
जाग नारायण रामचंद्र
रानडे विनायक गोविंद
केळकर नरहर कृष्ण, बी. ए.
गोखले दामोदर विश्वनाथ, बी. ए., एल्एल्. बी.
भिडे हनमंत बल्लाळ, बी. ए.


[वरील शिक्षकांचा सेवाकाल निश्चित माहीत नाहीं.]

अगस्ति वामन भास्कर, पी. एस्.	१९१३–२०
अत्रे हरि नारायण, तालीम मास्तर	१९१९–२०
अत्रे दामोदर विनायक, ३ पी. एस्.	१९१८–२८
अध्ये केशव पांडुरंग	१९१४–१५
अध्ये पांडुरंग केशव	१९०१–०८
अनगळ गोपाळ चिंतामण, बी. ए.	१९१७–२१
अभ्यंकर अनंत बाळकृष्ण	१९१२–१७
अरेकर हरि रघुनाथ, एस्. एफ्.	१९०९–११
आगाशे चंद्रशेखर गोविंद, आय्. ई.	१९१२–१५
आगाशे दिगंबर काशिनाथ, बी. ए.	१९१२–१३

आगाशे सखाराम काशिनाथ, बी. ए.	१९१६–१८
आठल्ये एल्. एस., बी. ए.	१९२९–३२
आठवले दत्तात्रय त्रिंबक, एल्. एम्. एस्. (नॅशनल)	१९१८–२१
आठल्ये दामोदर बैजनाथ, बी. ए.	१९१३–१६
आपटे अनंत विठ्ठल, आय्. इ.	१९१२–१५
आपटे चिंतामण गोविंद, मॅट्रिक	१९१३–१७
आपटे त्रिंबक रामचंद्र, मॅट्रिक, एस्. एफ्.	१९१२–२१
आपटे यशवंत विठ्ठल, पी. ई.	१९१८–
आपटे वासुदेव गोविंद बी. ए.	१८९८–१९११
आपटे विनायक गणेश, बी. ए.	१८९५–१९१६
आपटे सखाराम विनायक, एम्. ए., बी. एससी.	१९०९–१०
आंबेकर व्ही. टी., बी. ए.	१९२७–३१
इनामदार विष्णु महादेव, व्ही. टी.	१९१२–१३
ओतूरकर रामचंद्र विनायक, एम्. ए., एस्. टी. सी.	१९२१–२६
कमळापूरकर पुरुषोत्तम शंकर, बी. ए.	१९२३–२४
करमरकर र. दा., एम्. ए.	१९१६–१९
करमरकर रामचंद्र दामोदर, बी. ए.	१९१२–१३
करमरकर विश्वनाथ भालचंद्र, क्लार्क	१९१८–१९
करंदीकर जे. जी., बी. ए.	१९२९–३१
करंदीकर महादेव लक्ष्मण, मॅट्रिक	१९१९–२०
कवडे त्र्यंबक रामचंद्र	१९१९–२५
करंदीकर शिवराम लक्ष्मण	१९२४–२६
कवलगीकर रामचंद्र शेषाचार्य, बी. ए.	१९२२–२४
कळबणकर व्ही. आर.	१९२८–
कडूस्कर एकनाथ नरहर, एम्. ए.	१९१३–१५
कानडे एस्. जी., एम. ए., एस्. टी. सी.	१९२९–३०
कवडे के. पी., बी. ए., बी. टी.	१९२६–
कानिटकर गजानन नारायण, बी. ए.	१९०९–१५
कानिटकर बी. एम्., बी. ए., एल्एल्. बी.	१९२८–२९
कापड बामन बळवंत, लायब्रेरीयन	१९११–१८
कात्रजकर सदाशिव सखाराम, क्लार्क	१९१९–२३
काळे मोरेश्वर गोपाळ	१९१८–
कुडेकर गोविंद बळवंत, बी. ए.	१९१३–१६


नूतन मराठी विद्यालय–इंग्रजी शाळा

शिक्षकवर्ग १४–११–१९०३



बालोद्यान प्रेस, पुणें.

नूतन मराठी विद्यालय–मराठी शाळा
शिक्षकवर्ग १४–११–१९०३




बालोद्यान प्रेस, पुणें.

कुलकर्णी अनंत विनायक	१९३१–
कुलकर्णी आबाजी कृष्ण, पी. एस्. सी.	१८८५–१९३१
कुलकर्णी आबाजी दत्तात्रय, पी. सी.	१९०५–२२
कुलकर्णी के. के.	१९३१–
कुलकर्णी कृष्ण बल्लाळ	१९१३–१५
कुलकर्णी कृष्णाजी विरूपाक्ष, बी. ए.	१९०७–८
कुलकर्णी गोपाळ गोविंद, बी. ए., एस्. टी. सी.	१९२८–
कुलकर्णी दत्तात्रय गोपाळ, बी. ए.	१९३०–३१
कुलकर्णी नरहर परशुराम	१९१०–११
कुलकर्णी पांडुरंग विनायक, पी. सी.	१९०६–
कुलकर्णी पिलाजी लक्ष्मण, मॅट्रिक	१९१५–२१
कुलकर्णी प्रल्हाद पंढरीनाथ	१९१९–२०
कुलकर्णी भालचंद्र नारायण	१९१३–
कुलकर्णी मार्तंड हरि, आय्. ई.	१९२०–२४
कुलकर्णी एम्. एम्.	१९३१–
कुलकर्णी रंगनाथ विठ्ठल	१८८७–१९३२
कुलकर्णी श्रीधर केशव	१९०९–१०
कुलकर्णी हणमंत कृष्ण	१९२०–
केतकर दत्तात्रय व्यंकटेश, आय्. ई.	१९१७–१९
केळकर विश्वनाथ गोविंद, बी. ए.	१९११–
कोंडेजकर व्ही. के., सेकंड इयर, टी. सी.	१९२८–३२
कोरेगांवकर कृष्णाजी महादेव, ड्रॉइंग	१९१५–१९
कोरे वामन बयाजी	१९१९–२०
खरे पांडुरंग विष्णु, मॅट्रिक	१९०६–१५
खरे रघुनाथ विठ्ठल, एफ्. वाय्. एस्. एफ्. सी	१९३०–३२
खळदकर चिंतामण अनंत, कॉपी मास्तर	१९१७–
खांडेकर वासुदेव नारायण, पी. एस्.	१९९३–३१
खानबेलकर रामचंद्र कृष्ण	
खासनीस नारायण ग., मॅट्रिक	१९१५–१६
खेडकर विठ्ठल वामन, पी. सी.	१९१२–१९
खेडलेकर जी. व्ही., बी. एस्सी., एल्एल्. बी.	
गर्गे शंकर काशिनाथ	१९१५–३१
गर्दे गोविंद महादेव, बी. ए.	१९०८–११

गरुड बळवंत गोपाळ	१९३१–
गलांडे दत्तात्रय अनंत	१९१८–१९
गाडगीळ पी. के.	१९२९–३२
गुप्ते महादेव खंडेराव, बी. एस्सी.	१९११–१२
गुणे वामन भालचंद्र, बी. ए.	१९२९–
गुळवणी व्ही. डी., ड्रॉईंग मास्तर	१९२९–३२
गोखले गणेश बाळाजी	१९१०–११
गोखले दामोदर नारायण, बी. ए.	१९११–
गोखले नारायण दत्तात्रय	१९१४–१६
गोखले महादेव हरि, एम्. ए.	१९०७–८
गोखले रामचंद्र जनार्दन, आय. ई.	१८९६–१९१५
गोखले विष्णु दत्तात्रय, एम्. ए.	१९११–१३
गोखले विष्णु नारायण, बी. एजी.	१९१६–१९
गोखले शंकर दत्तात्रय, बी. एससी.	१९१६–१८
गोवित्रीकर वामन वासुदेव, आय. ई.	
गोंधळेकर व्ही. एन्., एस्. टी. सी.	१९३०–
गोडबोले गोपाळ सदाशिव, पी. ई., एस्. टी. सी.	१८९९–
गोडबोले गंगाधर विनायक	
गोडबोले गोविंद बळवंत, मॅट्रिक	१९१०–११
गोडबोले ग्यं. अ., एफ्. वाय्.	१९३१–३२
गोडबोले विनायक जनार्दन, मॅट्रिक	१९०७–१०
गोडबोले विठ्ठल गणेश	१९१५–३०
गोडबोले विश्वनाथ गणेश, बी. ए.	१९३१–
गोडबोले शंकर गोपाळ, बी. ए.	१९२५–३१
गोडबोले व्ही. के.	१९२९–३०
गोडबोले वा. गो. बी. ए., बी. टी.	१९२८–३२
घाणेकर विठ्ठल वामन, बी. एस्सी.	१९०७–८
घाणेकर शंकर वामन, बी. ए.	१९०९–१०
घारपुरे दत्तात्रय रामचंद्र, एम्. ए., बी. एस्सी.	१९१३–१८
घारपुरे एन्. के., एम्. ए., एम्. टी. सी.	१९२८–३०
घारपुरे वामन हरि, एम्. ए., एस. टी. सी.	१९१९–२५
घोरपडे आर. एस., एस्. टी. सी.	१९३०–
चाफेकर जी. एन्., एम्. ए.	१९२९–

नूतन मराठी विद्यालय–मराठी शाळा


शिक्षकवर्ग १९२६



बालोद्यान प्रेस, पुणें.

नूतन मराठी विद्यालय–मराठी शाळ

शिक्षकवर्ग.




बालोद्यान प्रेस, पुणें.

चाफेकर गणेश हरि	१८८५–१९०८
चिंचणीकर सदाशिव महादेव, मॅट्रिक	१९१६–१९
चित्राव गोविंद त्रिंबक	१९०६–
चितळे पांडुरंग नरहर, पी. ई.	१९१६–१७
चितळे व्ही. व्ही., मॅट्रिक	१९०३–१७
चिपळूणकर दामोदर रामचंद्र	१९११–१७
चिपळूणकर हरि वामन	१९२८–
जुवेकर नारायण विष्णु, पी. एस्.	१९१९–२२
जेरे कृष्णाजी महादेव पी. सी.	१९१२–
जोगळेकर एम्. डी.	१९३१–३२
जोशी जनार्दन नरहर, व्ह. फा.	१९१२–३२
जोशी यशवंत गोपाळ, बी. ए.	१९१४–१७
जोशी पांडुरंग नारायण, पी. एस्.	१९१३–१५
जोशी वामन काशिनाथ	१९३१–
जोशी विनायक गणेश, थर्ड ड्राइंग	१९२६–२८
जोशी विनायक रामचंद्र, बी. ए.	१९१६–२९
जोशी शंकर नारायण,	१९१२–३२
जोशी हरि कृष्ण, एफ्. वाय्.	१९०९–१३
जोशी त्र्यंबक केशवराव, बी. ए.	१९२५–२६
जोशी गोपाळ बळवंत, एस्. एफ.	१९१२–१३
जोशी गोविंद नारायण पी. एस्.	१९१३–१९
जोशी दत्तात्रेय केशव, पी. एस्.	१८९९–२९
जोशी दत्तात्रय गणेश एम्. ए.	१९२४–२५
जोशी दत्तात्रय परशुराम, बी. ए.	११२२–२४
जोशी दत्तात्रय विनायक, व्ही. एफ.	१९१४–१७
जोशी कृष्णाजी विष्णु एम्. ए.	
जोशी गोपाळ परशुराम, एल्. सी. पी. एल्. एस्.	१९३०–
जोशी जनार्दन महादेव	१९०९–१०
जोशी जी. एम्., बी. ए., एस. टी. सी.	१९२९–३०
जोशी नारायण विष्णु	
टिकेकर गोविंद चिंतामण, थर्ड आर्ट टी. सी.	१९०५–१७
टिल्लू जगन्नाथ रावजी, बी. ए.	१९१२–१३
टिळक दत्तात्रय बळवंत, बी. ए.	१९१२–१३

ठकार बामन रघुनाथ, बी. ए.	१९१८–२०
ठकार विष्णु रघुनाथ बी. ए	१९१८–१९
ठकार शंकर रघुनाथ, बी. ए.	१९१९–२०
ठाकूरदेसाई दत्तात्रय महादेव, मॅट्रिक	१९१३–१५
ठोसर व्ही. व्ही., मॅट्रिक, एस्. टी. सी.	१९२९–३२
डोंगरे कृष्णाजी बल्लाळ, पी. सी.	१८८३–१९२२
डोंगरे गणेश हरि, पी. एस्सी.	१९१२–१३
डोंगरे गोविंद हरि	१९०९–१०
ढवळीकर गणेश व्यंकटेश, बी. ए.	१९०७–८
ढवळे गणेश विनायक, आय्. ई.	१९१०–११
ढवळे नरहर सीताराम, पी. ई.	१९०८–
ढवळे रामचंद्र गणेश, बी. ए.	१९१३–१६
ढेकणे यशवंत विष्णु, लायब्रेरीयन	१९१९–२२
तट्टू बिठ्ठल वासुदेव	१९०९–१०
तिळवणकर, एल्. जी.	१९३१–३२
तुळपुळे हरि विठ्ठल, बी. ए., एल्एल्. बी.	१९१३–१८
तेलंग रामेश्वर गंगाधर, बी. ए.	१९०७–३०
तांबोळकर सखाराम भीवराव, बी. ए., एल्. सी. ई.	१९१०–११
दळवी गोविंद हैबत, आय. ई.	१९१९–२०
दाणी न. शि., कारकून	१९२५–
दाणी शिवराम लक्ष्मण, मॅट्रिक	१९००–१५
दातार व्ही. के., बी. ए., एल्एल्. बी.	१९३०–
दाते परशुराम रामचंद्र, आय. ई.	१९०७–८
दाबके एन्. जी., तालीम शिक्षक	१९२८–२९
दाबके रामचंद्र महादेव, मॅट्रिक	१९१५–१६
दांडेकर शं. वा.	१९२०–
दामले डी. डी., बी. एस्सी.	१९२८–२९
दिगंबर गोविंद बळवंत	१९०७–८
दीक्षित शिवराम विष्णु, व्ह. फा.	१९०२–२८
दुमाले राजाराम अनंत, मॅट्रिक, एस्. टी. सी.	१९१५–
देउस्कर लक्ष्मण विनायक, आय्. ई.	१९१२–१३
देव रामचंद्र गोपाळ, पी. सी.	१८८३–१९१७
देव विनायक लंबोदर	१९२८–३१

नूतन मराठी विद्यालय–इंग्रजी शाळा


शिक्षकवर्ग १९३२



बालोद्यान प्रेस, पुणे.

नूतन मराठी विद्यालय इंग्रजी शाळा

शिक्षकवर्ग १९३२



बालोद्यान प्रेस, पुणें.

देवगिरकर दत्तात्रय रामचंद्र, पी. ई., एस्. टी. सी. १९१४–
देवघर दिनकर बळवंत, एम्. ए. १९१७–
देवघर महादेव दत्तात्रय १९२५–२६
देवघर शंकर दत्तात्रय १९२०–३२
देशपांडे कृ. रामचंद्र, बी. ए., एल्. सी. ई. १९१०–११
देशपांडे केशव दासो, बी. ए. १९०७–८
देशपांडे दत्तात्रय संभाजी, ताल्लीममास्तर १९०७–८
देशपांडे दिगंबर श्रीपाद १९०७–८
देशपांडे शंकर गोविंद १९०७–१०
देशपांडे कृष्णाजी रामचंद्र, बी. ए. १९१२–१३
देशपांडे नारायण रामचंद्र, आय्. ई. १९०७–०८
देशपांडे मल्हार यशवंत, लायब्रेरीयन १९२२–२३
देशपांडे एस्. जी., बी. ए. १९२९–३१
देशमाने शंकर लक्ष्मण, बी. ए., एस्.टी. सी. १९१८–
देशमुख जी. के., बी. ए., एस्. टी. सी., १९३०–
देशमुख प्रल्हाद रामचंद्र १९१९–२०
देवरुखकर चिंतामण गोपाळ, बी. ए. १९१२–१३
देवरुखकर मंगेश गोपाळ, पी. ई., एस्. टी. सी. १९१२–३१
द्रवीड श्रीनिवास नारायण, आय्. ई. १९१९–२३
घारप काशिनाथ नारायण, बी. ए. १९१७–१९
घाले‌वाडीकर गंगाधर पंढरीनाथ, आय्. ई. १९१०–२१
नवाथे रामचंद्र पांडुरंग
नवाथे शंकर गणेश, बी. ए. १९१७–
नाईक दामोदर विठ्ठल, आय्. ई. १९१७–१८
नागले जनार्दन अनंत, से. टी. सी. १९१७–१८
नातू मोरेश्वर नारायण, बी. एससी., एम्. बी. बी. एस्. १९२९–
नातू गोपाळ शंकर, मॅट्रिक १९१३–१५
नारळकर नारायण गणेश, एम्. ए., एल्. टी. १९१७–२७
निगडे राम हरि, ड्रिल शिक्षक १९१५–१७
निगूडकर आत्माराम गोविंद, आय्. एस्.सी. १९०७–०८
निंबकीकर गोपाळ श्रीनिवास, मॅट्रिक, एस्. टी. सी. १९१३–
निसळ बळवंत तुकाराम १९०१–१२
नूलकर गोराळ अनंत, आय्. ई. १९१२–१३

नेने हरि नारायण, बी. ए.	१९१३–१६
पटवर्धन गोविंद परशुराम, एम्. ए.	१९१६–२०
परांजपे कृष्ण गणेश, एम्. ए., बी. टी.	१९२६–
परांजपे बाळकृष्ण बळवंत, बी. ए.	१९१०–३०
परांजपे भास्कर हरि, व्ह. फा.	१९१५–२८
परांजपे महादेव रामचंद्र, एम्. ए., बी. एस्सी.	१९२४–
पाठक गोविंद महादेव, व्ह. फा.	१९१७–१८
पाडगांवकर नारायण जगन्नाथ	१९१२–१३
पानसे जी. बी., बी. ए., एल्एल्. बी.	१९३०–३२
पानसे ना. स., बी. ए.	१८९१–९२
पाटणकर शिवराम भिकाजी, पी. सी.	१९१०–१३
पानवलकर हरि अनंत, बी. ए., एस्. टी. सी.	१९१५–१७
पारमेकर सखाराम बापू	१९१७–१८
पाध्ये प्रल्हाद गोविंद, एम्. ए.	१९१५–३१
पुराणिक रामचंद्र बापूजी	१९१९–२३
पुरोहित दत्तात्रय गणेश	१९१५–
पुणेकर एस्. एन्., एम्. ए., एल्एल्. बी.	१९२९–३०
पेठे गोविंद विष्णु, एम्. ए., एस्. टी. सी.	१९२४–२७
पेंडसे सीताराम बाळकृष्ण, मॅट्रिक, एस्. टी. सी.	१९०१–८ व १९१५–१९
पोतदार दत्तो वामन, बी. ए.	१९१२–
पंडितराव हरि बळवंत	१९१२–
फडके कृष्णाजी केशव	१८९९–१९११
फडके दत्तात्रय गोपाळ, बी. ए.	१९१४–१६
फडके नारायण सीताराम, एम्. ए.	१९१६–२०
फडके रघुनाथ भिकाजी, एम्. ए., एल्एल्. बी.	१९२९–३१
फणसळकर वामन महादेव, कारकून	१९१८–२०
फणसळकर विनायक गणेश	१९१०–११
फणसे एन. जे., पी. ई.	१९३०–
पतकी भीमराव रामचंद्र	१९३१–३२
परचुरे वामन वासुदेव., बी. ए.	१९१०–११
प्रधान बाळकृष्ण रामचंद्र, बी. ए.	१९०७–०८
फाटक गोविंद महादेव	१९१५–१६


फाटक रामचंद्र सदाशिव, बी. ए.	१९१९–२०
फाटक वासुदेव यशवंत	१९१५–२०
फाटक यशवंत बळवंत, मॅट्रिक	१९१४–२२
पाध्ये विठ्ठल वासुदेव	१९३१–
पिंपुटकर सदाशिव विष्णु	१९०९–१०
पिल्ले आर्. एन्., बी. ए.	१९३१–३२
पुरंदरे बळवंत पांडुरंग	१८९०–१९१२
पुरुषे गोविंद जयराम	१९०७–०८
पोफळे गो. ल., एम्. ए. (केंब्रिज), बार-ॲट-लॉ.	१९३०–
बडवे व्ही. ए.	१९२९–३१
बनछोड दत्तात्रय व्यंकटेश, मॅट्रिक, एस. टी. सी.	१९१३–१७
बबरे विठ्ठल कृष्ण, बी. ए., एल्एल्. बी.	१९३०–
बर्वे मदादेव केशव, बी. ए.	१९२३–
बर्वे विश्वनाथ वैजनाथ, मॅट्रिक, एस. टी. सी.	१९१८–२०
बापट गणेश गोविंद, पी. एस्. सी.	१८८७–१९३२
बापट दत्तात्रय काशिनाथ, कारकून	१९१०–१६
बापट प्रभाकर वासुदेव, एम्. ए., बी. टी.	१९२९–३२
बापट रंगनाथ रघुनाथ	१९०७–०८
बापट विष्णु हरि, पी. एस्.	१९०६–२०
बापट एस्. एस्.	१९३१–३२
बाबडेकर व्ही. जी., पी. ई.	१९३१–३२
बेन्द्रे परशुराम बल्लाळ	१९०९–१०
बेलवलकर नारायण मोरेश्वर	१९१५–१७
बोकील टी. एस.	१९२९–३१
भणगे अनंत मोरेश्वर, एफ्. वाय्.	१९२५–
भदे व्यंकटेश लक्ष्मण, हिशेबनीस	१९२१–२५
भागवत गणेश शंकर मॅट्रिक, एस्. टी. सी.	१९१४–३२
भागवत डी. एन्., बी. ए.	१९३१–
भागवत पंढरिनाथ नारायण	१९०९–१०
भागवत भालचंद्र नीलकंठ, बी. ए.	१९११–१२
भागवत एम्. एन्.	१९२८–२९
भानु परशुराम रामचंद्र, आय्. ई. एस्. टी. सी.	१९१४–
भालेराव गजानन जनार्दन	१९१०–११

भालेराव श्रीधर गणेश, बी. एजी.	१९१५–१९
भावे गोविंद बाळकृष्ण	१९१४–१९
भावे विश्वनाथ विद्याधर, मॅट्रिक	१९१८–
भावे विष्णु वामन, आय्. ई.	१९०९–१०
भिंगे विष्णु बापूराव, बी. ए., एल्एल्. बी.	१९१८–२५
भिडे भालचंद्र वामन, पी. ई.	१९१२–१३
भिडे रामचंद्र रघुनाथ, मॅट्रिक	१९१५–१८
भिडे विद्याधर वामन, बी. ए.	१९१३–२०
भिडे सदाशिव दामोदर, मॅट्रिक, स्कूल फायनल	१९१५–
भिडे हणमंत बाळाजी, एम्. ए.	१९०९–१०
भोमे श्रीधर बळवंत, व्ह. फा.	१९१४–
मराठे डी. के., बी. ए.	१९३१–३२
मराठे शंकर गोपाळ, बी. ए.	१९२४–२५
मराठे श्रीधर राजाराम	१९१३–१५
मराठे श्रीधर रामचंद्र, बी. ए.	१९१०–११
मंत्री श्रीकृष्ण विश्वासराव	१९०७–११
महाजन सीताराम नरहर	१९०४–१०
माटे शंकर दत्तात्रय, आय्. ई.	१९१७–१८
माटे श्रीपाद महादेव एम्. ए., एस. टी. सी.	१९२१–
मांदुस्कर भिकाजी मोरेश्वर, मॅट्रिक, पी. सी.	१९०९–
मिरजकर मु. ग.	१९१५–
मेंडजोगे एन्. व्ही.	१९२८–२९
मोकाशी गोविंद बळवंत	१९०९–१०
मोकाशी रामचंद्र नारायण, पी. सी.	१९१२–१३
मोकाशी वामन बळवंत	१९०९–
मोखडकर गोविंद वामन, टी. सी.	१९१९–२०
मोघे गणेश गोविंद, पी. सी.	१९११–१४
मोडक गणेश विष्णु	१९०७–०८
मोडक गोविंद अनंत	१९२१–३२
मोडक गोविंद कृष्ण, आय्. ई.	१९०७–०८
मोने काशिनाथ वामन	१९२२–३२
मोहोळकर वासुदेव नारायण, बी. ए.	१९०९–१०
येरवडेकर कृष्णाजी गणेश, बी. ए.	१९३०–३२

येवले पुंडलीक रामजी	१९१५–१८
रणदिवे शातांराम सदाशिव	१९१२–१३
रसाळ भगवंत नीलकंठ	१९१३–१५
राजवाडे नारायण शंकर	१९०७–०८
राजे बाय. बी., बी. एससी.	१९२९–३१
राजोपाध्ये दामोदर गोपाळ, थर्डग्रेड ड्रॉइंग	१९११–१३
राजोपाध्ये रघुनाथ गोपाळ, मॅट्रिक	१९१०–११
रानडे नारायण हरि	१९१०–११
रानडे नारायण विठ्ठल, मॅट्रिक	१९१५–१६
रानडे महादेव आबाजी, बी. ए.	१९१३–१६
रानडे वामन गोविंद, ड्रॉइंग शिक्षक	१९१८–
रानडे विष्णु आबाजी, पी. ई.	१९०७–०८
रायरीकर रामचंद्र गोपाळ, मॅट्रिक	१९१३–३०
रायरीकर गोविंद गोपाळ, कॉपी शिक्षक	१९१५–३१
लहू ज्ञानेश्वर कृष्ण, मॅट्रिक	१९१५–१८
लागू गोपाळ रघुनाथ, आय्. ई.	१९१७–१९
लाळे गणेश रामचंद्र	१९१९–
लिमये महादेव रामचंद्र, मॅट्रिक, एस्. टी. सी.	१९२९–
लिमये दत्तात्रय परशुराम, बी. ए.	१९१७–२५
लेले गंगाधर बल्लाळ	१९१९–२०
लेले जी. आर्.	१९२९–३०
लेले भालचंद्र लक्ष्मण, बी. ए., एल्एल्. बी.	१९२२–२३
लेले लक्ष्मण गणेश, मॅट्रिक	१८९८–१९३२
लोंढे दामोदर गणेश, एम्. ए.	१९१९–२१
लोणकर गणेश हरि, प्रथमवर्ष	१९१३–
लोहोकरे कृष्णाजी गोविंद, बी. ए.	१९०९–१३
लोहपात्रे विष्णु लक्ष्मण, आय्. ई.	१९१९–२०
वर्तक नारायण रामचंद्र	१९०७–०८
वर्टीकर नारायण रामचंद्र	१९०९–
वाघ गंगाधर अमृत, मॅट्रिक, एस्. एफ्.	१९१२–१३
वाड बी. व्ही., बी. ए.	१९३१–
वाडेकर रामचंद्र बापूराव, अक्षरशिक्षक	१९१२–
वाटवे केशव नारायण, एम्. ए., एस्. टी. सी.	१९२३–


बार्शीकर महेश्वरशास्त्री	१९१४–१६
बाणी आर्. के., बी. ए., एल्एल्. बी.	१९३०–३१
बैद्य घोंडो गोविंद, आय्. ई.,	१९०८–
बैद्य मुरलीधर देवराव, द्वितीयवर्ष, टी. सी.	१९२१–
बैद्य चिंतामण बळवंत, मॅट्रिक	१९१३–२२
श्रीखंडे रामचंद्र गोविंद, बी. ए.	१९२३–२९
श्रीखंडे लक्ष्मण गोविंद	१९२३–२९
शिंदे गणू कोंडिबा, ड्रिल शिक्षक	१९१२–१६
शिंदेकर श्रीराम गणेश	१९२३–२७
शिंदोरे गोविंद पंढरीनाथ, बी. ए.	१९०९–१९
शिराळकर एल्. बी.	१९२८–२९
शेकटकर अनंत घोंडीबा	१९२२–
शेकटकर कुमारी वासंतिकाबाई	१९२५–२९
शेंडे विनायक बळवंत पी. एस्. सी.	१८८५–१९१७
शेणोलीकर आत्माराम शंकर, आय्. ई.	१९१५–२१
शृंगारपुरे मार्तंड आत्माराम	१९१०–१२
सबनीस जनार्दन रामकृष्ण, मॅट्रिक	१९०९–१५
सबनीस रा. प., एम्. ए. (केंब्रिज)	१९१६–३०
सबनीस परशुराम सीताराम	१९१९–३२
सरनाईक दत्तात्रय सखाराम	१९३१–
सरदेसाई गंगाधर त्रिंबक, ब्ह. फा.	१९२०–२१
सहस्रबुद्धे गंगाधर नीलकंठ, बी. ए.	१९१०–११
सहस्रबुद्धे दामोदर महादेव	१९११–१२
सहस्रबुद्धे पुरुषोत्तम गोविंद, एम्. ए.	१९२८–
सहस्रबुद्धे महादेव गोविंद, बी. ए.	१९११–१३
सहस्रबुद्धे महादेव नारायण, एस. एफ्.	१९०७–०८
साठे आत्माराम भास्कर,	१९१६–२२
साठे दत्तात्रय लक्ष्मण, ब्ह. फा.	१९०१–
साठे राजाराम दत्तात्रय कारकून	१९२६–
साठे हरि विठ्ठल, ब्ह. फा.	१९०७–११
साने गंगाधर रामचंद्र, बी. ए.	१९१९–२६
साने पी. व्ही., पी. ई.	१९२८–३२
साने पी. आर.	१९३१–

नूतन मराठी विद्यालय–इंग्रजी शाळा
शिक्षकवर्ग १९२०–२१



बालोद्यान प्रेस, पुणें.

नूतन मराठी विद्यालय–इंग्रजी शाळा
शिक्षकवर्ग १९२६



बालज्ञान प्रेस, पुणे.

साने रामचंद्र गोविंद, बी. ए. सरकारकून	१९१६–३२
साळवेकर	१९२८–३०
सोमण गणेश कृष्ण,	१९२९–३१
सोमण बी. पी.	१९१८–३१
सोमण बासुदेव लक्ष्मण, पी. सी.	१९१६–२१
सोहोनी विनायक कृष्ण, आय्. ई.	१९१२–१३
सोमण जी. एस्, बी. एस्सी.	१९३०–३२
हगवणे नारायण महादेव, बी. ए., ड्रिलशिक्षक	१९२१–२५
हर्डीकर त्र्यंबक भिकाजी, एम्. ए.	१९१३–
हिंगणेकर गोविंद रामचंद्र	१९११–१२
हेर्लेकर के. व्ही., बी. एजी., बी. टी.	१९३१–
हेर्लेकर महादेव विष्णु	१९०३–१२
क्षीरसागर कृष्णाजी विठ्ठल, पी. सी.	१९१०–२०

नूतन मराठी विद्यालय हायस्कूल

विद्यार्थ्यांची संख्या, सरकारी मदत व फी यांचे सालवार आकडे

वर्ष	३१ मार्च रोजीं पटावरील मुलांची संख्या*			सरकारी ग्रँट	फी आकार	शि. प्र. मंडळाची व इतर देणग्या व क्वचित् ठिकाणीं म्युनिसिपल ग्रँट	एकूण जमा रक्कम	प्रत्येक विद्यार्थ्याकरितां सालीना खर्च
	हायस्कूल	मिडल् स्कूल	एकूण					
१८८९–९०	५८	२३६	२९४		२१९२	३२१	२५१३	८–८–४
१८९०–९१								
१८९१–९२	९३	२८२	३७५		३०६३	३०	३०९३	९–०–१
१८९२–९३	१०४	३११	४१५		३९८६	२०२	४१८८	११–२–८
१८९३–९४	१३१	३३९	४७०		४१७०	१७४	४३४४	९–९–१
१८९४–९५	१६१	३५९	५२०		५२२१	१८९	५४१०	१०–५–९
१८९५–९६	२०६	३८२	५८८		६६७७	१०१५	७६९२	१३–४–२
१८९६–९७					७२१९	९६४	८१८३	
१८९७–९८	१०९	११३	२२२		३५२१	८७१	४३९२	१०–५–४
१८९८–९९	२१८	२८४	५०२		७०११	३१३	७३२४	१४–५–७

* ज्या वर्षी प्लेगमुळें शाळा या तारखेस बंद होती, त्या वर्षी विद्यार्थ्यांचें सरासरी मान दिलें आहे.

१८९९–१९००														
१९००–०१														
१९०१–०२														
१९०२–०३														
१९०३–०४														
१९०४–०५														
१९०५–०६														
१९०६–०७														
१९०७–०८														
१९०८–०९														
१९०९–१०														
१९१०–११														
१९११–१२														
१९१२–१३														
१९१३–१४														
१९१४–१५														
१९१५–१६														
१९१६–१७														
१९१७–१८														
१९१८–१९														

१९१९–२०	१४५७			१४७४८	३२३२०	१८०२		४८८७०			
१९२०–२१	१६९८			१५६६७	४२७८४			५८४५१			
१९२१–२२	१५७०			२१३९१	४१७१५			६५३९१			
१९२२–२३	१३७२	११३	६५९	१८८९५	४१९४८	२२८५		६३२२८	४०		
१९२३–२४	१४०२	१२०	६८२	२२८८०	४१४५४	२२८५		७१७१३	५५		
१९२४–२५	१४८९	१४७	७४२	२४०५३	४०७७०	७३७९		७२२७३	५०		
१९२५–२६	१५४३	१२९	८२४	२४०२४	५५९६३	७४५०		८०४९०	५२		
१९२६–२७	१७४९			२५७४८	५०६००	२०५०३		९०६५७			
१९२७–२८	१८५२			२४६५५	५५२६२	२४२९९		९०७४६			
१९२८–२९	१८०८			२४१२३	६२९९६	२०८३०		९०७४५			
१९२९–३०	२३८७०	७३३	२०३७	२८११०	६४९६५	३५५७	३८७	८९२२२	५०		
१९३०–३१	१७५५			२४८३१	६४२९९	२००१		९१२३२			
१९३१–३२	१७६५			२४१४०	६२६७२	१९४८		८८७६०			

नूतन मराठी विद्यालय, मराठी शाळा

विद्यार्थ्यांची संख्या, सरकारी मदत व फी यांचे सालवार आंकडे

वर्ष	३१ मार्च रोजीं पटावरील मुलांची संख्या*			सरकारी ग्रँट	फी आकार	शि. प्र. मंडळीची व इतर देणग्या व क्वचित् ठिकाणीं म्युनिसिपल ग्रँट	एकूण जमा रक्कम	प्रत्येक विद्यार्थ्या-करितां सालीना खर्च
	अपर प्रायमरी	लोअर प्रायमरी	एकूण					
सन १८८३–८४ पासून १८९१–९२ पर्यंतचें आंकडे उपलब्ध नाहींत.								
१८९२–९३	२९३	१८६	४७९	९४७	१७७७	६६१	३३८५	७–४–०
१८९३–९४	३३७	२०१	५३८	११२८	१९४२	४१२	३४८२	६–१०–११
१८९४–९५	६९	५९	१२८	२०६	३५७	१७२	७३५	६–०–४
१८९५–९६	३०५	१७८	४८३	१३३६	१८४२	१०२७	४२०५	८–१–४
१८९६–९७	२८४	१८९	४७३	१४०२	१५८८	१३१०	४३००	८–१०–२
१८९७–९८	१०१	४७	१४८	१४२७	७९१	१२६१	३४७९	९–६–५
१८९८–९९	२७७	२००	४७७	१०२६	१४०४	१८२६	४२८६	९–१४–९
१८९९–१९००	२३३	१९५	४२८	१४२७	७०६	१५१८	३६८१	९–५–६

* ज्या वर्षी प्लेगमुळें शाळा या तारखेस बंद होती, त्या वर्षी विद्यार्थ्यांचें सरासरी मान दिलें आहे.

| | | |

१९२०–२१	५५८	३०४३	७	३३८	३५८	९१६	९१६	९१६	९१६	९१६	९१६
१९२१–२२	५५०	३३०६	६०	३८७०	३५८	२०७६	२०७६	२०७६	२०७६	२०७६	२०७६
१९२२–२३	५०५	३५८९	४२०	४२२३	३५८	२२३१७	२२३१७	२२३१७	२२३१७	२२३१७	२२३१७
१९२३–२४	५०५	३७९९	४५०	४५५५	३५८	२२९९०	२२९९०	२२९९०	२२९९०	२२९९०	२२९९०
१९२४–२५	५०४		४७०	३७२०	३५८	२३३८७	२३३८७	२३३८७	२३३८७	२३३८७	२३३८७
१९२५–२६	५०७	४०१७	४८०	३८७६	३५८	२३६३०	२३६३०	२३६३०	२३६३०	२३६३०	२३६३०
१९२६–२७	५२५	४१५८	४८०	४२००	३५८	२३७७८	२३७७८	२३७७८	२३७७८	२३७७८	२३७७८
१९२७–२८	५२३	४२८३	४८०	४२२५	३५८	२३७२२	२३७२२	२३७२२	२३७२२	२३७२२	२३७२२
१९२८–२९	५२०	४२४०	४८०	४१४०	३५८	२३१०९	२३१०९	२३१०९	२३१०९	२३१०९	२३१०९
१९२९–३०	५२७	४२२०	४८०	४०६३	३५८	२३१२५	२३१२५	२३१२५	२३१२५	२३१२५	२३१२५
१९३०–३१	५२५	४२८३	४८०	४१२५	३५८	२३१९२	२३१९२	२३१९२	२३१९२	२३१९२	२३१९२
१९३१–३२	५२५	४२८३	४८०	४१२५	३५८	२३१९२	२३१९२	२३१९२	२३१९२	२३१९२	२३१९२

नू. म. विद्यालयांतील बक्षिसें व शिष्यवृत्त्या

इंग्रजी शाळा

१. विनायकराव आपटे बक्षीस (रु. ७५) युनिव्हर्सिटी परीक्षेंत पहिल्या दहांत पहिला येऊन सर परशुरामभाऊ कॉलेजांत जाणाऱ्या विद्यार्थ्यांस. देणारः विनायकराव आपटे पर्सफंड.

२. पराडकर बक्षीस (रु. १७॥) युनिव्हर्सिटी परीक्षेंत संस्कृतांत पहिला येऊन सर परशुरामभाऊ कॉलेजांत जाणाऱ्या विद्यार्थ्यांस. देणार : श्री. के. वि. पराडकर.

३. द. के. जोशी बक्षीस (रु. ९) मॅट्रिक्युलेशन-परीक्षेंत या शाळेंतील ब्राह्मण विद्यार्थ्यांत इतिहासांत पहिला येऊन सर परशुरामभाऊ कॉलेजांत जाणाऱ्या विद्यार्थ्यांस. देणार : द. के. जोशी.

४. इचलकरंजी बक्षीस (रु. ९) सहाव्या इयत्तेच्या परीक्षेंत पहिला येणाऱ्या सुवृत्त विद्यार्थ्यांस. देणारः श्रीमंत बाबासाहेब इचलकरंजीकर.

५. आनंद बक्षीस (सुमारें रु. ४) अस्पृश्य जातींतील उत्तम सुवृत्त विद्यार्थ्यांस. देणार : कै. बा. गो. आपटे

६. सगुणाबाई चितळे बक्षीस (रु. १५) सर्वतोपरी लायक अशा चित्पावन विद्यार्थ्यांस. देणार : श्री. वि. य. चितळे.

७. केशवराव रानडे बक्षीस (रु. १२) सहाव्या इयत्तेच्या वार्षिक परीक्षेंत गरीब ब्राह्मण मुलांत पहिला येणाऱ्या सुवृत्त विद्यार्थ्यांस. देणारः डॉ. ह. के. रानडे.

८. सत्यभामाबाई रानडे पाठांतर पारितोषिक (रु. १५) एक पदक इयत्ता १ व २ या वर्गांतील कोणत्याहि मुलास ऐतिहासिक व सामाजिक पोवाडे उत्तम म्हणण्याबद्दल. बाकीचीं पदकें शक्य तर वर्गांत भेंड्या लावून घेऊन, त्यांपैकीं जीं मुलें उत्तम कविता, श्लोक वगैरे म्हणतील त्यांस द्यावयाचीं. देणारः श्री. घ. कृ. रानडे.

९. चिंतामण पुरुषोत्तम रानडे बक्षीस (रु. २५) इंग्रजी इयत्ता ४, ५ अगर ६ मधील जो विद्यार्थी बौद्धिक व शारीरिक दृष्ट्या सर्वांत जास्त प्रगति दाखवील त्यास. देणार : श्री. पु. वि. रानडे.

१०. दत्तात्रय केशव रानडे बक्षीस (रु. १२५) अभ्यासांत अगर खेळांत प्राविण्य दाखविणाऱ्या दोन्ही प्रकारच्या विद्यार्थ्यांस, मे. व्यवस्थापक ठरवितील त्याप्रमाणें. देणार : व्ही. आर्. रानडे अॅड् सन्स्.

११. धारप बक्षीस (रु. ५) शाळेच्या विद्यार्थिसंघांत औद्योगिक शाखेंत प्रावीण्य दाखविणाऱ्यास. देणार : श्री. टी. व्ही. धारप.


१२. ना. शि. फाटक शिष्यवृत्ति (द. म. रु. ११) नू. म. वि. हायस्कूलमधील हुशार व लायक कोंकणस्थ विद्यार्थ्यांस, सुपरिंटेंडेंट निवड करतील. देणार : कै. ना. शि. फाटक.

कै. दत्तात्रय केशव रानडे, कॉंट्रॅक्टर
नूतन मराठी विद्यालयाचे पटावरील पहिले विद्यार्थी.




व्ही. आर. रानडे अँड सन्सनीं यांचे स्मरणार्थ सालिना सवाशें रुपयांची
बक्षिसें नूतन मराठी विद्यालयांत सन १९३१ पासून ठेविलीं आहेत.

बालोद्यान प्रेस, पुणें.



श्री. भिकाजी विनायक साठे बी. ए.
कंत्राटदार, सोलापूर
नू. म. वि. चे माजी विद्यार्थी
शि. प्र. मंडळीचे आश्रयदाते.



श्रीमंत माणेकचंद मोतीलाल ऊर्फ प्रतापशेट,
अमळनेर.
शि. प्र. मंडळीचे आश्रयदाते.

१३. यशोदाबाई फाटक शिष्यवृत्ति (द. म. रु. ४) मॅट्रिक वर्गातील लायक कोंकणस्थ ब्राह्मण विद्यार्थ्यांस. निवड व्यवस्थापकांकडे. देणार : श्री. यशोदाबाई फाटक.

१४. रा. ब. सी. वि. पटवर्धन शिष्यवृत्त्या (द. म. रु. ३) गरीब, लायक व सुवृत्त ब्राह्मण विद्यार्थ्यांस (मे. ए. इन्स्पेक्टर निवड करतील).

१५. पिल्ले-पोतदार शिष्यवृत्ति (द. म. रु. ३) इयत्ता ४ थी मधील कोणताहि विद्यार्थी जो शाळेची शिस्त राखणारा असून गरीब व गरजू असेल आणि अभ्यासक्रमाबाहेरील इतर ज्यास्त पुस्तकें वाचील त्यास. मे. व्यवस्थापक निवड करतील. देणार : रावसाहेब नारायणस्वामी पिल्ले.

१६. मो. वा. साठे शिष्यवृत्ति (द. म. रु. ३) पांचव्या इयत्तेच्या वार्षिक परीक्षेंत गरीब ब्राह्मण मुलांत पहिला येणाऱ्या सुवृत्त विद्यार्थ्यांस. देणार : कै. मोरोपंत साठे यांचे चिरंजीव.

मराठी शाळा

१. नारायण बक्षीस (रु. ५) देणार : श्री. जी. व्ही. घारपुरे.
२. दीक्षित बक्षिसें दोन (रु. ४ व रु. ३) देणार : कै. एस्. व्ही.दीक्षित.
३. शेंडे बक्षीस (रु. ५) देणार : कै. व्ही. बी. शेंडे.
४. पळसुले बक्षिस (रु. ५) देणार : डॉ. जी. एस्. पळसुले.
५. हिंगवे बक्षीस (रु. ५) देणार : श्री. एस्. एन्. पालखे.
६. सत्यभामाबाई रानडे बक्षिसें (रु. १५) देणार : श्री. ध. कृ. रानडे.

शिक्षण प्रसारक मंडळींचें कौन्सिल

अधिष्ठायक मंडळींतील सभासद (१८९५-९६)

१. डॉ. रामकृष्ण गोपाळ भांडारकर
२. रा. ब. नारायणभाई दांडेकर
३. रा. ब. श्रीराम भिकाजी जठार
४. रा. ब. विष्णु मोरेश्वर भिडे
५. रा. ब. विष्णु बाळकृष्ण सोहनी
६. रा. ब. माधवराव गोविंद रानडे
७. रा. ब. वासुदेव बापूजी कानिटकर
८. प्रो. बाळ गंगाधर टिळक
९. रा. रा. रामकृष्ण भिकाजी कुलकर्णी
१०. रा. रा. दामोदर सदाशिव करंबेळकर
